
# माणूस

१०/१७ ऑगस्ट ८५
५ रुपये

परिवर्तन विशेषांक






# 15
# ऑगस्ट

स्वातंत्र्याची ज्योत
आपल्या शूर देशबांधवांनी प्रज्वलित केलेली
आपल्या लाखों जनांच्या हृदयांत तेवणारी
वादळानं कोणत्याहि कधी विझेल का ?
हीच आहे ती प्रभा
जिनं आपलं भाग्य उजळवलं
अन् आपल्याला मुक्त केलं
हीच आहे ती विभा
जिनं आपल्याला केलं सामर्थ्यशाली - स्वावलंबी
ही आहे ती आभा ठरेल आपला मार्गप्रदीप

**आपली चिरंतन ज्योति**

davp 85/165

साप्ताहिक

# माणूस

¤

वर्ष : पंचविसावे

अंक : अकरा व बारा

¤

१०/१७ ऑगस्ट १९८५

किंमत : पाच रुपये

¤

संपादक

श्री. ग. माजगावकर

¤

साहाय्यक

दिलीप माजगावकर

सौ. निर्मला पुरंदरे

मेधा राजहंस

¤

वार्षिक वर्गणी

साठ रुपये

¤

प्रकाशित लेख, चित्रे इत्यादींबाबतचे हक्क स्वाधीन. अंकात व्यक्त झालेल्या मतांशी चालक सहमत असतीलच असे नाही.

¤

राजहंस प्रकाशन संस्थेच्या मालकीचे हे साप्ताहिक संस्थेतर्फे मुद्रक व प्रकाशक श्री. ग. माजगावकर यांनी साप्ताहिक मुद्रण, १०२५ सदाशिव, पुणे येथे छापून तेथेच संस्थेच्या कार्यालयात प्रसिद्ध केले.

¤

: पत्ता :

साप्ताहिक माणूस

१०२५ सदाशिव, पुणे ४११०३०

दूरध्वनी : ४४३४५९

¤

यापुढील 'माणूस' अंक २४ व ३१ ऑगस्टचा जोड अंक प्रसिद्ध होईल.

¤

मुखपृष्ठ व आतील चित्रे

राजू देशपांडे

## अनुक्रम : परिवर्तन विशेषांक

१. विरोधी पक्ष आता खेडोपाडी पोचत आहेत
प्रा. राम कापसे / ३

२. कॉम्रेड सुदामकाका राष्ट्रवादाची – वऱ्हाडच्या मातीची भाषा बोलतात तेव्हा / ६

३. अस्थिरता : विविध गटांची, वर्गांची नवी आव्हाने
डॉ. अशोक चौसाळकर / १०

४. दलित नेतृत्वानेच दलितांना एकटं पाडलं
विजय गव्हाणे / १५

५. पुढल्या दशकात शुगर लॉबी प्रभावहीन होत जाईल
डॉ. गो. स. कामत / १७

६. कामगारांच्या आर्थिक संघटना वेगळ्या आणि राजकीय मत वेगळंच
दत्ता सामंत / २०

७. शेतकरी संघटना – १९८७–८८
डॉ. द. ना. धनागरे / २३

८. राखीव जागा घालवायच्या का राज्य गमवायचं ? हा सवाल
डॉ. बाबा आढाव / २८

९. मराठवाड्याच्या अस्मितेची जाणीवच मुंबई-पुण्याला नाही
सुधाकर डोईफोडे / ३१

१०. गरीब मराठा तरुण : क्रांतीचा नायक
प्रा. राम बापट / ३३

११. असंतोषाचा स्फोट टाळण्यासाठी रोजगार हमी योजना
शांताराम पंदेरे / ३९

१२. वर्गीय जनसंघटनांचे व्यापक व्यासपीठ – हाच कॉंग्रेस व्यवस्थेला पर्याय
कॉ. चंद्रगुप्त चौधरी / ४६

१३. परिवर्तनासाठी हिंदुत्व टिकविणे आवश्यक
प्रदीप रावत / ५०

१४. जिथे शाळा आहे पण विद्यार्थी जातात खेकडे धरायला
विनय गुणे / ५३

## कॉम्प्युटर आणि खेडेगाव

माणूस–तरुण–तरुणी विशेषांकापाठोपाठ हा परिवर्तन विशेषांक निघत आहे. त्या अंकाप्रमाणेच याही अंकाचे वाचकांकडून चांगले स्वागत होईल अशी आशा आहे.

' माणूस 'चे एक प्रथमपासूनचे वाचक व लेखक, सांगलीचे श्री. ग. सबनीस यांनी २६ जुलैला पाठविलेल्या पत्रात लिहिले आहे– ' माणूस 'चा तरुण–तरुणी विशेषांक नुकताच माझ्या वाचण्यात आला. अंक सर्वांगानी सुरेख साधला आहे. अंकातील सर्वच सदरे परखड, अभ्यासू व चिंतनशील वाटली.

– वयाची चौसष्ठी संपत आली तरी या तरुण लेखकांच्या अनुभवातून खूपच आपण शिकण्याजोगे आहे, हे जाणवले. विनय हर्डीकर, मंगला गोडबोले, विद्या बाळ हे तीन लेख तर अप्रतिम वाटले.

– आपण गेली पंचवीस वर्षे माणूस साप्ताहिक जिद्दीने, अनेकदा प्रतिकूल परिस्थिती निर्माण झाली असतानाही चालवीत आहात. याबद्दल मनःपूर्वक धन्यवाद. आज अनेक सवंग, हलकीफुलकी, करमणूकप्रधान मराठी साप्ताहिके प्रसिद्ध होत आहेत. तरीही माणूस टिकून आहे याचे कौतुक वाटते.'

देवरूखहून २६ जुलैला पाठवलेल्या पत्रात या विशेषाकासंबंधी सुनीता जोशी लिहितात—' अस्मिता दीक्षितांची स्टाईल खास आहे. विवेक परांजपेसारख्या जबरदस्त माणसाची ओळख आवडली.... पण अतिशय खटकलेली गोष्ट. यात ग्रामीण किंवा इतर भागातील तरुण-तरुणींचं प्रतिनिधित्व नाही. उमलणारी, बंडखोर, संवेदनाक्षम इ. तरुण पिढी फक्त पुण्या-मुंबईतच आहे का ?'


मराठीतील एक नामवंत समीक्षक प्रा. स. शि. भावे यांनी हा तरुण-तरुणी विशेषांक पाहून आपली लगेचची प्रतिक्रिया आवर्जून कळवली. त्यांनी लिहिले आहे– ' अंक सविस्तर चाळला. अंकाचे नियोजन, माडणी, आखणी चांगली झाली आहे. विवेक परांजपे यांची मुलाखत चांगली घेतली आहे... एक उणीव मात्र प्रथमदर्शनी जाणवली. ग्रामीण ( नवश्रीमंत ) व दलित ( उच्च पदावरील तसेच उपेक्षित ) यांचे वातावरण यात नाही. त्यांचाच एक वेगळा अंक आता काढा. '

अशा जागरूक लेखक-वाचक-समिक्षकांची हा परिवर्तन विशेषांक काही प्रमाणात अपेक्षापूर्ती करू शकेल असे वाटते.

वास्तविक हा अंक अगोदरच निघायला हवा होता. सयुक्त महाराष्ट्र राज्य निर्मितीचा रौप्यमहोत्सव मे महिन्यात झाला, त्यावेळेपासूनच या अंकाची जुळवाजुळव सुरू झाली; पण तरुण-तरुणी थांबायला तयार नव्हत्या. त्यांनी आघाडी मारली. त्यामुळे हा ' परिवर्तन विशेषांक ' मे-जून ऐवजी आता ऑगस्टमध्ये निघत आहे.

या विशेषांकात ग्रामीण भागातील खळबळीचे प्रतिबिंब तर आहेच; पण शहरी कामगार वर्गाची, मध्यमवर्गाची विचारपुसही यात आहे. गेल्या २५-३० वर्षांत महाराष्ट्राची जडणघडण कशी झाली, याबरोबरच उद्याची वाटचाल कशी असेल, याचाही वेध घेण्याचा येथे प्रयत्न केला आहे. यशवंतराव चव्हाणांच्या कारकीर्दीनंतर दिल्ली स्थिर आणि महाराष्ट्र अस्थिर अशी स्थिती होती. सध्यातर दोन्हीकडे स्थिरता व शांतता आहे. ही स्थिती वरवरची आहे की टिकणारी आहे ? एक नवी शहरानुकूल अर्थव्यवस्था स्थिरावत चालली आहे. अगदी दुर्गम अशा आदिवासी व डोंगराळ भागातही दौरे करून राजीव गांधी आपली नवी धोरणे अगदी तळागाळापर्यंत पोहोचवू पाहात आहेत. यामुळे ग्रामीण भारताच्या अफाट दारिद्र्याचे व विषमतेचे प्रश्न सुटून सध्याची शांतता—स्थिरता टिकून राहणार की, ग्रामीण असंतोष वाढत जाऊन, शहरे विरूद्ध खेडी, असा आजवर न उभा राहिलेला संघर्ष अधिकच तीव्र होणार ? याची निश्चित उत्तरे आज कोणाजवळही नाहीत. दिल्लीच्या कॉम्प्युटरी नेतृत्वाची २१ व्या शतकाकडे आगेकूच सुरू आहे. विरोधी शक्ती मात्र अद्याप मरगळलेल्या स्थितीतच आहेत. अशा वेळी यापुढील सत्तासंघर्षाचा, सामाजिक बदलाचा वेध घेण्यासाठी या अंकाचा थोडाफार उपयोग होऊ शकेल असे वाटते.

ह्या अंकात काही लेख व काही मुलाखती आहेत. सर्व मुलाखती पुण्यातील एक तरुण पत्रकार श्री. संजय सगवई यांनी घेतलेल्या आहेत या सर्व लेखकांचे च मुलाखतीद्वारा आपले विचार व्यक्त करणाऱ्या कार्यकर्त्यांचे कॉम्प्युटरी विचारवंतांचे आभार. □



# विरोधी पक्ष आता खेडोपाडी पोचत आहेत...स्वबळावर

—प्रा. राम कापसे

मुंबईतल्या विधानसभेच्या पावसाळी अधिवेशनात धारावी भूखंडाबाबत. जोरदार चर्चा झाली. शरद पवार, मृणाल गोरे, राम नाईक, राम कापसे ही मंडळी आपल्या युक्तिवादानं, सुदाम देशमुख, केशवराव धोंडगे, दत्ता पाटील ही मंडळी त्यांना पाठिंबा देऊन अनेक प्रश्नांवर सरकारी बाजूला जेरीस आणत होती. नुकतंच नागपूर येथे पवारांच्या कॉंग्रेस (एस) पक्षाच्या कार्यकर्त्यांचं शिबीर झालं होतं. तिथं पवारांनी आपल्या संभाव्य पक्ष बदलासंबंधी निश्चित विधानं केली होती. आपण कॉंग्रेस (आय) मध्ये जाणार नाही असं सांगितलं. मात्र त्याचबरोबर कॉंग्रेस संस्कृतीचा वारंवार उदो करून काही राष्ट्रीय प्रश्नांवर राजीव गांधींना पाठिंबा द्यायचं योजलं आहे. आपल्या पक्षाचं स्वतंत्र अस्तित्व ठेवण्याची घोषणाही त्यांनी केली. या संदर्भात इतर विरोधी पक्षांची फारच दोलायमान स्थिती झाली होती. पवारांच्या पुण्याच्या भाषणानंतर भाई वैद्यांसारख्या नेत्यांनी एकदम कावून लिहिले. शेकापक्षाची तयारी वेगळीच होती. महाराष्ट्रातला विरोधी पक्ष पवारांमुळे बळकट झाल्यानं त्यांच्या अचानक भूमिका बदलाचा कसा परिणाम झाला असावा, इतर विरोधी पक्ष नेमका कोणता पवित्रा घेत आहेत, पवारांबाबत त्यांची काय दृष्टी आहे ते पाहणं इथल्या विरोधी शक्तींच्या वाढीच्या संदर्भात महत्त्वाचं होतं. म्हणून प्रा. राम कापसे यांची प्रथम भेट घेतली.

पवारांच्या सहभागामुळेच विरोधी पक्ष ताकदवान झाले, त्यांना विधानसभेत जास्त जागा मिळाल्या असं गृहीतच प्रा. कापसेंना मंजूर नव्हतं. महाराष्ट्रातून विरोधक कधीच पूर्णपणे पुसले गेले नाही, ते बहुधा सत्ताधारी पक्षाच्या बरोबरीनं होते, असं त्यांचं म्हणणं.

इथल्या सांसदीय वैधानिक राजकारणाचा (Legislative Politics) प्रवाह सांगताना ते म्हणाले,

'आज महाराष्ट्रात विरोधी पक्ष पुन्हा सबळ झाला आहे. कधी नव्हतं तेवढा विधानसभेत विरोधी पक्ष प्रभावी आहे. महाराष्ट्रात असं तिसऱ्यांदा होत आहे.' कापसेंची सर्व घटनांचा अन्वयार्थ लावण्याची तऱ्हाच थोडी आशावादी (Optimistic) आहे.

महाराष्ट्राच्या निर्मितीच्या वेळेला सत्तारूढ कॉंग्रेस पक्ष व विरोधी पक्ष या दोघांची स्थिती समान होते हे सांगताना ते म्हणतात– "संयुक्त महाराष्ट्राच्या निर्मितीच्या वेळी जनमताच्या इच्छेला कॉंग्रेसने मान्यता दिली, आणि लोकांनीही कॉंग्रेसला legitimacy दिली. याचा त्या पक्षाला लाभ मिळाला. त्याच वेळी १९५७ पासून चालत आलेल्या चळवळीत, निवडणुकांत विरोधकांनाही चांगलेच goodwill मिळाले होते. संयुक्त महाराष्ट्राच्या चळवळीत विरोधी नेत्यांचाच पुढाकार होता. त्यामुळे १९५७ मध्ये सत्तारूढ व विरोधी पक्ष समबल होते.

नंतर १९७८ मध्ये कॉंग्रेसला बाजूला सारून विरोधी पक्ष सत्तेवर आले. महाराष्ट्र हा कॉंग्रेस सत्तेचाच गड आहे हा समज खोटा पडला. जनता जाणतेपणानं मत केले हे दिसले. १९८५ मध्ये पुन्हा विरोधी पक्षाने कॉंग्रेसशी जबर झुंज दिली. यावेळचं यश तर अधिक लक्षणीय होतं. राजीव लाट होती. सत्ता मिळो न मिळो पण विरोधकांचीही काही सामर्थ्यस्थळं आहेत हे मतदारांनी सिद्ध केलं. मुंबई–पुण्याचा अपवाद वगळता सर्व ग्रामीण महाराष्ट्रानं विरोधकांना हात दिला. त्यामुळे महाराष्ट्रात विरोधी पक्ष म्हणजे Lost Case आहे हा समजच खोटा पडला. इथं कोणचा बदल आणायचा, काय योग्य आहे ते ठरवायचं आव्हानांना कसं तोंड द्यायचं हे मतदारांनी दाखवलं. महाराष्ट्र वेगळ्या तऱ्हेनेही वागू शकतो हे कॉंग्रेसने त्यांना दाखवलं. त्यामुळं आज महाराष्ट्रात विरोधी

पक्षांचा वचक आहे, तुम्ही असेंब्लीत पाहिलंच असेल धारावी प्रकरणी !

'दुसरं म्हणजे, आपल्याकडं मतदानानं सर्व जाती–जमाती व्यवसायाचे लोक निवडून येतात. एखादीच जात निवडून येते असं नाही. म्हणजे राखीव जागा नसतानाही एखाद्या पक्षाच्या नावावर मागास उमेदवार जिंकतो. आज आपल्या विधानसभेत ओ. बी. सी., मुस्लिम, पारशी–असे अनेक आहेत ! जातीचा प्रभाव गृहीत धरला तरी या भिन्न गटांच्या प्रतिनिधीमुळं सभागृहाच्या कामकाजाला, धोरणं ठरवायला लाभ होतो–' यासाठी प्रा. कापसेंनी १९७८ मध्ये एका चर्मकार समाजातल्या आमदाराचं उदाहरण दिलं. हा इतरत्र प्रभावी नव्हता, पण चामड्याच्या वस्तूच्या प्रकरणाबाबत चौकशी समितीत यान आपलं ज्ञान उपयोगात आणल. *चामड्याच्या उत्पादन पद्धतीत, व्यापारात* काय सुधारणा व्हाव्या हे बिनतोड दाखवून दिले.

याहीपेक्षा आपल्या राजकारणात एक अभ्यासू, सजग आणि तळमळीच्या नेत्यांचा, प्रतिनिधींचा प्रवाह आहे. मधल्या काळात (१९७८–८३) ' संजय द्दरा ' होता. यावेळी अतुलेंच्या काळात निवडून आलेली बहुतेक माणसं ही ' संजय प्रवृत्ती ' ची होती. म्हणजे झुंडशाही, सत्यात्मक स्वरूप धाब्यावर बसवणं, मनमानी कारभार अशी कामगिरी ! देखाव्यापुरती लोकशाही देखील त्यांनी स्वीकारली नव्हती !

– महाराष्ट्रातल्या राजकारण्यांची ही मूलप्रवृत्ती नाही. त्याचा दर्जा खूप चांगला आहे. इतर प्रदेशाच्या तुलनेनं आपले प्रतिनिधी अभ्यासू होते. यशवंतराव, एसेम, म्हाळगी याच्यासारख्या प्रतिनिधींनी आपल्या वैधानिक जीवनाला अर्थ दिला आहे. आज आपल्या विधानसभेत बहुतेक सर्व (दोन्ही बाजूचे) आमदार अभ्यासू, जाण असलेले आहेत. म्हणजे यापूर्वीचे प्रतिनिधी तसे नव्हते असं नाही. आपण पण आपल्या मूळप्रवृत्तीकडे परत चाललो आहोत.'

## पवारांची भूमिका

' विरोधकांची आजची स्थिती चांगली आहे हे मान्य करू. मात्र शरद पवारांच्या भूमिकेमुळे विरोधी पक्षांची काय स्थिती झाली ?' या प्रश्नावर प्राध्यापक महोदयानी फार सावधतेनं उत्तर दिली.

' शरद पवारांची नुकतीच केलेली काही विधाने आणि त्यावर इतर विरोधी पक्षानी व्यक्त केलेली प्रतिक्रिया परस्पराशी जुळतच नाही. पंजाब–आसामसारखे प्रश्न पवारांना राष्ट्रीय वाटतात. त्यासाठी ते सत्ताधारी पक्षाला सहकार्य द्यायलाही तयार आहेत. मात्र विरोधी पक्षांची या प्रश्नाकडे पहायची पद्धत वेगळी आहे. हे राष्ट्रीय प्रश्न आहेत असं आम्ही मानतो, राष्ट्रीय भूमिका घेतो. मात्र देशापुढचे प्रश्न फक्त कॉंग्रेस (आय) च सोडवू शकेल ही भूमिका आम्हाला मान्य नाही हे प्रश्न सत्ताधारी पक्षाच्या राजकारणामुळे उद्भवले आहेत.'

**आज पवार कॉंग्रेस संस्कृतीबद्दल बोलत आहेत त्याचं काय ? नागपूरलाही तेच बोलले** ***त्याचा काय अन्वयार्थ लावणार ?***

' कॉंग्रेस संस्कृती वगैरे सारख्या ' शब्दांवर ' जाण्याचं, त्यावरून भाडण्याचं आम्हाला कारण नाही. आज पवार कुठे आहेत हे लक्षात घ्या. एप्रिल–मेच्या दरम्यान पुण्याच्या वसत व्याख्यानमालेत पवार जे बोलले, जे मुद्दे त्यांनी माडले, त्यानंतर विरोधी नेत्यांच्या अनेक प्रतिक्रिया व्यक्त झाल्या. आरंभी काहीना भीतीही वाटली असेल. मात्र आज नागपूरला पवार बोलले. त्यावेळी हे कुठे आहेत ? पुणे ते नागपूर हा पवारांचा प्रवास पाहिला तरी विरोधकांना धास्तावण्याचं कारण नाही.

**: पण पवार ज्या कॉंग्रेस संस्कृतीबद्दल बोलतात, त्याला मूलभूत विरोध असेल तरच विरोधकांचं विरोधीपण राहू शकतं ?**

त्यावर लगेच प्रा. कापसे म्हणतात, ' तात्त्विक मुद्दे जरी धरले तरी विरोधकाना एकत्र आणतील अशा बऱ्याच बाबी आहेत. त्यात आमच्या आणि पवाराच्या परस्परांच्या भूमिकाचाही विचार आहे. आम्ही जसा त्याच्या भूमिकेचा विचार करतो, तसेच तेही आमच्या भूमिकेसंबधी काही तरी गृहीतच धरत असतीलना ?

महाराष्ट्रात आज आपल्या भूमिकेला पवार अजूनही चिटकून आहेत. त्यामुळं पुणे भाषणानंतर धास्तावल्यासारखा वाटणारा विरोधी पक्ष आता थोडा सावरला आहे.

– विरोधी गट धास्तावला म्हणण्याचंही कारण नाही. कारण त्याचीही स्वत:ची काही शक्ती आहे. यापूर्वीही पवार असोत की नसो जनतेनं विरोधकानाही निवडलं आहे. १९५७, १९७७ मध्ये पवार कुठे होते ?'

**: पण ' शरद पवार मुख्यमंत्री ' या घोषणेवरच तुम्ही विरोधकांनी यावेळी निवडणुका लढविल्या ना !**

' १९७८ मध्ये आमचे मुख्यमंत्री शरद पवार होते. १९८० मध्ये तेच आमचे मुख्यमंत्री म्हणून आम्ही निवडणूक लढविली असती. पुलोदची ती भूमिका आता आम्ही का सोडावी ?' असं विचारून पूर्वीच्या कॉंग्रेस–विरोधक या द्वैताचा धागा पकडून ते म्हणाले,

' वैचारिक, धोरणात्मक मतभेदांबद्दल विचाराल तर अस बघा–एखाद्या प्रश्नावर आम्ही आणि पवार यांच्यात जमीन–अस्मानाचं अंतर आहे आणि तरीही त्यावेळी तडजोड केली असं कुठं आहे का ?'

ते पुढं म्हणाले, ' Ideological difference–yes. ते आहेत. पण तसं इतर विरोधी पक्षादरम्यानही आहेतच ना !

मात्र शे. का. पक्ष, जनता, भाजप याच्यातही वैचारिकदृष्ट्या खूप अंतर आहे व त्यामुळे त्याच्यात दुरावा आहे ही वस्तुस्थिती आहे का ? तसं जर असतं तर गेल्या सात वर्षांत दोन वेळा एकत्र आलो असतो का ?

अगदी प्राथमिक उदाहरण बघा. आमच्या (पुलोदच्या) जाहीरनाम्यात कोणत्या तरी घटक पक्षाने भिन्न मतपत्रिका जोडली का ? आम्ही एकमताने जे राज्य चालवलं तितकं चांगल राज्य महाराष्ट्रात कोणीच चालवलं नाही असं सगळेच मान्य करतात.'

विरोधी पक्षानी मुळात पहिल्यापासूनच शरद पवारांसारख्या मुरलेल्या कॉंग्रेसनेत्याच्या आश्रयाखाली का जावं ? पवार कॉंग्रेसमधून बाहेर पडल्यावर सर्व विरोधकांना श्रेयस् सापडल्यासारखं झालं होतं. त्या अनुषंगानं पुढे बोलायचं होतं. मात्र मुद्दा थोडा दुसरीकडे सरकत होता. म्हणून विचारलं,

**' आतापर्यंत महाराष्ट्रातला विरोधी पक्ष शहरी मध्यमवर्गापुरताच मर्यादित होता. शरद पवारांच्या रूपानं ग्रामीण–शेतकरी वर्गाची साथ (base) मिळाली, म्हणून विरोधी पक्षांनी लगबगीनं त्यांना धरलं–असं आहे का ?'**

'हा पुन्हा एक गैरसमजाचा भाग आहे. भाजप, जनता, शे. का. पक्ष हे किती बदलले आहेत ? त्याची मुळ आता खोलवर-पसरलेली आहेत. भाजप फक्त पांढरपेशाचा आहे असं पुण्यात बसून मत बनू शकतं. पण इतरत्र बघा. यावेळी भाजपच्या सोळा आमदारांपैकी फक्त पाच शहरातले-अकरा ग्रामीण भागातले आहेत. शिवणकर, बागडे, आहेर, दोंदे ही मंडळी कुठली आहेत ? आणि अगदी आत्ता देखील भाजपला ज्या जागा मिळाल्या त्या कामाच्या आधारावर मिळाल्या आहेत. जनता पक्षाचही तसच आहे. त्यांचाही ग्रामीण भागात पाया आहे. शेकापचा तर प्रश्नच नाही. विरोधी पक्ष आज मुळामध्ये शिरले आहेत. यापैकी काही माणस तर दरवेळी निवडून येतात. मग ग्रामीण भागात base नाही असं कसं म्हणता येईल ? '

## विस्तृत पाया

'पक्ष विकासाचा एक क्रम असतो. आपापल्या शक्तीनुसार पक्ष वाढतच असतात. तो वाढताना आपल्याला दिसत नाही. केवळ शंभर-हजार मतानी आमची माणसं मागं पडत होती. पण आपण ते लक्षात घेत नाही. जिंकला कोण हेच पाहतो. ही प्रक्रिया हळूहळू होते. अचानक काही होत नाही. त्यासाठी माणसं चिकाटीने काम करत असतात. आज नाशिक जिल्ह्यात आम्हाला चांगलं यश मिळाल ते अचानक नाही. १९८० पासून माणसं काम करत होती. मी स्वत: कल्याणचं उदाहरण देतो. तिथं आमचा एकही माणूस नसल्यापासून ते पचायत समिती, इतर संस्था आमच्याकडे घेण्यापर्यंत गेली वीस वर्षं आम्ही काम करतो. त्याचा परिणाम दिसतोच.

त्यामुळं इथला विरोधी पक्ष Composition, शक्ती, पाया यांच्या दृष्टीनं बदलत आहे.'

केवळ ग्रामीण बहुजनसमाजाचा पाया पाहिजे म्हणून विरोधक पवारांकडे गेले असं म्हणणे बरोबर होणार नाही हे त्यांनी सूचित केलं.

**: नेहमीच्या विरोधी पक्षांचं ठीक आहे; पण पवारांसारखी शक्ती आज विरोधी बाजूंकडे का आहे ? वसंतदादांनी निलंगेकरांना आणून छान डाव टाकला, म्हणून पवारांची पंचाईत झाली आहे का ?'**

'हे पहा, तुम्ही तसं म्हणू शकताही; पण जे घडलं आहे तेवढीच आपण विधानं करायची तर पवारांनी खूप तग धरला आहे. कॉंग्रेसमधून बाहेर पडून पाच-सहा वर्षं एखादा नेता कायम विरोधात राहतो असं चित्र दुर्मिळ आहे. इतरांची स्थिती पाहिली तर पवारानी खूप टिकाव धरला. हे मान्यच कराव लागेल. आता त्यानंतर ते दुसरीकडे गेले तर-हे तस झाल्यावरच सांगू शकतो-त्याआधी काही तर्क बांधू शकत नाही. जे काही झालं, त्यावरून आपण तर्क बाधतो. आज विधानसभेत काम करताना आमच्यात सामजस्य, समन्वय, सौहार्द आहे.'

आणि हा कॉंग्रेस प्रवेशासबधी पवारांबद्दलच का प्रश्न विचारला जातो ? इतराबद्दल नाही ? ते इतके दिवस विरोधात आहे म्हणूनच त्याच्याविषयी वाद उठतो ना ? त्याच्याबरोबर इतरही विरोधी पक्षात आले. वर्षां-दोन वर्षात ते पुन्हा कॉंग्रेसवासी झाले. त्याच्याबद्दल आपण विचारत नाही !

वसतदादा पाटलानी गेल्या काही महिन्यातच आपल्या राजकीय डावपेचांनी अनेक पक्षी मारले असं मानतात. त्यात पवाराच्या पक्षाचाही समावेश आहे ! दादानी मुबई महापालिका निवडणुकाच्यापासूनच केंद्र सरकारशी टक्कर घेण्याची भूमिका घेतली होती. महाराष्ट्राच्या राजकारणात हा प्रकार प्रथमच दिसत होता. मात्र हा संघर्ष कितपत प्रामाणिक असावा असा मुद्दा निघाला.

त्यावर प्रा. कापसेंनी दादाचं कौतुकच केलं. म्हणाले, 'दादांनी नेहमीच केंद्राशी confrontation केलं आहे. १९८० ते १९८५ या काळात अनेक वेळा दादांनी केंद्रावर डाव उलटवले आहेत. अतुल्यासाठी भ्रष्टाचार विरोधी कायद्यात दुरुस्ती करण्याचा प्रकार असो किंवा आताचं मुबई पालिकेचं प्रकरण केंद्रीय नेतृत्वाला धडा शिकवणारा, तिथल्या style of functioning ला आव्हान देणारा राज्यातला हा एकमेव मुख्यमंत्री आहे. '

**: दादांच्या रूपानं dominant शुगर लॉबीनं आपली सत्ता पुन्हा दाखवली असं तर नाही ? या शुगर लॉबीच्या सत्तेत काही फरक पडला आहे ?**

शुगर लॉबी ही संकल्पनाच प्राध्यापकांना मान्य नव्हती. ते म्हणाले, 'ऊसाचं साम्राज्य बागायती क्षेत्रातलच. आपल्याकडे ओलिताखालचं क्षेत्र किती ? सहा ते तेरा टक्के. त्या व्यतिरिक्त कोरडवाहू, आदिवासी, जिरायत जमीन आहेच. आपण जेव्हा शुगर लॉबी म्हणतो, त्याच्या व्यतिरिक्त महाराष्ट्र किती तरी मोठा व प्रभावी आहे. sugar lobby च्या नावामागे, संकल्पनेमागे ज्या प्रकारच्या वस्तुस्थितीची आपण कल्पना करतो तसा प्रकार नाही. या लॉबीच्या क्षेत्रातले आमदार किती आहेत ? किती मुख्यमंत्री sugar lobby चे होते ? अगदी यशवंतरावांचाही या लॉबीशी काय संबंध होता. ते गरिबीतनं वर आलेले होते. शुगर लॉबी बाकी आपल्याकडची एक महत्त्वाची Myth आहे झाल. '


**: या राजकीय-सामाजिक संदर्भात महाराष्ट्रातल्या पुढल्या तणावाचं स्वरूप काय असेल ?**

'इतर राज्यांच्या मानानं महाराष्ट्राच्या राजकीय जीवनात गौरव वाटावा, मान वाढावा असं बरंच काही आहे. गुजरातसारखी जातीय संघर्षाची स्थिती इथे येण्याची शक्यता नाही. जाती-राजकीय-आर्थिक गटातलं योग्य सतुलन ( equilibrium ) अस्तित्वात आहे. याला कारण इथली स्थिती आहे. त्याचप्रमाण इथली माणसं-नेतेमंडळीही कारणीभूत आहेत. ही माणसं दोन्हीकडची-सत्ताधारी व विरोधी पक्षांकडची आहेत त्याना काही दर्जा आहे, ते समजूतदार आहेत. माधवसिंह सोळंकींसारखा मुख्यमत्री इथे झाला नाही. तसं एकांगी इथं कुणी नव्हतं. आपल्याकडचे मुख्यमत्री सगळे सर्वांना बरोबर घेऊन चालणारे होते. तसे नसणारे फक्त अतुले होते. सस्थात्मक पाया न जुमानणारे. त्यांच्याकडे अनेक गुण होते. पण...बाबासाहेब भोसले मुख्यमंत्री होणं म्हणजे मोठा विनोद होता. तो माणूस मंत्री तरी कसा झाला हेच नवल वाटतं.

पण ही दोन्ही aberations होती. दीड वर्षाच्या आत ते दोघेही गेले. नव्हे त्याना घालवलं.

भोसले, अंतुलेंना घालवणं म्हणजे इथल्या सत्ताधारी लॉबीला नको असलेले मोहरे घालवण्याचे त्या लॉबीचे यशस्वी झालेले प्रयत्न म्हणता येतील का ? यावर कापसे म्हणाले, 'ही दोन्ही माणसं सत्तेवरून दूर करणं म्हणजे सत्ताधारी लॉबीचे प्रयत्न असं नव्हे. महाराष्ट्राच्या प्रकृतीला न मानवणाऱ्या वृत्ती उचलून टाकल्या मनमानीपणा आणि बावळटपणा ही दोन्ही इथल्या वृत्तीत नाहीत. ते मुख्यमत्री गेल्यावर महाराष्ट्र पुन्हा आपल्या स्थितीला आला. '

एका प्रकारच्या समाधानी मानसिक अवस्थेतच प्रा. कापसेंनी नेऊन सोडल होतं. ☐



# कॉम्रेड सुदामकाका राष्ट्रवादाची वऱ्हाडच्या मातीची भाषा बोलतात तेव्हा...

,आज जी खेड्यांची नागवणूक दिसते, ती कोणी दुसऱ्यानं केली नाही. आमचाच खेड्यातला, शेतकऱ्याचा पोरगा असतो, इथं सत्तेत आला की चलाखी करतो. नाव घेताना खेड्याचं न् राबवून राहिलेत शहरी पंचतारांकिताची संस्कृती, काय काय कथा सांगू यांच्या!'

मुंबईतल्या फोर्ट भागातही अगदी आवेशाने अचलपूर–अमरावतीकडची वऱ्हाळी रसवंती फुलत असते. कधी ती वावरातल्या दुष्काळाचा रखरखीतपणा आणते, मेळघाटातल्या वेठबिगार कोरकूंचं दुःख मांडते, दुसऱ्या वेळी उपहासानं धारदार बनते; पण या प्रत्येक वेळी तर्कसंगती, सांगायचा मुद्दा इकडचा तिकडे होत नाही. कम्युनिस्ट पक्षाचे अचलपूरचे आमदार कॉम्रेड सुदाम देशमुख. ऊन–पाऊस प्याल्यानंतरचा अलिप्त आवेश, वऱ्हाडी अनगडपणा, आपल्या व इतर भागातल्या प्रदेशातल्या समस्यांचा बारकाईनं, पुराव्यासह अभ्यास. ग्रामीण व्यक्तित्वात असते तशी अनवट–स्वतंत्र तर्कसंगतीची पद्धत आणि मार्क्सवादी spirit तेवढं घेऊन, आंधळी श्रद्धा नाकारणारा हा माणूस. विनाकारण उठल्या बसल्या कॉम्रेड लेनिनचं नाव घेणाऱ्याबद्दल चिडून बोलणारे सुदामकाका मातीची भाषा बोलत असतात, तिथे काय पाहिजे त्याचीच कथा ते सांगतात. महाराष्ट्रासंबंधी बोलताना आरंभी जरी Typical CPI / CPM बोलत असते तरी नंतर ते स्वतःचंच बोलतात.

'आज आमचं खेडेवाल्यांचं गरिबाचं सरकार वीस कलमी कार्यक्रमाचे ढोल वाजवते, देशात पहिला नंबर आहे म्हणते. पायजो बरं कसं सरकार आहे ते!' असं म्हणत ते काही पुरावेच देतात आणि मधून–मधून टिप्पणी! प्रत्येकाचं ध्रुवपद एकच असतं– दोन उच्च वर्गांची हातमिळवणी– परिणामी ग्रामीण उपेक्षित दलित वर्गाची उपेक्षा!

ते म्हणतात.

: आपल्या राज्यात वेठबिगार नाहीत, असं हे सरकार सांगतं. वेठबिगारांना मुक्त करण्याचा एक कार्यक्रम आहे. त्यांना मुक्त करायचं म्हणजे सुप्त उत्पादक शक्ती खुली करायची हा उद्देश. आज कोकण, खानदेश, यवतमाळ, अमरावतीचा आदिवासी वेठबिगार आहे. आमच्या मेळघाटात मी स्वतः दोनशे नावं दिली. ठाण्यातले समाज कार्यकर्ते हायकोर्टात जाऊन वेठबिगार आहे हे सिद्ध करतात.

पण आमचं सरकार अडलं ना प्रतिष्ठेवरती! इथं वेठबिगारच नाही म्हणते. ('फुशारकी दावायले, पुरोगामीपणाचे ढोल पिटवायले पायजे ना!') पण यामुळं होतं काय? प्रत्येक वेठबिगारांच्या पुनर्वसनासाठी केन्द्र सरकारकडून ५ हजारांपर्यंत रक्कम मिळते तीही यामुळे मिळत नाही. वेठबिगारी शोधून काढणारी केंद्र सरकारची समिती आहे. महाराष्ट्रात वेठबिगार असल्याचे तिने सांगितले. राज्य सरकारनेच महाराष्ट्रातल्या रूढी परंपरा शोधून काढण्यासाठी एक समिती नेमली होती. तिनेच अनेक ठिकाणी unpaid labour असल्याचे सांगितले. मात्र सरकारने या सर्वांचा इन्कार केला आमच्या अचलपूरकडे कोरकू आदिवासीत सासऱ्याकडे १२ वर्षे राबायला जाण्याची वेठबिगार प्रथा आहे; पण आदिवासी संस्कृतीत ढवळाढवळ करणार नाही या नावाखाली तिथं लक्ष दिलं गेलं नाही. अनुसूचित जाती–जमाती आयोगानं वेठबिगार असल्याचं सांगितलं. शेवटी हे सरकारला मान्य करावंच लागलं तरी त्यासंबंधी काहीच केलं नाही. आई जेवू घालीना, बाप भीक मागू देईना असा प्रकार चालला आहे. वेठबिगारी आहे; पण प्रतिष्ठेसाठी ती नाही असं दाखवायचं!

आदिवासींच्या वेठबिगारांची नवी पद्धत आता आली. contract labour! गावातल्या पारंपरिक धनिकांचा नव्या नोकरशाहीशी, नव्या भांडवलदाराशी संधान जोडलं. आमचा आदिवासी दुबळाच राहिला बल्लारपूर कागद कारखान्यासाठी (चंद्रपूर

जिल्ह्यात) जंगलकटाई करू देतात, भाव बांधून देतात. आदिवासींना मात्र स्वतःच्या रोजी रोटीसाठी—वनखात्याचे निर्बंध आहेत.

पुढच्या कलमाकड चला. किमान वेतन कायदा ' आज महाराष्ट्रात ५४ लाख शेत-मजूर आहेत त्यापैकी अकोला, अमरावती, यवतमाळ, बुलढाणा या जिल्ह्यातले आणि हरिजन आदिवासी या सर्वांची सख्या निम्म्याहून अधिक आहे. ही माणस अजून असघटित आहेत. त्याना मजुरी काय दिली जाते ? शेतमजुरी करणाऱ्या बाईला ४ रु. दिले जातात. दहा वर्षांपूर्वीचा रेट ! दहा-वर्षानतर आता रुपयाची किंमत १४ पैसे झाली; पण बाईला चारच रुपये मिळणार !

— आता शेतीत, खेड्यात आधुनिक यंत्र-तंत्र आली वीज, यंत्रसामग्री, पाणीपुरवठा यासाठी कुशल मनुष्यबळ हव. या मागणी-मुळ कुशल नसलेला बाटर, पारधी याला शेतीच काम राहिलं नाही.

या खालच्या वर्गाकड तात्रिक कौशल्य *नाही. तसं त्याना दिलं गेल्ही नाही. म्हणजे ते* समाजाला उपयोगी आधारभूत ठरू शकणार नाहीत. समाजाला त्यांची आवश्यकता वाट-णार नाही. यातून पुढे वेगळाच सघर्ष आकार घेईल. सरकारन खरं तर शेतीचे नवे तंत्र-ज्ञान या लोकाना द्यावे, म्हणजे त्याना समाजासाठी उपयोगी राहता येईल; पण इथं तुमच्या सर्व गरजा शहरातूनच भागवता येतात ना ? मग कशाला दुसऱ्या गोष्टी करायच्या असा विचार आहे. त्यामुळे खेड्यातला पैसा, मनुष्यबळ तिकडं ओढलं जात आहे.

— रोजगारासाठी केंद्र सरकारची राष्ट्रीय ग्रामीण विकास योजना ( NRDP ) आहे. त्यासाठी राज्याना पैसा मिळतो. त्यातले ४० टक्के मजुरीवर व ६० टक्के साधनसामुग्रीवर खर्च करायचे. *गेल्या* वर्षी आमच्या सरकारनं हा पैसाच वापरला नाही ! बरं हा पैसा वापरण्यासाठी कलेक्टरला देतात. त्याला कोरं mandate च दिलेल असते. एखाद्या गावात कोणाच काम काढायचं हे ठरवि-ण्याचे अधिकार जिल्हाधिकाऱ्याला ग्राम-पचायतीला हा पैसा देत नाहीत. त्यामुळे खेड्यात वेगळं काम काढण्याऐवजी आधीच दुसऱ्या योजनांखाली गावात चालू असलेली कामं या नव्या योजनेखाली दाखवतात !

— ग्रामपंचायतीला हा पैसा का नको ? ग्रामपंचायतीला अधिकार नाही. अहो साधं सजय गाधी निराधार योजनेत कोणाचा समावेश करावा याचेसुद्धा अधिकार ग्राम-पचायतीला नाही. (त्याचीच योजना, त्याचेच लोक राबवणार; पण विश्वास नाही. शहरातल्या अधिकाऱ्याच्या हातात राहू द्या ! असं छद्मीपण देशमुख म्हणतात ! )

— आमची ग्रामपचायत तर शोभेची वस्तू झाली आता. साधा वायरमन, मास्तर पट-वाऱ्यावर डोळा चढवतो.

— जिल्हा परिषदेला अर्धवट अधिकार. शाळा, पाणी याची तरतूद करायचा हक्क नाही. रस्ता दुरुस्ती कशी करायची – तर एका किलोमीटरला दोनशे रुपये खर्चापर्यंतची दुरुस्ती ? *काय म्हणाव ? त्यामुळे* Z. P. म्हणज फक्त भत्त्याची व्यवस्था झाली.

— ग्रामीण भागातला आवाज, अधिकार, शेतकरी – शेतमजुराच प्रतिनिधित्व – सगळ यानी दाबूनच टाकलं. कलेक्टरच्या हातात सत्ता दिली.

— अन् हे कोण करतंय ! हाच खेड्याचा मुलगा मत्री-आमदार होतो न् शहरी नोकर-शाहीच्या, सचिवाच्या देखरेखीत नियम तयार होतात. या लोकानी खेड्याशी कसा क्रूरपणा केला रे बाबू ! रस्ते, शाळा, पूल—लहान-सहान गोष्टीत ही चलाखी ( x x गिरी ) दिसते.

## ही तर क्रूर थट्टाच

— या लोकांनी नियम केला. पंधरा हजारापर्यंत गावात एक शिक्षकी शाळा काढल्या. एकाच खोलीत पहिली ते चौथी. तुम्ही नुसती कल्पना करा ! म्हणजे अभ्यास, गुणवत्ता, स्पर्धा याचा कसला म्हणजे कसला सबंध आमच्या पोराना येणार नाही. ती कधीच शहरात येऊन तुमच्या पुढं टिकू शकणार नाहीत. कुठलं शिक्षण ? ती शक्य-ताच नाही. मग सरळ सागा ना, बाबारे, तू काही आमच्याशी स्पर्धा करू नको, आपल्या बापाचीच गुरं वळत जा.

रस्त्याचीही तीच कथा– ग्रामीण भागा-तल्या बारमाही रस्त्यांची व्याख्या करताना तिथं नाल्या–नदीवर पूल नसला तरी चालेल अशी तरतूद आहे. पूल नसला तरी ते गाव बारमाही रस्त्यानं जोडलं असं मानतात—नियम आहे. अरे साधे नीट रस्तेदेखील खेड्यात तुम्ही येऊ देत नाहीत—काय म्हणाव तुम्हाला. मुबईला जोडणाऱ्या रस्त्याला अशी व्याख्या कराल का ? मधला खाडीवरचा पूल नसला तरी मुबई बारमाही रस्त्यान जोडली गेली म्हणाल ?

## जमीन सुधारणेचा बोजवारा

' या नवश्रीमतांच्या, प्रस्थापिताच्या सर-कारनं *जमीनसुधारणेचा बोजवारा उडवला!* असं कॉ. देशमुख म्हणाले. या बोजवाऱ्या-सबधी त्यांच्याकडे यवतमाळ व विदर्भाच्या इतर जिल्ह्यातली तपशीलवार माहिती आहे. ते म्हणतात, तुमच्या नियतकालिकात हे खरं द्याव. तसं नुसत वरवर बोलण्याला अर्थच नाही. पुराव्यान Expose करायला पाहिजे. पण यावेळी ती सगळी आकडेवारी इकड-तिकडं विखुरली असते. मग ते पुन्हा केव्हा तरी म्हणून गाडी पुढे चालते.

*ते म्हणतात, जमीन सुधारणेचा कायदा* आला हजारो एकर वरकड जमीन आहे; पण ती आदिवासी-दलिताना वाटण्याची सर-कारची हिंमत नाही. त्यातही वाटायची असेल तर १-२ एकरांच्या गैरआदिवासी अल्प-भूधार-काची जमीन काढून आदिवासीला देतात. त्यामुळ लहान शेतकरी-शेतमजूर आणि आदिवासी याच्यातच झगडे होतात. विना-कारण !

जादा जमिनीची कथा सागतो ! इथ सरकारी अधिकारी अन् जमीनदार याचं सगनमत झाल. जमीनदारानी आपल्याकडची जी Surplus जमीन होती, ती स्वतःकडे ठेवली. मूळ जमीन वरकड म्हणून सरकारच्या ताब्यात दिली. तोपर्यंत खरोखरीची वरकड जमीन विकून टाकली आणि सरकारी ताब्यातली जमीन आपली मूळची जमीन आहे म्हणून कोर्टात दावे लावले. जमीन परत मिळविली. पण हायकोर्टानही अधि-काऱ्याला विचारलं नाही का बाबा रे, आधीची वरकड जमीन मूळ जमीन म्हणून कशी ठेवलीस आणि मालकाची जमीन का ताब्यात घेतली ?

अहो, फक्त पांढरे टोपीवालेच ' असे ' असतात असं नाही !

शेतीचं तसच आहे. आज राज्याच्या उत्पन्नात २८ टक्के उत्पन्न शेतीचं आहे. इथले ६८ टक्के लोक शेतीवर जगतात. महाराष्ट्रातली पाटबधारे योजना उसासाठी राबवली आहे. ज्वारीसाठी पाणी नाही. दुष्काळी भागात जिरायत, कोरडवाहू जमिनीला पाणी हव. पण ते दिलं जात नाही.

आणि Ecological imbalance किती? आमची जगल तोडून कोळसा शहराकडे, पाणी शहराकडे. आमचे पाण्यावर चालणारे धंदे बद झाले. इथलं जंगल, पाणी, पैसा, माणसं शहरासाठी वापरायचे फक्त!

आज आमचं सरकार मुबईसाठी केंद्राकडं १ हजार कोटी रुपये मागते. पण खेड्यात उद्योगधंदे काढण्यासाठी किती तरतूद आहे? अरे, ही आमची खेड्यातलीच मुलं इथं शहरात आली. त्यांची न् अधिकाऱ्यांची, सचिवाची पंचतारांकित संस्कृतीची गट्टी झाली. शेतकऱ्याचा मुलगा मुबईतून शेतकऱ्याच्या विरुद्ध कायदे करतो. तिकडची संपत्ती मुबईत येते. मुबईच्या फ्लॅटवाल्यांवर टॅक्स बसवा ना! एवढ्या उंच मजल्यावर राहता, पाणी घेता. लादा टॅक्स! विकास कर, वीज कर, पाणी कर असं लादा ना! मुंबईसाठी १ हजार कोटी जमा होतील!

'पण नाही, कारण ही आमचीच पोरं. आधी शहरात जातात. नतर मुबईत फ्लॅट घेतात! तुम्ही यादी काढा सगळ्या आजी-माजी आमदार मंत्र्यांची! प्रत्येजण मुबईत फ्लॅट घेण्याच्या धडपडीत. ते आमदाराच्या नियोजित कॉलनीच तरी काय आहे? मुबईत आमदारांची हाऊसिंग सोसायटी काढत आहेत त्यात विदर्भ-मराठवाड्याचेच दीडशे आमदार आहेत!'

सुदामकाका आवेशानं बोलत होते. ग्रामीण भागातली सपत्ती, सत्ता सर्व बाहेर जात आहे. तो नागवला जात आहे. गेल्या पचवीस वर्षांपासून; पण ग्रामीण भागातल्या हित-संबधांचा एक नवा आविष्कार आता होत आहे. शेतकरी सघटनेच्या रूपानं. त्या शक्तीचा प्रभाव कितपत पडेल? ती शक्ती आतापर्यंतच्या धोरणात बदल घडवून आणू शकेल का? असा प्रश्न विचारल्यावर ते म्हणाले–

नुसतं शेतमालाला भाव मिळून चालत नाही. ग्रामीण भागातले Social Relations बदलण्याचा सवाल आहे. शेतकरी सघटना व्यापक चळवळीशी जोडलीच गेली नाही.

शेतकरी सघटनेनं ग्रामीण विकासाकडे सर्व-व्यापी दृष्टीन पाहिलं पाहिजे. शहरीकरणाच्या नावाखाली विकासाची उलटीच गंगा वाहून राहिली आहे. खेड्यातली संपत्ती, माणसं शहरात पाठवण्याऐवजी modernize the village, तिथं विकेंद्रीकरण पाहिजे. सार्वजनिक वितरण व्यवस्था पाहिजे. हे शेतकरी सघटनेकडे नाही. त्यांच्या तात्पुरत्या मागण्या आहेत. त्याचे अलिकडचे Election gains स्थायी नाहीत. ग्रामीण भागात सर्व थरांना स्पर्श करेल असा कार्यक्रम, तसा राजकीय विचार पाहिजे. सघटनेचा आधार तर श्रीमत शेतकरी आहे. त्यामुळे ती सामाजिक आर्थिक परिवर्तनाच साधन होणार नाही.

## दलितांचा अलगतावाद

**प्रश्न : दलित चळवळीनही इथल्या परि-वर्तनासाठी प्रयत्न केले? त्यांची परिणाम-कारकता कशी वाटते?**

–दलित चळवळीनंच या समाजापासून अलगावाचा, परकेपणाचा दृष्टिकोन ठेवला. त्यांनी आपल्या समाजाला My Society म्हणून पाहिलंच नाही, शत्रूच मानलं. आता-पर्यंतची त्याची मांडणीच चुकीची आहे. त्यांच्या वाट्याची विषमता ही समाजातल्या अनेक प्रकारच्या विषमतेचा परिपाक आहे. या देशातली सामंतशाही परंपरा, रूढी यामुळे ते झाले. याचा सर्वांनाच सामना करावा लागेल. समानतेची सर्वांनाच गरज आहे; पण दलित चळवळ सगळ्याबरोबर समानतेच्या लढ्यात येण्याऐवजी अलग रहाते, राग करते. राखीव जागाप्रश्नी आंदोलनात सर्व समतावादी एकत्र येतात. पण शेतमजुरांच्या प्रश्नावर ते बरोबर येणार नाहीत· इतर विषमतेच्या प्रश्नावर ते बरोबर नाहीत.

–काही प्रमाणात सत्तेचे भागीदार झाल्याने त्याची मूलभूत चळवळीची प्रेरणा गेली; पण तिचा राजकीय प्रभावही नाही. त्यामुळे आज दलित चळवळ इतकी खडित झाली की, तिचं अस्तित्व जवळजवळ नाहीच.

**प्रश्न : गुजरातमध्ये मागास जातीं-विरुद्धचं आंदोलन चालू आहे. राखीव जागा विरोधाच्या नावाखाली. तसं काहीसं महा-राष्ट्रात होण्याची शक्यता आहे का? त्याला वातावरण अनुकूल आहे का?**

–यावर सुदाम देशमुख म्हणाले, 'गुज-रातमधला किंवा इतरत्रचा काय, राखीव जागांविरुद्ध तक्रार नाही तक्रार पदोन्नतीच्या रोस्टर पद्धतीविरुद्ध आहे. राखीव जागा बाकीचा कर्मचारी वर्ग मान्य करेल, मात्र रोस्टर पद्धतीत वैयक्तिक भावनाचा प्रश्न आहे.'

यापुढे कॉ. देशमुखानी धक्कादायक वाटेल असं विधान केलं. Upper class individual is ready to sacrifice for social transformation. But the situation is not suitable to do so. याला कारण आहे. दलितांचा अलगावा. या वृत्तीमुळं राखीव जागाविरोधी प्रवृत्तीना उत्तेजन मिळतं. सामाजिक बदलाच्या व्यापक चळ-वळीत–आंदोलनात ते आले तर त्यांच्या दोन गोष्टींसाठी समाज काय लढणार नाही? पण Their very separatist attitude foments the reaction.'

आज ब्राह्मण–मराठा तरुणात बेकारीबद्दल राग आहे. पण त्याला यामुळ जातीय कला-टणी मिळते.

या राखीव जागांच्या समस्येवर ते एक तोडगा सागतात;

'हा झगडा नोकरीला धरून आहे. तो सपवण्यासाठी राखीव जागा वाढवून–काढून टाकणे हा उपाय नाही. नोकरीची सकल्पनाच बदलून टाकणे हा त्यावर उपाय आहे. आज नोकरी ही प्रतिष्ठेच गमक आहे. नोकरी म्हटलं की त्यामागे स्थिरता, सामाजिक सुरक्षितता, प्रतिष्ठा यांची हमी हेच अभिप्रेत असतं. काम पूर्ण करण्यासाठी नोकरी अस नाही. त्यामुळं नोकरी ही एखाद्या मालमत्ते-सारखी झाली. त्याऐवजी रशियातल्याप्रमाणे २–३ वर्षे नोकरी ठेवावी. त्यामागच्या वर सागितलेल्या सकल्पना त्यामुळं बदलतील. नसता नोकरीच्या वाटपासाठी भाडणं चालूच राहतील. आज दलित झाले, उद्या मुस्लिम, परवा आणखी कोणी–अस भांडत राहील.'

मुद्दा चांगलाच होता. पण थोडसा बाजूला सरकत होता. सुदामकाका मार्क्सवादी–डावे म्हणून डाव्याच्या चळवळीच्या प्रभावाविषयी, त्याच्या योगदानाविषयी मी विचारलं. इथंही

काकांनी 'अपेक्षा' भंग करायचं ठरवलेलं होतं असं वाटतं. कारण 'डावी चळवळ' नाव काढताच ते म्हणाले,

'Left forces can only grow in the womb of nationalism. Outside it, they can't survive (राष्ट्रवादाच्या गर्भातच डाव्या शक्ती बळकट होऊ शकतात) आणि हे सार्वत्रिक सत्य आहे. तुम्ही टिळक-आगरकर वाद रंगवला आगरकरांना समाज-सुधारणा पाहिजे होती. टिळक राष्ट्रवादासाठी समाजसुधारणेला वगळत होते असं आपण म्हणतो. त्यांना सुधारणेत रस नव्हता असं म्हणतो, पण तसं नाही. परकीय सरकार राहिलं तर खऱ्या अर्थानं समाज सुधारणार नाही, उलट feudalism च वाढेल. त्याऐवजी सत्ता आपल्या हातात असली की झपाट्याने-सर्वंकष सुधारणा करता येते. परकी सरकार चार-दोन दिखाऊ सुधारणा करते.

-तसंच डाव्या शक्तींबाबत आहे. राष्ट्रीय प्रवाहाशी तादात्म्य पावल्याशिवाय मार्क्सवादाचं विधायक आचरण (Creative application of Marxism) शक्य नाही. त्यादृष्टीनं महाराष्ट्रात काय चित्र आहे? इथं सत्तेला बहुजन समाजाची मान्यता आहे. तिला legitimacy आहे. अशा वेळी हा वर्ग तुमच्याकडे आकृष्ट करून घेण्यासाठी तुमचे विशिष्ट धोरण काय आहे? Left is always a natural policy अशी स्थिती आता इथे नाही. इथले डावे पक्ष काँग्रेसमधल्या उणिवाच शोधत आहेत. काय केलं नाही याचा पाढा वाचत आहे.

-यापेक्षा डाव्या पक्षांनी डावे धोरण टिकेल, चालू राहील असं काही करावं. आज अनेक सरकारी महामंडळे तोट्यात आहेत, अकार्यक्षम आहे. त्यामुळे, नव्या राज्यकर्त्यांच्या धोरणाने व लोकांच्या दृष्टीनेही State sector ची प्रतिमा बिघडत आहे. त्यावेळी State sector लोकोपयोगी करण्याच्या दृष्टीने 'सरकारी (राज्याचे) उद्योग बचाव' चळवळ इथे नाही. आज एस्. टी. तोट्यात चालते. म्हणून एस् टी. बंद करून ती खाजगी कंपनीकडे देऊ नये म्हणून एस् टी कशी लोकोपयोगी होऊ शकेल हा प्रयत्न नाही. त्याऐवजी कुठं थोडी पगारवाढ, काही फुटकळ मागण्या यांच्यामागे हे पक्ष आहेत. सरकारने लोकांसाठी अंगिकारलेले उद्योग-व्यवसाय तोट्यात जाण्याची लाट आली. तिथं मक्तेदार-भांडवलदार त्याला खतम करायलाच बसले आहेत. त्यावेळी डाव्यांनी State sector यशस्वी कसं होईल याचे प्रयत्न करावेत.

- दुसरं, आज सामाजिक प्रबोधनाच्या सगळ्या चळवळी, विधायक संघर्षात्मक कार्य हे समाजवादी-साम्यवादी कक्षेच्या (orbit) बाहेर चालत आहे. म्हणजे या पुरोगामी, नव्या चळवळींना खाद्य पुरविणारे नवे विचार आमचे, मात्र चळवळी आमच्या नाहीत अशी स्थिती आहे. स्त्री-मुक्ती चळवळ कर्वेनी सुरू केली, दलित चळवळ ज्योतीराव फुले, आंबेडकरांनी सुरू केली. आता आमच्याशिवाय दुसरेच, बाबा आढावांसारखी माणसंच ती चालवतात, कामगार चळवळीत दत्ता सामंत, शेतकरी संघटना वेगळीच, शेतमजुराच्या संघटना, कष्टकरी संघटना, शिवाजीरावांचे तपोवन कुठेच कम्युनिस्ट नाहीत!

गोदूताई परुळेकरांच्या ठाणे जिल्ह्यातील आदिवासी कार्याचा उल्लेख करताच ते म्हणाले, 'ते गोदूताई म्हणून काम केलं, लोक जमले.'

'सर्वात समृद्ध प्रागतिक विचारसरणी असूनही कृतीच्या, त्याच्या अंमलबजावणीच्या नावानं दरिद्री अशी इथली डावी चळवळ आहे. तिनं आता आत्मपरीक्षण करावं. चाळीस वर्षं इथं चळवळ आहे, पण Contribution काहीच नाही, असं व्हायला नको. शेवटी परिवर्तनाची विचारसरणी तीच आहे.'

एवढं झाल्यावर आणखी गप्पा झाल्या. नंतर म्हणाले, फार झाल बोलणं. 'या सगळ्या बोलण्यातला एकेक मुद्दा पुराव्यानं शाबित करावा, Expose करावं तरच काही अर्थ आहे.'

□


**राजहंस प्रकाशन**

**कुंपण आणि आकाश**

मंगला गोडबोले

वीस रुपये

बाईचं सुख? तिला दुःख आहेच कुठे?
हा युक्तिवाद एकीकडे आणि
आपल्या सांस्कृतिक, सामाजिक संदर्भात
बाईला सुख मिळणं शक्य नाही
ही भूमिका दुसरीकडे
खरं तर या दोन टोकांमध्येच
स्त्रीजीवनाच्या अमर्याद शक्यता,
सामर्थ्य आणि मर्यादा असण्याची
शक्यता आहे. त्या शोधण्याचा
एक प्रयत्न!



# अस्थिरता

## विविध गटांची, वर्गांची नवी आव्हाने

डॉ. अशोक चौसाळकर
राज्यशास्त्र विभाग, शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

**१९६०** साली संयुक्त महाराष्ट्र स्थापन झाला. या नव्या राज्याचे मुख्यमंत्री यशवंतराव चव्हाण यांनी समाजवादी महाराष्ट्राचे ध्येय लोकांसमोर ठेवले. चव्हाण यांचा समाजवाद ह' काँग्रेसी समाजवाद होता, त्याचा मार्क्सप्रणित शास्त्रीय समाजवादाशी फारसा संबंध नव्हता. चव्हाण यांनी काही लोकाभिमुख योजना या काळात राबविल्या. महाराष्ट्रातील बहुजन समाजात स्वतःच्या कर्तृत्वाविषयी आत्मविश्वास व महत्त्वाकांक्षा निर्माण केली. त्यातूनच पंचायती राज्य निर्माण झाले. प. महाराष्ट्रात महत्त्वाकांक्षी सहकारी संस्था निर्माण झाल्या आणि सहकारी साखर कारखाने उभे राहिले. काही भागात ग्रामीण उद्योग उभे राहिले. कृषि औद्योगिक समाज निर्माण करून ग्रामीण महाराष्ट्राचा कायापालट करण्याचे चव्हाण यांचे स्वप्न होते.

ग्रामीण महाराष्ट्राचा या काळात बराच कायापालट झाला. शेतकऱ्यांनी व्यवस्थापिलेली सहकारी साखर कारखानदारी उभी राहिली. शेतकऱ्यांना कर्जपुरवठा करून त्यांना ऐन पावसाळ्यात मदत करणारी यंत्रणा उभी करण्यात आली. नवी बी–बियाणे आणि रासायनिक खते व नवे पाटबंधारे, धरणे व पाझर तलाव यामुळे ग्रामीण भागात काहीसा बदल दिसू लागला. नवा बागायतदारांचा वर्ग ग्रामीण भागात निर्माण झाला. ह्या नव्या शेतकऱ्याजवळ प्रचंड आत्मविश्वास होता. या नव्या वर्गाचे पुढारपण यशवंतराव व त्यांच्या काँग्रेसकडे होते. १९४८–५० या काळात जो शेतकरी कम्युनिस्ट व शेकापच्या प्रभावाखाली गेला होता, त्याला चव्हाणांनी विकासाचा एक नवा मार्ग दाखविला. १९६० नंतर कम्युनिस्ट व शेका पक्षात असणारे पुढारी काँग्रेसमध्ये डेरेदाखल झाले. त्यांनी स्वतःच्या कर्तृत्वाच्या जोरावर सहकारी क्षेत्रात साम्राज्ये उभारली. त्यातल्या काहीजणांची आर्थिक ताकद लक्षभोजने देण्याइतकी वाढली. हा जो नवा वर्ग महाराष्ट्रात वाढत होता त्याला जनतेचा पाठिंबा होता. त्यामुळे निवडणुकीत त्याचा पाडाव करणे अवघड होते. प्रथम बागायती शेतीमध्ये या लोकांनी जम बसविला. त्यानंतर साखर कारखान्यांवर आपले वर्चस्व प्रस्थापित केले. सहकारी बँका आपल्या कक्षेत ठेवून त्यांनी जिल्हा परिषदांवर नियंत्रण प्रस्थापित केले. त्यातूनच मग यातील काहीजण आमदार–खासदार झाले. काही यशस्वी मंत्र्यांनी जिल्हा परिषदेचा कारभार मोठ्या कौशल्याने हाकला होता. सत्तेचा हा वर्गीय पाया संस्थात्मक पाठिंब्यामुळे जास्तच बळकट झाला. त्याला जातीचेही थोडेसे बळ मिळाले. कारण अल्पसंख्य भटजी–शेटजींचा राजकारणातील आधार नष्ट झाला. बहुसंख्य जनता नव्या पुढाऱ्यांना वाव देऊ इच्छित होती. याच काळात भूमिहीन शेतमजूर, दलित व आदिवासी संघटित होऊन विकासातील आपला वाटा मागू इच्छित होते. रिपब्लिकन पक्ष कम्युनिस्ट, समाजवादी यांनी अशा प्रकारची आंदोलने केली.

चव्हाणांनी महाराष्ट्रातील या बागायतदार वर्गाची मुंबईच्या बड्या भांडवलदाराशी चांगलीच दोस्ती जमविली. त्यामुळे ' समाजवादी ' महाराष्ट्रात हा भांडवलशहा चांगलाच फोफावला, बळावला. त्याने मुंबईतील मराठी माणसाची नागवणूक केली. मराठी भाषा दडपून टाकली आणि सनदी नोकरशाहीच्या मदतीने मुंबईतील मराठी माणसाची उचलबांगडी करण्याचा चंग बांधला. पण वर्गीय स्वार्थ एवढा बळकट पायावर उभा होता की मराठी नेतृत्वाने त्याची फारशी फिकीर केली नाही. राष्ट्रीय स्तरावर काँग्रेस पक्ष खूप

मजबूत अवस्थेत होता. त्या पक्षाचा व राष्ट्रीय भांडवलदाराचा चव्हाण याना पाठिंबा होता. त्यामुळे दोन्ही वर्गसंबंध व्यवस्थित हितसंबधांनी आकळले गेले. शेतीचा भांडवलीविकास व मुंबईच्या मक्तेदार भांडवलशाहाचे सामर्थ्य यामुळे चव्हाण व महाराष्ट्र कॉंग्रेस याचा पाया मजबूत झाला. वर्ग, जात आणि भाषा या तीनही आकारावर कॉंग्रेस पक्ष उभा होता. त्यामुळे त्याना आव्हानास फारसे तोंड द्यावे लागले नाही. डावे पक्ष कमजोर होते. शेकापचे सामर्थ्य मर्यादित होते आणि प्रतिगामी जातीयवादी पक्षाचा आधारभूत पाया कमजोर व तोकडा होता. त्या पक्षाना मुख्य आव्हान म्हणून लोकासमोर उभे करणे चव्हाणाना फायद्याचे होते व ते त्यानी केले.

१९६०–१९७५ म्हणजे जवळजवळ पधरा वर्षे महाराष्ट्र कॉंग्रेसवर चव्हाण व त्याचे हस्तक वसतराव नाईक याचे वर्चस्व होते त्याना विरोध करणाऱ्याची परिस्थिती वाईट होत असे कारण ते सत्तेच्या सर्व स्थानावरून बाहेर फेकले जात. १९६४ व १९६६ च्या केंद्रीय सत्तातराच्या वेळी चव्हाणानी आपल्या पाठीमागे असणाऱ्या ४०–५० खासदाराच्या मदतीने महत्त्वाची भूमिका पार पाडली. पण त्याचे शक्तिस्थान केवळ महाराष्ट्र राहिल्यामुळे त्यांना पतप्रधानपद मिळाले नाही ११६६ मध्ये इदिरा गाधी पतप्रधान झाल्या. १९६९ मध्ये चव्हाण यानी नीलम सजीव रेड्डीना पाठिंबा दिला. यावेळी चव्हाण याचे पक्षावर एवढे जबरदस्त वर्चस्व होते की २११ पैकी २०४ कॉंग्रेस आमदारानी रेड्डीना मतदान केले. पण रेड्डीचा पराभव होताच चव्हाण इदिरा गाधीना सामील झाले. पण त्या घटनेमुळे इदिराजीचा त्याच्यावरील विश्वास कमी झाला.

१९७१ मध्ये कॉंग्रेस पक्षाने निवडणुका जिंकल्या. विरोधी उजव्या युतीचा दारूण पराभव झाला. विजयानतर लगेच इदिराजीनी ब्रह्मानंद रेड्डी, मोहनलाल सुखाडिया व महेंद्रमोहन चौधरी या तीन शक्तिशाली मुख्यमंत्र्याची हकालपट्टी केली. पण नाईक सत्तेवर कायम राहिले जर चव्हाण १९६९ मध्ये इदिरा गाधीबरोबर आले नसते तर त्याची राजकीय कारकीर्द त्याचवेळी लयास गेली असती. कारण इंदिरा गाधीनी या काळात मध्यम वर्ग व मध्यम शेतकरी जातीना आपल्याभोवती संघटित केले होते. चव्हाण व त्याचे पाठीराखे जर प्रवाहाच्या विरुद्ध दिशेने पोहोले असते तर पराभूत झाले असते कारण राष्ट्रीय पातळीवरील व राजकारणाचा प्रभाव मराठी राजकारणावर मोठ्या प्रमाणात पडतो.

## यशवंतरावांना आव्हान

१९७१ नतर केंद्रात मुंबईप्रदेश कॉंग्रेस समितीचे अध्यक्ष रजनी पटेल यांचा प्रभाव वाढू लागला. मुंबई प्रदेश कॉंग्रेस समितीच्या अध्यक्षपदी बसणारी व्यक्ती महत्त्वपूर्ण बनावयास पाहते. पक्षाला फड पुरविण्याची त्याची जबाबदारी असते. रजनी पटेल याच्या मदतीने हळूहळू इदिरा गाधीनी वसतराव नाईक यांच्या विरोधी गट उभा केला व १९७५ च्या सुरुवातीस मराठवाड्यातील शकरराव चव्हाण याना मुख्यमत्री बनविले. या सत्तातरामध्ये रजनी पटेल यानी महत्त्वाची भूमिका बजावली.

शकरराव चव्हाण मुख्यमत्री झाले त्यावेळी कॉंग्रेसमध्ये दोन गट होते. एक गट भूतपूर्व कम्युनिस्टांचा. त्यात वारूमा, पटेल, रे आणि सत्पथी याचा समावेश होता. दुसरा गट जुन्या कॉंग्रेसवाल्यांचा उजवा गट होता. त्यात जगजीवनराम, चव्हाण, रेड्डी, चद्रशेखर याचा समावेश होता. मोक्याच्या वेळी चव्हाण आपणास दगा देतील अशी इदिराजीना भीती असल्यामुळे डाव्या गटास जवळ असणारे शकरराव मुख्यमत्री झाले. शकरराव जरी मुख्यमंत्री असले तरी बहुसख्य आमदाराची निष्ठा चव्हाणाना होती. वसतदादा त्यावेळी पाटबंधारे मत्री होते त्यानी शकररावाचे नेतृत्व मनापासून कधीच स्वीकारले नाही; पण शकरराव चव्हाण मुख्यमत्री झाले आणि सहा महिन्यात इदिरा गाधीनी आणीबाणीची घोषणा केली. शकररावानी आणीबाणीचा उपयोग आपले स्थान बळकट करण्यासाठी केला.

आणीबाणीत शकररावानी बऱ्याच यशस्वीपणे जमीन धारणा कायदा अमलात आणला. त्याचप्रमाणे ग्रामीण कर्जनिवारण, रोजगारहमी व इतर योजना फार चागल्या राबविल्या. त्यामुळे इदिरा गाधीचे नाव तळागाळापर्यंत जाऊन पोहोचले. त्यानी सहकारी क्षेत्रावर काही मर्यादा आणल्या, त्यामुळे सहकार सम्राट नाराज झाले त्यातच वसतदादाची त्यानी सत्तेवरून हकालपट्टी केली.

आणीबाणीनतरच्या १९७७ च्या निवडणुकीत शकरराव व यशवतराव गटास ४८ पैकी २४–२४ जागा मिळाल्या. यशवतराव जगजीवनराम याचेबरोबर जातील अशी भीती वाटत होती. पण तसे झाले नाही आणीबाणीविरुद्धच्या जनतेच्या रोषाचा फायदा विरोधकाना मिळाला. शकररावासारखा मागास मराठवाड्यातील माणूस आमच्या डोक्यावर मिरे वाटतो, हे काही लोकाना आवडले नाही. मराठवाड्यातील जमीनदार वर्ग कमाल जमीनधारणेच्या कडक अमलबजावणीमुळे रागावलेला होता. लोकशाहीच्या नावाने केल्या जाणाऱ्या भडक प्रचारामुळे पाढरपेशा मध्यमवर्ग चवताळलेला होता यशवतरावाच्या गटाने शकरराव गटाचे उमेदवार पाडण्याचा प्रयत्न केला. त्यातूनच १९७७ मध्ये प्रथमच ४२ पैकी २८ जागा विरोधी पक्षीयाना गेल्या. २० कॉंग्रेस खासदारापैकी मूठभरच इदिरा गाधीना पूर्ण निष्ठा वाहिलेले होते.

शंकरराव चव्हाणानी १९६० पासून महाराष्ट्राच्या राजकारणात माड रोवलेल्या हितसबधी गटाना प्रथम आव्हान देण्याचा प्रयत्न केला. त्यात ते पूर्णत: यशस्वी झाले नाहीत. त्यावेळी केंद्रात 'जनता सरकार स्थापन झाले. इदिरा गाधीच्या जागी यशवतराव चव्हाण याची कॉंग्रेस ससदीय पक्षाच्या नेतृत्वपदी नियुक्ती झाली व वसतदादा व वसतराव नाईक यानी शकररावाना पदच्युत करण्याचे प्रयत्न सुरू केले मोरारजी देसाई, चद्रशेखर, जगजीवनराम याच्याशी चव्हाणाचे चागले सबध होते म्हणून त्यानी नऊ राज्यात लगोलग ज्या निवडणुका झाल्या त्यात महाराष्ट्राचा समावेश होऊ दिला नाही जलद हालचाली करून त्यानी शंकररावाची उचलबागडी केली व वसतदादाना मुख्यमत्रीपदी बसविले चिडलेल्या शकररावानी स्वत चा राजकीय अपरिपक्वपणा दाखवीत स्वत चा एक पक्ष काढला. ते जनता पक्षाच्या आघाडीत सामील झाले. शकररावानी सात–आठ महिने जरी कळ काढली असती तरी त्याना राजकीय पुनरागमनाची सधी होती; पण प्रचारमाध्यमाच्या चौफेर इदिराविरोधी प्रचारामुळे त्याची दिशाभूल झाली

वसतदादाचे रूपाने जे सत्तातर झाले त्यामागे एक सूत्र होते. ते

हे की पश्चिम महाराष्ट्रातील शक्तिशाली साखर सम्राटांच्या व त्याच्या हस्तकाच्या ताब्यातच सत्ता राहिली पाहिजे. तसे झाले नाही की ते नव्या मुख्यमंत्र्यास फार काळ टिकू देत नाहीत असा इतिहास आहे. कॉंग्रेसमधील प्रस्थापित उजव्या गटाकडे ही सत्ता आली व डाव्याचा पूर्ण पराभव झाला. यानंतर महाराष्ट्रातील कॉंग्रेसमधील व कॉंग्रेस बाहेरील डावे राजकारण जे भरकटत गेले ते गेलेच. १९७७ मध्ये कॉंग्रेसच्या विघटनास सुरुवात झाली. आपल्या महाराष्ट्रातील सामर्थ्याच्या जोरावर यशवंतराव चव्हाणांनी इंदिरा गांधीचे शत्रुत्व स्वीकारले. इंदिरा गांधीनी जनता पक्षाविरुद्ध मोहीम उभारली. चव्हाण त्यांना आव्हान देऊ शकले नाहीत कारण इंदिरा गांधी एक घोंघावते वादळ होते.

## पुलोदचे आगमन

इंदिरा गांधीनी आपला स्वतःचा वेगळा पक्ष स्थापन करण्याचा मनसुबा जाहीर केला आणि १९७८ च्या सुरुवातीस एका नव्या पक्षाची त्यांनी स्थापना केली. गुजरात, कर्नाटक, आंध्र, केरळ, ओरिसा व सर्व उत्तर भारतात त्यांना चांगला प्रतिसाद मिळाला. महाराष्ट्रात वसंतराव नाईक बराच वेळ कुंपणावर होते. ते इंदिराजीच्या पक्षात सामील झाले नाहीत; पण नाशिकराव तिरपुड्यासारखे त्यांचे अनुयायी त्या पक्षात सामील झाले. हा सारा बनाव १९७८ च्या विधानसभा निवडणुका जिंकण्यासाठी होता. या निवडणुकीत तीन प्रतिस्पर्धी होते. जनतापक्ष व त्यांचे दोस्त पक्ष, कॉंग्रेस (रेड्डी) आणि इंदिरा कॉंग्रेस यामध्ये इंदिरा कॉंग्रेसची परिस्थिती सर्वात वाईट होती. कारण प. महाराष्ट्रात पक्षाला फारसा पाठिंबा नव्हता; पण इंदिरा गांधीना आपला पक्ष महाराष्ट्रात चांगली कामगिरी करून दाखवील असे वाटत होते. जनता पक्षाचा जनाधार तोकडा होता. पक्षातील जनसंघ व समाजवादी गटात भांडणे होती आणि ग्रामीण स्तरावराचे नेतृत्व दुय्यम दर्जाचे होते. शेतकरी कामगार पक्षाची संघटना व पाठिंबा मर्यादित होता.

केंद्रात सत्ताधारी पक्ष असल्यामुळे जनता पक्षाची सत्तेवर येण्याची शक्यता जास्त होती. वसंतदादाचा कॉंग्रेस (रे) पक्ष संघटना बांधून होता. सहकारी संस्था, पंचायती राज व नगरपालिका आणि राज्याची सत्ता या बळावर सत्तेवर पुन्हा येता येईल असा त्यांचा अंदाज होता. पण निवडणूक सभातून एक गोष्ट हळूहळू स्पष्ट होऊ लागली की इंदिरा गांधी पुन्हा लोकप्रिय होत आहेत, त्यांना अनुसूचित जाती व जनजाती, झोपडपट्टीतील रहिवासी व मुसलमानांचा पाठिंबा मिळत आहे. हा वर्ग तसा कॉंग्रेसचा परंपरागत मतदार. पण वसंतदादा व जनतापक्ष मालदारांचे व भांडवलदारांचे हस्तक पक्ष असल्याचे या मतदारांना भासू लागले. कॉंग्रेसची जी सर्वसाधारण अधिमान्यता असते ती रेड्डी कॉंग्रेसला नव्हती. त्यामुळे फेब्रुवारी ७८ मधील निकाल अनपेक्षित ठरले. निवडणुकीत कोणत्याच पक्षास बहुमत मिळाले नाही. जनता पक्षास सर्वात जास्त म्हणजे ९७ जागा मिळाल्या. रेड्डी कॉंग्रेसला फक्त ६९ व इंदिरा कॉंग्रेसला ६२ जागा मिळाल्या. चव्हाण यांच्या पक्षाला प. महाराष्ट्रात बऱ्यापैकी जागा मिळाल्या. जनता पक्षाला कोकण, पुणे व मुंबईत जास्त जागा मिळाल्या तर विदर्भ व उत्तर महाराष्ट्र इंदिरा कॉंग्रेसने काबीज केला. याचा अर्थ हा झाला की फक्त राजकीय संस्था व साखर कारखाने ताब्यात असले म्हणजे निवडणुका जिंकता येतातच असे नाही त्याला व्यापक जनाधार आणि विशिष्ट ध्येयदृष्टी असलेल्या विचारसरणीची गरज असते. मागास विदर्भ, अनुसूचित जाती-जमाती, मुसलमान व शोषित वर्ग जनता पक्षावर फारसा खूष नाही, हे इंदिरा गांधीनी बरोबर ओळखले. वसंतदादाबद्दल त्यांना फारसे प्रेम नाही. त्यामुळे त्यांनी या कमजोर दुव्यावर हल्ला करून चव्हाण यांचे पंतप्रधान बनण्याचे स्वप्न मोडीत काढले.

वसंतराव नाईक जर यावेळी इंदिरा गांधीबरोबर असते तर महाराष्ट्रातही इंदिरा कॉंग्रेसला बहुमत मिळण्याची शक्यता नाकारता येत नव्हती. पण वसंतराव व वसंतदादा यांच्या आपली चूक तात्काळ लक्षात आली आणि त्यांनी इंदिरा कॉंग्रेसबरोबर आघाडीचे सरकार स्थापन केले. पण नव्या सरकारवर नासिकराव तिरपुडे यांचे जबरदस्त दडपण होते. इंदिरा कॉंग्रेसचे नवे आमदार एका वेगळ्या परंपरेतील असल्यामुळे त्यांचे जुन्या आमदारांशी जमेना. १९७८ नंतर इंदिरा गांधीनी कॉंग्रेसचे स्वरूपच बदलून टाकले. त्यातूनच यशवंतरावांच्या प्रेरणेने पवारांनी समांतर कॉंग्रेस स्थापन केली. जनता पक्षाच्या साह्याने पुलोद सरकार स्थापन केले. त्यानंतर जवळजवळ चार वर्षे वसंतराव पाटील व यशवंतराव चव्हाण यांच्यामध्ये आडवा विस्तव जात नव्हता. तिरपुडे यांचा सासुरवास न सहन झाल्यामुळेच पवार फुटून बाहेर पडले.

पुलोद सरकारने जवळ जवळ पावणे दोन वर्षे काम केले. त्या काळात पवारांनी आपले राजकीय कौशल्य पणास लावून वसंतदादाच्या प्रत्येक व्यूहरचनेस तोड दिले. जनता पक्षातील समाजवादी व जनसंघ गटातील भांडणाचा फायदा उठवत आपले स्थान जनमानसात पक्के केले. पण केन्द्रातील जनता सरकार यशवंतरावांच्या अदूरदर्शी व अपरिपक्व राजकारणामुळे कोसळले व पवारांच्या सरकारलाही सुरुंग लागला.

१९७७ ते ८० या तीन वर्षात महाराष्ट्राने चार सरकारे पाहिली शंकरराव चव्हाण यांचे इंदिरावादी सरकार पदच्युत करून वसंतदादा मुख्यमंत्री झाले. पुन: ते इंदिरावादी तिरपुडे यांच्या मदतीने मुख्यमंत्री झाले. पण या काळातील प. महाराष्ट्रातील सत्ताकांक्षी गटाने उठाव करून शरद पवारांना बंड करावयास लावले. सहकार सम्राट तीन चार गटात विभागले गेले. कॉंग्रेसच्या चार पाच फळ्या झाल्या व महाराष्ट्राच्या राजकारणात एकसूत्रता व एकसंघपणा राहिला नाही. निरनिराळ्या सत्ताधारी गटांच्या पाठीमागे असणारे लोकगट सतत खादेपालट करू लागले.

## इंदिरा पुनरागमन

१९७७–८० या तीन वर्षात महाराष्ट्रात साखर सम्राट विभागलेले होते. भांडवलदार दिङ्मूढ झाले होते आणि नव्यानेच राजकारणात घुसलेले राजकारणी इंदिरा कॉंग्रेसच्या आश्रयाने पुढे सरकू पहात होते. या काळात नव्याने जागृत झालेले वर्ग आपले अधिकार राखण्यासाठी राजकारणात उतरत होते. मराठवाड्यातील नामांतर दंगलीमुळे अनुसूचित जाती व जमाती जागृत झाल्या होत्या. बागायतदारांचे प्रश्न कॉंग्रेस व जनता सोडवू न शकल्यामुळे शेतकरी वर्ग

हळूहळू जागृत होत होता. शेतमजुराचे लढे संघटित केले जाऊ लागले आणि मुंबईत दत्ता सामंत यांच्या नेतृत्वाखाली जहाल कामगार चळवळ झपाट्याने मार्गक्रमण करू लागली. या काळात शरद पवारांनी मोठ्या कौशल्याने राज्यकारभार हाकला आणि राज्यातील ग्रामीण भागातील तरुणामध्ये स्वत:चे असे एक स्थान निर्माण केले.

पण जुलै १९७९ मध्ये मोरारजी सरकार पडले व त्यानतर आलेले चरणसिंग याचे सरकार अल्पायुषी ठरले. इंदिरा गांधीचा मार्ग मोकळा झाला. हे लक्षात घेताच तीन चार फळीत विभागले गेलेले महाराष्ट्र कांग्रेसचे भाऊबदकी करणारे शिलेदार कांग्रेस (इं) मध्ये सामील झाले. त्यात शकरराव चव्हाण, वसतराव पाटील, बाळासाहेब विखे, यशवतराव मोहिते याचा समावेश होता. १९८० च्या निवडणुकीत वसंतदादांच्या गटाला बऱ्याच जागा मिळाल्या आणि कांग्रेस (इं) ने निवडणुकीत मोठा विजय मिळविला. या काळात यशवंतराव चव्हाण व शरद पवार यानी आपली सत्ता तसेच नगर, सातारा, कोल्हापूर, बीड, पुणे, जळगाव, औरंगाबाद, उस्मानाबाद, सोलापूर या भागातील साखर कारखाने व जिल्हा परिषदा याच्या साह्याने निवडणुका लढविल्या. पवार व चव्हाण याचे दल व बळ या जिल्ह्यात इदिरा कांग्रेसपेक्षा कमी नव्हते. उमेदवारही नामाकित हाते पण लोकांना इंदिरा कांग्रेसच खरी कांग्रेस वाटत असल्यामुळे एक चव्हाण वगळता इतर उमेदवारे पराभूत ठरले. साखर कारखाने, जिल्हा परिषदा व नगरपालिका मागे असल्यामुळे निवडणुका जिकता येतातच असे नाही हे यावेळी पुन्हा एकदा सिद्ध झाले. शरद पवारांच्या पाठीमागे असणारे बरेच साखर सम्राट व जिल्हा परिषद अध्यक्ष कांग्रेस (इ) मध्ये सामील झाले. शरद पवार सरकार बरखास्त करण्यात आले.

१९८० मध्ये शंकरराव चव्हाण, वसंतदादा पाटील व ए. आर. अंतुले या तीन गटाचा महाराष्ट्र कांग्रेसवर तावा मिळविण्याचा प्रयत्न सुरू होता. दादा गटाने त्यासाठी बराच जोर लावला पण इदिरा गाधीनी १९७८ पासून देशातील सर्व आर्थिक व लोकसंख्येच्या दृष्टीने प्रभावशाली असणाऱ्या जातीचे महत्त्व कमी करण्याचा प्रयोग सुरू केला होता. कर्नाटक व आध्रात तो यशस्वी झाला होता. गुजरात, ओरिसा व केरळात पण हा प्रयोग यशस्वी होण्याची शक्यता होती. म्हणूनच त्यांनी महाराष्ट्रात इतके दिवस प्रभावशाली असणाऱ्या मराठा उमेदवारांची सख्या कमी केली. जनता पक्षातही मराठा आमदार कमीच होते. पण जनता पक्षाच्या विधान मडळ पक्षात प्रथमच ग्रामीण भागातून निवडून आलेल्या ब्राह्मणाची सख्या जास्त होती, तर इंदिरा कांग्रेसचा भर इतर मागास वर्गीय, मुसलमान व दलित यांच्यावर होता.

फक्त ३३ टक्के मराठा उमेदवारास तिकीट देण्यात आले. या काळात पवारानी जोर लावून महाराष्ट्राची अस्मिता हा निवडणुकीचा विषय केला होता.

निवडणुकीत कांग्रेसचा विजय झाला. मात्र तो लोकसभा निवडणुकीइतका प्रभावी नव्हता. शरद पवारांनी ४८ जागा मिळविल्या. भाजप व जनता पक्ष याच्यातील सुंदोपसुंदीत जनता पक्ष तिसऱ्या जागेवर फेकला गेला. प. महाराष्ट्र व मराठवाड्यातील कांग्रेसचा ग्रामीण भागातील पाया पवारानी पोखरला, पण मात्र मुबई, पुणे, नागपूरसारखा शहरी भाग व शहरी व ग्रामीण भाग याना जोडणारे नगर, पंढरपूर, लातूर, जळगाव, अकोला, अमरावती यासारखे मतदार सघ यामध्ये इंदिरा यशस्वी ठरली व अंतुले महाराष्ट्राचे मुख्यमंत्री झाले. अंतुले यांना विधिमडळ कांग्रेस पक्षात बहुमताचा पाठिंबा होता त्यानी रिपब्लिकन, शिवसेना, जुने हिंदुमहासभावादी व टाकाऊ पुढारी हाताशी धरले आणि असे चलाख राजकारण केले की त्यामध्ये भले भले वहावले.

## दोन अनवट मोहरे : पुन्हा दादा

देवराज अरस यानी ज्याप्रकारे कर्नाटकात व माधवसिंग सोळकी यांनी गुजरातेत राजकीय सत्तातर घडवून आणले तशा प्रकारचे सत्तातर अतुले यांनी महाराष्ट्रात घडवून आणावे अशी इंदिरा गाधीची इच्छा होती; पण अतुले यांचा जनाधार (base) मर्यादित होता. त्याना इतर मागासवर्गीय शेतमजूर, हरिजन, गिरिजन व मुसलमान याना आपल्या पाठीमागे उभे करण्यात तेवढे यश आले नाही. त्याचे पाठीराखे नव्याने राजकारणात घुसलेले तरुण, उद्योजक, विधिनिषेधशून्य व्यापारी व कारखानदार स्मगलर्स व काळाबाजारवाले होते. स्वत: अतुले यांची नेतृत्वशैली विधिनिषेधशून्य, अनावश्यकरित्या आक्रमक व जहाल अशी होती. महाराष्ट्रात इंदिरा गाधीना हवे असणारे सत्तांतर करण्याची धमक व रग त्याच्यामध्ये होती पण त्यानी जे मार्ग अवलबिले ते इतके विचित्र होते की त्याच्या आधारे सत्ता टिकविणे अवघड होते. शरद पवार, शरद जोशी व दत्ता सामत यांना परस्पराशी लढवीत ते राजकारण करीत होते. इंदिरा गांधी प्रतिभा प्रतिष्ठानच्या भानगडीत ते अडकले आणि त्याना सत्ता त्याग करावा लागला. त्यानतर अंतुले यांची प्रत्येक खेळी चुकत गेली. ते राजकारणातून जवळजवळ बाहेर फेकले गेले.

अतुले जाताच भोसले आले. यशवतराव त्याच्या चाळीस आमदारांसह पक्षात सामील झाले. या काळात राजीव गांधी याचा प्रभाव वाढत होता श्री. गाधी परिवर्तनापेक्षा स्थैर्याचे जास्त भोक्ते असल्यामुळे व चव्हाण याच्या पक्षात सामील होण्यामुळे वसतदादाची बाजू पक्की झाली. त्यातच आध्र व कर्नाटकात कांग्रेसचा पराभव झाला. १९८३ च्या सुरुवातीस वसतदादा पुन्हा मुख्यमंत्री म्हणून पदारूढ झाले. अंतुले व आदिक गट स्वत:च्या कारवायामुळे इतका बदनाम झाला होता की तो गट वसंतदादाना आव्हान देऊ शकला नाही. वसतदादानी राज्यास स्थैर्य दिले. कामगाराचे व शेतमजुरांचे लढे चिरडून काढले. मुबईच्या माडवलदारांस मोकळे रान सोडले आणि साखर कारखान्याना असख्य इजिनियरिंग कॉलेजेस काढावयास परवानगी दिली. वसतदादानी यशवंतरावापेक्षा वसंतराव नाईकांच्या प्रशासनशैलीचे अनुकरण केले. त्याच्याजवळ यशवंतरावांची ध्येयदृष्टी

## त्यानंतर अंतुले यांची प्रत्येक खेळी चुकतच गेली

नव्हती की शंकरराव चव्हाणांचा तडफदारपणा नव्हता. पण व्यापक जनाधार (base) प्रचंड लोकसंग्रह व श्रेष्ठ संघटना कौशल्य या बळावर दादांनी अंतुले व पवार यांच्या खटपटींना यशस्वीरीत्या तोंड दिले.

या काळात महाराष्ट्रात शेतकरी संघटनेने बाळसे धरले. संपूर्ण शेतकरीवर्ग पूर्वीसारखा काँग्रेसच्या पाठीमागे उभा राहीनासा झाला. शेतमजूर कामगार पण लढ्यात उतरले. इंदिरा गांधींच्या आकस्मिक व हत्येमुळे देशातील राजकारण बदलले आणि १९८४ च्या लोकसभा निवडणुकीत काँग्रेसला महाराष्ट्रात भरघोस यश मिळाले. त्यानंतरच्या विधानसभा निवडणुकीत शरद पवार यांनी पुलोदच्या रूपाने एक मोठे अवघड आव्हान काँग्रेसपुढे उभे केले होते; पण वसंतदादांनी यशस्वीरीत्या पवारांचा पराभव केला. काँग्रेस विधिमंडळ पक्षात दादांचे पाठीराखे बहुमतात होते पण केंद्रीय नेत्यांशी मतभेद होताच वसंतदादांनी सत्तात्याग केला व निलंगेकर महाराष्ट्राचे नवे मुख्यमंत्री झाले. गेल्या पाच वर्षात राज्याने ४ मुख्यमंत्री पाहिले. महाराष्ट्राच्या राजकारणाचे अशाप्रकारे विघटन होईल असे दहा वर्षापूर्वी कोणालाच वाटले नव्हते.

### पूर्वीपेक्षा बदल : पण कुणीकडे ?

१९७५-१९८५ हा दहा वर्षाचा कालावधी तसा परिवर्तनाचा कालावधी आहे. या काळात महाराष्ट्राने ६ मुख्यमंत्री पाहिले व वसंतदादा चारवेळा मुख्यमंत्री झाले. गेल्या दशकातील राजकारणात फारसे सातत्य जसे दिसत नाही तसे निश्चित असे दिशांतरही दिसत नाही. राजकारणात भाग घेणारे निरनिराळे वर्ग व लोकगट अजून स्वतःची परिस्थिती व सामर्थ्य जोखू शकलेले नाहीत. केंद्रात आणि राज्यात सतत बदल होत आहेत. त्यामुळे महाराष्ट्रात खऱ्या अर्थाने सत्तांतर झालेले नाही. १९६० सालच्या सत्तांतरानंतर १९८० साली अंतुले यांच्या मदतीने केलेला प्रयोग फसला. त्यामुळे विविध गटात व वर्गात जोडतोड चालू राहिली असती तरी कोणताही एक वर्ग आपला प्रभाव प्रस्थापित करू शकलेला नाही. मुंबईचे भांडवलदार व पश्चिम महाराष्ट्रातील साखरसम्राट पूर्वी ज्या प्रमाणात प्रभावशाली होते तेवढे ते राहिले नाहीत, कारण त्यांना नवनवे वर्ग आव्हान देत आहेत. यामुळे आपल्या प्रांताच्या राजकारणात सतत बदल होत आहेत, पण निश्चित दिशा गवसत नाही.

शिवाजीराव पाटील निलंगेकर अशा संधीकाळात मुख्यमंत्री झालेले आहेत. ते प्रशासन व राजकारण यामध्ये मुरलेले खेळाडू आहेत. एकदा सत्तेवर येताच त्यांना काढणे अवघड होणार आहे. त्यामुळे शरद पवारांना हाती धरून पुनः एकदा १९६० नंतरचा राजकीय बनाव घडवून आणण्याच्या प्रयत्नास खीळ बसली आहे. पण पवार महाराष्ट्राचे मुख्यमंत्री झाले तरी पूर्वीसारखे स्थैर्य लाभणे अवघड आहे कारण सामाजिक, आर्थिक व राजकीय परिस्थिती बदललेली आहे. पराभूत वर्ग व जातीगट लोकशाही व्यवस्थेच्या बाहेर जाऊन अशा प्रकारच्या सत्तांतरास विरोध करणार हे पंजाब व गुजरातमधील घटनांवरून स्पष्ट दिसते. म्हणून पुढील काही वर्षांत भारतीय लोकशाही खऱ्या अर्थाने कसास लागणार आहे. □

डार्विनचे वेगळेपण हे की त्याने माणसाला ' माणूस ' केले. मनुष्यात ' ईश्वरी ' अंश आहे, तसेच कोणा एकाच्या पापामुळे मनुष्यजन्म प्राप्त झाला आहे, या दोन्ही धार्मिक असत्यांच्या मगरमिठीतून त्याने माणूस मुक्त केला.

पण भारतीय समाजाला ही मगरमिठी अजून पूर्ण सोडवता आलेली नाही. माणसातील जाती-पोटजाती थेट परमेश्वराने निर्माण केल्या आहेत अशी आपली श्रद्धा आहे.

म्हणूनच डार्विन चरित्राचा अभ्यास आज उपयुक्त ठरेल.

# चार्ल्स डार्विन

**व्यक्ती, क्रांती आणि उत्क्रांती**

**लेखक : भा. रा. बापट**

डेमी आकार, पृष्ठे : १८२
भरपूर आकृत्या व साधार
विवेचनासह प्रकाशित झालेली
पहिली आवृत्ती.

**किंमत : रुपये बत्तीस**

शाळा कॉलेजच्या ग्रंथपालांनी
त्वरित मागणी करावी.

राजहंस प्रकाशन

१०२५ सदाशिव, नागनाथ पाराजवळ
पुणे ३०.



# दलित नेतृत्वानंच दलितांना एकटं पाडलं

— विजय गव्हाणे

नव्या विधानसभेत शेतकरी कामगार पक्षाचा विजय गव्हाणे हा तरुण आमदार आहे. परभणी जिल्ह्यात त्याच्या वडिलांनी —अण्णासाहेब गव्हाणेंनी—शे. का. पक्षाच्या विस्ताराचं काम केलं. औरंगाबादला असताना विजय युवक क्रांती दलाच्या चळवळीत होता. बहुजन, ग्रामीण भागात 'सत्ता'धारी असलेल्या मराठा जातीतील एक युवक सामाजिक परिवर्तनाच्या चळवळीत चमकतो, पुरोगामी आंदोलनात उतरतो हे चित्र आशादायक होतं. १९७४ च्या मराठवाडा विकास आंदोलनात, त्यानंतर मागासवर्गीयांच्या शिष्यवृत्तीत वाढ करण्याच्या आंदोलनात त्याचा सहभाग होता. मात्र त्यानंतर विजय गव्हाणे हे नाव लोकांच्या आठवणीतून जायला लागलं. मराठवाडा विद्यापीठाच्या नामांतराच्या निमित्ताने झालेल्या दंगलींच्या वेळी विजय गव्हाणे हा पुरोगामी युवक दुसऱ्याच बाजूला होता.

'त्यानंतर हळूहळू सत्तेच्या राजकारणात तो येऊ लागला. परभणीची शेतकरी कामगार पक्षाची सत्ता त्याला उपयोगी पडू लागली. १९८५ मध्ये तो विधानसभा निवडणुकीच्या आखाड्यात उतरला. भरवशाचा मतदारसंघ असूनही राजीव लाटेमुळे खात्री नव्हती. त्यावेळी परभणीतून श्रीमती आयेशा बेगम (त्या नुकत्याच वारल्या) कॉंग्रेस (आय) तर्फे उभ्या होत्या. यामुळे निवडून येण्यासाठी दोन्ही बाजूंकडून हिंदू–मुस्लिम मतांच्या ध्रुवीकरणाचे प्रयत्न होत होते. विजय निवडून आला तो असा.

सामाजिक परिवर्तनाच्या आघाडीवर असलेला ब्राह्मणेतरवादाची धुरा सांभाळणाऱ्या पक्षातील उच्च मराठा जातीतला हा युवक आता राजकारणात गेला. सामाजिक चळवळीचं क्षेत्र आता त्यानं जवळजवळ सोडलंच आहे. सत्तेतील Elites - counter elites या वर्गात तो आला. त्यादृष्टीनं तो आता मराठवाड्यातील आमदारांच्या (निदान विरोधकांच्या) लॉबीचा सक्रिय नियंत्रक असतो. पुलोदच्या मराठवाड्यातील पुढे येणारं नेतृत्व म्हणून त्याच्याकडे इतरांचं लक्ष आहे.

'सामाजिक चळवळीतून बाहेर पडल्यानंतर आता तिकडं बघताना तुला काय वाटलं?' असा प्रश्न केल्यावर तो म्हणतो.

— चळवळी आंदोलनं आता कुठं राहिलीत? दहा वर्षांपूर्वी आपल्याकडं पुरोगामी चळवळ किती जोरात होती. सारखं काहीतरी घडत रहायचं. लोकांना कार्यकर्त्यांना उत्साह होता. आम्ही समाजवादाची भाषा वापरत होतो...या दहा वर्षांत या चळवळीचं पार विघटन झालं. त्यासंबंधी जागच राहिली नाही. त्यावेळी आम्ही सोलापूरच्या मेडिकल कॉलेजमधल्या कॅपिटेशन फी–विरुद्ध आंदोलन उभारलं होतं. सर्व विरोधी पक्षांचा पुरोगामी शक्तींचा त्याला पाठिंबा होता. आज ग्रामीण भागात, सहकारी साखर कारखान्याच्या परिसरात इंजिनिअरिंग–मेडिकल कॉलेज निघत आहेत. त्यात कॅपिटेशन फी, देणग्या सगळं सर्रास चालू आहे. याला विरोध तर कोणी करतच नाही, उलट विरोधी पक्ष सदस्यांसकट सगळेच त्याचं समर्थन करत आहेत. कारण काय तर ग्रामीण भागात आधुनिक शिक्षण पोहचावं म्हणून! हे काय समर्थन आहे? म्हणजे आपल्या परिवर्तनवादी चळवळींची ही पुच्छप्रगतीच झाली! अशी अनेक क्षेत्रातली उदाहरणं देता येतील.

त्यावर विचारलं, 'दहा वर्षांपूर्वीपेक्षा आज ही स्थिती वेगळी आहे निराशाजनक आहे, म्हणतोस त्याला काय कारण असावं?'

— महाराष्ट्रात मांडवलशाही अर्थव्यवस्थेच्या विकासाचा हा परिणाम आहे. हे objective कारण झालं. या व्यवस्थेत चळवळींचं खच्चीकरणच होतं. त्याचाच परिणाम म्हणून आता तरुणांमध्ये पूर्वीसारखं मार्क्सवादी विचारसरणीचं आकर्षणच वाटे-

नास झालं. पधरा वीस वर्षांपूर्वी आमच्या ग्रामीण भागात, तालुका पातळीपर्यंत पोराना आपण मार्क्सवादी असाव, आहोत अस सागावं वाटत असे; त्याचा अभ्यास, चळवळीत भाग घेणं असा सहभाग असायचा. आता पाहतो तर सगळीच उदासी! या तरुणाचा आता कशावरच विश्वास राहिला नाही. राजकीय प्रक्रिया, विचारसरणी, नेते आणि सपूर्ण रचना यावरचा त्याचा विश्वास उडाला आहे. म्हणून हा वर्ग निपचित आहे.

**या नैराश्यातूनच सामाजिक तणाव निर्माण होतो. मंडल आयोगाला विरोध, नामांतरविरोधी दंगल या कशामुळे होतात? मराठा समाजातला शिक्षित तरुणवर्ग आपले हितसंबंध सुरक्षित रहावे म्हणूनच हे करत नाही का?**

इथं विजय गव्हाणे माजी सामाजिक कार्यकर्ता, आमदार, राजकारणी अशा विविध भूमिकेतून बोलत होता. तो म्हणाला,

'मंडल आयोगाला विरोध करणारं वसंतदादाचं मन हे सरंजामी मराठा समाजाचं मन आहे. तुला आमच्या खेड्यातल्या मराठ्याचा स्वभाव माहीत नाही. दलित जाती वगैरे तर सोडच; पण गावातलं एखादं घर जरी फार पुढारलं तर त्याला हे सहन होत नाही. हे Feudal धागे अजूनही बळकट आहेत. मांडवली अर्थरचनेचा तो परिणाम आहे. (इथे मार्क्स सुरू झाला.) नवी समाजव्यवस्था आली तरी सरकारी क्षेत्रातल्या कारखानदारीच रूप तसच राहिलं.'

**तरी दलितांवर रोष का?**

तो म्हणतो: मराठा तरुणाचं आजच्या राजकारणात काहीच भलं झालं नाही. त्याला नैराश्य आलं आहे. नेत्यांचा राग आला आहे. पण तो राग दलितांवर काढला जातो. त्या frustration चा फायदा घेऊन दंगली घडवल्या जातात. दलितांविरुद्ध.

या दलितावर इतर मागासवर्गीयांचाही राग आहे. तुला आश्चर्य वाटेल. आम्ही मडल आयोगाचा प्रचार करत असताना गावोगाव फिरत होतो. तिथं खुद्द ओ. बी. सी. वाल्यांनीच मंडल आयोगाच्या अमलाला विरोध केला. आम्हाला कळनाच! नंतर समजल की, रिझर्वेशन म्हटलं की शेडयूल्ड-कास्ट असं समीकरणच तयार झालं आहे! त्यामुळे ती मंडळी राखीव जागा नको म्हणत होती! अशा वेळी आपण फक्त समजून सागायच एवढंच.'

**शेवटी पुन्हा विचारलं, महाराष्ट्राला पुरोगामी चळवळीची, विचारांची पार्श्वभूमी असताना आज एवढा हा तणाव का वाढत आहे? दलितांविरुद्ध राग का आहे? आणि तो ही प्रामुख्यानं ग्रामीण भागातल्या मराठा समाजाच्या वतीनं का प्रगट व्हावा?**

या वेळी विजय गव्हाणे स्वत: चळवळीतून बाहेर पडायला कारणीभूत झालेल्या घटनाच्या अनुषंगानेच बोलत होता. तो युक्रांदमध्ये असतानाच दलितपॅन्थरच्या मडळींनी सवर्णांच्या पुरोगामी चळवळीला दूषणे देण्यास सुरुवात केली होती. त्याचा धागा पकडूनच विजय म्हणत होता. 'आपल्याकडे घुमसणारा तणाव जरूर आहे. कारण आंबेडकर, फुले याच्या समतावादी चळवळीची व्यापकता आज उरली नाही. रिपब्लिकन पक्ष सामाजिक-राजकीय क्षेत्रात जोपर्यंत विरोधक म्हणून होता, तोपर्यंत त्याची चळवळीशी बांधिलकी टिकून होती. १९६२ पर्यंत दलित चळवळदेखील एकसंध होती. दलिताना न्याय मिळावा अशी ग्रामीण भागातही भावना होती. मात्र त्यानंतर यशवंतराव चव्हाणाच्या राजकारणाला रिपब्लिकन पक्ष बळी पडला. तो काँग्रेसवासी झाला. तेव्हापासून त्याचा सामाजिक संदर्भ विरत गेला. त्यामुळे दलितामध्ये साहजिकच नैराश्य आलं.

त्यातून पँथरच्या रूपानं पुढं आलेलं नेतृत्व धारदार, आक्रमक होत-इथूनच ती चळवळ वेगळ्या वळणावर गेली.

- इथून दलित चळवळीची व्यापकता संपली. समान पुरोगामी शक्तीना, समाजाला बरोबर घेऊन लढा देण्याचं भानच त्याना राहिल नाही. आज ही चळवळ एकदर समाजापासून दुरावलेली, एकाकी आहे. याचे नेते भडक-बोलतात, त्याचे पाठीराखे असलेल्यांना तोडतात. दलिताना न्याय मिळावा म्हणून बहुजन समाजातला तरुण संघर्ष करतो. युक्रांदमध्ये असताना आम्ही अशा चळवळी केल्या.

दलित विद्यार्थ्यांच्या शिष्यवृत्तीत वाढ व्हावी म्हणून आदोलन केलं. त्यात सवर्णांचा सहभाग होता. मात्र त्यावेळी पँथरची ढाले वगैरे मंडळी दलित तरुणांना म्हणायची 'या ब्राह्मण-मराठ्यांना तुमचा आताच का पुळका आला? ही मडळी तुमचा भाडवल म्हणून उपयोग करत आहेत.' अशा बोलण्यानं त्यानी पुरोगामी आदोलनात फुटीची बीज रोवली. तरुणाची मनच दुभगली रे!

- त्यामुळ आमची पोरं म्हणायला लागली की, 'का आम्ही दलितांच्या बाजूनं उभं रहायचं?' दलितांच्या बाजूनं उभं राहणारं सामाजिक मन आज नाही. त्यांनीच ते बिघडवलं. दलिताबद्दल त्यामुळे आज सहानुभूतीही नाही. त्याचाच परिणाम मराठवाड्यातल्या नामांतराच्या दगलीत दिसला.

- खरं तर नामातराचा प्रश्न ग्रामीण भागात गैरलागू असतानाही तिथं दंगली का झाल्या? हल्ले का झालं? याचमुळे!

- त्या काळात दलितानी पुरोगामी शक्तीना सोडून काँग्रेसशी सधान बांधले. त्यामुळं या शक्तीची ताकदही कमी झाली. दलिताच्या बाजून सबळपणे बोलायलाही आज कुणी नाही. ती ताकदच कमी झाली. बहुजन समाजाला दलित नेत्यांनी दूर लोटलं जोपर्यंत रिपब्लिकन पक्ष विरोधी पक्षाबरोबर होता, तोपर्यंत दलितावर फारसे अत्याचार घडले नाही. काँग्रेसशी संधान बांधल्यावर मात्र त्यानी दलित नेतृत्वाला गाठीस बांधून दलितावर हल्ले सुरू केले! दलित एकटा पडला.'

विजय गव्हाणेचं बोलणच एखाद्या melancholy सारख वाटत होतं. प्रत्यक्ष कार्याच्या वर्तुळातून बाहेर पडल्यावर त्या पूर्ण प्रक्रियेविषयी उदासीनतेची भावना असते तशीच त्याच्या बोलण्यात भावना जाणवत होती.

परिवर्तनासंबंधी तो उदासीनच होता चळवळधा तरुण राजकारणात पडल्यावर त्याची Perceptions च बदलतात, त्याच तो उदाहरण होता.

□



# पुढल्या दशकात शुगर लॉबी प्रभावहीन होत जाईल

--डॉ. गो. स. कामत

'महाराष्ट्रातल्या सहकारी साखर उद्योगाला आपण Sugar lobby म्हणून दूषणं देतो. त्यातील काही वैयक्तिक गैरप्रकारांनी मी ही दोष देतो. पण याच शुगर लॉबीनं महाराष्ट्राच्या ग्रामीण भागात एक संस्थात्मक पाया घातला. सत्तेला एक सातत्य पुरवलं आणि काही म्हटलं तरी, कोणत्या तरी स्वरूपात ग्रामीण भागात विकास त्याची जाणीव आणली हे नाकारता कसा येईल ?'

– पुण्याच्या वैकुंठ मेहता व्यवस्थापन प्रशिक्षण संस्थेतले डॉ. गो. स. कामत आवर्जून हा मुद्दा सांगत होते. महाराष्ट्रातल्या सहकारी– विशेषतः सहकारी साखर चळवळींवर, जमीन सुधारणा कायद्यांवर त्यांचा अभ्यास आहे.

साखर उद्योगाचा 'गोडवा' गाणारे त्यांचे बरेच लेख वाचून विचारलं.

**– तुम्ही काय या** sugar lobby **चे रॅशनलायझर आहात ?**

**विचलित न होता ते म्हणाले, 'हो. त्यासाठी तशी कारणंही आहेत.'**

महाराष्ट्रात साखर उद्योग सरकारी साह्यानेच उभा राहिला. state partnership च्या वस्तुस्थितीमुळे सहकारी साखर उद्योग आणि सत्ता यांचं अपरिहार्यपणे नातं जुळलं कॉंग्रेस आणि साखर उद्योगांची परस्पर मैत्री त्यामुळेच झाली. याबाबत बोलताना ते म्हणाले. 'कोणताही उद्योग ज्याप्रमाणे आपला विस्तार करतो तसं साखर उद्योगानं धूर्तपणे स्वतःचं स्थान बळकट केलं. सरकारची त्यांना मदत मिळाली. त्याच्या बदल्यात सरकारला त्यांनी पाठिंबा दिला. त्यामुळे सरकारला पाठिंबा देणारी centres म्हणूनच पुढे त्यांचा विकास झाला.'

– या उद्योगांमुळे ग्रामीण भागात बदल घडला. कारखानदारी–रोजगार जादा क्रमशक्ती, कारखान्याच्या निमित्ताने विकासाला आवश्यक सुविधा, शाळा, इस्पितळे यांचं complex तयार झालं, सर्वांना एक विधायक अंग होतं. राज्याची प्रगती करण्यासाठी पोषक वातावरण तयार होतं.

– आपल्याकडच्या साखर कारखान्यांनी केलेलं योगदान लक्षात येण्यासाठी आपण दुसऱ्या राज्यांकडे पाहू. आज उत्तरप्रदेश, बिहार सारख्या राज्यात मोठ्या प्रमाणावर साखर उद्योग आहे पण इथे जसं आहे तशी सहकाराची एक फळी तिथे नाही. त्यामुळे तिथं संस्थात्मक पाया नाही. आपल्या साखर कारखान्यांनी ग्रामीण भागात एक संस्थात्मक पाया उभा केला. दुसरीकडे तर ग्रामीण भागात केवळ मनमानी, गुंडगिरी यांचंच राज्य आहे. आपल्याकडं तसं नाही. संस्थेत काही व्यक्ती शक्तीशाली आहेत. मात्र त्यांना संस्थेच्या संघटनात्मक बंधनात राहूनच शक्तीशाली होता येतं. आपल्या. कडच्या कारखान्यांमुळं ग्रामीण भागात बँका, खरेदी–विक्री संस्था, महामंडळेही आली.

– या शिस्तबद्ध बांधणीचा परिणाम म्हणून सरकारमध्ये ग्रामीण भागातील ही लॉबी आली. ग्रामीण भागात आतापर्यंत पैसाच गेला नव्हता. तिथं तो जात आहे. याच युक्तिवादाचा logical undercurrent म्हणून असं म्हणता येईल की, इथल्या सहकारी क्षेत्रानं सरकारला स्थैर्य दिलं. इथली सहकारी चळवळ संस्थात्मक पायावर उभी असल्यानं सरकार जरी बदललं तरी सहकाराचे स्वरुप बदलायचं काही कारण नाही. कारण सरकारमध्ये कोण व्यक्ती आहे. त्यानुसार इथलं सहकाराचं चित्र बदलत नाही. खालून वर सत्ता जाते. इतर राज्यात याच्या उलट आहे. तिथं सरकारमधली माणसं बदलली की सहकाराचं चित्र बदलतं.

– आता, या नव्या संपन्नतेचा परिणाम ग्रामीण भागातल्या शोषितांना मिळण्याला वेळ लागणारच. टप्प्याटप्प्याने ही प्रक्रिया होत जाणार. अजूनही साखर उद्योगांनी

फार काळ ही सत्ता उपभोगली नाही. प्रत्यक पातळीवर ती सत्ता नाही. यात लहान शेतकरी कुठेच नाही असं म्हणता पण विकासाच्या–समृद्धीच्या कोणत्याही क्षेत्रात हा भाग असतोच. त्यातही ग्रामीण भागात हे झरपण (Percolation) तितकं सोपं नाही.

## संबंधात बदल नाही

**सहकारी साखर चळवळीमुळे आर्थिक फायदा झाला तरी ग्रामीण भागातले जुने सामाजिक बंध तुटले आहेत, बदलले आहेत असं झालं का ?**

या प्रश्नावर ते म्हणाले,

: ग्रामीण भागात नवं नेतृत्व आलं. रोजगारामुळे क्रयशक्ती वाढली अनेक प्रकारचे उद्योग आले. (Diversification of activities) पूर्वीपासूनचे प्रतिस्पर्धी–ब्राह्मण–मराठा याचे स्पर्धात्मक संबंध आहे तसेच कायम. खालच्या, मागास जातींना आर्थिक लाभात काही वाटा मिळाला पण त्यांच्याविषयी मराठा समाजाचा दृष्टिकोन बदलला नाही. मात्र साखर कारखान्यात दलित–मागासांना नोकऱ्याच नाहीत अशी स्थिती मुळीच नाही. कॉंट्रॅक्ट लेबर खेरीज नियमित वेतनावर मागासांची भरती होतच असते.

– यासंबधात १९८० ची पुढील आकडेवारी पहा :

सांगलीच्या शेतकरी सहकारी साखर कारखान्यात २३ टक्के कामगार मागासवर्गीय, वारणानगर–२५ टक्के, शंकर सहकारी–३८ टक्के, माळेगाव–४५ टक्के, माळीनगर (सासवड)–५३ टक्के, श्रीराम सहकारी–५० टक्के, यशवंत (अकलूज)–४७ टक्के, छत्रपती–५६ टक्के

साखर कारखान्यांमुळे ग्रामीण भागात जातीनिष्ठ समाजाऐवजी वर्गावर आधारित समाज तयार होत आहे असं म्हणता येणार नाही. आज या कारखान्यात उच्च तांत्रिक जागांवर गुणवत्तेच्या आधारावर भरती होते. इतर भरती मात्र जातीवरच जाते. सामाजिक पदरचनेवरही ( Social stratification) या नव्या शक्तीचा काही परिणाम होत नाही.

– पण असंही पूर्णपणे म्हणता येणार नाही. एका भागात एक कारखाना गेला म्हणजे तिथल्या परिस्थितीत, सामाजिक संबंधात किती ढवळाढवळ होते ! तिथं शिक्षण येतं, कॉलेज येतं. शिक्षण, वाहतूक, वीज जाऊन पोचते.

**साखर कारखान्यांची मंडळी आणि शहरातली नोकरशाही यांचं संगनमत झाल्याचं दिसतं, ते कितपत ?**

: शुगर लॉबीची माणसे आज सरकारात आहेत. ते धोरण ठरवतात. धोरण ठरविणारे व त्याला अंमलात आणणारे यांचं संगनमत हे सर्वच काळात असतं. धोरण ठरविणारा हा काही तज्ज्ञ नसतो, त्याला फक्त robust commonsense असतो. त्यामुळे नोकरशाहीला काही बाबतीत अधिकार चालवता येतो हे खर असत तरी मंत्र्याला जेवढं वाटेल तेवढाच अधिकार सचिवाला घेता येतो. त्या पलीकडे नाही !

**साखर कारखाने ग्रामीण भागात असते तरी त्यातला पैसा सगळा शहरी भागात गुंतवला जातो. आज पंचगंगा, वारणा इथला माणूस, कोल्हापुरातच पैसा गुंतवतो, पैसा खर्च करतो. त्यानंतर मुंबई, शेअरबाजार !**

कामत यावर म्हणतात, भांडवल, नफा कितीही असल, तरी त्याची value appreciation हे शहरातच होतं. कोणत्याही वस्तूला, गुंतवणुकीला मूल्य शहरात येतं.

**आजकाल साखर-सम्राट व पश्चिम महाराष्ट्रातले 'एलिट्स' यांचं एक समीकरणच तयार केलं जातं. साखर उद्योगाचा (लॉबी) व पश्चिम महाराष्ट्रातील प्रभावाचा परस्परांशी संबंध आहे का ?**

: महाराष्ट्रात साखर उद्योग आहेत. पण ते सर्व Localised आहेत. जिथं स्थिती अनुकूल असेल तिथं त्यांच जाळं आहे. ही लॉबी जिथं कारखाने आहेत, त्यांची आहे ते समान हितसंबंधासाठी एकत्र येतात. बाकी त्यांची उद्दिष्टे निराळीच आहेत आज वसंतदादा–विखे पाटील अशी तुम्ही म्हणता त्या 'प. महाराष्ट्राच्या शुगर लॉबीत' दुफळी आहेच ना ! शुगर लॉबीची उद्दिष्टेच निराळी आहेत. मग ती मराठवाडा–विदर्भातली का असेना !

**आपल्याकडं साखर उद्योगच एवढा बलिष्ठ का ? महाराष्ट्रात सहकारीकरण अनेक क्षेत्रात आहे. मग तिथं एवढी सत्ता-संपत्ती किंवा Solidarity नाही असं का व्हावं ? उदाहरणार्थ विदर्भात कापसाच्या सहकारी संस्था आहेत, दूध सहकारी आहेत–मी.**

: एकतर State partnership हे साखर कारखान्याचं बलस्थान आहे. पहिल्यापासूनच दोन्हीमध्ये सुरळीत आंतरसंबंध आहेत. दुसरं असं की,साखरेच्या उद्योगात ऊस पिकविणारा व साखर उद्योग (कारखाना) यांच्या हितसंबंधात तफावत नाही, ते एकाच संस्थेत असतात. ऊस उत्पादकच कारखान्याचा सदस्य असतो किंवा vice–versa. सूत गिरण्यांमध्ये, (spining mills) तसं नाही. तिथं कापूस उत्पादक यांचा वेगळा हितसंबंध व विणकरांचे वेगळे असं असतं. कच्चा मालाचे पक्क्या मालाचे वेगवेगळे हितसंबंध असतात. विणकरांना स्वस्तात धागा पाहिजे तर कापूस उत्पादकांना अधिक भाव पाहिजे. त्यांचे कारखाने, संस्था निराळ्या असतात.

– डेअरीच्याबाबत तर स्थिती गुंतागुंतीची असते. किंमत–उत्पादन–पुरवठा याचा मेळच जमत नसतो. यामुळे साखर उद्योगच सहकारी क्षेत्रातील फायदेशीर व परिणामकारक उद्योग ठरले आहेत.

## खरं आव्हान अंतर्गतच

**: यापुढे शुगर लॉबीच्या वर्चस्वाला किंबहुना अस्तित्वाला काही आव्हान, धोका वाटतो का ?**

१९५० पासून महाराष्ट्रात मोठ्या प्रमाणावर साखर कारखानदारी सुरू झाली. १९५२ च्या निवडणुकांनंतर तिचं राजकारणात अस्तित्व जाणवू लागलं. ऊस हे टिकाऊ पीक आहे, त्यामुळे त्याला धोका नाही. गेल्या वर्षात ऊस कमी पडला, तो शेतकऱ्यांनी लावला नाही, ( भाव पडले होते) म्हणून. ऊस कमी करणे हा शेतकऱ्यांचा निर्णय आहे. या लॉबीला खरा धोका आतूनच आहे, तो सुद्धा त्यांच्या करणीतूनच निर्माण झाला आहे. राजकीय हिताच्या दृष्टीतून या उद्योगांचे हळूहळू नुकसानच होईल.

यासंबधी बोलताना डॉ. कामत पुढे म्हणाले राजकीय निवडणुका यांच्या लाभावर डोळा ठेवून साखर कारखान्यांना परवानगी देण्यात येत आहे. अशी क्लस्टर्स निर्माण करून एखाद्या विभागात कारखान्यांची गर्दी होते. मग ऊस पळवण्याचे प्रकार सुरू होतात. एकाच पक्षातील ही

मंडळी असतात–पण परस्पर स्पर्धा सुरू होते इथे सहकार धोक्यात येतो. या स्पर्धेने पूर्ण व्यवस्थाच Disturb होते.

– दुसरं म्हणजे भारंभार साखर कारखाने काढण्याच्या निर्णयामुळं कमी भाडवल-गुंतवणुकीत जास्तीत जास्त क्षमतेचे कारखाने काढण सुरू होत. पूर्वी दोन–तीन कोटीच्या भाडवलावर एक हजार टन क्षमतेचा कारखाना निघू शकत होता. आज तेवढ्याच भाडवलावर नऊ हजार कोटी टनाची क्षमता घेऊ पहात आहे खर तर आज एक हजार कोटी टनाच्या क्षमतेलाच ९ कोटीपर्यंत भाडवल लागेल. पण ही मंडळी ९ कोटीना तीन हजार टनाची क्षमता उभारत आहेत.

– अशा धोरणामुळे उद्योग आजारीच होणार तसंच एकाच भागात १५–२० कारखाने झाल्यानेही विपरीत परिणाम होतोच. आजारी उद्योग झाल्याने साखरेची किंमत वाढते. आंतरराष्ट्रीय बाजारात साखर स्वस्त आहे. म्हणून ती आयात करावी लागते. यामुळे इथला साखर उद्योग तोटघातच जाणार ना! राज्य सरकारचे यासबंधी short–sighted (अ–दूरदृष्टीचे) धोरण आहे. दीर्घ–कालीन धोरण परिणामाचा विचारच नाही. कारखान्याची गर्दी वाढवायची कशाला? त्याचबरोबर सतत रासायनिक खते अवाजवी वापरल्याने दर एकरी ऊसाचे उत्पादन घटतच आहे. त्याकडे दुर्लक्ष होत आहे.

– दुसरीकडे केंद्र सरकारच धोरण, त्याची झोनिंगची पद्धत महाराष्ट्राला अन्यायकारक आहे. त्यात राज्याच्या कार्यक्षमतेवर अन्याय होतो. उत्तरप्रदेश – बिहारमधील कारखान्याच्या रिकव्हरीचे प्रमाण ८ टक्के आहे म्हणून केंद्राच्या लेव्ही कोट्यासाठी त्याना जास्त भाव दिला जातो, सवलती मिळतात. महाराष्ट्रातील कारखान्यांची रिकव्हरी जास्त ११–१२ टक्के आहे म्हणून त्याच्याकडे कमी भाव हा प्रकार आहे.

साखर कारखाने नीट चालण्यात राज्य सरकारला फायदा असला तरी लोकसमेत केंद्रीय नेतृत्वात शुगर लॉबीचे काय प्रतिनिधित्व असणार? (जे आहे ते राज्यातच!) साखरे सबधी धोरण ठरविणार केंद्र सरकार! बरं राज्य नेतृत्व यासाठी केंद्राशी भांडेल म्हणावं तर तिथे पक्षनिष्ठेचा प्रश्न येतो. केंद्रीय नेतृत्वाला उत्तर प्रदेश–बिहारचे हितसबंध साहजिकच अधिक महत्त्वाचे वाटतात!

– अशा सर्व गोष्टी एकत्र येत आहेत. त्यामुळे पुढच्या दशकाच्या अखेरपर्यंत सहकारी साखर उद्योगाचा प्रभाव–हुकमत कमी होत जाईल.

### शेतकरी संघटना

**हे झालं अंतर्गत आव्हान पण बाह्य कोणते आव्हान असेल? शेतकरी संघटना हे आव्हान होईल का? ते कितपत ठरू शकेल? संघटनेमुळे शुगर लॉबीला काही धोका पोचेल का?**

शेतकरी संघटनेच्या मागण्यांचा, धोरणाचा, आंदोलनाचा पायाच मला संकल्पनात्मक दृष्ट्या चूक वाटतो. कच्च्या मालाच्या किंमती वाढवून मागितल्या, त्याचा परिणाम Finished products च्या किंमती वाढण्यावर होतो. शेतीतील स्थितीच अशी आहे की कच्चा माल, धान्य याच्या किंमती कमी राहणारच.

यावर 'शेतीमालाच्या किंमती नेहमी कमी राहणारच' असच तुम्हाला म्हणायचं ना अशी दोन-तीनदा मी खात्री करून घेतली.

डॉ. कामत म्हणाले, 'होय. शेतीत Nature factor (निसर्ग) महत्त्वाचा आहे. शेतकऱ्याला फक्त पेरणीच्या वेळीच काय पेरावं, पेरावं की नाही याचा निर्णय घ्यावा लागतो. एकदा पेरल्यावर बाकी सर्व निसर्गाच्या आधीन असतं. मनुष्य निर्मित उत्पादनात तस नाही. तिथं उत्पादन, किंमत या सर्व गोष्टीवर नियंत्रण ठेवता येते.

त्याचा (संघटनेचा) शेतमालाच्या भावाचा मुद्दाही टिकाऊ नाही. कच्चा माल-धान्य-दूध याच्या किमती वाढल्याने उत्पादन वाढेल; पण उपभोग (Consumption) कमी होतो त्याचं काय? मग माल खपणार का? किमती कुणासाठी वाढवायच्या? त्यावर आंदोलक म्हणतात, वाढीव दूध सरकारने शाळात, इतरत्र वाटावे, त्याचा सामाजिक दृष्ट्या लाभ होतो. पण at what cost? अशा वाटपात किती यंत्रणा, प्रयत्न, मनुष्य-बळ-पैसा जाईल. त्यामुळे दरडोई दूध घेण्याच प्रमाण वाढेलच अस नाही.

आपल्याकडे तुकडीकरण व विभागणी (Subdivision व Fragmentation) वाढत जाणार आहे. त्यामुळे किमती वाढून देण्यासारख्या बाह्य उपायांचा शेतीला फायदा होणारच नाही. उत्पादनखर्च हा नेहमीच वाढता राहील. शेती तोटघातच राहणार.

उत्पादनखर्च वाढल्याने किमती वाढवा. त्यातून मग Consumption कमी होईल. कमीत कमी उत्पादनाला जास्तीत जास्त भाव अशी परिस्थिती होईल. त्यामुळे शेतीमालाचे भाव वाढवा ही short-range policy झाली. त्यासाठी दूरदृष्टीचे धोरण हवे. उत्पादनखर्च परवडण्याजोगी स्थिती निर्माण करावी लागेल त्यासाठी जमीन-सुधारणेचा मूलभूत कार्यक्रमच कायद्याद्वारा करावा लागेल. जमिनीवर अवलबून असलेले, जमीन कसणारे कमी करावे लागतील. जमिनीचा आकार वाढवावा लागेल. त्यासाठी तुम्ही तयार आहात का? जमिनीचे सामूहिकीकरण (Collectivization) करण्यासाठी शेतकरी संघटना पाठिंबा देणार नाही. कारण खाजगी जमीनधारकामध्येच संघटनेचे हितसबंध आहेत. जमीन सुधारणामुळे ते दुखावले जातील.

त्यामुळे शेतकरी संघटना खऱ्या अर्थाने शुगर लॉबीला आव्हान, प्रतिस्पर्धी होत नाही. शुगर लॉबीलाही संघटनेच्या प्रसारामुळे वाईट का वाटावं? भाव वाढवून मिळण्याचे उद्दिष्ट त्याचेही आहे. शरद जोशी ते करत आहेत. त्यानी बटाटा-कांदा-दूध याच्या दरासाठी आंदोलन केलं. त्याला शुगर लॉबीची काहीच हरकत नाही. □




# कामगारांच्या आर्थिक संघटना वेगळ्या आणि राजकीय मत वेगळंच

–दत्ता सामंत

'महाराष्ट्रातल्या कामगारांनी आपल्या संघटना बांधल्या, लढे दिले, आपल्या युनियनची साथ दिली, मात्र राजकीय दृष्टीने निवडणुकांत वेगळ्याच पद्धतीनं मतदान केलं. त्यांनी आपल्या आर्थिक मागण्या-समस्या अनुसरून कधीच मतदान केलं नाही, ही वस्तुस्थिती आहे.' अशी खंत दत्ता सामंत आपल्या शांत-धीम्या सुरात व्यक्त करत होते.

मुंबईच्या घाटकोपर स्टेशनला उतरल्यावर पंतनगरमधल्या त्यांच्या कार्यालयाकडे तुम्हाला कोणीही नेऊ शकतं. एखाद्या गजबजलेल्या तहसील कचेरीसारखं त्यांचं ऑफिस. घरावर अजूनही डॉक्टरकीची पाटी. आवारात मध्यम–निम्नमध्यमवर्गीय कामगार, पुढारी, पॉश पोशाखातील कंपनी अधिकारी. आतल्या व्हरांड्यात खासदारसाहेबांच्या केबीनच्या दाराशी साकोनाका रोडवरील कारखान्यातील कामगारांची रांग. त्यातच टायपिस्ट, कंपनी अधिकाऱ्यांना इशाऱ्याची पत्रं टाइप करीत बसला. 'We think this is wrong, improper,' 'We request you to withdraw the action against' अशा आशयाची ही पत्रं. भिंती–खांबांवर गणपतीची, डॉ. सामंतांची चित्रं. बहुतेक छायाचित्रं डॉक्टरसाहेब व कंपनी यांच्यातील कराराची. व्हरांड्यातल्या गोंधळातच दादा सामंत खड्या आवाजात आपल्याभोवतीच्या घोळक्याला 'मार्गदर्शन' करत असतात. मोठा तेज, बेरकी, मिष्किल, माणूस आहे हा. एवढ्यात डॉक्टरांचे बोलावणे आले. 'जा तुम्ही आत, मग बोलू.' असे म्हणून त्यांनी माझी रवानगी केली.

सामंतांच्या ऑफिसमध्येही कामगार संघटनेच्या नेत्याचं काही वातावरण नव्हतं. एखाद्या ऑफिसात गणपती, इंदिरा गांधी यांची असतात, तशी चित्रं इथेही होती. बाजूला फायलींचा गठ्ठा, काचेच्या दारातनं बाहेर रांग लावून उभे असलेले कामगार. मधूनच एका मॅनेजरला टाईप केलेल्या पत्रात फारच आर्जवी भाषा वापरल्याबद्दल टायपिस्टला 'समजा'वत. 'इतकी मस्का–पॉलिसी कशाला, त्यांचं चूकच आहे' इ. इ.

अशा वातावरणात बोलणं सुरू झालं ते कामगारांच्या नव्या शक्तीवर. १९२५ च्या दरम्यान मुंबईतील कम्युनिस्ट चळवळ सुरू झाली. त्या पक्षाच्या अधिपत्याखालीच कामगारांचे लढे सुरू झाले. त्यावेळी कामगार चळवळीचं नातं व्यापक विचारप्रणालीशी असतं– व्यापक समाजबदलाच्या लढ्याचा तो एक भाग असतो. त्यानंतर गेल्या पाच वर्षांत दत्ता सामंतांच्या नेतृत्वाखाली पक्षातीत, कामगार संघटना सुरू झाली. स्वतंत्र कामगार संघटनाही वेगळीच वस्तुस्थिती असते. तिला पुरोगामी–प्रतिगामी, डाव्या–उजव्या विचारसरणीशी, world view शी काही कर्तव्य नसतं. कामगारांच्या वारंवार उद्भवणाऱ्या तुटक मागण्या मान्य करवून घेणे हेच तिचे उद्दिष्ट राहते.

यासंबंधी डॉ. सामंत सरळच म्हणाले–

: व्यापक चळवळ किंवा class struggle या पेक्षा भांडून आपल्या मागण्या मान्य करवून घेणे हे योग्य आणि इष्ट उद्दिष्ट आहे.

सरकारशी किंवा इतरांशी याबाबत भांडावे लागते. आमच्यासारख्या कामगार संघटनेचा class struggle किंवा, proletariat movement यासारख्या गोष्टींवर विश्वास नाही. ते आमचे साध्य नाही. इथे क्रांती वगैरे काही होणार नाही. इथल्या सार्वजनिक क्षेत्राची खाजगी उद्योगांना टक्कर देण्याची कुवतच नाही. त्यामुळे ideology based अशा चळवळीतील कामगार संघटना ऐवजी बळकट

संघटना हाच योग्य मार्ग आहे सर्वांना समान उत्पन्न, संपत्ती असावी अशा गप्पा मारण्यापेक्षा आज कामगार व भांडवलदार–कारखानदार किंवा उच्चवर्ग यांच्या उत्पन्नातील तीस–चाळीस टक्क्यांपर्यंतचा जो फरक आहे तो भरून काढणे हे महत्त्वाचे आहे. आम्ही तेच काम करत आहोत.

महाराष्ट्रातल्या कामगाराच्या राजकीय व आर्थिक जागृतीबद्दल त्यांनी निराशेचाच सूर व्यक्त केला. 'मुबईचा गिरणी कामगार हा थोडा फार राजकीयदृष्टया जागृत आहे. टिळकांच्या तुरुंगवासाच्या वेळी त्यांनी संप केला नेहरूंच्या आवाहनास प्रतिसाद देऊन ते रस्त्यावर आले इतर कामगार तितके संवेदनशील नाहीत तस जर असतं आज आमचेच बहुमत राहिले असते ना !

– आतापर्यंत अखिल भारतीय पातळीच्या पक्षांनी कामगाराची शक्ती आपल्या राजकीय स्वार्थासाठी वापरली. त्याना राजकीय व आर्थिक बाबीविषयी अनभिज्ञ ठेवले. आमच्या कामगारांपैकी तीस-चाळीस टक्के मतदानच करीत नाहीत. परिवर्तनाची ताकद तरी त्यांच्यात कुठून येणार ? स्वातंत्र्यानंतर मुबईतील कारखानदारी झपाट्यानं वाढली. कामगाराच्या गरजाही वाढत गेल्या. ते असंतुष्ट राहिले. त्यानंतर आम्ही महाराष्ट्र कामगार सघटना काढली. कामगाराचे आर्थिक प्रश्न युनियनमार्फत सोडवले जात होते. मात्र आधी सांगितलेली Dichotomy (दुहेरी स्थिती) कायम राहिली. कामगाराचे आर्थिक प्रश्न आम्ही सोडवायचो म्हणून आर्थिक प्रश्नासाठी ते आमच्यामागे येणार. मात्र राजकीय मतदानाच्या वेळी ते या आर्थिक मुद्द्यांवर मतदान न करता वेगळाच कौल देत राहतात. कामगाराचं voting behaviour हे धार्मिक, प्रांतिक, क्षेत्रीय असं राहिलं आहे. दारिद्र्याच्या, मागण्यांच्या निकषावर ते मतदान करत नाहीत. त्यामुळे त्यांच्या शक्तीचा अजूनही इथल्या सत्तास्वरूपात प्रभाव पडलेला नाही.

– कामगाराच्या मागण्याना राजकीय वजन प्राप्त व्हावं म्हणून आम्ही कामगार आघाडी हा पक्ष काढला आहे. मात्र आतापर्यंतच्या अनुभवातून हे कामगार आपली union आणि राजकारण हे वेगळंच मानतात असं दिसलं आहे.'

### मराठी कामगार कसा ?

**प्रश्न : मुंबई महानगरपालिकेच्या निवडणुकांत कामगार आघाडीला फारच तुटपुंजं यश मिळाल लोकसभा व विधानसभा निवडणुकीच्या वेळी जिथून कामगार आघाडीच्या उमेदवारांना यश मिळालं, तिथं यावेळी पराभव स्वीकारावा लागला, शिवसेनेला तिथं यश मिळालं**

त्यावर डॉक्टर म्हणाले; शिवसेनेला फार मतं यावेळी मिळाली नाहीत. एकदर मतदानाच्या तेवीस टक्के मतं त्याना मिळाली आणि तेही काही सरळ मार्गानं नाही. आणि एक खर, मराठी कामगाराची, माणसाची मुबईतली स्थिती खालावत जात होती. आर्थिक दृष्टया तो मागेच राहिला. व्यवसायधद्यात पुढे कसं जायच त्याला नीट जमत नाही. तो कष्टाळू आहे. पण प्रामाणिकही आहे. लबाडी करणे त्याची वृत्ती नाही. आता हा त्याचा स्वभाव आहे ! त्यामुळ तो मागं पडला. पण त्या कामगाराची स्थिती सुधारायची, त्याच्यासाठी काम करायची शिवसेनेची तयारी, कार्यक्रम नाही. त्याचं आर्थिक धोरण असलंच तर ते तात्पुरतं आहे !

**शिवसेनेकडून पुन्हा कामगार चळवळीवर आम्ही आलो. महाराष्ट्रात कामगार चळवळीला इतिहास आहे, तिच्यामुळे सत्ताधाऱ्यांच्या Composition मध्ये नाही तरी सत्ताधाऱ्यांच्या धोरणात काही फरक पडला का ?**

सामंत स्वतःच्या सघटनेच्या बाहेर जायला तयारच नव्हते.

आमच्या पक्षाच्या शक्तीमुळं थोडासा परिणाम पडतो. मी स्वतः ससदेत कामगाराच्या समस्यावर वारंवार बोलतो. मात्र त्याला आपल्याकडचे वर्तमानपत्रवाले प्रसिद्धी देत नाहीत. आता तर ससदेत पजाब आसामचीच चलती आहे तरी आज कामगाराला द्यायच्या बोनसची मर्यादा सोळाशेपर्यंत वाढविली, त्याला लागू असलेली सक्तीची ठेव योजना (सी. डी. एस.) रद्द केली, रेल्वे व केन्द्रीय कर्मचाऱ्याच्या पेन्शनच्या तरतुदी या कामगारांना लाभदायक धोरणाचा अमल सुरू झाला. आमच्या गिरणी कामगाराच्या प्रदीर्घ संपाच्या परिणामाला हे श्रेय द्यावं लागेल

**मात्र सध्याच्या शुगर–लॉबीच्या सरकारच्या स्वरूपात Composition मध्ये काही बदल झाला नाही हे तितकच खर !**

आमची कामगार चळवळ सुरू झाली केव्हा, ते तरी लक्षात घ्या ना ! इतक्या थोड्या काळातच तिचा राजकीय प्रभाव पडू शकतो. औरंगाबाद, पुणे, किंवा इतर काही ठिकाणी आमच्या सघटना आहेत. आम्ही आमच जाळं वाढवण्याचा प्रयत्न करत आहोत.

**तुमच्या कामगार सघटनेचा असंघटित क्षेत्रातील शेतमजूर–कामगारांशी कसा संबंध आहे ? त्यांना तुम्ही सामावून घेण्याचा प्रयत्न केला का ?**

या माझ्या प्रश्नावर डॉक्टर संशयानंच म्हणाले, 'हे तुमचं मॅगझिन सघाचं, भांडवलदाराचं आहे का हो ?'

– मी म्हटलं, 'असं तुम्हाला का वाटावं ?'

'नाही, तुम्हीसुद्धा टाटा–बिर्लांच्या प्रेसवाल्यांसारखे प्रश्न विचारत आहेत. आमच्या चळवळीच्या प्रभावाकडे, achievement कडे लक्ष न देता ते लोक असघटित कामगारांचं काय करणार– काय होणार अस विचारतात, त्यावर लिहीत राहतात. तुम्ही तसच करता.'

मनात म्हटलं– आमचं मॅगझिन भांडवलदारांचं ? अहो... जाऊ द्या काय सांगायच.

अशी काही स्थिती नाही असं मी सांगितल्यावर डॉक्टर पुढे म्हणतात,

असघटित शेतमजूर कामगार हा सर्वात जास्त शोषित आहे. त्यासाठी सरकारनं प्रयत्न करायचे असतात. Why do you expect organised sector to work for the unorganised one ? (संघटित क्षेत्रानं त्याच्यासाठी काही करावं अशी अपेक्षा का धरता ?) आम्ही काय करणार त्याच्यासाठी? महाराष्ट्रात आज साडेचार लाख ऊस कामगार आहेत, त्याना किमान वेतनसुद्धा मिळत नाही. या असघटित कामगाराना किमान वेतन लागू करणे हा शोषणावरचा उपाय आहे. ते सरकारनं करायचं असत. आम्ही काय करावं ?

**पण ग्रामीण भागातल्या कष्टकऱ्यांविषयी सहप्रवाशांची भावना तरी आहे का ?**

: या कामगारांशी शेतमजूर-शेतकऱ्यांशी आमचे सबंध आहेत. गिरणी कामगाराच्या संपाच्या वेळी महाराष्ट्रातल्या शेतकऱ्यांनी

आम्हाला धान्य दिलं, वर्गणी दिली. त्यांचा पाठिंबा असतोच आणि आमचा कामगारही शिकलेला आहे ना! सातारा, नगर, रत्नागिरी, उस्मानाबादचा!

काचेच्या दाराबाहेर रांग लावलेले चेहरे आता फारच अस्वस्थ होते. 'हा प्रेसवाला डॉक्टरांचा वेळ खाणार!' म्हणून बाहेर सटकलो. धडाड् करून सगळी रांग खोलीत गडप झाली. दोन मिनिटांत गटागटांनी आले. साकी नाका रोडवरच्या कारखान्यातील कामगारांची ती रांग होती...

□

समोर दादा सामंत बोलत होते शुगर लॉबीविषयी. या शुगर लॉबीवाल्यांनी कामगारांना काहीही दिलं नाही. साखरेचे भाव पडणार ते माहीत आहे म्हणून कायदा–नियमात बदल करतात, पण कामगारांच्या वेतनासाठी, कल्याणासाठी काहीच तरतूद करत नाहीत ही त्यांची तक्रार–नव्हे आरोपपत्रच होते.

यासंबंधी सविस्तर बोलणे झाल्यावर कामगार चळवळीबद्दलही ते बोलले. दत्ता सामंत प्रणीत कामगार चळवळीचा रोख केवळ आर्थिक मागण्यांवर असतो. व्यापक चळवळ, उद्दिष्ट नाही असं म्हणताच त्यांनी आपल्या संघटनांनी कामगारांना किती फायदा मिळवून दिला त्याचा तपशील दिला.

मी म्हटलं, 'हे कामगारांच्या पुढे टाकलेले तुकडे तर नाहीत? त्यांचा असंतोष वाढू नये म्हणून?'

त्यावर आम्हाला घेरून असलेल्या कामगारांचे चेहरे निर्विकार होते. दादा सामंत स्वतंत्र कामगार संघटनेचं रॅशनलायझेशनच बोलून दाखवीत होते.

'याला तुम्ही तुकडे का म्हणतात? शेवटी कामगारांच्या संघटनांचं उद्दिष्ट काय? कामगारांचं जीवनमान चांगलं करणं. त्यासाठी कंपनीकडे असलेला जादा फायदा कामगारांना वाढीव पगाराच्या रूपानं मिळवून देण्यात वावगं काय आहे. कामगारांनी भांडवलदार, कारखानदारांशी भांडावं–पण उद्दिष्ट अंती वाढीव वेतन हेच येतं ना! कामगारांना व्यापक चळवळ, समाजव्यवस्था यांची भूल देऊन प्रत्यक्षात मात्र त्यांची स्थिती 'जैसे थे'च ठेवायची. त्यांच्यासाठी काही न करता, आपल्या नेतृत्वासाठी पक्षासाठी 'बेस' म्हणून?'

## चळवळीची दखल नाही?

दादा सामंतांनी त्यानंतर मुंबईतल्या कामगार चळवळीचा आढावा घ्यायला सुरुवात केली. कम्युनिस्ट पक्षाच्या कामगार संघटनातही हे काम करत होते. रेल्वेमन्स युनियन त्यांनी बांधली. त्यावेळच्या अनेक डाव्या नेत्यांना ओते पुरविले. ते म्हणाले, 'पण प्रत्येक पक्षाचा एक कामगार cell असतो. कामगारांचे प्रश्न हा त्या पक्षाच्या चौकटीनुसारच ठरविला जातो. पक्षाचं बळ वाढवण्यासाठी कामगारांचा उपयोग केला जातो. तिथं कामगार म्हणून काही प्रश्न असतात हे विसरलं जातं. म्हणून कामगार आघाडी आली. आज दत्ता सामंतांच्या युनियननं अनेक कामगारांना पगार वाढवून देऊन त्यांचं जीवनमान सुधारलं आहे'

पण हा संतुष्ट झालेला कामगार इतर कारखान्यातल्या कामगारांच्या मागण्यांकरता रस्त्यावर येतो का?

माझ्या या प्रश्नावर भोवतालची सगळी मंडळी होकारार्थक बोलू लागली. 'येणार'च, दुसरीकडच्या कामगारांवर अन्याय झाला तर सर्वजण निदर्शने, मोर्चे काढतात, 'तेवढी solidarity आहे' असं ऐकू येऊ लागलं. दादा सामंतांनी काही न बोलता त्यांच्याकडे पाहून माझ्याकडे पाहिलं, 'काय ते समजा' असाच त्यांचा संकेत होता.

दत्ता सामंतांच्या युनियनचा किंवा एकंदरच कामगार आंदोलन–चळवळीचा राज्यकर्त्यांवर, समाजावर काही परिणाम झाला आहे का?

आम्ही कारखानदाराकडून कामगारांना पगारवाढ करून देतो. आमची ताकदच आज वाढली आहे. कोणत्याही मोर्च्याला हजारांच्या संख्येत माणसं असतात. पण आमच्या या नेहमीच्या मार्गाचीही आता कुणी फारशी दखल घेत नाही. कसं ते पहा, सामंतांच्या युनियनचा मोर्चा म्हटलं की लोक गृहीतच धरतात. हजार माणसांचा मोर्चा नेहमीचाच. दहा दहा हजारांचे मोर्चे काढून सुद्धा लोकांचं त्या इकडं लक्ष नसतं. काळाघोड्याकडे आमचा मोर्चा आला की सचिवालयातल्या बाया चारच्या आधीच घरी पळतात. लोक म्हणतात, तिकडून मोर्चा आहे, इकडच्या रस्त्यानं चला. मोर्चाला टाळतात.

लोकांच्या या थंडपणाचा सर्वात तीव्र अनुभव आमच्या गिरणी कामगार संपाच्या वेळी आला. वर्ष–वर्ष संप चालतो. पण कुणाचं लक्ष नाही. तसाच संप चारगळला. कामगारांच्या स्थितीकडे कोणी पाहतच नव्हतं. सर्व सुरळीत चालल्यासारखे व्यवहार होत होते.

पण असं का घडलं? या प्रश्नावर दादा सामंतांनी प्रत्यक्ष उत्तर दिलं नाही. 'गेल्या पंचवीस वर्षांत महाराष्ट्रात काय झालं विचारता ना? तर हे झालं. तुमच्यासारखी तरुण माणसं पुढंच येत नाहीत– संघटना बांधणं, सामाजिक जीवनात पडणं असं नाहीच.' इत्यादी.

असं घडायला कामगार संघटनांच्या कार्यपद्धतीतच काही दोष आहेत का? असं माझ्या विचारण्याकडं त्यांचं लक्षच नव्हतं.

आपल्या संघटनांमध्ये हिंसाचाराचा अवलंब केला जातो. या आरोपाबाबत ते दणक्यात म्हणाले, 'मिल मालकांकडे अनेक शस्त्रे असतात, सरकारकडे पोलीस आहेत. मग कामगारांनीही त्याला प्रत्युत्तर दिले तर काय बिघडले? पण दुसऱ्या बाजूला हीच आमची युनियन आणखी दहा ठिकाणी करार करून कामगारांच्या मागण्यांना समाधानकारक उत्तर मिळवून देते.

आज आमच्याकडे गुजरात–महाराष्ट्रातले एकूण चार हजार युनिट्स आहेत. त्यापैकी दहा टक्के युनिट्समध्ये तुम्ही म्हणता तशा खून–मारामाऱ्या झाल्या असतीलही. मात्र त्याचबरोबर इतर ९० टक्के युनिट्समध्ये आमच्या संघटनशक्तीमुळे करार होतात. शांततापूर्ण कामगारांना लाभ मिळवून देणारे. ती बाब दुर्लक्षिली जाते. आणि अपवादच नियम करता तुम्ही प्रेसवाले.'

शिवसेनेचा निवडणुकीतील विजय हा विषय निघाल्यावर तर दादा सामंत उखडलेच! 'सगळं बोगस आहे. त्यांनी दहशत पसरवून आधी लोकांना बाहेर पडू दिलंच नाही. त्यांची माणसं फिरतच होती, मतदानाच्या दिवशी. दुसरं म्हणजे त्यांनी बोगस मतदान केलं. दुसऱ्याच्या नावे मतं टाकली. गुंडगिरी केली. आणि खोटा–भडक प्रचार! भांडवलशहांचं ते हत्यार आहे!

पण मध्यमवर्गीय वस्तीबरोबरच कामगार वस्तीतूनही शिवसेनेला मतं मिळाली, ती काय दहशतीमुळेच!

'तुम्हाला सांगतो आमचा कामगार कसा आहे ते. आपल्या मागण्यासाठी, संपासाठी दत्ता सामंतांच्या युनियनच्या पाठीशी उभा राहील. घोषणा देईल. मात्र त्याची अनधिकृत झोपडी पाडू नये म्हणून शिवसेनेच्या कार्पोरेटरकडे जाईल तो कार्पोरेटरसुद्धा त्याचं तेवढं काम तात्पुरतं करून देईल. म्हणजे पुढच्या इलेक्शनमधलं मत पक्कं. आमच्या संपामुळं मिळालेले जादा पाचशे रुपये तो त्या शिवसेनेवाल्याला देईल– झोपडी पाडू नये म्हणून! अशी गंमत आहे!'

□



# शेतकरी संघटना

## १९८७–८८

डॉ. द. ना. धनागरे

महाराष्ट्रातल्या प्रस्थापित राज्यकर्त्यांना जबरदस्त शह देणारं काही घडलंच नव्हतं. १९७९–८० च्या सुमारास 'शेतकरी संघटनेच्या रूपात, जाती–आर्थिक हित–संबंधांच्या प्रस्थापित गटाला शह देऊ शकणारं एक आव्हान उभं राहिलं. या संघटनेचं पुढं काय होत आहे, त्याचा प्रवास कसा झाला हे पाहणं त्यामुळेच आवश्यक ठरतं. पुणे विद्यापीठाच्या समाजशास्त्र विभागाचे प्रमुख डॉ द ना. धनागरे यांचा भारतातल्या शेतकऱ्यांच्या चळवळीवर अभ्यास आहे. त्यातही शहरी संस्कृतीत राहून शेतकऱ्यांच्या चळवळीवर टीका करण्यातले ते नाहीत. मूळचे विदर्भातले असल्यानं शेतीची संस्कृती त्यांच्या परिचयाची आणि अनुभवाची आहे एम्प्लॉयमेन्ट एक्स्चेंज अधिकारी १९६०–६१ मध्ये असताना त्यांनी जवळपास संपूर्ण ग्रामीण विदर्भ गावोगाव दौरे करून तर कधी पायी तुडवत पाहिला होता, अनुभवला होता. त्या संदर्भातून शेतकरी संघटनेच्या विश्लेषणासाठी त्यांची मुलाखत घेतली.

महाराष्ट्रात शेतकरी चळवळ १९८० च्या सुमारासच का सुरू झाली? त्याच्या पूर्वीच्या शेतकऱ्यांचे उठाव झाले नाहीत का? या प्रश्नापासून चर्चेला सुरुवात झाली. मात्र प्रश्नांचा अडथळा बाजूला सारून त्यांना हव्या त्या मार्गानं विषयाची मांडणी करू देणं इष्ट होतं. मधून मधून फक्त catalyst सारखं कामच आपल्याकडे ठेवावं हे चांगलं.

डॉ. धनागरे म्हणाले :– महाराष्ट्रात पूर्वीपासूनच शेतकरी आंदोलन आहे का? झालेल्या उठावांना आंदोलन म्हणावं का याबाबत मतभेद आहेत. ब्रिटिश काळापासून याचा इतिहास पहायचा झाला तर १८५७ च्या बंडापासून/उठावापासून सुरुवात करावी लागेल. मात्र तो उठाव यमुना–गंगेच्या खोऱ्यातच मर्यादित होता. दक्षिणेकडे आला नाही. १८७५ मध्ये नगर–पुणे भागात 'डेक्कन रॉयट्स' घडल्या. शेतीचे वाढते व्यापारीकरण, सावकारांचा पाश यामुळे हे घडलं मात्र तो वीस–पचवीस खेड्यांपुरता मर्यादित उठाव होता. त्यात हजार एक शेतकरी अटक झाले. पुण्याच्या सार्वजनिक सभेनंही या उठावावर नेमलेल्या कमिशन ( Deccan Riots Commission ) समोर निवेदन सादर करून शेतकऱ्यांच्या समस्यांना वाचा फोडली.

१८९७ मध्ये मोठा दुष्काळ पडल्यावर टिळकांच्या पुढाकारानं सारावंदी चळवळ सुरू झाली. पण त्याच वेळी प्लेग, रँडचा वध, टिळकांना अटक अशा घटनांमुळे आंदोलन पसरलं नाही. त्यावेळी तळागाळातला शेतकरी संघटित करण्याची दृष्टीच नव्हती असे म्हणता येणार नाही, मात्र त्याला पोषक अशी राजकीय परिस्थिती नव्हती. राजकीय घटनांच्या प्रभावामुळं आंदोलनशक्ती प्रगटच झाली नाही.

गांधींच्या उदयानंतर शेतकरी आंदोलनाच्या स्वरूपात फरक पडत गेला. त्याच्यामुळे शेतकरी चळवळ राष्ट्रीय काँग्रेसच्या चळवळीशी जोडली गेली. आतापर्यंत नागरी व बुद्धिजीवी वर्गातच असलेलं संघटन खेड्यापाड्यात यशस्वी करण्याचं महत्त्वाचं योगदान गांधींनी केलं. ग्रामीण भागात काँग्रेस रुजल्यानं साहजिकच शेतसारा, कुळ, वेठबिगार असे अनेक प्रश्न राष्ट्रीय सभेला घ्यावे लागले. किसान चळवळीशी ती जोडली गेली. मुळशी धरणाचा सेनापती बापटांच्या नेतृत्वाखालचा सत्याग्रह याच प्रकारचा होता.

पण एक आहे, ही चळवळ राष्ट्रीय सभेशी निगडित असल्याने एखादं राष्ट्रीय आंदोलन मागे घेताच शेतकऱ्यांच्या प्रश्नावरच आंदोलनही मागं घ्यावं लागत होतं.

दुसरं म्हणजे, शेतकऱ्यांच्या मूलभूत प्रश्नाला गांधीजींच्या आंदोलनानं हात घातला नाही. जमिनीशी निगडित पण वरवरच्या प्रश्नांपुरतंच त्यांचं आंदोलन होतं. असलेली ग्रामीण समाजाची चौकट विस्कळीत न करता काँग्रेसच्या स्वातंत्र्यासाठीच्या लढ्याला पाठबळ मिळविण्याचे दृष्टीने त्यांना जे काय करता येईल ते गांधींनी केलं. त्यांचं एकंदर आंदोलनच प्रस्थापित चौकटीत राहून Liberal–Reformist ( उदारमतवादी–सुधारकी ) थाटाचं होतं.

१९२०–२१ च्या सुमारास डावी चळवळ सुरू झाली. डाव्यांनी कम्युनिस्ट चळवळीची उभारणी देशभरच पण प्रामुख्यानं मुंबईत सुरू केली. औद्योगिक कामगारांच्या भूमिकेशी या आंदोलनाची बांधिलकी अधिक होती. त्यामानाने शेतकरी, शेतमजूर, आदिवासी, दलित हे दुर्लक्षित घटक त्यांच्या logistic map मध्येच नव्हते. बिहार–बंगाल–केरळमधल्या डाव्या चळवळींनी केले तसे प्रयत्न यांनी केले नाहीत. पण पुढे गोदावरी परुळेकरांनी वारली जमातीत आंदोलन पसरवलं. जंगलजमिनी, धरणग्रस्त, सावकारी अशा प्रश्नांवर तिथं चळवळ झाली. पण तेवढंच.

त्यानंतर महाराष्ट्रात तरी १९४० ते १९७८ हा पूर्ण कालखंड शेतकरी आंदोलनाचे बाबतीत शांत होता सतत अडतीस वर्षं महाराष्ट्राच्या ग्रामीण भागात एक प्रकारचा lull ( सुस्ताई ) होता.

**प्रश्न : पण १९४० च्या सुमारासच शेतकरी कामगार पक्ष जोर धरत होता, त्याचं काय ?**

यासंबंधी डॉ. धनागरेंची भूमिका स्पष्ट आहे. ते म्हणाले :

शेकापक्ष हा प्रामुख्यानं राजकीय गट आहे. त्याला उदारमतवादी पक्षीय राजकारणाचा निवडणुकांचा संदर्भ होता. १९४६ च्या घटना समितीसाठीच्या निवडणुकातही शे. का. पक्ष सहभागी होता. हा पक्ष ग्रामीण बहुजन समाजातल्या नेत्यांचा होत आहे त्याला Left orientation आहे; पण ते शुद्ध मार्क्सवादापेक्षा निराळं आहे. शोषण हे वर्गपद्धतीपुरतं मर्यादित नसून पारंपरिक वर्णव्यवस्थेत आणि जातिव्यवस्थेतही सामाजिक आणि आर्थिक शोषणाची पाळेमुळे खोलवर रुजलेली आहेत. म्हणून वर्गसंघर्षाला जातीय विद्वेषाची धार येणं महाराष्ट्रात अपरिहार्य होतं. ती धार आणण्यात शेकापने भरपूर काम केलं. या पक्षानं शेतकऱ्यांच्या प्रश्नावर काही मोर्चे, सत्याग्रह केलेही. मात्र त्याला चळवळीचं रूप आलं नाही. शेतकऱ्यांची जागृती Mobilization करण्यापेक्षा जातीय, ब्राह्मणविरोधी वादाचा रंग या पक्षाच्या कामाला होता. त्यामुळे जिथं ब्राह्मणेतर चळवळ जोरात होती तिथं हा पक्ष बळकट झाला. पश्चिम महाराष्ट्र, मराठवाड्याचा परभणी, उस्मानाबाद, लातूर भागात शेकाप वाढला, मात्र विदर्भात तो नव्हता. कारण विदर्भातील Elite हा बहुलपृथक् स्वरूपाचा आहे. पश्चिम महाराष्ट्राप्रमाणे एकमार्गी (linear monopolistic) अशी जातीय रचना सत्तास्पर्धेच्या संदर्भात तिथं नाही, त्यामुळं शेकाप तिथं रुजू शकला नाही. राजकारणाच्या बाहेर तो चळवळ करू शकत नव्हता.

म्हणून १९४० नंतर शेतकरी कामगार पक्ष असला तरी शेतकऱ्यांची चळवळ महाराष्ट्रात होती असं म्हणता येणार नाही.

– *त्यामुळेच महाराष्ट्रात ग्रामीण भागात प्रचंड शिथिलता आहे, अशी प्रतिमा तयार झाली होती. हा lull शेतकरी संघटनेच्या १९७८–७९ च्या आंदोलनानं नाहीसा केला. महाराष्ट्राची ती प्रतिमा पुसून टाकली. हे संघटनेचं फार मोठं योगदान आहे.*

मात्र असं सांगतानाच हे आंदोलन काही एकमेव, भारतात unique आहे असं समजायचं कारण नाही, असं त्यांनी स्पष्ट केलं.

– *इथल्या शेतकरी आंदोलनाला आपल्याकडच्या प्रसारमाध्यमांनी (media) उचलून धरलं. त्याचा गाजावाजा केला;* पण त्यापूर्वीच भारताच्या अनेक भागात शेतकऱ्यांचे याहून सशक्त लढे चालू होते. त्यांना आपल्याकडे प्रसिद्धी मिळाली नाही. १९७३ पासून पंजाबमध्ये किसान युनियन, तामिळनाडून नारायणस्वामी नायडूंची विवसंगल संघम्, कर्नाटकात नंजुंदस्वामी, मध्यप्रदेश, बिहार, गुजरातसारख्या ठिकाणी शेतकरी चळवळी चालू होत्या. मध्यप्रदेशात हे कार्य आदिवासींच्या प्रश्नावरून सुरू झालं. गुजरातेत त्याला सर्वोदयी गांधीवादी रंग होता. कर्नाटकात तर आज शेतकरी संघटना जे मार्ग चोखाळत आहे त्याच मार्गानं आंदोलन होत. त्यामुळे महाराष्ट्रात जे घडत होतं, ते या अखिल भारतीय घटनाचं प्रतिबिंब, भाग होता. हे काही unique असं आंदोलन नाही.

पंजाब–तामिळनाडूतली आंदोलनं कशी सुरू झाली त्याचा अभ्यास महत्त्वाचा ठरेल. १९७३ मध्ये पंजाबात भूपिंदरमान, राजेवाल या लोकांनी गव्हाच्या पिकाला भाव मिळावा म्हणून आंदोलन केलं. सत्तेमुळे श्रीमती गांधींची वृत्तीच अशी होती की, कोणी काही मागितलं, तर लगेच ते त्यांना द्यायचं नाही. त्यामुळं आपली सत्ता power प्रकट होते ना ! ती वृत्ती इतकी विकोपाला गेली की इथल्या गव्हाला दोनशे रुपये भाव देण्याऐवजी अमेरिकेतून २१० रुपयांनी गहू आयात केला. त्यातून तिथला जाट काँग्रेसविरोधी झाला. अकाली दलाच्या agravion base चं हे कारण आहे. ' declining profitability of agriculture ' हे पंजाबातल्या शेतकऱ्यांचं दुःख होत. दक्षिणेतही अशीच रास्ता रोको, दिंडी आंदोलन झाली.

इथं शेतकऱ्यांचा असंतोष होता, मागण्या होत्या; पण त्या पक्षीय स्वरूपात निरनिराळ्या पक्षाच्या विभागणीत प्रकट होत होत्या. *त्यावेळीच शरद जोशी महाराष्ट्रात* आले. त्यांचा अभ्यास, स्वतः कोरडवाहू शेतीवर त्यांनी केलेले प्रयोग, अनुभवसिद्ध विचार, ती डोळसपणे पण तितक्याच ठोसपणे मांडण्याची हातोटी या पार्श्वभूमीमुळे त्यांनी शेतकरी संघटना बळकट केली. त्यांना

बोरावके, बोरस्ते, मोरे, प्रल्हाद पाटील, म्हात्रे, अरविंद वामन कुलकर्णी यासारखे lieutenants मिळाले.

### आंदोलन व संघटन ?

१९७८ पासून सुरू झालेल्या या आंदोलनाचे दोन टप्पे पाडता येतील. एक म्हणजे आंदोलनाचा. दुसरा संघटनाबांधणीचा.

१९७९ ते ८३ हा कालखंड आंदोलनाचा होता. कांदा, तंबाखू, ऊस, दूध या प्रश्नावर मोठी महत्त्वाकांक्षी आंदोलनं छेडली गेली. ही आंदोलनं दबावगटाच्या (Pressure groups) भूमिकेतून चालवल्याचं सकृतदर्शनी वाटत; पण त्या काळातही शरद जोशींची वक्तव्ये, मुलाखती यावरून अंगावर पडेल, तसं आंदोलन नेत रहायचं अशी भूमिका वाटली नाही. मी स्वतः त्यांच्याशी अनेकदा बोललो. त्याचवेळी व्यापक चळवळीची विचारप्रणाली त्यांची तयार होती असं वाटलं.

केवळ आंदोलनात्मक भूमिका न ठेवता संघटना, बांधणीचाही प्रथमपासूनच त्यांचा विचार होता. मात्र दूध आंदोलनाचा फटका बसल्यावर त्यांनी दोन गोष्टी ठरविल्याच. एकतर आंदोलनाला अभ्यासपूर्ण रीतीने हात घालणे आणि आंदोलनाची विश्वासर्हता, टिकाऊ मूल्य वाढण्यास संघटनेवर अवलंबून असलेले आंदोलन करणे.

–हे करणं आवश्यकच होतं कारण आंदोलनाचा फायदा जरी झाला तरी त्याचा Result ( परिणाम ) काय? आज ऊस शेतकऱ्याला ३०० रुपये भाव बांधून दिला. ते पैसे तो बाजारात उडवेल. पुढे काय? फायदा मिळाल्यावर शेतकऱ्यांत शैथिल्य आले म्हणजे पुनः आंदोलनासाठी त्याला रस्त्यावर फलक हातात घेऊन उभे करणे अवघड असते, हे निश्चित करण्यासाठीही संघटना लागते. प्रत्येक चळवळीला अपरिहार्यपणे संघटनेकडे वळावे लागतेच. विशेषतः व्यक्तीप्रभावयुक्त ( charismatic ) चळवळीला तर संघटनेच्या चौकटीत बांधून घेतल्याशिवाय पर्याय नाही. त्याची उद्दिष्ट कार्यकर्ते, विचार हे निश्चित पाहिजे.

यालाही कारण आहे. चळवळीचा शाश्वत व्यापक सामाजिक परिवर्तनाशी संबंध जोडायला पाहिजे. चळवळीचा world view, तत्त्वज्ञान, अनुयायी तयार राहिले पाहिजे आणि त्याचा व्यापक समाजमूल्याशी कोणता तरी संबंध राखता यावा. तसं नसेल तर केवळ आंदोलन हेच उद्दिष्ट राहतं, ते शाश्वत होत नाही. असं तत्त्वज्ञान, संघटन द्यायची शरद जोशींची कुवत होती. म्हणून तुम्हाला दिसेल की १९८३ नंतर विशेषतः मनमाडच्या अधिवेशनानंतर शेतकरी संघटनेचा संघटनात्मक टप्पा सुरू झाला. विचारसरणी, कार्यक्रम, पद्धती, strategies, कार्यकर्त्यांचा संच ( Cadre ) इतर संघटना, राजकारणाशी संबंध या सर्वांवर आता विचारमंथन, प्रत्यक्ष कृती–आचरण चालू आहे. अजूनही संघटनेच काही निश्चित रूप नाही. समस्या आहेतच. संघटना आता प्रसूतिवेदनाच्या काळातून जात आहे.

– संघटनेची भूमिका काय असावी यावर मनमाड अधिवेशनात खडाजंगीच झाली. मी स्वतः तिथं होतो. राजकीय सहभागाबाबत संभ्रमावस्था होती. तिथं उघड उघड दोन तट पडले. कै. माधवराव बोरस्तेंचे अनुयायी, माधवराव खंडेराव मोरे, रामचंद्र बापू पाटील यांच्या गटानं तर राजकारणाशी संबंध ठेवण्याचा आग्रह धरला. अलिबाग गटाने मात्र वैचारिक जागृती, संघटन, आंदोलन चळवळ यावर भर दिला. सत्तासंघर्ष व सत्तेच्या राजकारणापासून अलिप्त राहण्याच्या जुन्या भूमिकेचाच पाठपुरावा केला. शेतकरी संघटनेच्या सुरुवातीपासूनच त्यात राजकारणात सक्रिय असलेले लोक आले नाशिककडची बहुतेक मंडळी कोणत्या ना कोणत्या पक्षीय राजकारणाशी जोडलेली. त्यामुळे आपल्या राजकारणाला शेतकरी आंदोलनाचा उपयोग होईल असा त्यांचा विचार असणं साहजिक आहे. शरद जोशींच आधीचं पाठबळ ही मंडळीच होती. त्यांच्या हेतूची कल्पना शरद जोशींसारख्या दूरलक्षी नेत्याला नसेल हे संभवत नाही.

मात्र त्यातही भास्करराव बोरावके हे राजकीय सत्तेच्या आकांक्षेपासून दूरच होते व आहेत. जोशींना आधीपासून कायम आधार त्यांचा आहे. राष्ट्रसेवादलाची पार्श्वभूमी आहे त्यांना. शेतकरी संघटनेला पाठिंबा देण्यात बोरावके मंडळींचे आर्थिक हितसंबंध असतील असं वाटत नाही. हां, वर्गीय हितसंबंध आहेतच. किंबहुना शेतकरी संघटनेचं अर्थशास्त्र बोरावके फार्मवरच तयार झालंय (म्हणूनच ते फारस प्रतिनिधिक नाही असं डॉ. घनागरे एकीकडे म्हणतात.)

– तर राजकारणाच्या संबंधात या दोन गटाचं द्वंद्व चालू असतानाच शरद जोशींनी आपली संघटनेची भूमिका संदिग्ध ठेवली. ती जाणीवपूर्वक तशी ठेवली असावी असं वाटत. त्यालाही कारण आहे. मुख्य राजकीय प्रवाहापासून दूर राहून फायदा नाही असं वाटल असावं. प्रभावी दबावगट व्हायचं असेल तर राजकारणापासून दूर असून चालतच नाही. पण त्याचबरोबर उघडपणे राजकीय सत्तेची भूमिका नको हा Puritanical आदर्शवादी दृष्टिकोनही आहे. राजकारणात आल्यावर ध्येयवाद ढळतो असं एकदर समीकरण होतं. या दोन्ही बाजूचे फायदे–तोटे आहेत. दोन्हीकडचा लाभ मिळावा म्हणून भूमिका संदिग्ध ठेवली असण्याची शक्यता आहे.

– आज या चळवळीत साधन समजून कुठले कुठले लोक आहेत ! शरद पवारापासून ते वसंतदादाचे चुलतभाऊ सांगलीचे आकाराम पाटील ( हे संघटनेत Sugar Lobby ने plant केलेले असावेत ), जनसंघ, जनता, सेवादल, व्यक्तिगत निष्ठा असलेले–अनेकांची सरमिसळ यात आहे. आणि शेतकरी संघटनेला मात्र शेतकऱ्याचे प्रश्न साधन वाटत नाही तर त्याचे साध्यच शेतकरी आहे यात तूर्त तरी शंका घेण्यास वाव नाही.

शुद्ध चळवळ व राजकारण या दोन प्रकारच्या Value systems मुळे शेतकरी संघटनेची याबाबतची सैद्धांतिक भूमिका आता कुठे उत्क्रांत होत आहे.

### व्यापक व्यासपीठ

डॉ घनागरेंशी चर्चा झाली ती दोन टप्प्यात. दुसऱ्या वेळी बोलताना तीन मुद्देच गृहीत धरले होते. विचारसरणी, संघटन आणि राजकारण – सत्ताकारणाशी संबंध. परिणाम नेहमीप्रमाणेच ते काही तेवढंच राहिल नाही. डॉ घनागरेंनी आपलं arguement पुढे चालू केले–

– संघटनेच्या विचारसरणीचा मागोवा तीन भागात किंवा पातळ्यांवर घ्यायला हवा.

— पहिला भाग म्हणजे त्यांची आर्थिक भूमिका. अर्थवाद आपण कोणत्या प्रकारची मूल्ये, गृहीतके स्वीकारतो त्यावर त्याची तर्कशुद्धता अवलंबून असते. शेतकरी संघटनेच्या अर्थवादात दोष त्या मूल्याच्या गृहीतकाच्या दृष्टीतून काढता येईल. मात्र त्याची गृहीतके स्वीकारल्यास त्या अर्थवादाची मांडणी पूर्णतः तर्कशुद्ध आहे. ग्रामीण भागातील विकासातूनच देशाचा व्यापार आर्थिक विकास होऊ शकतो हे गृहीतक मान्य केलं तर त्याची पुढची विचारप्रणाली सुसंगत आहे. शेतीत *निर्माण होणारा कच्चा माल हा खरा* औद्योगिक उत्पादनाचा पाया आहे का हा मुख्य प्रश्न आहे संघटनेच्या मतानुसार आजपर्यंतचं नियोजन हे उफराटच झालं भारतातल्या नियोजन प्रक्रियेनं आर्थिक घडामोडीच्या मुळाना पाणी घालण्याऐवजी वरवर दिसणाऱ्या पानाफुलानाच जोपासलं. पण त्यामुळं झाड काही वाढत नाही. तसच *आर्थिक व्यवहाराचं फलित असलेल्या उद्योग*-धंद्यांनाच केवळ उत्तेजन देत राहिल्यान फक्त Consumer Culture फोफावेल!

हे कल्चर विकसित करण्याच्या दृष्टीनेच आतापर्यंत शेतीकडं पाहिलं गेलं म्हणून शेतकरी दुर्लक्षित राहिला.

— संघटनेच्या युक्तिवादात एक प्रकारची मूल्यांवर आधारित तर्कनिष्ठता आहे. तसं प्रत्येक social science चे सिद्धांत हे उघड किंवा प्रच्छन्नपणे value–based असतातच. ग्रामीण अर्थव्यवस्थेकडे दुर्लक्ष करून उद्योगांना समोर ठेऊन मजुरी, गुंतवणूक, यांचे दर धरले जातात. शेतमालाचा भाव वाढू द्यायचा नाही यादृष्टीने उत्पादनाचे घटक धरायचे अशा कृत्याविरुद्ध संघटनेची तक्रार आहे व ती बरीचशी रास्त आहे.

— विचारसरणीचा दुसरा भाग म्हणजे आपल्या तत्त्वज्ञानाचे mystification करून, सवंग लोकप्रियतेसाठी जनसामान्यांना कळेल अशा घोषणेत त्या उच्च विचाराचे रूपांतर करणे. यात शेतीमालाला वाजवी भाव देताच ग्रामीण भागातील, शहरातीलही सर्व प्रश्न सुटतील, दारिद्र्य दूर होईल हा एक कलमी कार्यक्रम येतो. उत्पादन खर्च कसा ठरवतात त्यावर टीका. असल्या सवंग गोष्टी Facts च्या आधारे मांडल्या जातात. Unreal is presented through reality. कुठल्याही ideology त अशी *अव्यवहार्यता अंगभूतच* असते. आपला पाया–पाठिंबा बळकट करण्यास हे *आवश्यक असतं तसं ते शेतकरी* संघटनेच्या वैचारिक मांडणीतही काही प्रमाणात आहेच

यापेक्षाही शेतकरी संघटनेच्या विचारसरणीच्या दृष्टीने महत्त्वाचा भाग म्हणजे आपल्या मताशिवाय इतर मतप्रवाहाशी साम्य शोधण्याची धडपड.

१९८३ च्या सप्टेंबरमधल्या मनमाड *अधिवेशनापासून शरद जोशींच्या एकदर* विचारातच हा घटक अधिक प्रकर्षाने आढळतो. आपल्या मताशी जुळणाऱ्या सहप्रवाहांच्या लघुत्तम साधारण विचारांची (Lowest common denominator) फळी घेऊन चालण्याचा हा प्रयत्न आहे. शेतकरी संघटनेचा अर्थवाद एकतर्फी–एकांगी तर नाही? अशा प्रश्नातून १९८३ पासून इतर *विचारसरणीशी साम्य–भेद ताडून पाहण्याची* चिकित्सा सुरू आहे.

मनमाडला त्यानी सुशीला नय्यर 'याना बोलावलं होतं. या बाई गांधी–सर्वोदयवादी, विधायक कार्यकर्त्या आहेत. त्यांची ओळख करून देतानाच जोशींनी सांगितल की, संघटनेची आंदोलनतंत्रे ही गांधीवादीच आहेत. सोयीचे पडते म्हणून ते आंदोलनतंत्र स्वीकारलं. *आपण डावे–क्रांतीवादी–कम्युनिस्ट* नाही. त्या घराला आम्ही जाणार नाही असेही त्यानी सांगितले. राज्यकर्त्यांमध्ये विश्वास संपादण्याचा हा प्रयत्न आहे. तो गांधीवादाच्या तंत्राच्या रूपानं पुढं केला गेला.

आज जोशी आपण मार्क्स–केन्सच्याहून वेगळ सांगतो असं म्हणतात. अर्थोत्पादन–भांडवलनिर्मिती खेड्यात होते, तेथून ते शहरात येत असं म्हणतात आपण मार्क्स व केन्सचा डोळस स्वीकार केला आहे. त्याचा भौतिकवाद मान्य आहे परंतु भांडवलनिर्मितीची प्रक्रिया ते अमान्य करतात. यामुळे पुस्तकी डाव्या धोरणाला ते विरोध करतात, पण दुसऱ्या बाजूनं मार्क्सची काही मूलभूत चिकित्साही ते मान्य करतात. डाव्यांशी असे दुहेरी संबंध त्यानी ठेवले आहेत

— १९८५ च्या मार्चमध्ये पुणे विद्यापीठाच्या समाजशास्त्र विभागातील अभ्यास शिबिरात बोलताना जोशींशी आपण गांधी–मार्क्स व माओ या तिघांचा मेळ घालून पुढे जात असल्याचं सांगितलं. 'आपला कमकुवत दुवा कोणता *याची जाणीव हे आंदोलनाचं* शक्तिस्थान' हे माओचं तंत्र संघटनेत आणण्याचा प्रयत्न करीत असल्याचं त्यांच्या बोलण्यातून आम्हाला जाणवलं.

— आपली एकांगी भूमिका सोडण्याचा शेतकरी संघटनेचा प्रयत्न आहे. इतरांशी वैचारिक जवळीक साधण्याच्या त्यांच्या या प्रयत्नांकडे अजून कोणी लक्ष दिलं नाही. *जोशींच्या सहकाऱ्यांच्या हे लक्षात येत आहे* का ते माहीत नाही.

चळवळ–संघटना वाढवायची असते तेव्हा असा खुलेपणा दाखवावाच लागतो.

आज शेतकरी संघटनेची संघटनात्मक बाजू पूर्ण होत आहे. त्यांनी अध्यक्ष–उपाध्यक्ष अशी रचना ठेवली नसली तरी ट्रस्टीज घटना–कार्यकर्ते अशी कोणती तरी रचना *त्यांना स्वीकारणे आवश्यक आहे.*

**प्रश्न : शेतकरी संघटनेची महाराष्ट्रात काही Pockets प्रभाव क्षेत्रे आहेत. तीच प्रभावक्षेत्रे असण्याचं काही कारण ?**

—या प्रश्नावर डॉ. धनागरे म्हणाले,सुरुवातीची आंदोलनं जिथं झाली त्यावरून त्यांच प्रभावक्षेत्र आज मापलं जातं– किंवा प्रत्यक्षात आहे आंदोलनाच्या पातळीवर localised अशी Pockets आहेत. ती नेहमीच असतात. त्यांनी कांदा–तंबाखू–ऊस याच्यासाठी आंदोलन केले ज्वारी—बाजरी—नाचणीसाठी मात्र नाही. शेतमजुरीसंबंधी नाही. (याबाबत तर शरद जोशी फारच 'हळवे!' शेतीमालाला योग्य भाव मिळाला तर योग्य शेतमजुरी शेतकरी देणार नाही असं तुम्हाला का वाटतं? आम्ही शेतमजुरांमध्ये *जाणार नाही असं तुम्हाला का वाटतं?* अशासारखं ते विचारतात.)

— मात्र त्यानी कापसाच्या भावासाठी विदर्भात आंदोलन का केलं नाही? तिथं निपाणी–पिंपळगाव बसवंत का नाही? याचं कारण खुद्द शरद जोशींनीच covertly मान्य केलय्. विदर्भात कापसाला भाव मिळाला नाही तर तो मध्यप्रदेशात बऱ्हाणपूर, छिंदवाडा, खंडवा, जबलपूर भागात जातो, आंध्रात आदिलाबादला स्मगल केला जातो.

भंडाऱ्याच्या तांदळाची हीच अवस्था आहे. म्हणून *अधिक भावासाठी आंदोलन करण्यापेक्षा लगेच फायद्याच्या दृष्टीनं चोरटा व्यापार केला जातो ?*

– मराठवाड्यात मात्र परभणीसारख्या भागात श्रीरंगराव मोरे वगैरेंसारखे त्यागी कार्यकर्ते आहेत.

## तिरस्कार ते पाठिंबा

**आरंभापासूनच राजकारण-सत्ता याबाबत संघटनेची वेगळीच भूमिका राहिली आहे. आज ते कोणत्या टप्प्यावर आहेत ? हा प्रश्न महत्त्वाचाच आहे**

– भारतातल्या सर्व शेतकरी आंदोलनांची भूमिका राजकारणासंबंधी Love–hate अशी आहे. पंजाब–कर्नाटक–तामिळनाडूमधील चळवळीचंही तसंच आहे. महाराष्ट्रात शरद जोशीसकट सर्व शेतकरी नेत्यांनी पहिल्यांदा राजकारणी सत्ताधाऱ्यांना नाकं मुरडली. सर्व राजकारणी–चोर आहेत, सत्ताधारी मूर्ख आहेत अशी त्यांची भाषा होती; पण नंतर त्यांच्या लक्षात आलं की, आपल्या मागण्या मांडायच्या कुणासमोर, आपला शत्रू target कोणाला करावं ? आपल्यातल्याच श्रीमंत बागायतदारांना करावं, class enemy मानावा तर संघटनेच्या विचारसरणीच्या दृष्टीने गैरसोयीचं ठरतं म्हणून सरकारला शत्रू केलं. शासकीय माध्यमातून मागण्या मान्य करवून घेण्याचे प्रयत्न सुरू झाले. परिणामत: शेतकरी संघटना एक दबावगट म्हणून पुढे आली.

– पुढे मनमाड अधिवेशनानंतर सत्तेत राजकारणात सहभागी होणं फायद्याचं आहे हे लक्षात आलं; पण राजकारणाला विरोध करणारा दुसरा तट होताच. म्हणून एक उपसमिती नेमण्यात येऊन निवडक राजकारण (selective participation) तत्त्वं पुढे आले. यामुळे जिथं सोयीस्कर तिथं राजकारणात सहभाग असं धोरण झालं. संपूर्ण संघटनेच म्हणून सर्व ठिकाणं असं धोरण नाही. स्थानिक स्थितीनुसार व्यवहार्य भूमिका घ्यायची असं ठरलं. तीन वर्षांपूर्वीच त्यांची काय भूमिका होती ? त्यानंतर आता तीन सहकारी साखर कारखान्यांवर शेतकरी संघटनेचे पॅनेल्स निवडून आले. जिथे हे निवडून येत तिथ ऊसाला टनामागे जादा भाव मिळत होता. हा फायदा दिसला !

गेल ओमवेड्ट यांनी म्हटलं की अशा प्रकारांमधून sugar lobby च प्रच्छन्नपणे या संघटनेला वापरत आहे. जे खुर्चीवर बसून वसंतदादांना बोलता येत नाही तेच ही लॉबी शेतकरी संघटनेकडून वदवते. अर्थात संघटना ते अमान्यच करेल.

– निवडक फायदेशीर अशा राजकारणातील सहभागातून लाभ होतो असं लक्षात आल्यावर १९८४–१९८५ मध्ये उघड उघड शेतकरी संघटनेने राजकीय भूमिका घेतली. विधानसभा निवडणुकीत पुलोदला पाठिंबा दिला. शरद जोशी, शरद पवार एकत्र भाषण देत होते. नाशिक जिल्ह्यात शेतकरी संघटनेनं सगळं बळ दिल्यानं चौदाही जागा पुलोद आघाडीला मिळाल्या; पण लगेच दुसरीकडं अजूनही राजकारणाला नावं ठेवणे चालूच आहे. मग त्यांच्याकडे कशासाठी जातात ? एक बदल घडला, राजकारणापासून दूर रहावं ही भाषा गेली असून फायद्याची-दबावगटाची भूमिका संघटनेने घेतली आहे

शेवटी राजकारणाशी संबंध अपरिहार्य आहे आणि खुद्द चळवळीचंही एक राजकारण असतं. (There is a Politics of movement) अनेक हितसंबंधी गट चळवळीला आपली विशिष्ट दिशा द्यायचा प्रयत्न करत असतात ! शेतकरी संघटनेनं आपलं दार सर्वांना खुलं ठेवलं आहे. त्यामुळे अनेक पक्ष-गट-हितसंबंधांचे लोक येतात. पण हे येतात ते आपली प्रभावळ, slogans, गट घेऊनच येतात.

संघटनेचेसुद्धा काही अपरिहार्य मार्ग, tactics, strategies असतात. ते मार्ग कोणत्याही तऱ्हेच्या संघटनेला-संघटना व्हायचं असेल तर-वापरावे लागतात. चाकणचे शंकरराव वाघ हे या organizational skills मध्ये मुरलेले आहेत. त्यांची mobilization ची शक्ती जबर आहे स्वत:चे ट्रक्स आहेत पंढरपूरला विठोबाला साकडं घालण्याच्या वेळी एकट्या चाकणमधून शंकररावांनी ५० ट्रक्स भरून समर्थक पंढरीस नेले होते. ते आणि म्हात्रे हे शरद जोशींचे खरोखर संघटनात्मक आधार आहेत !

**: शेतकरी संघटना या स्थितीत असताना आजच्या सत्ता-स्वरूपावर तिचा काही परिणाम झाला आहे का ? किंवा पुढे कसा होईल ?**

यावर डॉ. धनागरेंनी मराठा शुगर लॉबी यामुळे दुबळी झाल्याचं म्हटलं.

–अंतुलेंपासूनच या प्रक्रियेला सुरुवात झाली. मराठा जातीय राजकारणाचा काँग्रेसला मोठा आधार होता. पण ऊसाला, कांद्याला भाव मिळवून देऊन शेतकरी संघटनेनं काँग्रेस (आय) चा हा शेतकरी-ग्रामीण वर्गाचा हा जातीय पायाच दुबळा केला आहे. त्यातून संघटनेचा पाया विस्तारला.

शेतकरी संघटनेनं निर्माण केलेला प्रश्न आज प्रत्येकाला डाचत आहे. प्रत्येक राजकीय पक्ष शेतमालाला रास्त भाव पाहिजे असं म्हणत आहे. खुद्द राजीव गांधीही हेच म्हणत आहेत भाजपही तीच भाषा बोलत आहे. मराठा लॉबीत दुफळी झाली.

**पण ही दुफळी Elite-Counterelites च्याच पातळीवर राहते मूलभूत संघर्ष कुठेच अभिप्रेत नाही ?–मी.**

शेतकरी संघटनेनं तयार केलेलं तत्त्वज्ञानच तसं आहे. भारतातला अंतर्विरोध हा ते भारत विरुद्ध इंडिया असा पाहतात. गरीब शेतकरी–शेतमजूर इथे अभिप्रेत नाहीच. भारत म्हणताना हा भारत तरी एकसंध आहे का ? मात्र संघटनेला तो ग्रामीण वर्ग-संघर्ष अभिप्रेत नाही. त्यांचा संघर्ष औद्योगिक समाजाच्या मूल्यव्यवस्थेशी आहे. Mass Versus Elite हा प्रश्न त्यांच्यापुढे नाही. असे प्रश्न हे केवळ काही डावे बुद्धिजीवी आणि समाजशास्त्रज्ञांनी उभे केलेले असतात, वास्तवात नसतात असं शरद जोशी काहीशा उपहासानं नेहमी म्हणत असतात.

**असं असलं तर संघटनेमुळे मराठा लॉबी कमकुवत झाली असं म्हणता येईल का ? शेवटी हा संघर्ष Elites मधलाच होईल. माझा पुन्हा प्रश्न**

डॉ. धनागरे म्हणतात: तसं नाही. आपल्याकडे Elites (अभिजन) जसा एकसंध नाही तसाच 'मास'ही एकसंध नाही. तो अनेकरूपी (hetrogenous) आहे. Mass and Elite, both are split. यापैकी कोणतीही एक यंत्रणा monolithic असते हा समजच आदर्शवादी आहे !

पृष्ठ ३० वर



# राखीव जागा घालवायच्या का राज्य गमवायचं ? हा सवाल

—डॉ. बाबा आढाव

गुजरातमधील राखीव जागाविरोधी आंदोलन ऐनभरात असतानाच डॉ. बाबा आढाव यांच्याशी चर्चा झाली. त्यामुळं साहजिकच चर्चेला तो रंग आला. आपल्याकडं मराठा महासंघ या प्रश्नी थोडी खळबळ करत होता. महाराष्ट्रात अशा प्रकारचं आंदोलन सुरू होण्याची शक्यता कितपत आहे, तशी स्थिती इथं आहे का ? यावर बाबा म्हणाले, ' कोण हे आंदोलन करणार? सध्याच्या व्यवस्थेतून प्रत्येक उच्च जातीला फायदा मिळत आहे. ते त्यांना तसेच राखायचे आहेत. '

त्यांच्या मते राखीव जागांच्या विरोधात ब्राह्मण व मराठा समाजातले तरुण उभे राहण्याची शक्यता असते; पण याबाबत दोन्ही जातींचे परस्पर संबंध व दलितासंबंधीच्या भूमिकेत मोठाच फरक आहे. परिस्थितीतून मिळणारे फायदे दोन्ही समाजांना हवे आहेत. ब्राह्मण मध्यमवर्गीय, शिक्षित समाजाच्या भूमिकेबद्दल बोलताना ते म्हणाले, ' हा मध्यमवर्ग आज वैद्यकीय अभियांत्रिकीसारख्या क्षेत्रातील राखीव जागांबाबत फार संवेदनशील आहे. नोकऱ्यातील पदोन्नतीच्या बाबतीत रोस्टर पद्धतीबद्दलही तो असंतुष्ट आहे. मात्र त्यांचा असंतोष निश्चित रूप घेऊ शकत नाही. तो Tenable च होत नाही. याचं कारण म्हणजे त्यांची संख्या. तसंच असल्या दलितविरोधी आंदोलनाची आग ते आपल्यावर घेऊ इच्छित नाहीत. त्यांना मराठा समाजाचा व नेतृत्वाचा पाठिंबा हवा आहे मराठा समाजातील तरुण आज दलितविरोधी राहू शकतो; पण ब्राह्मणांची व मराठ्यांची याबाबत भूमिका आता एक राहिली नाही. '

यावेळी मी म्हटलं की, दलितांना मिळणाऱ्या राखीव जागांची-सवलतीची खरी आच मराठी तरुणाला लागली आहे. सांस्कृतिक कारणामुळं एकेकाळी ब्राह्मणविरोधी असणारा मराठा समाज आज आर्थिक कारणांमुळे दलितविरोधी झाला का ? त्याचं उदाहरण म्हणून महाविद्यालयीन मराठा विद्यार्थ्यांचा दाखला दिला. आमच्या होस्टेलमधली मराठा मुलं तर सरळ म्हणायची, ' ब्राह्मणांच्या मुलांना काय नोकऱ्या मिळतातच. एकतर घरचं वातावरण आणि नोकरदारांमध्ये लागेबांधे. दुसरीकडं मागासवर्गीयांना राखीव जागा ! खरी पंचाईत आमची आहे. धड इथं ना तिथं ' या भावनेतून तणाव वाढत आहे का ? मराठा समाजाची भूमिका तशी बनली आहे का ?

यावर डॉ. आढाव म्हणतात : ही अवस्था हा युवक शिकेपर्यंत राहत असेल, असुरक्षितता त्याला जाणवत असेल. मात्र शिक्षण संपवल्यावर तो त्यांच्या पावण्या-रावळ्यांच्या जगात कुठं ना कुठं समाविष्ट होतच असतो. मराठा समाजाची महाविद्यालये, साखर कारखाने, ग्रामीण भागातल्या सरकारी नोकऱ्या, सहकारी संस्था, जिल्हा परिषद, पंचायत समिती यात त्याला स्थान मिळू

शकतं. सरकारी नोकरीत राखीव जागा असतील; पण साखर कारखाने' सहकारी संस्थात त्या कुठे आहेत ? त्यात सत्तर टक्के साखर कारखाने प. महाराष्ट्रात आहेत. त्यामुळे ज्या ठिकाणी मराठा समाजाचे हित-संबंध गुतलेले आहेत, तिचे इतर मागास-वर्गीयाचा क्लेम नाही

आणखी एक मराठा तरुणाला नोकऱ्यात रस नाही. त्याचा ओढा आहे राजकारणाकडे या उपरही बराच मोठा मराठा व इतर तरुण बेकारीच्या खाईत आहे. त्याची कारणे देशाच्या अर्थकारणात आहेत. दलितांच्या राखीव जागावर राग काढून 'वडघाचे तेल वांग्यावर काढणे' अशी स्थिती निर्माण होते, हे या तरुणाला समजू लागले आहे,

या गोष्टीमुळे ब्राह्मण व मराठे हे दलि-तांच्या, मागासवर्गीयाच्या विरोधात एक होतील याची शक्यता कमीच आहे. आज ग्रामीण भागात तांत्रिक व वैद्यकीय महा-विद्यालये काढण्यासबंधी मराठा राजकारणा-तील वसतदादा पाटलांसारखी महत्त्वाची मंडळी जी भाषा, युक्तिवाद वापरतात. तो पाहण्यासारखा आहे. या महाविद्यालयासाठी ते वेगळ समर्थन वापरतात. आमच्या मुलांना शिक्षण मिळालं पाहिजे म्हणतात. अशा शिक्षणक्रमांना मिळणाऱ्या प्रवेशासाठी ब्राह्मणांप्रमाणे ते Merit –गुणवत्तेचा युक्ति-वाद वापरत नाहीत. त्यामुळे हे दोन्ही समाज दलितविरोधात एकत्र येणे इतके सहज नाही. हा फार गुतागुतीचा प्रश्न आहे.

## एकसंधतेचा अभाव

ब्राह्मण-मराठे जसे या कारणांमुळे एक येणं शक्य नाही तसंच खुद्द मराठा समाजा-तलं नेतृत्व आणि राजकीय बळ पक्षापक्षात विभागलेलं आहे. शेतकरी कामगार पक्ष, लालनिशाण, जनता पक्ष, शरद पवारांचा पक्ष आणि कांग्रेस (आय्) अशी विभागणी आहे. जाती–निष्ठे इतका राजकीय (पक्ष) निष्ठेचाही प्रभाव असतोच. पूर्वी मराठा ही जात कांग्रेसमागे असेल पण आज खेडघातला मराठाही पक्षवार विभागला गेला आहे.'

याशिवाय, मराठा ही एकसंध जात आहे का? असा एक सनातन मुद्दा बाबानी काढला. ते म्हणाले, 'शहाण्णव कुळी, कुणबी, शेतकरी हे सगळे स्वत.ला मराठाच म्हणव-तात. ते क्षत्रियीकरणाच्या लाटेतून. या मराठ्याची गंमत आहे. याच्या मिशीचा नृ फेटघाचा पीळच जास्त असतो. त्यांना प्रतिष्ठे-साठी कुणबी म्हणवून घ्यायचं नाही. मात्र त्यांची आर्थिक स्थिती, व्यवसाय 'मराठा' जातीप्रमाणे नाहीत.'

बाबानी मंडल आयोगाचा अहवाल काढला. त्यात इतर राज्यातल्या मागास जातीची यादी होती. कर्नाटक, मध्यप्रदेश, ओरिसा इत्यादी राज्यात कुणबी–मराठा समाज हा इतर मागासवर्गीयात (O.B C.) मोडतो अस त्यात दिसतं. त्या अनुषगाने बाबा म्हणाले, 'या समाजातले अनेक वर्ग गरीबच आहेत. कोणत्याच पातळीवर ही जात एक नाही. त्यामुळे या 'मराठा' जातीतील सत्ताधारी वर्गाला सत्तेवर कायम राहण्या-साठी इतर जातीच सहकार्य लागेलच!'

मराठ्यांतल्या अंतर्गत भेदाविषयी बोल-ताना ते म्हणाले, 'मंडल आयोगातल्या कुणबी, साळी, माळी या जाती, जैन–लेवा पाटील या जाती मराठ्यांप्रमाणेच शेती करतात. त्यामुळे त्याचे हितसबंध समान आहेत. १९३० च्या सुमारास शाहू महाराजामुळे क्षत्रियीकरणाची लाट आली. आताच्या O. B. C. पैकी धनगर, तांबट, न्हावी, लेवा–पाटील या जातीनी स्वत:ला क्षत्रिय म्हणणे सुरू केले. मात्र आता त्यांचा क्षत्रियत्वाचा आग्रह नाही. कारण मंडल आयोग!'

'– विदर्भात मात्र क्षत्रियीकरणाची लाट नाही. तिकडे कुणबी अजूनही स्वत:ला कुणबी म्हणवून घेतात. देशमुख–तिराळी–खैरे असे कुणबी तिकडे आहेत. त्यांचे प. महाराष्ट्रातील मराठ्यांबरोबर विवाहसबध आहेत. या कुणब्याचा मंडल आयोगाला विरोध नाही. उलट पाठिंबाच आहे. तो स्वत:ला मराठा म्हणवून घेत असेल, तरी 'क्षत्रियीकरणा'ची तिथं भावना नाही.

आता अशा सर्व 'कुणब्यां'ना मराठा समाजातून वगळलं तर 'मराठा' अशी सख्या किती राहील? म्हणून महाराष्ट्रात तीस टक्के 'मराठा' म्हणवणारा समाज असला तरी त्याची या सामाजिक प्रश्ना-वरची, तणावासंबंधी भूमिका एकसारखीच राहील असं नाही. 'एकसध मराठा हित-सबध' असा प्रकार नाही.'

संयुक्त महाराष्ट्राच्या निर्मितीनतर बहुजन म्हणून मराठा समाजच सत्तेवर आला. त्याला १९३०–४० च्या दशकातील कट्टर ब्राह्मणविरोधी चळवळीची पार्श्वभूमी होती. अशा वेळी यशवतराव चव्हाणांनी जे राज-कारण सुरू केलं त्याचा जातीय संबधावर कसा परिणाम झाला असावा?

यासंबंधी बाबा आढाव म्हणाले: यशवत-रावांनी बहुजन समाजाला, मराठ्याना सत्ताभिमुख बनवल. त्याला जागृत करण्याचं काम केल. मात्र हे करताना जातीय रंग घेणार नाही ही दक्षता घेतली. त्यासाठी ते 'शेतकरी', 'ग्रामीण' या सज्ञामध्ये बोलत असत. ब्राह्मण–मराठे व इतर मागासवर्गीय यांना एकत्र आणण्याचं काम त्यांनी केलं. बर्व्यांसारख्या प्रशासकांना त्यांनी मत्रिमंडळात घेतलं. अनेक जातीय वादामध्येही त्यांनी समतोल भूमिका घेतली.

सयुक्त महाराष्ट्राची पहिली पाच–सहा वर्षे तर राज्यात जाती–हितसबधांचे सुयोग्य सतुलन (equilibrium) होते. मनात आणलं तर मराठे इतराना बरोबर घेऊन चालू शकतात हे यावेळी दिसलं. नतर आलेल्या कन्नमवाराचा सत्तेचा कालखड अतिशय थोडा होता

वसतराव नाईक हे यशवतरावाचेच धोरण चालवीत होते. आपण मराठ्याबरोबरच आहोत, त्यांच्याशीच आपल्याला वागायचे आहे हे त्यांच्या लक्षात होतं. ते असूनही त्यांनी इतर जातीच्या हितसबधासाठी प्रयत्न केले. त्यानी सरंजामदारी, शुगर लॉबीला धक्का लावला नाही. विदर्भातल्या कपाशी–उत्पादकांनाही त्यांनी हात लावला नाही. म्हणून ही मडळी त्याच्यावर खूष होती. नाईकांना यशवंतरावानी आणल, यशवंत-रावाना अभिप्रेत असलेलं ब्राह्मणेतर राज-कारण त्यांनी मोठ्या खुबीनं केलं. त्यानी यापूर्वी विदर्भातल्या ब्राह्मणविरोधी राज-कारणात मोठा वाटा उचलला हे लक्षात घ्यायला हवे. तसच त्यांनी मागास जातीनाही लाभ मिळवून दिला.

इतकं सगळं असताना वसतदादांच्या काळांत मराठा महासंघाची प्रवृत्ती डोकं वर काढू लागली! खुद्द दादांनीही मडल आयो-गाला आपला विरोध जाहीर केला. याचा अन्वयार्थ कसा लावायचा? हा माझा प्रश्न.

## दिल्लीशी भांडण

त्यावर डॉ. आढाव म्हणाले, ' मराठा महासंघाची खरी सुरुवात दिल्लीच्या राजकारणात आहे. यशवंतराव व त्यांचं राजकारण इथं चालू होतं, तोपर्यंत मराठा महासंघ नावाची चीज नव्हतीच. यशवंतरावांचं राजकीय खच्चीकरण सुरु झालं, तेव्हापासून महासघाची प्रवृत्ती बळावत गेली. हा मराठा महासघ दादांवर हुक्क सागत होता. मराठा महासंघ, शिवसेना किंवा रा. स्व. संघ काय, याना कसं केव्हा वापरून घ्यायचं ते केंद्रीय नेतृत्वाच्या इच्छेवर व सोयीवर अवलंबून असतं. कोणती आदोलनं कितपत चालू द्यायची हे त्यांच्या सत्तेच्या राजकारणावरून ठरतं.

दादाच्या मंडल आयोगासंबधीच्या भूमिकेसंबंधी म्हणाल तर तो दिल्लीशी भांडण करायचा त्यांचा एक मार्ग होता. आपल्या इच्छेविरुद्ध मत्री आणले गेले, केंद्रातही आपल्या विरोधी महाराष्ट्राचे मत्री होते. म्हणून मंडल आयोग हा इशारा देण्याचा एक मार्ग होता. '

**ही परिस्थिती असताना दलित व इतर उच्चवर्णीयांमध्ये सबध कसे राहतील ? गुजरातमधल्याप्रमाणे तणावांचा स्फोट होईल का ? – मी.**

: आज स्थितीच अशी गुतागुंतीची आहे की Nobody is in the mood to precipitate the things. ब्राह्मण–मराठा वर्ग आज दलित विरोधी मानला तर दोन्ही वर्गांना नोकऱ्यातील राखीव जागांचा त्रास होतो. मात्र ही तक्रार सरकारी नोकऱ्या, तत्रविज्ञान अभ्यासक्रमापुरतीच मर्यादित आहे. यातून मार्ग निघू शकतो. राज्य कर्मचारी सघटनेचे नेते आर. जी. कर्णिक यांच्याशी माझी चर्चा झाली तेव्हा ते म्हणाले, ' भरती करताना राखीव जागांना आमचा विरोध नाही. बढतीतील रोस्टर पद्धतीबद्दलच आहे. तो वैयक्तिक–मानसिक पातळीवर आहे. ' ही तक्रार फारच मर्यादित स्वरूपाची आहे.

दुसरं असं की, इथे मराठा Sugar lobby सत्तेवर असली तरी दिल्लीचे सत्ताधारी त्याचे वर्चस्व मानायला तयार नाहीत. राजीव गांधीची भूमिका पुरेशी स्पष्ट आहे. त्यामुळे मडल आयोग, राखीव जागाना विरोध करून ब्राह्मणेतरांचा रोष ओढवून घ्यायचा का राज्य टिकवायचं ? सहज मिळत आहे ते हा रोष ओढवून घालवायचं का हा मराठा सत्ताधारी वर्गासमोर प्रश्न आहे त्याबाबत इथले सत्ताधारी सावध आहेत. एक म्हणजे मराठा किंवा ब्राह्मण समाजाला कडेची भूमिका घ्यायला लावणारी Pinch होईल अशी स्थिती इथे नाही आणि टोकाची भूमिका घेणं सत्ताधाऱ्यांना मराठा समाजाला परवडणार नाही. राखीव जागा घालवायच्या का राज्य घालवायचं याचा त्याना विचार करावा लागेल.

इथं उच्चवर्णीयांना चिथविण्यासारखी नाही, त्यामुळे आतून कुणी पाठिंबा, फूस दिल्याशिवाय राखीव जागाविरोधी आंदोलनासारखं दलितविरोधी आदोलन इथं होणार नाही.

शिवाय मागे सांगितल्याप्रमाणं ब्राह्मण, मराठे याचे हितसंबध एक नाहीत. दोघे दलितविरोधी असले तरी त्यांची परस्परात जुंपणारच असते. दुसरं म्हणजे खुद्द मराठा समाज हा Monolithic interest group होऊच शकत नाही.

यामुळे इथला तणाव टोकाला जाणार नाही. धुसफूस जरूरआहे व राहीलही.

**शेवटी मी म्हटलं, की इथ अनेक वर्षांपासून दलित चळवळ सुरू आहे, आता तर पँथर, आंबेडकरी गट आहेत, यांचा किती परिणाम इथल्या सत्ताकारणावर, धोरणावर झाला ?**

बाबांनी याबाबत आशादायक भूमिकाच घेतली. वसंतराव नाईक अकरा वर्षं मुख्यमत्री राहतात, नरेंद्र काबळे काँग्रेस ( आय) प्रदेशाध्यक्ष होते, मुख्यमंत्रीपदाच्या स्पर्धेत सुशीलकुमार शिंदे राहतात– हे सगळं या दलित चळवळीचा परिणाम म्हणून आहे. तुम्ही म्हणाल की, ही माणसे केवळ शोभेसाठी ठेवली आहेत. तरी सत्तेच्या पंगतीत मानकरी म्हणून त्यांना घ्यावंच लागेल ही जाणीव मराठा समाजात आहे ना !

देशात इतरत्र कुठेही मराठा समाजासारखी जातीची एकगठ्ठी सख्या नाही. या तीस टक्के सत्ताधारी समाजालाही माणसाना Tolerate करावं लागतं आणि त्यांनी केलंही आहे. दलित–मागासांसाठी अनेक कल्याणकारी योजना राबवल्या जातात. पूर्वीसारखी धोरणं आता नाहीत हा या चळवळीचाच परिणाम आहे.

□

## शेतकरी संघटना

पृष्ठ २७ वरून

–संघटनेच्या प्रभावामुळं मराठा ' मास ' देखील दुभगला आहे हे या विधानसभा निवडणुकात दिसून येत. मराठा समाज ४३ टक्के असताना आज विरोधी पक्षाना ५३ ते ५४ टक्के मतं मिळतात. हे ४३ टक्के मतं दुभंगल्याचं लक्षण आहे.

महाराष्ट्रात शेतकरी, दलित, स्त्रिया, कामगार हा सर्व वर्गच दुभंगलेला आहे. या स्थितीतून सर्व शोषिताना एक कसं करायचं हा डाव्या चळवळीसमोर प्रश्न आहे.

**शेवटचंच विचारल, भारतात औद्योगिकरण वाढत आहे. त्यात राजीव गांधी आधुनिकता, २१ व्या शतकाची स्वाही फिरवीत आले आहेत. अशा वेगळ्या मन:स्थितीत शेतकरी संघटनेची काय उपयोगिता राहील ?**

आज सत्तेत जी लॉबी आहे, तिला समाजातले-राजकारणाचे बारकावे कळत नाही. शहरं, शहरांमुळे होत जाणारा विकास एवढंच urban-obsession त्याना आहे. ७२ टक्के लोक शेतीवर उपजीविका करतात याचं त्याना भान नाही.

राजीव गांधी शेतीमालाला रास्त भाव देण्याची भाषा करत असले तरी खऱ्या अर्थाने ग्रामीण प्रश्नाचा गांभीर्यानं विचार करीत नाहीत. असं जर झालं नाही तर शेतकऱ्याच देशव्यापी आदोलन उभं होईल. विरोधी पक्ष वैफल्यग्रस्त असल्यावर त्यांना शेतकरी आंदोलन एक वरदान वाटेल.

माझ्या मते १९८७-८८ च्या सुमारास शहरी-उच्चमध्यम वर्ग व ग्रामीण भागातील आकाक्षा यातील तणाव वाढणार आहे. तो आता प्रसुप्तावस्थेत आहे.

**अशा वेळी शेतकरी संघटना भ्रष्टाचार, कॉम्प्युटरायझेशन, ग्रामीण, भागाकडे दुर्लक्ष अशा प्रश्नांवर प्रभावी आंदोलन उभारेल. इतर विरोधी पक्षही त्यात सामील होतील. काहीशा लोकप्रिय-सवंग घोषणांच्या आडून हे ग्रामीण आंदोलन जोर, पकड घेईल असे वाटते.**

□



# मराठवाड्याच्या अस्मितेची जाणीवच मुंबई–पुण्याला नाही

सुधाकर डोईफोडे, नांदेड

संयुक्त महाराष्ट्राच्या स्थापनेचा रौप्य-महोत्सव १ मे रोजी साजरा करण्यात आला. मराठवाड्यात मात्र याप्रसंगी फारसा उत्साह दिसून आला नाही. केवळ शासकीय पातळीवर काय समारंभ झाला असेल तेवढाच. बाकी जनतेचा सहभाग असा फारसा नव्हताच. मराठवाडा जनता विकास परिषद व रेल्वे संघर्ष समितीनं तर हा दिवस मागणी दिवस म्हणून धरणे धरूनच पाळला.

विदर्भातील जनमत पूर्वीपासून स्वतंत्र विदर्भाच्या बाजूचे होते. २५ वर्षांनंतर ही मागणी मधूनमधून डोके वर काढतेच. मराठवाड्यानं स्वतंत्र राज्याचा आग्रह कधीही धरला नाही. मराठवाड्यानं महाविदर्भात येऊन आपला विकास साधावा या भुलावणीलाही येथील जनता कधी बळी पडली नाही. संयुक्त महाराष्ट्रासाठी मराठवाड्याने पश्चिम महाराष्ट्राच्या बरोबरीने लढा केला. अशा मराठवाड्यात २५ वर्षांनतर रौप्यमहोत्सवाबाबत उदासीनतेची भावना निर्माण व्हावी हे काही चांगले नव्हे. पुढे होणाऱ्या वादळाची ही चिन्हे असावीत असेही कुणाला जाणवले असल्याचे दिसत नाही. मराठवाड्याच्या भावनांबाबतची ही उपेक्षा किंवा बेपर्वा वृत्ती असेल अथवा ‘हे लोक करून करून काय करणार आहेत’ अशी वृत्ती असेल. पण एवढे खरे की मराठवाड्याची काही दुःखे आहेत, समस्या आहेत हे समजावून घेण्याची गरज कुणालाही वाटत नाही.

जेव्हा जेव्हा एखाद्याच्या दुःखावर डागण्या दिल्या जातात तेव्हा त्याचा स्वाभिमान जागृत होतो तो इतिहासाचे पुनरावलोकन करू लागतो. पूर्वी आपण असे शूर होतो, मग आजच असे हीनदशेला का पोचलो याचा तो विचार करू लागतो. त्यातून त्याची अस्मिता जागी होते. संयुक्त महाराष्ट्राच्या आंदोलनात मराठी मनाची अस्मिता अशाच प्रकारे फुंकर घालून जागी करण्यात आली होती. ‘महाराष्ट्र मेला तरी राष्ट्र मेले’ अशी (वस्तुतः खोटी) घोषणा करण्यात आली होती. परतु काही प्रसंगांनी मराठवाड्याच्या अस्मितेचा उच्चार होताच, त्याची भरपूर टिंगल करण्यात आली. गरिबांना अन्न नसते, मान नसतो. तो असतो श्रीमंतांना. त्याचप्रमाणे मराठवाड्यासारख्या दुबळ्या व जित प्रदेशातील लोकांना अस्मिता बाळगण्याचा हक्क नाही, असे बजावून सांगण्यात येऊ लागले. आम्ही ज्याना दैवत मानले तीच मंडळी या फॅसिस्ट धमकावणीत अग्रेसर होती याचे खरोखर दुःख होते. ‘अंबेजोगाईचे मोमिनाबाद झाले तेव्हा तुमची अस्मिता कुठे गेली होती’ असा अत्यंत हिणकस व गैरलागू प्रश्न आम्हाला विचारण्यात आला. प्रश्नकर्ते हे विसरले की, अंबेजोगाईचे मोमिनाबाद इस्लामी राजवटीत जबरदस्तीने झाले होते व २०० वर्षांनी का होईना, वेळ येताच जनतेने त्याचे पुन्हा अंबेजोगाई केले. अस्मिता आतल्या आत धगधगत होती म्हणूनच वेळ येताच हे घडू शकले. निजामाने नामांतर करून मराठवाड्याची अस्मिता जेवढी दुखावली नसेल तेवढी या आमच्या पुरोगामी नेत्याच्या एका अविवेकी वक्तव्याने दुखावली गेली.

वरील संदर्भ मराठवाडा विद्यापीठ नामांतराचा आहे हे उघडच आहे. नामांतराबाबत कुणाचे मतभेद असू शकतात. पण सर्वच नामांतरवादी प्रामाणिक समतावादी नाहीत, तसेच सर्वच नामांतरविरोधक समताविरोधक नाहीत, हेच या वादात विसरले गेले. परस्पर मराठवाड्याचे नामांतर घडवून

फुकटचा पुरोगामीपणा मिळवू पाहणारे काही लोक त्यात असणे शक्य आहे. डॉ. बाबासाहेबांच्याबद्दल अत्यंत आदर असूनही काही ऐतिहासिक कारणामुळे, नामांतराला विरोध असणारेही असू शकतील, हे लक्षातच घेतले गेले नाही. 'विरोधकाना गोळ्या घाला, गोविंदभाई, अनतराव याना अटक करा' अशा बेगुमान मागण्या करण्यात आल्या. मराठवाडा या नावाचीही टिंगल करण्यात आली आणि तरी मराठवाड्याने आपली अस्मिता दुखावली असे म्हणू नये अशी तबीही देण्यात आली. वास्तविक मराठवाड्याच्या सीमेबाहेर सुरक्षित ठिकाणी राहणारी ही मंडळी खाजगीरीत्या काय बोलत होती (काहीजण तर मजजवळच बोलले) हे बाहेर आले, तर बऱ्याच जणाचे वस्त्रहरण होईल. खरे पाहिले तर नामांतराचा प्रश्न वेगळ्या पद्धतीनं पुढे आला असता तर ही कटुता आली नसती. पण मराठवाड्याला काही मन आहे, हेच लक्षात न घेतल्याने पुढील अनर्थ घडून आला. या नामातर आंदोलनाचे फलित एवढेच की काही मडळीना पुरोगामी म्हणून वावरता आलं. मराठवाड्यातील समाजवादी चळवळ संपूर्ण खलास झाली. समाजवादी व दलित यांच्यात दरी निर्माण झाली आणि संपूर्ण महाराष्ट्रातील समतावादी चळवळ १० वर्षांनी मागे रेटली गेली.

मराठवाड्याला नगण्य मानण्याची प्रवृत्ती केवळ सत्तारुढ काँग्रेस पक्षातच आहे असे नाही, तर ती विरोधी पक्षातही आहे. पुलोदची राजवट आली, तेव्हा मराठवाड्यातून निम्म्यापेक्षा अधिक आमदार पुलोदचे होते. पण मत्रिमडळात घेतले गेले कुणी डॉ. गाडेकर म्हणून. या गृहस्थांचे पूर्ण नावही मला आठवत नाही. मत्री होण्यापूर्वी ते कोण होते व आज कुठे आहेत याचा पत्ता नाही. आणीबाणीत हालअपेष्टा भोगलेले कित्येक लोक विधानसभेवर निवडून गेलेले होते. त्यांना मंत्रिमडळात प्रतिनिधित्व दिले गेले नाही. तुमचे प्रतिनिधित्व आम्हीच करतो अशी पुलोद राज्यकर्त्यांची भावना असावी. परिणामी येथील समस्या शासनाला नीटशा समजल्या नाहीत. पुलोद असो की काँग्रेस असो, शासनात मराठवाड्याला कधीच प्रमाणशीर प्रतिनिधित्व लाभलेले नाही; ते आजही नाही.

## डिवचणे–उपेक्षा चालूच


पुलोदची क्षणभगुर राजवट सोडता महाराष्ट्रावर काँग्रेसचेच राज्य आहे; पण यशवतरावांपासून ते वसंतदादापर्यंत मराठवाड्याचे मन जाणावे असा कधी प्रयत्नच झाला नाही. पाडवातील नकुल–सहदेवांप्रमाणे त्याला आपला अनुचर म्हणून गृहीतच धरले. नागपूर करार केला पण त्याचे पालन यशवतरावानी केले नाही. वसतराव नाईकानी तर जिल्हा नियोजनाची कल्पना काढून नागपूर करार मोडीतच काढला. आज शासनाच्या अदाजानुसार मराठवाड्याचा अनुशेष ७५१ कोटी रुपयांचा आहे. पण ही आकडेवारी शासनाच्या बेइमानीच्या गणिताचे उत्तर आहेत. मुळात हा अनुशेष १५०० कोटी रुपये होतो, हे मराठवाड्यातील अर्थतज्ज्ञांनी दाखवून दिलेच आहे. मागासभागाचा अनुशेष शोधून काढण्यासाठी शासनाने डॉ. दाडेकराना लवाद नेमले. डॉ. दाडेकर हे या प्रकरणी अत्यत अप्रामाणिकपणे वागले असा माझा आरोप आहे. महाराष्ट्रातील मागासभागांच्या समस्याचा विचार करण्यासाठी मुबई *सकाळच्या* पुरस्काराने मुबईत ८ ऑगस्ट १९८३ रोजी एक परिषद बोलावण्यात आली होती. 'सयुक्त महाराष्ट्रात ज्या विश्वासाने विदर्भ व मराठवाडा आला तो विश्वास कायम राखण्यासाठी, मते दुभंगू नयेत व महाराष्ट्राचे ऐक्य कायम टिकाव यासाठी ही परिषद आहे' असे सयोजकानी म्हटले होते. अध्यक्ष होते डॉ. वि. म. दाडेकर. दाडेकरानी पहिल्यादाच महाराष्ट्राचे त्रिभाजन व्हावे असे सागून टाकले. विदर्भ व मराठवाड्याचा अनुशेष निघाला, तो, ती रक्कम इतरत्र म्हणजे पश्चिम महाराष्ट्रावर खर्च झाल्यानेच. ती रक्कम परत करण्याची वेळ येताच डॉ. दाडेकर विदर्भ-मराठवाड्याला बाहेर हाकलण्याची गोष्ट करतात. सयुक्त कुटुबातील वडील भावाने आपल्या लेकीबाळीची लग्नकार्ये उरकावीत व धाकट्या भावाच्या मुलीच्या लग्नाची वेळ येताच व्यवहाराची वाटणी करण्याचा डाव टाकावा असाच हा प्रकार झाला. डॉ. दाडेकराची हीच भूमिका असती तर त्यानी आयोगाचे काम स्वीकारावयास नको होते; पण त्यानी ते स्वीकारले व विदर्भ-मराठवाड्याबरोबर पश्चिम महाराष्ट्राचाही अनुशेष दाखवून मागासभागाचा विश्वासघात केला.

आता राज्य व केंद्राबद्दल काय लिहावे? कोयना योजना राज्य पातळीवरील; पण त्यापेक्षा मोठ्या असलेल्या जायकवाडी प्रकल्पासाठी विभागीय पातळी त्याचा खर्च मराठवाड्यासाठी ठेवलेल्या रकमेतून. नादूर-मधमेश्वर प्रकल्प वेग घेत नाही. जेव्हाजेव्हा वसतदादा मुख्यमंत्री होतात तेव्हातेव्हा विष्णुपुरी प्रकल्पाचे काम थंडावते. मराठवाड्याच्या विकासात रेल्वेचा अभाव हा मुख्य अडसर. मनमाड-अदिलाबाद आणि मिरज-लातूर मार्गांचे रूदीकरण व नगर-परळी नव्या मार्गाची बाधणी, या तीन मागण्या. मराठवाडा महाराष्ट्रात आहे म्हणून या संपूर्ण महाराष्ट्राच्या मागण्या आहेत असे राज्य शासनाने कधी मानलेच नाही. या तीन मागण्यापुढे आल्या तेव्हा राज्य शासनान एकूण ३३ रेल्वे मागण्याचे निवेदन केंद्राला पाठवून दिले. त्यात मराठवाड्याच्या मागण्या पार बुडून गेल्या. त्याना अग्रक्रम देण्याचीही गरज वाटली नाही.

सयुक्त महाराष्ट्रासाठी मराठवाड्याने काही करावयाचे ठेवले नव्हते. पण सयुक्त महाराष्ट्राच्या चळवळीचा उल्लेख होतो तेव्हा प. पू. स्वामी रामानंद तीर्थ, गोविंदभाई श्रॉफ, अनत भालेराव, व्ही. डी. देशपांडे, भाई उद्धवराव पाटील याचे नेमके विस्मरण होते. वास्तविक विदर्भ, मराठवाडा, पश्चिम महाराष्ट्र व मुबई शहरातील काही प्रमुख नेत्याची (प्रातिनिधिक स्वरूपात) तैलचित्रे विधानभवनात लावावी अशी सूचना झाली होती पण तिची दखल घेतली गेली नाही.

साऱ्या लेखात मी कशाचीही तात्त्विक चर्चा केली नाही. मराठवाड्याच्या अविकसितपणाची आकडेवारी दिली नाही. त्याची चर्चा इतरत्र होत असतेच. आपल्याकडे पाहण्याचा दृष्टिकोन उपेक्षेचा आहे. क्वचित उद्दामपणाचा आहे अशी इकडील लोकांत समजूत वाढत आहे. त्याची काही उदाहरणे दिली. तशी सारी उदाहरणे म्हटले तर क्षुल्लक आहेत व नजरेआड करण्याजोगी आहेत. मी काहीना डिवचल्याने राग येऊन ते उत्तर देतील तर बरेच होईल. मात्र लेखक

पृष्ठ ३८ वर



# गरीब मराठा तरुण क्रांतीचा नायक

–प्रा. राम बापट

पुणे विद्यापीठाच्या राज्यशास्त्र विभागातील प्रपाठक राम बापट याच्या अनेक क्षेत्रांतील विश्लेषक बुद्धीविषयी सर्वचजण बोलतात. विद्यार्थी, मित्र वगैरेंमध्ये त्यांची विद्वत्ता, स्वभाव, उत्साह (आणि लोकाना सुरेख, टांगतं ठेवणं) याविषयी कौतुकमिश्रित आदर वा आदरयुक्त कौतुक आहे. पण त्यांची सगळी विचक्षणा दत्तो वामनांसारखी–कागदावर न येणारी. त्यांची काही ठाम मतं, त्याला पूरक असं सूक्ष्म विश्लेषण, त्यापलीकडचं निरीक्षण व त्याचा अन्वयार्थ लावण्याची पद्धत-हे सगळं वेगळं आहे. महाराष्ट्राच्या प्रबोधनाच्या राजकारण-समाजकारणासंबंधी संदर्भग्रंथ म्हणून वापरल्या जाणाऱ्या गेल ओमवेट बाईच्या पुस्तकासाठी बापट 'Constant source of inspiration and insight' होते. यामुळे त्यांच्याशी बोलायचं होतं. त्यांनीही 'नक्की-अगदी-जरूर' करून अनेक हुलकावण्या देत दोन बैठकीत चर्चा केली.

हल्ली राज्यशास्त्र-सामाजिक शास्त्रांच्या अभ्यासकाची विश्लेषणाची पद्धत आहे त्या व्यवस्था-कार्याचं rationalization करून, त्यातील आंतरसंबंध शोधण्याची असते. या System मध्ये होत जाणारा बदलही तिच्या सनातन मूल्यांना व कार्यांना धरूनच असतो अशी अंतर्निहित (implict) गृहीतकं या प्रकारच्या विश्लेषणात असतात. या Structural-functionalism च्या नव्या विश्लेषणतंत्रामुळं अभ्यासकालाही एक सुरक्षिततेचा दिलासा मिळतो. व्यवस्थेतील घटकांचे संतुलन होतच असते किंवा शेवटी परस्परांशी जुळवून घ्यावेच लागते असा equilibrium चा भाव या नव्या (किंवा पुनरुज्जीवित) विश्लेषण पद्धतीत असतो. System analysis च्या नावाखाली जुन्या, क्वचित दैववादी व नियतीवादी (Deterministic) वाटणारी ही विश्लेषणाची पद्धत दुसऱ्या महायुद्धानंतरच्या अमेरिकन सामाजिक शास्त्रज्ञांनी विकसित केलेली आहे. १९६० च्या सुमारास तिचा कळस झाला. समृद्ध समाजामध्ये येणाऱ्या दृष्टिकोनाचाच तो परिणाम होता. भारतीय सामाजिक शास्त्रज्ञांनीही ती पद्धत उचलली. त्या दृष्टीनेच अजूनही विचार चालू आहे

मात्र याला प्रत्युत्तर म्हणून दुसरीही विश्लेषण-अर्थ लावण्याची व विषय मांडण्याची पद्धत आहे. पुणे विद्यापीठाच्या राज्यशास्त्र विभागातील प्रपाठक प्रा. राम बापट यांनी दुसऱ्या पद्धतीत आपलं हे विश्लेषण बसवलं. त्यांच्या मते structural-functionalism मुळे आपण फक्त प्रस्थापित राजकारणाचा विचार करतो. तर त्याउलट क्रांतिकारी-बदलाच्या संदर्भात राजकारणाचा विचार, अशीही दुसरी पद्धत असते. तिथं संघर्ष, परिवर्तन यांचं गतिविश्लेषण असतं. या Radical-Revolutionary Politics च्या संदर्भात ते महाराष्ट्राच्या एकंदरच जडणघडणीचा आढावा घेत होते.

त्यात त्यांनी पहिल्यांदा प्रस्थापित राजकारणातले प्रवाह सांगितले. नंतरच्या भागात परिवर्तनासंबंधीच्या राजकारणावर ते बोलले. आजपर्यंत महाराष्ट्रात ब्राह्मण, मराठा व महार या तीन जातींचे प्रस्थापित राजकारण चालू आहे. ब्राह्मण व मराठा या प्रभावी जातींचे प्रत्येक पवित्रे, मग ते कोणत्याही क्षेत्रातले का असेना, प्रस्थापित राजकारणात प्रबळ होण्यासाठीच होते, हा त्यांचा मुद्दा ते मांडत होते.

ते म्हणाले, : आज जी स्थिती आहे. तीच नजिकच्या भविष्यकाळात कायम राहील.

मला सध्या तरी महाराष्ट्रात फार मोठं परिवर्तन किंवा सध्याच्या स्थिर स्थितीत फारसा बदल होईल असं वाटत नाही. प्रस्थापित राजकारणाचा विचार करायचा झाल्यास महाराष्ट्रात पहिल्यापासून मराठा ब्राह्मण व महार या तीन जातींचच राजकीय प्राबल्य आहे. या तीन जातीपाशीच सत्तेची मयुरी दिसते. यांचं आजच राजकारण, एकमेकासंबंधीचे पवित्रे त्या दृष्टीनं पाहण्यासारखे आहेत.

## ब्राह्मणांचा वाढता सहभाग

हे बोलतानाच आम्ही काही गृहीतकं धरली. त्यात १९३५ नंतर मराठा समाज महाराष्ट्रात हळूहळू राजकीय वर्चस्व कमावू लागला. संयुक्त महाराष्ट्राच्या निर्मितीनंतर मराठा राजकारणामुळे पूर्वीच्या सत्ताधारी ब्राह्मण जातीची राजकीय पीछेहाट झाली. ब्राह्मण जातीच्या या पीछेहाटीबद्दल बोलताना ते म्हणाले, '१९४८ ते ६१, १९६१ ते ७५ व १९७५ नंतरचा कालखंड हे तीन टप्पे पडतील. १९४८–६० या कालखंडात ब्राह्मण जात धास्तावलेली होती. मराठा समाजाची सत्तेवरील पकड पाहून राजकारणाचे तर राहू द्या, आपली आर्थिक स्थिती, सधी यांचाही पार सकोच होईल अशा भीतीने त्याला घेरले होते. दुसरी जात राजकारणात प्रभावी होत आहे ही खतही त्याला होती. या प्रस्थापित राजकारणाविषयी एक तुच्छतेची, उदासीनतेची व कृतक बंडखोरीची भावना त्याच्यात निर्माण झाली'

ही कृतक बडखोरी सांगताना बापटांनी बव्हशी विरोधी राजकारण, विधायक कार्य, राजकारणापासून अलिप्त राहून काम करण या ब्राह्मणी नेत्याच्या प्रवृत्तीकडे लक्ष वेधलं. 'हे सगळे राजकारणी मठ्ठ आहेत, आपण आता विधायक कार्याकडे वळू'–अशासारख्या भावना त्याचे निदर्शक होत.

'पण पुढे जशी भारताची किंवा महाराष्ट्राची अर्थव्यवस्था विकासाच्या मार्गाला लागली, तशी त्याचा फायदा या जातीला मिळायला–व जाणवायला– सुरुवात झाली. विकास योजनांमुळे त्याचा व्यवस्थापकीय, तंत्रवैज्ञानिक व तत्सम नोकऱ्यांच्यारूपाने सहभाग वाढला त्याचे परपरागत व्यवसाय सुटले, कार्यक्षेत्रे बदलली. पण तो व्यवस्थापनातील मध्यम दर्जाच्या व्यवस्थापकीय जागा, लहान उद्योग–व्यापार, धोरण ठरविणाऱ्या सस्थात उच्च पदावर पोहोचू शकला.

–अशा वेळी प्रस्थापित समाज व राजकारण यामध्ये गुतलेले हितसंबंध त्याला परत एकदा उमजू लागले आहेत. या रचनेत, आपलेही काही stakes आहेत असं त्याला आता जाणवत आहे त्याच्या जोडीला प्रस्थापित राजकारणातही काही तरी करावं आणि करता येईल अशी त्याच्यात भावना बळावत आहे. एकूण तो राजकारणात चागलाच रस टिकवून आहे. यावेळी राज्याच्या व केंद्राच्या प्रस्थापित राजकारणात ब्राह्मणाचा सहभाग वाढत होता. आतापर्यंत केवळ विरोधकातच दिसणारे ब्राह्मण आता सत्ताधारी पक्षातही होते. निवडणुकाही लढवू लागले. म्हणजे प्रस्थापित राजकारणात तो फारसा दिसत नाही पण एक प्रकारची Studied aloofness, masterly inactivity ची भूमिका घेऊन तो वावरत आहे. त्याचबरोबर प्रस्थापित राजकारणात उघडपणे मिरवण्याची स्वप्नेही त्याला पडू लागली आहेत.

– १९४८ ते १९७१ या काळात ब्राह्मण समाजाने नव्या परिस्थितीत सास्कृतिक व साहित्यिक अगाने स्वतःचे बळ व रसरशीतपणा शाबित ठेवण्याचा प्रयत्न केला. हा आपले परंपरागत अस्तित्व कायम ठेवण्याचाच प्रयत्न होता.

– १९७१ नंतर मात्र ब्राह्मण समाज नव्या उभारीने प्रस्थापित राजकीय जीवनात उतरत आहे. उघडपणे मिरवण्याची स्वप्ने त्याला पडू लागली. आतापर्यंत राजकारणात तो वेगळपा भावनेने शिरत होता. मराठा राजकारणामुळे पीछेहाट झाल्याची प्रतिक्रिया म्हणून प्रस्थापित राजकारण हे आपलं क्षेत्र नाही तरी आपण येत आहोत ही भावना होती. मात्र १९७१ नंतर तो उघडपणे, बरोबरीच्या, हक्काच्या नात्याने राजकारणात उतरला.'

: आणि मराठा जात ?

: ती आजची सत्ताधारी जात आहे. १९३० नंतर तिचे राजकारण सत्तेच्या दिशेने चालत आलेले आहे. या समाजाचे दोन भाग पाहू. एक सत्ताधारी अभिजनाचा (Elites) शहाण्णव कुळी गट. दुसरा लहान शेतकरी, शेतमजूर व नव्या चाकरमान्यांचा असा कुणब्यांचा गट. केंद्रीय सत्ताधाऱ्यांशी भागी करून राज्यपातळीवर एक गठ्ठा नेतृत्व सत्ताधारी मराठा जातीनं कमावलं आहे. सत्यशोधक व ब्राह्मणेतर चळवळीनी हे नवे मराठा नेतृत्व घडवल आहे.

– १९५६ नंतर अधिक सत्तेच्या दृष्टीनं पावलं पडायला सुरुवात झाली. सहकारी साखर कारखाने व विकसित शेती यामुळे या उच्चवर्गीय मराठा राजकीय सत्तेला एक भक्कम आर्थिक पाया मिळाला आहे. आर्थिक सत्तेतून मराठ्यांना राजकीय सत्ता मिळाली नाही. आधी त्यांनी संख्येच्या जोरावर, राजकीय सत्ता मिळवली आणि त्या सत्तेच्या साह्याने आर्थिक पाया निर्माण केला.

## सत्तेसाठी सांस्कृतिकता

–या गटानं केवळ राजकारणात रस घेतला, त्यांची पुढची पिढीही तशीच. यातील बहुतेक युवकांना शिक्षणानंतर नोकरी रोजगार मिळाला तरी त्यातील बहुसंख्यांची ओढ कोणत्या तरी स्तरावर प्रस्थापित राजकारण करण्याची आहे. आर्थिक सत्ता व हे राजकारण यांच्यावर थोडीफार पकड मिळाल्यावर या वर्गाला आपल्यातील एक कमतरता जाणवत आहे. जीवनात काही तरी राहून गेल्याची, सुटल्याची ही भावना असते. संपन्न (Power या अर्थाने) जीवन जगायचं म्हणजे केवळ राजकारण, अर्थकारणाची गणितं, रणधुमाळीच पुरते असं नाही. सभोवतालच्या परिस्थितीची एक सजग जाण (understanding), या संपन्नेत मोडतात. सत्ताधिष्ठित मराठा समाजाला साहित्य व कला म्हणजेच सास्कृतिक बाबतीत ही उणीव जाणवत आहे.

ब्राह्मण आणि महार समाज याबाबतीत कार्यशील आहे. यामुळे दोघाच्याही अंगी त्यातून निर्माण होणारी रग व अहंता दिसते. मराठा समाजालाही हे क्षेत्र एक दिवस काबीज करावे लागेल

**: मी सहज म्हटलं, 'ही नेहमीच्या Sanskritization किंवा Brahminization ची अपरिहार्य प्रक्रिया नाही ?'**

राम बापटानी तो मुद्दा गणतीतच धरला नाही.Sanskritization, Brahminization या संकल्पनांनी काय साध्य होतं, त्या

कशासाठी वापरायच्या यासंबंधी त्यानी प्रश्नच उपस्थित केला.

विकासाच्या प्रक्रियेतले अधिक सपन्नता यावी यासाठी काही मूल्ये असतात, त्यापैकी हे सास्कृतिक जाणतेपणाच अग असणं हे आवश्यक असतं, असं त्यावं म्हणण आज विशिष्ट सत्ता व समृद्धीच्या पातळीवर पोचलेल्या सुशिक्षित मराठा माणसाची ती विकासाची स्वाभाविक दिशा आहे असं सागताना ते म्हणतात, 'एका बाजूला सांस्कृतिक, वैचारिक सत्ता व परंपरा असलेला व ती जतन करणारा ब्राह्मण समाज, दुसरीकडे भौतिक पातळीवर पूर्वी व अजून दारिद्र्यात असलेला महार समाज. वैचारिक, सास्कृतिक दृष्टया जागृत, सपन्न व मातब्बर होत आहे. स्वत.चे understanding, तत्त्वज्ञान, विचार, साहित्य कला तो स्वत: उभारत आहे. या पार्श्वभूमीवर मराठा समाज कुठे आहे?'

प्रस्थापित राजकारण हे Power Politics आहे. आणि Power म्हणजे सत्ता (राजकीय) आहेच. दुसऱ्याला 'प्रभावित' (Influence) करून त्याच्याकडून आपल्याला हव्या त्या गोष्टी करवून घेणे हा Power या सज्ञेचा गाभा आहे. 'प्रभावा'च्याच क्षेत्रातली उच्च-समर्थ पातळी म्हणजे Power. या Power मध्ये सास्कृतिक-वैचारिक सत्तेचाही भाग असतो. राजकीय-आर्थिक सत्तेबरोबर ही सत्ताही आवश्यक असते. अशी लासवेल (Laswell) प्रभृतीची सत्तेची (Power) सकल्पना आहे. तीच बापटाना अभिप्रेत असावी. या Cultural hegemony च्या अगानं चर्चा चालू असताना ते म्हणाले, 'या सास्कृतिक-वैचारिक सत्तेमुळे मराठा समाजाच्या माणसाला एक भरीवपणा तर येईलच. पण दुसरीकडे सध्याच्या मराठा राजकारणाला त्यामुळे अधिमान्यता लाभेल. असली सांस्कृतिक प्रतिमा मिळवण्याच्या नादात आपण राजकारणापासून दूर जाऊ अशी भीती काही मराठा नेत्याना वाटते. याउलट या पैलूमुळे आपले समाजातील व राजकारणातीलही स्थान पक्के होईल, समाजातलीही acceptability वाढेल ही गोष्ट मराठा समाजातील निदान काही-जणाच्या ध्यानात येऊ लागलेली दिसते. या गोष्टीमुळे आपली Power अधिक बळकट होते हे ध्यानात येत आहे. मराठा समाजाचं एका बाबतीत मतैक्य आहे, पुढची पचवीस-तीस वर्षं तरी सत्तेपासून त्याला दूर जायचं नाही. यासाठी सास्कृतिक अग वाढवण्याचा या समाजाचा प्रयत्न असतो.'

'मराठा समाजासमोरचा पेच सागताना ब्राह्मण हा गुणात्मक स्पर्धेचा आधार घेतो, तर दलित सवलतीचा आधार घेतात, हे सागून मराठ्याची खरच अडचण झाल्याचं त्यानी सागितलं. नव्याने देणगीवर काढण्यात आलेली तत्रनिकेतनं व अभियांत्रिकी-वैद्यक महाविद्यालये ही त्या अडचणीवर उपाय शोधण्याचा प्रयत्न आहे. श्रीमत मराठा समाजाच्या सत्तेच्या विकासासाठी हे प्रयत्न आवश्यक आहेत. अशा संस्थांमध्ये होणारी Recruitment ( भरती ) पाहिली तर ती बागाइतदार घराण्यातल्याच वर्गाची असते. हा केवळ एक दाखला झाला. त्याला अनुसरून बापट म्हणतात, 'राजकीय सत्ता. बळकट करण्यासाठी परपरागत नसलेली क्षेत्रे पादाक्रांत करण्यास मराठा समाजानं सुरुवात केली आहे. त्यासाठी राजकारण हे हत्यार वापरता येते त्याचा आधार परत आपली मतदान-शक्ती.'

**ब्राह्मणांच्या परंपरागत Cultural hegemony ला व दलितांच्या उगवत्या सांस्कृतिक सत्तेला तोंड देण्यासाठी मराठा समाजाला हे करावं लागत आहे. याबाबत यशवंतराव चव्हाणांपासूनच प्रयत्न सुरू होते का? महाराष्ट्रातील मराठा सत्ताधीशांचे याबाबत काय प्रयत्न होते? असा माझा प्रश्न.**

'यशवतरावांची सास्कृतिक-वैचारिक सपन्नता ही वैयक्तिक होती. प्रातिनिधिक नव्हती. मात्र त्याचा त्यानी मराठा समाजात सास्कृतिक-वैचारिक उन्नयनाची एक गरज, एक प्रेरणा व जाणीव निर्माण करण्यासाठी उपयोग केला. याबाबत त्यानी प्रत्यक्षात त्याचा गाजावाजा केला असं दिसणार नाही. आंध्रप्रदेश, तमिळनाडूमध्ये ब्राह्मणविरोधी जाती सत्तेवर आल्यावर त्यांनी अगदी उघडपणे साहित्यिक-सास्कृतिक सस्था, कार्यक्रम आपल्या जातीच्या ताब्यात देण सुरू केलं. तस यशवंतरावानी केलं नाही. पण मराठा समाजानं जाणतं व्हावं व त्याही अर्थान प्रबळ व्हावं हा त्यांचा प्रयत्न सर्व पातळीवरून होता.

पुढच्या मराठा नेत्यानी यासाठी विशेष धडपड व आच दाखविली आहे असं दिसत नाही. वैयक्तिक पातळीवर एखाद-दुसऱ्या सास्कृतिक बाबीची आवड, साखर कारखान्यानी काही नाटयगृह उभारणं, वारणानगरच त्याबातचं काम अशा गोष्टी आहेत. मात्र समाजात तशी urge निर्माण करणं ही ओढ नंतरच्या मराठा नेतृत्वात दिसत नाही.'

यशवंतरावानतर काही मराठा नेत्यामध्ये ती कुवत होती का? यावर बापटानी यशवतराव मोहिते याचा उल्लेख केला. त्यांच्याजवळ ती जाण, खोली, प्रयत्न करण्याची ऊर्मी आहे. ते जर सत्तेच्या शिखरावर असते तर बरंच काही करू शकले असते असं त्याचं म्हणणं.

**हे झालं उच्चवर्गीय मराठ्यांचं, खालच्या वर्गातल्या कुणबी मराठ्यांची काय स्थिती आहे?**

बापट म्हणतात, 'पश्चिम महाराष्ट्रातला कुणबी स्वत.ला सत्ताधीशाशी जोडून घेत असला तरी तो वेगळाच आहे. खेड्यातून बाहेर पडून शहरात नोकऱ्या शोधण्यात व पाढरपेशी होण्यात तो गुतला आहे. हा वर्ग आता शहरातल्या कामगारापासून ते स्वतंत्र छोटे व्यवसाय करणाऱ्यापर्यंत आहे. त्या समाजाची राजकीय, आर्थिक व सास्कृतिक भूक कशी भागेल यावर महाराष्ट्राचे पुढील पंधरा वर्षांचे राजकारण ठरणार आहे.'

या कुणबी जातीच्या राजकीय-सामाजिक आतरप्रक्रियाबद्दल बोलताना ते पुढे म्हणाले, 'हा कुणबी श्रमिक आहे. गरीब आहे. मात्र तो स्वत.ला वर्गीय रूपात पाहत नाही. अजूनही हा श्रमिक स्वत.ला मराठा जातीशी Identify करतो. वर्गापेक्षा जातीची जाणीव त्याला आहे. त्यामुळे मराठा समाज, म्हणजे आपणच, राज्यकर्ते आहोत हा भ्रम त्याच्यात आहे. हा भ्रम अजूनही आहे. हा भ्रम गेला तर त्याला निराशा येईल, ती निराशा त्याला समाजातले आपले स्थान समजायला मदत करील. त्या वेळी तो विरोधलढा या मार्गाने जाईल.

—नाही तर अभिजन मराठा वर्ग

Co-option ( सह-निवड ) मार्ग स्वीकारेल. असल्या Co-option च्या मार्गानं त्याला मराठा सत्ताधारी वर्गात थोडं स्थान मिळेल. हा वर्ग कुणीकडे जाईल हे या Co-option च्या घटकावर अवलंबून आहे. एकूणच , देशाच्या पातळीवर यापुढे Co-option ची ही प्रक्रिया वाढती राहील. पुढे काही काळ स्थिर सरकार, राष्ट्रीय ऐक्य व आर्थिक विकास आहे त्या भांडवलशाही चौकटीत चालू राहिला तर या समाजातल्या जागृत चळवळ्या ( articulate ) वर्गाचं Co-option होऊ शकत. इथला असंतोष संघटित झाला तरच टिकाऊ राहू शकेल. '

## राजकीय खेळी

हे विश्लेषण जरा पुढच जात होत. या प्रस्थापित राजकारणातला तिसरा घटक 'महार' राहिला. त्याबाबत विचारता बापटांनी महार ही संज्ञा बिनदिक्कतच वापरली. आज तो नवबौद्ध असला किंवा दलित या सबगोलंकार ( Blanket ) संकल्पनेत येत असला, तरी 'महार' ही संज्ञा अधिक अर्थपूर्ण ठरेल. कारण त्याला ऐतिहासिक पार्श्वभूमी आहे आपण जातीच्या भाषेतच योग्य रीतीने विश्लेष करू शकतो. कारण भारतात ती वास्तवता आहे. बापटांच्या मते महाराष्ट्राच्या राजकारणात महार समाज मातबर घटक आहे. दलितांमधला हा समाजच सामाजिक–राजकीय–सांस्कृतिक चळवळीत ताकदीने शिरला आहे. आंबेडकरी चळवळीनंतर दलित पँथर इत्यादी चळवळी झाल्या. यामधून महार समाज जाणीवसपन्न झाला. त्याच स्वत:चं वैचारिक सांस्कृतिक विश्व तो तत्त्वज्ञान, साहित्य, कला यातून तयार करत आहे.

' मात्र आता त्यांच्यातही सरकारी चाकरमान्या मध्यमवर्ग तयार होत आहे. या मध्यमवर्गाचे व मूठभर उच्चपदस्थांचे आपल्या गरीब जातबांधवांशी असणारे संबंध बदलत आहेत तो मनानं पांढरपेशा बनत आहे. खुद्द महारांच्या सर्वंकष–व्यापक चळवळीची धारही कमी होताना दिसते. संपूर्ण समाजव्यवस्थेला बदलून टाकू पाहणारी अनेक पातळीवरची चळवळ आता सौदेबाजीकडे झुकू लागली आहे. तात्कालिक फायदे, राजकीय निर्णयप्रक्रियेत काही वाटा, यापलीकडे चळवळीची धाव पोहचताना दिसत नाही. इथल्या अर्थव्यवस्थेचे, राज्यव्यवस्थेचे फायदे वाढत्या प्रमाणात मिळत असल्याने या दलित मध्यमवर्गीय राजकारणाची धार कमी होणं साहजिक आहे.

दलित नेत्यांचं Cooption, absorption किती होतं त्यावर चळवळीची, क्रांतिकारी बदलाची आच अवलंबून राहील.'

आजवर या जातींच्या राजकीय बलाचा असा प्रवास राहिला आहे. ब्राह्मण, मराठा, महार या राजकीय जातींची स्थिती संतुलन अवस्थेतील ( equilibrium ) आहे का ? इथल्या नेतृत्वानं त्याबाबत काय प्रयत्न केले ?

त्यावर श्री. बापट म्हणाले, ' यशवंतरावांनी इथं परस्परपूरकतेच राजकारण सुरू केल. त्यातून कोणत्याही समाजाला एका टोकाकडे जाऊ न देण्याची काळजी घेतली. त्यामुळ ध्रुवीकरण कोणत्याही अर्थानं झालं नाही. त्यांनी ब्राह्मण समाजाची काही मर्मस्थानं जपली साहित्य–कला या क्षेत्राबाहेर इथल्या व्यवस्थेत त्यांनाही वाटा मिळत राहील हे बघितल. मात्र त्याच वेळी ब्राह्मण समाजानं मराठा सत्ताधारी वर्गाच्या राजकीय मिराशीवर हक्क सांगू नये किंवा तो हिसकावूनही घेऊ नये याचीही दक्षता घेतली.

: यशवंतरावांनी मराठ्यांच्या वतीनं ब्राह्मणांशी alliance केला हे कितपत बरोबर आहे ?

: ' हा alliance म्हणजे मैत्री होती अशातला भाग नाही. परस्पराची भिन्न प्रभावक्षेत्रे मान्य करण्यातला हा प्रकार आहे, व होता. ब्राह्मण व मराठा समाजातला कलह non-antagonistic contradiction च्या पातळीवर नेण्याचा प्रयत्न त्यांनी केला. ब्राह्मण समाज हा 'आहेरे' वर्गच आहे अशी त्याची दृष्टी होती. फक्त ब्राह्मणांच्या दृष्टीनं महत्त्वाच्या असलेल्या तांत्रिक–बौद्धिक प्रगतीला त्यांनी खीळ घातली नाही एवढंच.

महारांच्या/दलितांच्या बाबतही अशीच दक्षता त्यांनी घेतली. मराठा इतरांना सामावून घेऊ शकतो. राजकीय सत्तेतही थोडी भागी करू शकतो हे त्यांनी स्पष्ट केलं. रिपब्लिकन पक्ष काँग्रेसशी जोडला. त्यामुळे शिखर पातळीवरच पांढरपेशा महार नेतृत्व प्रस्थापित मराठा राजकीय नेतृत्वाशी जोडले गेले. यशवंतरावांचं हे राजकारण आजही कमी अधिक फरकानं चालू आहे असं दिसत.

या स्थितीत एखादा समाज टोकाला जाऊन क्रांतिकारी बदल घडवून, वेगळं काही करेल अशी शक्यता नाही. मराठा समाजानं ब्राह्मण व महारांना आपल्या कह्यात ठेवल आहे ब्राह्मणांच्या महत्त्वाकांक्षा राजकीयदृष्ट्या डोईजड वाटू लागल्या, तर दलितांची शक्ती हाताशी आहेच. याउलट श्रमिक दलिताची व्यापक चळवळ उभी राहण्याची शक्यता निर्माण झाली तर ब्राह्मणांशी प्रभावक्षेत्रे वाटून घेण्याचा सुप्त करार अमलात येतोच.'

¤

आतापर्यंत 'प्रस्थापित राजकारणा'संबधीच चर्चा झाली. राजकारणाचं विश्लेषण म्हणजे एवढंच अभिप्रेत असतं किंवा याच lines वर पुढे काय होईल हे सांगता येनं. मात्र राम बापटांनी प्रस्थापित राजकारणाची ही स्थितो गृहीत धरून दुसरा घटक आणला. माझ्या प्रश्नातील structural-functionalism-त्याच्यावर अप्रत्यक्ष हल्लाच करताना ते म्हणाले, ' माझा हा दृष्टिकोन नाही. Radical Revolutionary Politics हा एक दुसरा भाग असतो. तो तुम्ही मानणार की नाही यावर चर्चा होऊ शकते; पण प्रस्थापित राजकारण चालू आहे. सर्वत्र विकास – शांतता – सुख समाधान आहे, हे असच पुढे चालू रहावं असं म्हणणं असेल तर ओ. के. मग काही म्हणणच नाही' असं बोलून हताशपणे त्यांनी तळवे टेबलावर आपटले.

राजकीय विश्लेषकांना, नव्या विश्लेषण पद्धतीनुसार equilibrium, system adaptation, system maintenence यासारख्या अवस्थांच एक आकर्षण आहे; त्याचं स्वरूप काय आहे, तो योग्य–इष्ट आहे का ? अशा प्रश्नांना या विश्लेषणपद्धतीत उत्तर नाही. हे प्रश्नच १९ व्या शतकातले Normative स्वरूपाचे आहेत असा त्यांचा दावा असतो. (Normative, value loaded या संकल्पनात्मक शिव्या आहेत !) मात्र आता या दृष्टिकोनालाही झाली पन्नास वर्षं. नवा विचारप्रवाह हा Normative चीच कालानुरूप बदलेली आवृत्ती असावी.

## क्रांतिकारी राजकारण

राम बापटांनी या दृष्टिकोनातनं विचारलं, 'आहे त्यात समाधान मानायचं तर ठीक. मात्र आज या राजकारणात गरिबीचा, विषमतेचा प्रश्न आहे सर्वसाधारण माणसाच्या मनात असहायतेची भावना आहे. हा वर्ग अधिक एकटा, असुरक्षित आहे. त्याच्या दृष्टीनं नवं राजकारण–अर्थकारण करावं लागेल. आज राजीव गांधींच्या स्वरूपात आतापर्यंत प्रचलित, पण सध्या अधिकच स्पष्ट झालेली भांडवलशाही विकासाची प्रक्रियाच पुढे पचवीस वर्षं चालू राहणार हे गृहीत धरू. राष्ट्रीय–परदेशाच्या पातळीवर आकस्मिक काही उत्पात घडणार नाही असं मानून बोलावं लागेल. अचानक एखादी घटना, बदल झाला तर सगळंच उलट-पालट होईल' अस हातचं विधान करून ते म्हणाले, 'सध्याच्या केंद्र–राज्य संबधात येत्या पंधरावीस वर्षात बदल होणार नाही असं मानलं तर महाराष्ट्राच्या राजकारणाचं एक अग या पद्धतीन बाधलं जाईल. या स्थितीत इथल्या जागरूक घटकाच स्थान काय राहील? परिवर्तनवादी शक्तींनी कोणत्या मार्गानं जावं, कोणत्या मार्गांनी जाण्याची शक्यता आहे, हे पाहिल पाहिजे. त्यातून सर्वसामान्याना दिलासा मिळेल, प्रस्थापित हितसंबंधांचं सामान्यांच्या जीवनावर होणारं आक्रमण रोखता येईल. त्याहीपेक्षा इथं आता काहीच होऊ शकत नाही अमेरिकेतल्यासारखी End of Ideology ची स्थिती आली, हा सुधारवाद्यांचा (Reformist) दावा निकालात निघेल. इथला सध्याचा सन्नाटा जाईल, या तऱ्हेनं राजकारण उभारावं लागेल. त्याला आज जागा आहे. कारण इथल्या व्यवस्थेतले तणाव वाढत आहेत.'

हे नवं राजकारण कसं असावं। असेल?

या नव्या राजकारणाची पद्धत (Method) सांगताना बापट म्हणाले, 'सध्याच्या चौकटीत एकदम क्रांती करण्याचा साहसवाद पत्करण्यान सगळं राजकारण बिनसेल. तो आक्रस्ताळेपणा सोडून द्यावा लागेल. मात्र त्याच वेळी नव्या राजकारणासाठी सघटन करावं आणि हे राजकारण नेहमीच्या राजकीय–संसदीय प्रक्रियेपेक्षा वेगळं असावं' हे म्हणतानाच ते घाईने म्हणाले, 'हे मी नेहमीप्रमाण ससदबाह्य राजकारण, रस्त्यावर येणे असं मानत नाही. संसदबाह्य फुटकळ, विस्कळित राजकारण करायचं असं नाही. शोषितांच्या संघटनेचही समान राजकीय बळ उभारायचं ही कसोटी असावी.'

आपला 'संसदबाह्य' पद्धतीचा मुद्दा अधिक स्पष्ट करताना ते म्हणाले, 'मतपेटी हेच राजकीय बळ मोजण्याचं साधन असावं असं नाही. मतपेटीतून प्रस्थापितांना यश मिळत असतं. मतपेटीचं यश म्हणजेच गरिबांचं यश असा प्रचार केला जातो. त्यामुळे प्रस्थापितांना मतपेटीद्वारेच हटविण्याचा प्रयत्न सुरू असतो. त्यामुळे त्याना हटविण्याच्या इतर मार्गांकडे डोळेझाक होते. त्यामुळे We play their game. खऱ्या विरोधकानी मतपेटीद्वारेच जनतेची ताकद मोजण्याचा हव्यास सोडावा. कारण संसदीय लोकशाहीत तंतोतंत प्रतिबिंबित होईल इतकी सरळ इथली व्यवस्था नाही. इथे गुतागुती आहे.

— आणि आजचे विरोधी पक्ष, पर्याय वगैरे नाहीत. वर्ग म्हणून विरोधी पक्षही प्रस्थापिताचा भाग आहे. ही त्यांच्यातील आपसातली धुसफुस आहे. या विरोधीपक्षांचा आधार मध्यमवर्ग आहे. मात्र जगभरचाच मध्यमवर्ग हा by definition उपभोगवादी असतो. हा खऱ्या विरोधी पक्षाचा आधार नाही.

— त्याचबरोबर परंपरावादी मार्क्सवाद्यांच्याप्रमाणे deepening crisis (चिघळत जाणारी स्थिती) याची वाट पहायची गरज नाही. त्याचप्रमाणे Welfarism (कल्याणकारी) व्यवस्थेच्या माध्यमातून येणारी सतुष्टता–त्यातून विकास होईल हा भ्रम टाकण्याची जरुरी आहे. हा reformism अव्यवहार्य आहे.

— सध्याच्या प्रस्थापित सत्तेला पर्याय म्हणून विरोधी सत्ताकेंद्रे स्थापन केली पाहिजेत. मात्र त्यात साहसवाद, सुधारणावाद, विरोधीपक्षांचा 'पर्याय' हे प्रकार टाकले पाहिजे.

इथल्या अन्यायग्रस्त लोकाचं संघटन, असंघटितांना संघटित करूनच विरोधी पर्याय उभा राहू शकेल.'

**: या गटांना कसं उभं करायचं, कोणत्या मुद्द्यांवर जागृती करायची?**

: 'शेतीमध्ये पाण्याच्या वाटपाचा प्रश्न हा महत्त्वाचा मुद्दा ठरणार आहे. भांडवली विकासाबरोबरच जलसिंचनाचं प्रमाण वाढलं, उसाला पाणी मिळालं, बड्या बागायतदाराचा लाभ झाला. गरीब–मध्यम ज्वारी–बाजरीचा शेतकरी ही मागणी करेल. आठमाही–बारमाही पाण्याचा सवाल आहे. गरिबांमध्ये जाणीव निर्माण करण्याचा हा चांगला मार्ग आहे. त्याला राजकीय स्वरूप देण्याचे जाणीवपूर्वक प्रयत्न करावे. असे प्रश्न welfarism च्या भूमिकेतून माडले तर तात्पुरते सोडवलेही जातात; पण त्यामुळे शोषितांचं सघटन करण्याची ऐतिहासिक संधी हुकवल्यासारखं होतं. विरोधकानी या प्रश्नी आजपर्यंत लक्ष घातल नाही.

: दुसरा मुद्दा आहे तो रोजगार हमी योजनेचा. यासारख्या योजनेची कसून अमलबजावणी व्हावी असं कोणालाच वाटत नाही. सत्ताधाऱ्याप्रमाणेच विरोधकही त्याला जबाबदार आहेत. हा प्रश्न यापैकी कुणालाच निकराचा वाटत नाही. ही योजना हमखास राबवत राहिली तर दलित–श्रमिक याच्या राजकीय संघटनाची भीती वाटत असावी. विरोधक भ्रष्टाचार, स्थानिक प्रश्न इतक्या निकराने माडतात, तेवढा काळीचा प्रश्न रोजगार हमी का मानत नाही? हा लोकजागृतीचा राजकीय सघटनेचा प्रश्न म्हणून माडला नाही. यासंबधी आक्रमक धोरण घेऊन सहेतुकपणे राजकीय शक्तिकेंद्रे म्हणून या योजनेचा वापर करावा.

— त्यानतरचा प्रश्न शहरातला आहे. तिथे आपले विरोधक गैरलागू प्रश्न उपस्थित करतात. झोपडपट्ट्यांची सुधारणा, पाणीपट्टी हे वरवरचे मुद्दे आहेत. किमान नागरी सुविधा हा खरा प्रश्न आहे. साधनसंपत्तीचे वितरण (Resource allocation) हा मुद्दा आहे. मक्तेदारी भांडवलशहाच्या योजनेभोवती लोकसघटन उभारायची गरज नाही. ज्या खेळांमध्ये लोकांना सुतराम रस नाही तिथं stakes ठेवायचं कारण नाही. इथे Reformism उपयोगाचा नाही. सरळ संघर्षाची स्थिती आली तर लोकसंघटन होतं. ज्या ज्या issue मुळे सघटना बळ निर्माण होईल ते सर्व शास्त्रशुद्ध रीतीने उभं करावं. मात्र ते उभं करण्याच्या तर्कशास्त्रात गेलं की आपण 'त्यां'ची प्रस्थापितांची खेळी खेळतो.

## कुणबी युवक अग्रदूत

यापेक्षा महत्त्वाचा मुद्दा येतो तो राजकीय सत्तेचा. महाराष्ट्रात आतापर्यंत वरिष्ठ जातींकडून कनिष्ठ जातींकडे सत्ता जात राहिली· मात्र नंतर ही प्रक्रिया थांबली. आज इथल्या political agenda वर वरिष्ठ जातीकडली सत्ता कनिष्ठ जातींकडे जाण्याचा विषयच राहिला नाही. आज बहुजन समाजाकडून दलितांकडे सत्ता जाईल असा issue करायचा नाही. त्याचप्रमाणे मराठेतर ब्राह्मणेतरांकडे सत्ता जाईल असं मानणंही भाबडेपणाचं होईल. कारण मराठ्यांची संख्याच तीस टक्के आहे.

त्याऐवजी ब्राह्मणवर्ग व मध्याचा अभिजन मराठावर्ग यांच्याकडून खऱ्या गरीब मराठ्यांकडे, अलुतेबलुतेदार व दलितांकडे सत्ता येण्याचा खरा प्रश्न आहे. या वर्गात अंतर्विरोध नाही. हा प्रधान प्रश्न मांडायची जबाबदारी परिवर्तनवादी शक्तींवर आहे.

आजपर्यंत सत्ताहीन वर्गांनी गरीब मराठा युवकांना वगळून सत्ताकारण करण्याचे प्रयत्न केले. त्यामुळे हा घटक प्रस्थापित मराठा नेतृत्वाशी alliance करून आहे. पण हा मराठा वर्ग भांडवलदार, ब्राह्मण वर्गांशी संधान साधून आहे. त्याऐवजी गरीब कुणबी मराठा, इतर मागासवर्गीय व दलित यांची सत्ता टिकाऊ ( viable ) विश्लेषण व लढाऊ राजकारणाची चौकट तयार होईल.

– इथं प्रस्थापित मराठा वर्ग दिशाभूल करतो मराठा अस्मितेचा नारा व त्याचं राजकारण खेळतो. मात्र त्यामुळे गरीब मराठ्यांची अस्मिता राहील का ? परिवर्तनाचं राजकारण करण्यासाठी 'जात विसरा, सर्व बंधू–बंधू' आवश्यक आहे असं नाही. तसं कुणी विसरतही नाही. त्यामुळे मराठा अस्मिता कशात आहे याचा शोध या कुणबी युवकाने घ्यावा. बागायतदार व ब्राह्मणांच्या विरोधी उभं राहिल्यानंच त्याची अस्मिता कायम राहील. त्यासाठी मराठा अभिजनवर्गाचा आपल्याला आधार आहे हा त्याचा भ्रम ( Myth ) फोडावा लागेल. इथं विरोधी राजकारण उभं करायचं झाल्यास मराठा श्रमिक युवकाचं या आघाडीत स्थान राहील. त्याची राजकीय भूक भागवायची तर इतर शोषितांनी, दलितांनी त्याच्याबरोबर यावं त्याच्या झेंड्याखाली एकत्र आले तरच प्रस्थापित राजकारणाला खिंडार पडेल.

आतापर्यंत आपल्याकडे परंपरागत मार्गांनी ध्रुवीकरण होत होतं. ब्राह्मण – मराठे वाद झाला की मराठेतर शक्ती गप्प असतात. नव्या शिकलेल्या कुणबी तरुणापुढे आपण कोणचा प्रश्न ठेवणार ? अस्मिता हा प्रश्न आहे. त्याच्या मुळाशी मला न्याय कसा मिळेल ? या प्रश्नाचा त्यानं शोध घ्यावा. तरच तो या प्रस्थापित मराठ्यांच्या जाळ्यातून बाहेर पडेल. त्यासाठी त्याला अस्मिता सोडण्याची गरज नाही. खरं तर कोणत्याच क्रांतीच्या, बदलाच्या आड अस्मिता आली नाही– कोणी विसरूही शकत नाही. या मराठा युवकाने 'आपण कोण' हे विसरू नये. ते न करताही आपल्यावरचा अन्याय, शोषण कोण करत आहे, आपल्या अस्मितेच्या क्षेत्राला मर्यादा घालणारे कोण ते लक्षात येईल.

हा मराठा गरीब तरुण संख्येने मोठा आहे. विरोधी, परिवर्तनाची राजकारण उभारायचं तर त्याला बाजूला ठेवून विचार करणं थिल्लरपणा होईल. तो भोंगळपणा आहे. तो क्रांतीचा नायक आहे.

–अन्यायाचं कारण लक्षात आल्यावर तो प्रस्थापित समाजाच्या Co-option ला बळी पडणार नाही. Barricade च्या योग्य बाजूला तो आहे हे पाहिलं की काम झालं.'

अशा प्रकारचं राजकारण, असंघटितांना संघटित करणं हेच पर्यायी–विरोधी राजकारण आहे. असली purposive political activity हे राजकीयदृष्ट्या स्वयंभू उद्दिष्ट आहे. आज महाराष्ट्रात त्या दृष्टीनं वातावरण आहे. हे केलं तर आजची मरगळ, सुधारवाद यांना आळा बसेल असं प्रा. बापट यांना वाटतं □


---

## मराठवाड्याच्या अस्मितेची जाणीव

पृष्ठ ३२ वरून

मराठवाड्याचा तर आहे, त्याला काय उत्तर द्यायचे ?' अशी भूमिकाही घेण्याची शक्यता आहे. मराठवाडा 'संतांची भूमी आहे' हे एकदा मानले की शांतीब्रह्मत्व त्याच्यावर लादले जाणारच. याच शांतीब्रह्म मराठवाड्यात गेल्या दशकातच तीन उग्र आंदोलने झाली व त्यांची सुरुवात वरवर क्षुल्लक वाटणाऱ्या प्रसंगातूनच झाली हे तरी जाणत्यांनी विसरू नये म्हणून हे थोडे तिखट. मराठवाड्यातील लोकांच्या मनात कटुता वाढत आहे. स्वतंत्र मराठवाडा हा व्यवहार्य नाही एवढे ज्ञान जाणत्यांना आहे. पण लोक पेटले म्हणजे विवेक व वास्तवता बाजूला राहते. प्रकरणाचा स्फोट झाल्यावर धावाधाव करणे हे काही शहाणपणाचे लक्षण नसते. आज गरज आहे ती मराठवाड्याच्या भावनांवर फुंकर घालण्याची. त्याचा राग, त्याची मागणी, त्याची अस्मिता समजावून घेण्याची. आता संतांचीच लेकरे म्हटल्यावर ओंजारले, गोंजारले तर तो कासेची लंगोटीही सोडून देईल, पण डिवचल्यावर अस्मितांची टक्कर होईल. सर्व पक्षांतील नेते व विचारवंत मराठवाडा हा भूभाग आहे व त्याला मन आहे याची दखल घेतील तर संयुक्त महाराष्ट्राचा हीरक महोत्सव थाटात साजरा होऊ शकेल. पण पुण्या-मुंबईत बसून वाकोल्या दाखविण्याचा उद्योग सुरू राहिला तर तुम्हालाच काय पण आम्हालाही नको असलेले घडेल.

□



# असंतोषाचा स्फोट टाळण्यासाठी रोजगार हमी योजना

शांताराम पंदेरे
( सहकार्यवाह, युक्रांद )

भारतीय संविधानाच्या अनुच्छेद ४१ मधील मार्गदर्शक तत्त्वामध्ये प्रत्येक नागरिकाला निर्वाहाचे साधन अथवा रोजगार मिळविण्याचा हक्क प्राप्त करून देण्यासाठी शासनाने प्रयत्नशील रहावे असे नमूद करण्यात आलेले आहे. काम करण्याच्या या तत्त्वांना महाराष्ट्र शासनाने पूर्वीच मान्यता दिली आहे. शासनाच्या वित्तविषयक व आर्थिक धोरणाचे मूलभूत उद्दिष्ट म्हणून काम मागणाऱ्याला ते काम देण्याची जबाबदारी (शासन) स्वीकारते. महाराष्ट्र राज्याची 'रोजगार हमी योजना' ( रोहयो ) ही या दिशेतील पहिले पाऊल आहे आणि देशातील महाराष्ट्र राज्य हे या संदर्भात कृती करणारे पहिले राज्य आहे.

'रोहयो'ला राज्य शासनाने 'महाराष्ट्र रोजगार हमी अधिनियम १९७७' अन्वये वैधानिक स्वरूप दिले. हा अधिनियम २६ जानेवारी १९७९ रोजी म्हणजे प्रजासत्ताक दिनी अंमलात आला. १५ ऑगस्ट १९८३ रोजी म्हणजे स्वातंत्र्य दिनी लाल किल्ल्यावरून भाषण करताना भारताच्या पंतप्रधान इंदिरा गांधी यांनी महाराष्ट्रातील 'रोहयो' ही यशस्वी ठरली असल्याने ती देशव्यापी करण्यात येत असल्याचे घोषित केले.

यादृष्टीने 'रोहयो'ला ऐतिहासिक महत्त्व प्राप्त झाले आहे. महाराष्ट्रातील सुमारे २० लाख मजूर या योजनेशी निगडीत आहेत. आतापर्यंत सुमारे ८०० कोटी रुपये या योजनेखाली खर्च करण्यात आले आहेत. १५ वर्षांपासून सुरू असलेल्या 'रोहयो'चे हे सामाजिक आर्थिक राजकीय महत्त्व ध्यानात घेता तिचे वस्तुनिष्ठ मूल्यमापन करण्याची वेळ येऊन ठेपली आहे.

१९६९ मध्ये 'रोहयो', राज्यात ग्रामपातळीवर काही निवडक गटात रोजगाराची हमी देण्यासाठी एक पथदर्शी योजना म्हणून सुरू करण्यात आली. तत्पूर्वीची महाराष्ट्रातील व देशातील सामाजिक-आर्थिक-राजकीय परिस्थिती काय होती हे पहाणे महत्त्वाचे ठरेल.

स्वातंत्र्यानंतर देशाचा नियोजनबद्ध आर्थिक विकास साधण्याचा मार्ग सत्ताधारी काँग्रेस पक्षाने स्वीकारला. त्यादृष्टीने पहिली पंचवार्षिक योजना 'कृषी योजना' म्हणून घोषित केली गेली. परंतु ब्रिटिशांविरुद्धच्या स्वातंत्र्य लढ्यात सक्रिय असलेल्या व काँग्रेस पक्षावर वर्चस्व असलेल्या भांडवलदार वर्गाने परत एकदा स्वातंत्र्योत्तर काळातील भारतीय सरकारवर आपली पकड बसविली. त्याचा तात्काळ दृश्य परिणाम म्हणजे दुसरी पंचवार्षिक योजना 'औद्योगिक योजना' म्हणून घोषित झाली. ज्या देशातील ७६.६९ टक्के लोकसंख्या शेतीवर अवलंबून आहे व 'शेती' हाच ज्या देशातील प्रमुख उद्योग राहिला आहे, त्या विभागाला त्या दुसऱ्या पंचवार्षिक योजनेपासून दुय्यम स्थान दिले गेले. परिणामी महाराष्ट्रात कुळकायद्यांची अंमलबजावणी १९६५ पर्यंत चालली होती. कमाल शेतजमीन धारणेबाबत २६ जानेवारी १९६२ रोजी प्रथमतः मर्यादा घालण्यात आल्या. याचा अर्थ स्वातंत्र्यपूर्वकाळात ग्रामीण भारतामध्ये जे शेतजमीन विषयक उत्पादन संबंध होते, त्यात बदल व्हायला १८ वर्षे लागली. तोपर्यंत पारंपारिक-सरंजामी स्वरूपाचे शेतमजुरांचे भीषण शोषण ग्रामीण भारतातील सरंजामी अवशेष जोपासणारा शेतमालक वर्ग करतच राहिला होता. औद्योगिक क्षेत्रात भांडवली विकासाचा विपरीत परिणाम होऊन बकाल आयुष्य जगणाऱ्या बेकारांच्या फौजा निर्माण झाल्या.

शेतीकडे दुर्लक्ष झाल्याने शेती उत्पादन व शेतजमिनीची उत्पादकता १९६०-६१ ते १९७१-७२ या काळात सातत्याने कमी होत गेली. १९६०-६१ च्या दरम्यान १४ टक्क्यांनी शेती उत्पादन घटले

होते. परिणामी येथेही रोजगार क्षमता कमी होत गेली. महाराष्ट्रात १९६०—६१ ते १९७०-७१ या दरम्यान गहू ९५००० हेक्टर, ज्वारी ५८१००० हेक्टर, सर्व तृणधान्ये २८६००० हेक्टर व सर्व अन्नधान्ये ६९००० हेक्टर याप्रमाणे क्षेत्र घटले होते. मात्र त्याच काळात उसाखालील क्षेत्र ४८००० हेक्टरने वाढले होते. महाराष्ट्रात सहकारी साखर कारखाने मोठ्या प्रमाणावर वाढत होते. सर्व ग्रामीण बेकारी सामावून घेण्याची त्यांची क्षमता नव्हती. परंतु हुकमी ऊस तोडणी—वहातूक कामगार कत्राटी पद्धतीने त्यांना हवा होता. हा कामगार बहुसंख्येने भटक्या-विमुक्तामधील बजारा व दलित जातीतील आहे.

## वाढता दुष्काळ, बेकारी, विद्रोह

१९६९ ते १९७३ पर्यंत (१९७० चा अपवाद) सतत महाराष्ट्रात पावसाचे प्रमाण कमी होत गेले. परिणामी दुष्काळी परिस्थिती निर्माण झाली होती.

शहरी औद्योगिक विभागही रोजगार पुरवू शकत नव्हता. आणि इकडे शेतीवरचा बोजा वाढत चालला होता. देशभर स्वातंत्र्योत्तर काळातली पहिली ' नव सुशिक्षित युवकाची बेकराची फौज ' भीषण चक्रात सापडली होती.

भारतीय राज्य घटनेने दिलेल्या सोयी-सवलतीतून शिकून बाहेर पडलेला दलित जातीतील युवक गावोगाव आपले पारंपारिक वर्ण-जाती व धर्म व्यवस्थेने लादलेले गुलामीचे जीवन उध्वस्त करण्याच्या पावित्र्यात उभा ठाकला होता. माणूस म्हणून स्वाभिमानी, निर्भय व मुक्त जीवन जगण्याची जबरदस्त प्रेरणा जोतिराव फुले, डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या विचार व कृतीतून त्याला मिळाली होती. यातूनच पारंपारिक गावकीची कामे सोडण्याची, पाणवठे व मंदिरे जातीमुक्त करण्याची व व्यवसाय परिवर्तनाच्या चळवळी सुरू झाल्या त्यामुळेच या लढणाऱ्या दलिताविरोधी सवर्ण सधन /शेतमालकांनी गावोगाव हल्ले करायला सुरुवात केली.

दोन युद्धामध्ये कामास आलेल्यामध्ये या दलित जातीतील सैनिकही होते. राष्ट्रप्रेमापोटी सीमेवर लढणाऱ्या दलित सैनिकांच्या गावात मात्र त्यांच्या घरावर हल्ले होत होते. सामाजिक-आर्थिक बहिष्कार टाकले जात होते. यातून ' हा देश कुणाचा ?' हा मूलभूत प्रश्न या विद्रोही दलित तरुणानी विचारायला सुरुवात केली होती.

डॉ. आंबेडकरांच्या तालमीत तयार झालेले रिपब्लिकन पक्षाचे ज्येष्ठ नेते दादासाहेब गायकवाड यांच्या नेतृत्वाखाली देशभर ' भूमिमुक्ती ' आंदोलन छेडले गेले. तत्कालीन समाजवादी पक्षानेही जमिनीच्या प्रश्नावर सत्याग्रही लढा पुकारला होता. देशभर मार्क्सवादी-लेनिनवादी पक्षांनी ( नक्षलवादी गटानी ) सशस्त्र उठाव करायला सुरुवात केली होती. हे उठाव प्रामुख्याने ग्रामीण भागात जमीनदाराविरोधी होते. आजपर्यंत मानवी समाज परिघाबाहेर असलेल्या आदिवासी समाजाला साम्यवादी पक्षाने संघटित करून पारंपारिक गुलामीविरोधी प्रखर आंदोलन उभारले होते.

या सर्व तप्त परिस्थितीत भर पडली होती, बेसुमार वाढलेल्या महागाईची. जीवनावश्यक वस्तूची अभूतपूर्व टंचाई व वाढलेल्या बेसुमार किंमती. परिणामी सर्वसामान्य माणूस हैराण झाला होता.

शहरी संघटित औद्योगिक कामगार चळवळ कामगार कपात व बोनससारख्या प्रश्नांवर लढ्याच्या तयारीत होती.

याचा राजकीय परिणाम म्हणून समाजवादी पक्षाचे नेते डॉ. राम मनोहर लोहियानी ' संयुक्त विधायक दला'ची (सविद) कल्पना व भूमिका पुढे मांडताच देशातील अनेक राज्यामध्ये प्रथमच काँग्रेसेतर ' सविद 'ची सरकारे निवडून आली. सामान्य माणसाने त्याच्यासमोर ठाकलेला राजकीय पर्याय स्वीकारला होता.

ही सर्व परिस्थिती चिघळत जाणे सत्ताधारी काँग्रेस पक्ष व भारतीय शासकवर्गाला परवडणारे नव्हते महाराष्ट्राचे त्यावेळचे मुख्यमंत्री वसंतराव नाईक यांना या ग्रामीण असंतोषाची चांगली कल्पना होती. म्हणूनच केंद्र सरकारच्या ' गरिबी हटाव ' कार्यक्रमाचा एक भाग म्हणून महाराष्ट्र शासनाने १९६५ मध्ये ' एकात्मिक क्षेत्र विकास योजना ' (Integrated Area Development Project ) आखून बेकारी निर्मूलनाचा प्रश्न हाताळण्यास आरंभ केला व १९६९ मध्ये राज्यात, ग्रामपातळीवर, काही निवडक गटात रोजगाराची हमी देण्यासाठी ' रोहयो ' एक पथदर्शी योजना म्हणून सुरू करण्यात आली. त्याच दरम्यान केंद्र शासनानेही लहान शेतकरी विकास यंत्रणा व सीमांतिक शेतकरी ( अत्यल्प भू-धारक ) विकास यंत्रणा यासारख्या योजना सुरू केल्या होत्या.

महाराष्ट्र राज्य रोजगार हमी परिषदेचे अध्यक्ष वि. स. पागे ' रोहयो 'च्या भूमिकेविषयी लिहितात—

" आर्थिक विकासाचे प्रमाण वाढवून व एकूण राष्ट्रीय उत्पादनात वाढ करून आणि नंतर संपत्तीचे अधिक चांगल्या प्रकारे वाटप करण्याच्या दृष्टीने आर्थिक उपाय योजूनही गरिबांची स्थिती बदलण्याची काही चिन्हे दिसली नाहीत... पण आता दुसऱ्या दृष्टीने सुरुवात करायची वेळ येऊन ठेपली आहे. आपल्या आतापर्यंतच्या नियोजनात **बेकारीचे निर्मूलन हे कधीच प्रमुख उद्दिष्ट नव्हते. त्यास कायम दुय्यम दर्जाचे स्थान दिले गेले. यापुढे मात्र आपण सर्वांना रोजगार उपलब्ध करून देण्याचे उद्दिष्ट साध्य करण्याच्या दिशेने पावले उचलली पाहिजेत. ' सर्वांसाठी काम ' यापुढे आपले ब्रीद असले पाहिजे. केवळ मूठभर लोकांचा विकास होण्याच्या प्रक्रियेत बहुजन समाजाचा हळूहळू बळी जात असलेला सहन करणे हे अत्यंत अमानुष आहे. ' रोहयो ' मागे हीच विचारप्रणाली आहे.** ( लोकराज्य—' रोहयो ' विशेषांक १९८३ ) ( जाड ठसा आमचा )

## ' रोहयो 'चा महत्त्वपूर्ण ठराव व घटना

**१९६९ :** एकात्मिक विकास कार्यक्रमाचा एक भाग म्हणून 'रोहयो' सांगली, सातारा, रत्नागिरी, यवतमाळ व बीड जिल्ह्यातील एकात्मीकृत क्षेत्र विकास (एक्षेवि) गटातील प्रत्येकी एका खेड्यात राबविण्यात आली.

**१९७० :** पथदर्शी ' रोहयो ' अधिक लोकाभिमुख करण्यासाठी नोव्हेंबर १९७० मध्ये सुधारित पथदर्शी ' रोहयो ' अस्तित्वात आली. ती सांगली, रत्नागिरी, बीड, अहमदनगर, सातारा, नांदेड, ठाणे, जळगाव, नागपूर, यवतमाळ, वर्धा या ' एक्षेवि ' योजनेखालील ११ जिल्ह्यांत सुरू करण्यात आली.

**१९७१ :** ग्रामीण भागातील वाढती बेकारी, बेरोजगार व दारिद्रय यावर उपाय म्हणून राज्य शासनाने १५ कलमी कार्यक्रम

जाहीर केला होता. त्याचा एक भाग म्हणून राज्यपातळीवर 'रोहयो' एक खास कार्यक्रम एप्रिल १९७१ पासून सुरू झाला.

टंचाई परिस्थितीत मात्र 'रोहयो'ची कामे स्थगित ठेवण्यात आली होती.

१९७४ : राज्य विधीमंडळाने सखोल चर्चेअंती २० डिसें. ७४ रोजी 'रोहयो'चा प्रस्ताव एकमताने पारित केला. या प्रस्तावात म्हटले.

**– ही योजना पूर्णत: राबविली जाईल आणि कुठल्याही परिस्थितीत, प्रशासकीय अकार्यक्षमतेमुळे, निधी अभावी किंवा राजकीय मतभेद अथवा समाज कार्यकर्त्यांनी दुर्लक्ष केल्यामुळे या योजनेची अंमलबजावणी स्थगित होणार नाही असेच या सदनाचे मत आहे. या योजनेची आर्थिक बाजू लक्षात घेता, खेडे भागातील बेकारांना द्यावयाची कामे ही उत्पादक स्वरूपाची असली पाहिजेत. त्या कामातून शेतीचे व कुटीर आणि ग्रामोद्योगाची क्षेत्रातील उत्पादन वाढले पाहिजे. या प्रश्नाकडे पाहण्याचा दृष्टिकोन भिन्न असू शकतो, तथापि बेकारीच्या प्रश्नावर चहुकडून हल्ला झाल्यासच तो निकालात निघू शकेल याची या सदनाला जाणीव आहे. जगण्यासाठी जो धडपडतो आणि प्रामाणिकपणे कष्ट करू इच्छितो असा सर्वसामान्य माणूस या योजनेमुळे दीर्घकाळ टिकणारा सार्वजनिक मालमत्ता निर्माण होणार असून त्याद्वारे महाराष्ट्राच्या, पर्यायाने देशाच्या संपत्तीत मोलाची भर पडणार आहे.**

या ठरावात शेवटी म्हटले आहे. **कुटुंबात एकही कमावती व्यक्ती नसल्यास, अपवाद म्हणून १५ ते १८ वर्षे वयातील अज्ञान व्यक्तीला सुद्धा काम दिले जाईल व तिला कामाच्या प्रमाणात मजुरी मिळेल.**

१९७५ : 'रोहयो' निधी स्थापन करण्याकरिता राज्य शासनाने १९७५ च्या महाराष्ट्र राज्य व्यावसायिक, व्यापारी व रोजगार अधिनियमानुसार व्यावसायिक, व्यापारी व कामगार यांच्यावर कर बसविला. याची अंमलबजावणी १ एप्रिल १९७५ पासून सुरू झाली.


यामध्ये व्यवसाय कर, विक्री करावरील अधिभार, मोटार-वाहनांवरील उपकर, शेतसारा, सिंचित धारण जमिनीवरील 'रोहयो' उपकर, शहरी स्थावर बिगर निवासी मालमत्तेवरील उपकर येतात.

१९७७ : राज्य शासनाने महाराष्ट्र रोजगार हमी अधिनियम १९७७ अन्वये 'रोहयो'ला वैधानिक स्वरूप दिले.

१९७९ : हा अधिनियम २६ जाने. १९७९ रोजी अंमलात आला व भारतीय संविधानातील कलम ४१ नुसार कामाचा कायदेशीर हक्क देणारे महाराष्ट्र हे देशातील पहिले राज्य.

## गावगाडा हलू लागला

'रोहयो' राज्य स्तरावर सुरू होताच सर्वात प्रथम जर कोणता बदल जाणवला असेल तर तो म्हणजे ग्रामीण भागातील भूमिहीन शेतमजूर, गरीब शेतकरी स्त्री–पुरुष, एकत्र, मोठ्या संख्येने, दिवसाचे ७ तास काम करू लागले. त्यात सर्व जातींचे (ब्राह्मण, मारवाडींचा मात्र अपवाद) मजूर असतात. १९७१ ते ७३ च्या दुष्काळात 'रोहयो'ची कामे तात्पुरती स्थगित होती. परंतु दुष्काळी कामे मोठ्या प्रमाणावर सुरू करण्यात आली होती. भीषण दुष्काळी परि-



स्थिती. त्यामुळे गावातून 'रोजगार–चारा–पाणी' प्रश्न तीव्र झाला. त्यातच नोकरशाही बेरोजगार व भ्रष्टाचाराने बरबटलेली. या परिस्थितीत गावोगाव मजुरांचे लढे मोठ्या प्रमाणावर सुरू झाले.

प्रायोगिक तत्त्वावर काही विभागात तात्पुरते काम देण्यासाठी म्हणून सुरू झालेली ही योजना संपूर्ण राज्यभर लागू करा अशी मागणी सर्वत्र होऊ लागली. यातूनच १९७५ ला राज्यव्यापी योजना लागू करण्यात आली. यातून अनेक जिल्ह्यांतून रोह. कामगारांच्या संघटना उभारल्या गेल्या. प्रथमच खेड्यातील हा माणूस मधून शेतमालकांच्या तावडीतून मुक्त झाला. पर्यायी उत्पन्नाचे साधन म्हणून 'रोहयो'कडे तो पाहू लागला. सरंजामी व्यवस्थेतील जमीनदारावर शेतमजुराचे जे आर्थिक अवलंबित्व होते, त्यातून त्याचे काही सामाजिक संबंध निर्माण झाले होते. ते उरले सुरले संबंध तुटायला या योजनेमुळे मदत झाली. 'रोहयो' कामावर जाणे ऐच्छिक ठरले. जमीनदाराकडे म्हणजे आताच्या भांडवली व्यवस्थेतील मधून शेतमालकाकडे जायचे की नाही याबाबत त्याला निवडीचे स्वातंत्र्य मिळाले. विशेषत: दलित–आदिवासींची जी सामाजिक व आर्थिक अशी दुहेरी पिळवणूक होत होती, त्या दुहेरी जोखडातून मुक्त होण्याची संधी 'रोहयो'ने त्याला दिली. कामाचे काही नियम, पद्धती निश्चित केली गेल्याने दिवसातील काही वेळ या मजुराला मिळू लागला. वर्ण जातीबद्ध गावगाड्यात सर्व वर्ग व जातींची किमान उठबस व अन्य व्यवहारांवर काही बंधने पडत असत. 'रोहयो'वर शेकडो स्त्री–पुरुष मजूर एका कामावर काम करू लागले. सर्व जातीतील मजुरांशी संबंध प्रस्थापित होऊ लागले.

स्त्री–मजूर तर तिहेरी शोषणात अडकलेली होती. सरंजामशाहीत तर तिला स्वत:चे असे स्वतंत्र व्यक्तिमत्त्वच नव्हते. तिचा स्वत:चा चेहरा नव्हता. नवरा जिथे घरगडी–लग्नगडी–सालदार म्हणून वेठ-

बिगारीचे आयुष्य जगत असेल तिथेच–त्या जमीनदाराकडे, चेहरा नसलेली त्याची बायको काम करीत असे. समान काम करूनही तिला केवळ ती स्त्री आहे म्हणून कमी मजुरी मिळत असे.

भांडवली व्यवस्थेमध्ये सधन शेतमालकवर्ग उदयाला आला. भांडवली पद्धतीने शेती करण्याकडे या वर्गाचा मोठा कल दिसू लागला; परंतु त्यांच्याकडे जे दलित–आदिवासी–कनिष्ट जातीय सालदार–घरगडी आहेत, त्यांच्या बायांना मात्र अजूनही चेहरा सापडलेला नव्हता.

'रोहयो' ने या बायांना 'समान कामाला समान वेतना' चा हक्क दिला. तिचे स्वतःच्या नावाचे 'रोजगार हमी नोंदणी कार्ड' मिळाले. ऑगस्ट ८५ पासून तिला आता तिचा स्वतःचा फोटो– 'खरा चेहरा' असलेले ओळखपत्र मिळणार आहे गँगमध्ये पुरुषांच्या बरोबरीने ती खणतीचे, वहितीचे काम काम करू लागली. आठवड्याला पगार घेताना तिचे नाव पुकारले जाते व ती परपुरुषासमोर (ओव्हरसीअर) न लाजता जाते व स्वतः सही–अंगठा करून स्वत.च्या कष्टाचे मूल्य स्वतःच्या हातात घेतेय.

चेहरा हरवलेल्या अनेक स्त्रियांची 'रोहयो' साईटवर तिला प्रथमच ओळख झाली. २१३ स्त्री मजूर 'रोहयो' वर काम करतात हे आपल्या या 'सख्ख्या बहिणीशी' आपल्या सुखदु:खाविषयी बोलू लागली. आपल्या पगाराविषयी, कामाच्या नियमाविषयी चर्चा करू लागली सघटित ताकदीची जाण व प्रत्यक्ष शक्ती तिला उमगली. गावातील चेहरा नसलेल्या, मुक केलेल्या बाईला तिचा 'चेहरा' गवसला. तिचा 'आवाज' मिळाला. अनेक ठिकाणी लढ्यामध्ये या स्त्रियांनी सक्रिय भाग घेतला. परिणामी सावलीची व्यवस्था, पाळणाघराची कल्पना, बाळतपणाची पगारी सुट्टी आदी नियम शासनाला बनवावे लागले.

'रोहयो' ही एक नवी जागा की, जिथे शेतमजूर, स्त्री–पुरुष कामगार आपल्या भवितव्याविषयी–जीवनाविषयी एकत्र व निर्भयपणे विचारविनिमय करतात.

किमान वेतानाचा कायदा व कामाबाबतचे काही नियम झाले कामगार न्यायालय, कामगार अधिकारी, किमान वेतन निरीक्षक (किवेनि) आदी शासकीय व्यवस्था व नवी नोकरशाही या व्यवस्थेने निर्माण केली; परंतु अजूनही गावात गावचा सरपच, पोलीसपाटील, सोसायटीचा चेअरमन हा पारंपारिक सरजामी व्यवस्थेतील पाटील–देशमुख असल्याने या उपऱ्या नोकरशाहीवर त्याची अजूनही पकड आहे. सालदार, महिनेदार व रोजदार मजुरांची किमान वेतन व अन्य बाबतीत पाहणी करायला आलेला 'किवेनि' त्याच्या शेतमालकाच्या टोलेजग वाड्यात उतरतो. तिथेच जेवतो व मालकासमोरच या मजुराना प्रश्न विचारून माहिती जमवितो! पर्यायी रोजगाराची कोणतीच हमी नव्हती. त्यामुळे हा मजुर मालकाने सागितल्याबरहुकूमच जवाब देतो आणि 'किवेनि', 'कायद्याची अंमलबजावणी व्यवस्थित होत आहे' असा शेरा मारून खुशीने निघून जातो.

'रोहयो' वर खाजगी शेतीवरील शेतमजुरीपेक्षा कमी वेतन मिळूनही कुठे तरी, स्वतत्रपणे काम मिळू शकते याची खात्री असल्याने हा पाटील–देशमुख–कुलकर्ण्यांच्या जोखडाखालील मजूर आज खाजगी शेतवरील किमान वेतनाबाबत रोखठोक बोलू लागलाय. जो कि. वे.कायदा व पाटील-देशमुखाच्या गुलाम 'किवेनि' कडून झाले नव्हते ते 'रोहयो' ने केलेय शेतमजूर–सालदार हवा असेल तर 'रोहयो'पेक्षा अधिक मजुरी दिली पाहिजे हा दट्टया या सधन शेतमालकावर आलाय.

१९७८ ते ८० या काळात 'कामासाठी धान्य योजने' (काधायो) खाली 'रोहयो' वरील मजुराना ३० पैशामध्ये रोज किमान एक किलो गहू मिळत होता. परिणामी या मजुराच्या घरी या काळात खाण्याचे तरी हाल थोडे कमी झाले होते. त्याचे जीवनमान थोडेसे उचवायला 'रोहयो व काधायो'ने खूप मदत केली. जीवनमान उचवण्याची प्रत्यक्ष पातळी जरी कमी असली तरी व सांगितले सामाजिक सबंध बदलले,

## महाराष्ट्र–एक प्रातिनिधिक राज्य

हे सर्व बदल येथील शासनकर्त्या वर्ग–जातीना अपेक्षित होते का? त्याना हे सोयीचे आहेत का? महाराष्ट्र शासनानेच ही योजना प्रथम का सुरू केली?

महाराष्ट्र राज्य या देशातील एक 'प्रातिनिधिक राज्य' आहे जिथे सातारा, सागली, कोल्हापूर, नगर, नादेडसारखे सरजामी थाट–सरजामी सस्कृती जोपासणारे विभाग आहेत. त्याबरोबर कराड, सातारा, सागली, कोल्हापूर, श्रीरामपूर, कोपरगाव, बारामतीसारखे भाडवली शेतीचे 'साखर सस्कृती' जोपासणारे नवे विभागही आहेत. मुबई, ठाणे, बेलापूर, पुणे, पिंपरी–चिंचवडसारखी येथील भाडवली विकास प्रक्रियेत जन्माला आलेली महाकाय औद्योगिक शहरे आहेत. तर दुसरीकडे ग्रामीण कोकण, मराठवाडा, विदर्भासारखे मागासलेले, अविकसित विभागही आहेत. नोकरीच्या शोधात भटकणारी नवी बेकाराची फौज सर्वत्र दिसते. यातून शिवसेने सारखी विकृत वळण घेणारी शक्ती निर्माण झालेली आपण पहातो पुढे तर गुन्हेगारीही विकोपाला गेलेली आढळते.

सावित्रीबाई फुले, महात्मा जोतिराव फुले, डॉ. बाबासाहेब आबेडकर, सुधारक गो. ग. आगरकर, छत्रपती शाहू महाराज आदी समतावादी नेते–विचारवत व त्यांच्या चळवळीही येथेच झाल्या आणि त्याच महाराष्ट्रात मराठवाडा विद्यापीठाला डॉ. बाबासाहेब आबेडकराचे नाव देण्याचा व राखीव जागाच्या प्रश्नांवरून दलित-जातीचा वशच्छेद करण्याच्या उद्देशाने बहुसंख्य–जातीयवादी, सवर्ण हिंदू समाज मैदानात उतरलेला दिसतोय. या देशातील तमाम मुस्लिम 'देशद्रोही' आहेत अशी उघड भूमिका घेऊन या हिंदु समाजाने धर्मयुद्ध पुकारलेले सर्वत्र दिसतेय.

तर दुसरीकडे कामगार, शेतमजूर, स्त्रिया. दलित व आदिवासींच्या चळवळी उभ्या राहताना दिसताहेत. त्याचवेळी या चळवळीमध्ये आलेली विकृतीही स्पष्टपणे दिसतेय.

ससदीय लोकशाहीच्या नावाखाली विशिष्ट वर्ग–जातीची सत्तेत मक्तेदारीही निर्माण झाली आहे.

नियोजनबद्ध आर्थिक विकास व मिश्र अर्थव्यवस्थेचा पुरस्कार करीत भाडवलशाहीला पोषक वातावरण निर्माण करण्यासाठी शासनसस्था व शासकवर्ग-जातीना या विसगतीतूनच मार्ग काढायचा असतो. परतु आपला चेहरा नेहमीच उदारमतवादी–पुरोगामी–

लोकशाहीवादी दाखवावाच लागतो. त्याशिवाय सासदीय लोकशाहीतील सत्ता निवडणूकीच्या मार्गाने त्या सत्ताधारी पक्षाला जिंकता येणार नाही. तशी भौतिक व ऐतिहासिक परिस्थिती महाराष्ट्राला लाभलेलीही आहे. विधानभवनासमोर महात्मा फुल्याचा भव्य पुतळा उभारून दोन्ही सभागृहात नामातराचा ठराव एकमताने समत केला जातो. पण ठराव अमलबजाणीच्या वेळी मात्र हेच शासनाचे प्रतिनिधी–नोकरशाही, न्यायसस्था, पोलीस आदी सपूर्ण शासनसस्था दलित जातीची कत्तल करताना आपण पाहिलेच. तरीही आपण म्हणू शकतो की, सपूर्ण देशात कायदा व सुव्यवस्था टिकून असलेले एकमेव महाराष्ट्र राज्य आहे !

'एक गाव एक पाणवठा' चळवळ मूळ धरतेय हे जाणवताच याच 'प्रातिनिधिक' राज्य शासनाने ती घोषणा स्वीकारून तिचे पूर्ण 'सरकारीकरण' केले व तिथेच ती चळवळही सपली.

'कल्याणकारी राज्य' कसे असावे याचा उत्कृष्ट नमुना म्हणजे महाराष्ट्र शासन !

### रोहयो : भांडवलशाहीची कोंडी सोडवण्याचा प्रयत्न

'रोहयो' सुरू होण्यापूर्वीची देशातील व महाराष्ट्रातील जी सामाजिक–आर्थिक–राजकीय परिस्थिती होती; त्यातूनच या शासनाला फार उलथापालथ होऊ न देता मार्ग काढायचा होता

१९६५ नंतर सपूर्ण जगभर मंदीची लाट आली होती. भारतीय मक्तेबाज भाडवलदारापुढे एक नवा पेच उभा ठाकला होता. 'औद्योगिक पंचवार्षिक योजनातून जी अखड कारखानदारी उभी ठाकली होती, त्यातून जीवनावश्यक वस्तूऐवजी उपभोग्य वस्तूचे उत्पादन भरमसाठ होत होते. जागतिक बाजारपेठेतील या मालाशी चढाओढ करायची असेल तर नवीन तंत्रज्ञान विकसित केले पाहिजे किंवा आयात केले पाहिजे.जे उपभोग्य वस्तूचे उत्पादन निघतेय त्यासाठीची भारतीय बाजारपेठ व उपभोक्ता वर्ग मर्यादित आहे.

यासाठी नव्या भारतीय बाजारपेठा व नवा उपभोक्ता वर्ग निर्माण करण्याशिवाय भारतीय भाडवलदारासमोर, पर्यायाने भारतीय शासन सस्थेसमोर पर्याय नव्हता. यातूनच या शासनाने आर्थिक विकेंद्रीकरणाची घोषणा केली. १९६९ साली तर बँकाचे राष्ट्रीयीकरण केले गेले. ही नवी बाजारपेठ ग्रामीण आहे. भारतीय मक्तेबाज भाडवलदार वर्गाची झालेली ही कोंडी समजण्याइतकी राजकीय जाण भारतीय नव्या शेतमालक वर्गात त्याकाळी नक्कीच नव्हती. हा वर्ग सत्तेतही निर्णायक प्रभाव गाजवू शकत नव्हता परिणामी 'शेतीला पूरक भाडवली विकास' हे आर्थिक सूत्र शासनसस्थेच्या गळी उतरविणे या वर्गाला जमले नाही. त्यामुळे देशाच्या एकूण भाडवलातून नगण्य हिस्सा शेतीकडे वळवून त्यातून जमेल तसा शेतीचा भाडवली विकास साधण्यापलिकडे हा वर्ग फार काही मिळवू शकला नाही.

'रोहयो' जशी १९६९ साली काही गावातील काही गटात प्रायोगिक पातळीवर सुरू करण्यात आली होती तसाच 'हरित क्राती'चा प्रयोगही देशातील काही भागात करण्यात आला. परतु प्रयोगाअती 'रोहयो' राज्य स्तरावर व आता राष्ट्रीय स्तरावर स्वीकारली गेली पण 'हरित क्राती'ची योजना मात्र काही विभागापुरतीच ठेवण्यात आली.

मात्र या कोडीची चागली जाण असलेल्या सत्ताधारी कॉंग्रेस पक्षाच्या नेतृत्वाने 'रोहयो' च्या दरम्यान देशभर 'लहान शेतकरी विकास यत्रणा व सीमातिक शेतकरी (अत्यल्प भू–धारक) विकास यत्रणा' यासारख्या योजना सुरू केल्या होत्या. शेतीला निगडीत हा वर्ग सख्येने मोठा आहे. त्याचा शेतीचा विकास करून त्याची क्रयशक्ती वाढवायची, परिणामी ग्रामीण भागात एक भाडवली सस्कृतीचा स्वीकार करणारा नवा उपभोक्ता वर्ग निर्माण होईल व ही कोंडी फुटायला मदत होईल. या मोठ्या सख्येच्या वर्गातील असतोषही कमी होईल; हे गणित या योजनेमागे होते.

महाराष्ट्रामध्येही एकात्मिक ग्रामीण विकास योजना, रोजगार निर्मितीची धडक योजना, दुष्काळप्रवण विभाग विकास योजना, पथदर्शी ग्रामीण रोजगार योजना, अल्पभूधारक अगर लहान शेतकऱ्याना सहाय्य देणारी योजना आदी योजना सुरू करण्यामागे हाच हेतू होता.

२० डिसेंबर १९७४ रोजी राज्य विधी मडळाने जो ठराव एकमताने समत केला त्यात स्पष्ट म्हटले आहे की, खेडे–भागातील बेकाराना द्यावयाची कामे ही उत्पादक स्वरूपाची असली पाहिजेत. त्या कामातून शेतीचे व कुटीर आणि ग्रामोद्योगाच्या क्षेत्रातील उत्पादन वाढले पाहिजे. या योजनेमुळे दीर्घकाल टिकणारी सार्वजनिक मालमत्ता निर्माण होणार आहे ...

**१९७६–७८ मध्ये कार्यक्रम मूल्यमापन समिती आणि महाराष्ट्र शासन यांच्या संयुक्त विद्यमाने संचालित करण्यात आलेल्या रो. हृ. मूल्यमापन अभ्यास गटाने असे निदर्शनास आणले आहे की, या कार्यक्रमामुळे ज्यांचा फायदा झाला आहे अशा उपयोग कर्त्या कुटुंबांपैकी ('रोहयो' मुळे निर्माण झालेल्या दीर्घकाळ टिकणाऱ्या सामाजिक मालमत्तेमुळे ज्यांच्या जमिनींचा फायदा झाला) ९१ टक्के कुटुंबे ही शेतकरी असून केवळ ७ टक्के हे शेतमजूर होते. 'रोहयो' तून निर्माण झालेल्या मालमत्तेचा जास्तीत जास्त फायदा हा मध्यम आणि मोठ्या उपयोगकर्त्या शेतकऱ्यांना झाला आहे असे निदर्शनास आले उपयोगकर्त्या कुटुंबातील जवळ जवळ ७८ टक्के कुटुंबांची आपल्या शेती उत्पादनात जवळ जवळ ३५ टक्के वाढ झाली तर ४० टक्के कुटुंबांच्या पिके घेण्याच्या पद्धतीत बदल झाला असेही निदर्शनास आले.**

ग्रामीण भागातील ही नवी बाजारपेठ व नवा उपभोक्ता वर्ग निर्माण करीत असताना शासनाने खेड्यातील 'बेकाराना रोजगाराची हमी' अशी घोषणा केलीय राज्यातील सुमारे १२ लाख मजुराना या योजनेखाली वर्षातील सुमारे १०० दिवस काम मिळतेय. 'रोहयो' सुरू झाल्यापासून १–५० रु पासून रोज मिळत होता आज तो ६ रु. वर आलाय. याशाठी मागील सुमारे १२ वर्षे मजुराना लढे द्यावे लागले आहेत. मजुराच्या या असतोषाचा स्फोट होवू नये म्हणून वारंवार काही सवलती घोषित करण्याचे धोरण शासनाने स्वीकारलेले आहे.

**राज्य सरकारने 'रोहयो' ची व्याप्ती व उद्देश स्पष्ट करताना म्हटलेय–** Putting employment at the centre of economic planning is often regarded by some critics as a wasteful method of production. But the social costs and consequence and the overt or direct challange to the

security of the nation in case the frustrations of these sectors of the community transcend the bounds of reason are immeasurably more heavy and dangerous...

वाढती महागाई, ग्रामीण भागातील रोजगाराची कमी होत जाणारी क्षमता व त्यातून निर्माण झालेली बेकारांची फौज, उत्तर-पूर्व व दक्षिणेकडील राज्यात सुरू झालेल्या चळवळीकडे ओढली जाऊ नये; तिच्या असंतोषाला वाट करून द्यावी; हा 'रोहयो'वर रोजगाराची हमी देण्यामागचा आणखी एक प्रमुख हेतू आहे. क्रांतीकारक चळवळ होऊ न देण्यासाठी व सर्व चळवळी एका उदारमतवादी–सुधारणावादी चौकटीत बसविण्याचे प्रयोग करणारी महाराष्ट्र ही एक प्रयोगशाळा आहे! यासाठी एकूण रकमेतील ६० टक्के भाग अकुशल काम करणाऱ्या मजुराच्या वेतनावर खर्च झाला पाहिजे. म्हणूनच कंत्राटदारी पद्धतीने ही कामे करून घेऊ नयेत असे आदेशही शासनानें दिलेत.

### रोहयो : समग्र दृष्टिकोनाचा अभाव

१९७२–७३ ते १९८३–८४ या ११ वर्षाच्या काळात ७८३.७० कोटी रुपये 'रोहयो' वर खर्च करण्यात आले व त्या मोबदल्यात १३०.९२ कोटी मनुष्य दिवस निर्माण झाले. दरवर्षी साधारणपणे ५० ते १०० कोटी रुपये 'रोहयो' साठी मजूर केले जात आहेत. एकूण खर्चाच्या सुमारे ६० टक्के रक्कम दुष्काळग्रस्त जिल्ह्यात खर्च झाली. १९७२–७३ च्या दुष्काळात 'रोहयो'ची कामे न काढता वेगळी दुष्काळी कामे काढण्यात आली. मात्र 'रोहयो' राज्यस्तरावर राबविताच तिला दुष्काळात रोजगार पुरवणारी योजना म्हणूनच शासन तिच्याकडे पाहू लागले. महाराष्ट्रात एकूण १३ जिल्ह्यामधील ९० तालुके दुष्काळग्रस्त आहेत. असे असतानाही दुष्काळाची तीव्रता काही कमी करता येत नाही. त्यासाठी कायमस्वरूपी, परिणामकारक योजना काही आखता आल्या नाहीत. या भागात अजूनही 'रोजगार–चारा–पाणी' प्रश्नाने भीषण स्वरूप धारण केलेले आहे. कालव्याच्या पाण्याच्या चुकीच्या वापरामुळे व अन्य काही कारणाने हजारो हेक्टर जमीन 'खार' बनली आहे. दरवर्षी तितकीच भर नव्याने पडतेय. असे असतानाही 'रोहयो' खाली खार जमीन दुरुस्तीबाबत कार्यक्रम घेतला गेलेला नाही.

बेघरासाठी शासनाने घरकुल योजना जाहीर केलीय. थोड्या बेघरांसाठी गावात अत्यंत खराब अशी घरे तलाठ्यामार्फत बांधून दिलेली आहेत. लाखो लोक अजूनही बेघर आहेत. पण हा कार्यक्रम काही अजून 'रोहयो' खाली घेतलेला नाही. २५ ते ३० हजार विहिरींची पाण्याची पातळी वाढली व तितक्याच नव्या विहिरी खोदण्याची क्षमता आहे असे शासन म्हणतेय. तर ७७१९ पाझर तलाव पूर्ण झाल्याची नोंद आहे. तरीही माणस व जनावराच्या पिण्याच्या पाण्याची व्यवस्था अजून झालेली नाही.

ग्रामीण भागातून शहराकडे जाणारा माणसाचा लोंढा अजून थोपवला गेला नाही. पश्चिम महाराष्ट्र व गुजरातकडे जाणारा ३ ते ४ लाख ऊस तोडणी–वहातूक कामगाराचा लोंढा दरवर्षी वाढतोय. भांडवली ऊसशेती व सहकारी साखर कारखान्याच्या विकासातून हा 'नवा भटका वर्ग' उदयाला आलाय. त्याच्या आरोग्य, घरे व मुलाच्या शिक्षणाची कोणतीही जबाबदारी शासन वा सहकारी कारखानदार, पर्यायाने नवा सधन शेतमालक वर्ग यानी घेतलेली नाही. करोडो रुपये शिक्षणकर आज सहकारी साखर कारखान्याकडे आहे. परतु याहीबाबतीत 'रोहयो' काहीही करू शकलेली नाही.

या सर्व पार्श्वभूमीवर एक गोष्ट प्रकर्षाने जाणवते ती म्हणजे येथील ग्रामीण भागातील नवा सधन शेतमालक वर्ग व त्याचे नेतृत्व यांना याबाबत अजून समग्र दृष्टिकोन घेता आलेला नाही. शेतीच्या भांडवलीकरणासाठी लागणारा भांडवल सचय कुठून करणार–शेतीची पुनर्रचना–शेती साधनाचा विकास–पाणी व जमीन यांच्या सबधाबाबत नवा वैज्ञानिक दृष्टिकोन या नव्या सधन शेतमालक वर्गाने आत्मसात केलेला नाही. शेती अर्थशास्त्राबाबत नवा भांडवली दृष्टिकोनही हा वर्ग आत्मसात करू शकलेला नाही. परिणामी त्यातून येणारी नवी शिस्तही या वर्गाकडे नाही.

'रिलिफ वर्क' म्हणून सुरू केलेल्या 'रोहयो' चे कोणत्याही प्रकारचे नियोजन करता आलेले नाही. राज्य रोजगार हमी परिषदेचे अध्यक्ष व या योजनेला तात्त्विक अधिष्ठान देणारे वि. स. पागे याची 'रोहयो' बाबतची भूमिका भावनेने ओथबलेली, गहिवरलेली, भूतदयावादी आहे. आपल्या भूमिकेत श्री. पागेंनी बेकारी-निर्मूलनाच्या कार्यक्रमाला यापूर्वी शासनाने कधी अग्रक्रम दिला नव्हता हे मान्य केले आहे पण नवा बेकारी निर्मूलनाचा मार्ग कोणता? प्रस्थापित आर्थिक–राजकीय धोरणात कोणते आमूलाग्र बदल केले पाहिजेत? अग्रक्रमाचा कार्यक्रम आणि त्याला लागणारे भांडवल मात्र करातून दरवर्षी फक्त ५० ते १०० कोटी रुपये जमवायचे ही विसगती कशी?

श्री. पागे पुढे म्हणतात, केवळ मूठभर लोकाचा विकास होण्याच्या प्रक्रियेत बहुजन समाजाचा हळूहळू बळी जात आहे व शेवटी म्हणतात, सर्वांना काम मिळो, दाम मिळो– आणि आपला भारत समृद्ध होवो. समाज सुखी होवो एवढीच प्रार्थना!

'रोहयो' च्या आतापर्यंतच्या कार्यक्रमातून काम व दाम जरी १२ लाख मजुराना मिळाले असले तरी त्यातून निर्माण झालेल्या सामाजिक मालमत्तेचा सर्वात जास्त फायदा मध्यम शेतकरी व सधन शेतमालक वर्गांना झाला आहे. यातून कुणाचा भारत समृद्ध होत आहे? मूठभराकडून केवळ नगण्य कर घेऊन बहुजन समाजाचा बळी जाण्याचा वेग थोडा फार कमी करता येईल. तो थांबविणे केवळ नशीब वा देवाच्याच हातात आहे असे मानायचे का?

राज्य चालतेय ते केवळ कोणाची सदिच्छा म्हणून नाही; तर या शासनाची व शासक वर्गाची काही मूलभूत धोरणे आहेत त्यांची दिशा ठरलीय. वाद आहे तो कसा प्रवास करायचा याविषयी. या प्रवासात 'रोहयो' किंवा अन्य योजना बहुसंख्य जनतेचे मूलभूत प्रश्न सोडवू शकणार नाहीत.

'रोहयो' राबवणारी नोकर यंत्रणा आपल्या नेहमीच्या बेजबाबदार–अकार्यक्षम पद्धतीनेच वावरतेय. करोडो रुपयाचा भ्रष्टाचार झालेला आहे. होत आहे 'दुष्काळ व रोहयो' त्याना भ्रष्टाचारासाठी राखीव कुरणच वाटतेय! पण येथील शासन त्यावर कोणतीही परिणामकारक योजना सुचवू शकलेले नाही. १९७८–८० साली सुरू असलेली 'काधायो' परदेशाकडून मिळणारा गहू बंद होताच बद केली गेली. 'रोहयो' तून निर्माण झालेल्या सामाजिक मालमत्तेतून जे विक्रमी धान्योत्पादन दरवर्षी निर्माण होत आहे, त्यातून गव्हा-

सारखे धान्यही या मजुरांसाठी मिळू नये– यातून शासनाला मजुरांच्या वाढत्या, संघटित शक्तीची भीती वाटू लागल्याचे हे लक्षण आहे.

तर दुसरीकडे आजची रो. हृ. कामगार-शेतमजुरांची चळवळ येथील व्यवस्थेविरोधी, समग्र क्रांतिवादी दृष्टिकोन घेऊन संघर्ष पुकारील असेही वाटत नाही. शासनाच्या या तथाकथित उदारमतवादी धोरणांच्या चौकटीत ही चळवळ अडकू पहाते आहे.

ग्रामीण भागातील लाखो मजुरांना 'रोहयो' वर जी तुटपुंजी मजुरी मिळते ती शासनाने गावोगाव परवानाधारक दारूची दुकाने उघडून परत आपल्याकडे घेतली आहे. तर या योजनेतील अनियमितपणा व वेळेवर पगार न होणे; परिणामी गावोगाव सावकारी जोरात सुरू झाली आहे. स्वस्त धान्य दुकाने उघडली गेली. पण जीवनावश्यक वस्तूंचे वेळेवर, योग्य व पुरसे वाटप न झाल्याने खाजगी दुकानदारांचा धंदा तेजीत आला आहे. महागाई तर प्रचंड प्रमाणात झाली आहे.

'रोहयो' वर काम करणाऱ्या एकुण मजुरांमध्ये ४० ते ४५ टक्के मागासवर्गीय व ३७ ते ५२ टक्के महिला मजूर आहेत. यांनी भर उन्हात राबून जी सामाजिक मालमत्ता (Community Assets) निर्माण केलीय, तिने अजून स्त्रियांसाठी साधे संडास, बिन धुराच्या चुली व दलितांसाठी एकत्र पाणवठे निर्माण केलेले नाहीत. विहिरीवर मोटार बसविलेली नाही. त्यांच्या कमाल जमीन धारणा कायद्याखाली मिळालेल्या खडकाळ, पडिक व खराब जमिनींचे उत्पादन काही वाढलेले नाही. उलट या जमिनी परत सधन शेतमालकांकडे गहाण पडताहेत. केंद्रित होताहेत.

या सामाजिक मालमत्तेचे समान वाटप करण्याची वेळ आली आहे.

वरिष्ठ अधिकाऱ्याला दाखविण्याचा निव्वळ दृष्टिकोन समोर ठेवून ज्या पद्धतीने कार्यक्रमांची नीलप्रत (Blue Print) तयार करण्यात येत आहे ती पाहिली की, या नोकरशाही–सधन शेतमालक वर्ग व सत्ताधारी पक्ष यांची बनवेगिरी कळू शकते. याही नीलप्रतीतील कामे बऱ्याच ठिकाणी संपत आलेली आहेत. नवी कामे कोणती घेणार हा प्रश्न समोर आ वासून उभा ठाकलेला आहे

राज्यघटनेच्या कलम ४१ मधील मार्गदर्शक तत्त्वानुसार महाराष्ट्रातील माणसाला कामाचा हक्क प्राप्त झाला आहे. पण 'मालमत्ता धारण करण्याचा मूठभरांसाठीचा मूलभूत हक्क' ज्या घटनेत आहे तेथे 'कामाचा मूलभूत हक्क' कधी प्रस्थापित होणार आहे ?

जमिनीचे फेरवाटप, पाण्याचे राष्ट्रीयीकरण, पीक पद्धतीत आमूलाग्र बदल, मोठ्या प्रकल्पांना बंदी व छोटे प्रकल्प उभारणी, सामूहिक पद्धतीने शेती, शेतीला पूरक ग्रामीण व्यवसाय–उद्योग, व खाजगी शेतीवरील मजूर आणि 'रोहयो' यांचा संबंध प्रस्थापित करणे यासाठी नव्या समतावादी वैज्ञानिक दृष्टिकोनाची गरज आहे. भूतदयावादी भूमिकेतून येथील क्रांतिकारी जाणीव वाढू न देणारी व मूठभर वरिष्ठ जातीय सधन शेतमालक आणि भांडवलदारांची खाजगी मालमत्ता वाढत आहे, यातून 'भीक देण्याची वृत्ती' जोपासली जाते. भीक देणारी व घेऊ पहाणारी व्यवस्था नष्ट करण्यासाठीची प्रेरणा यातून कधीच निर्माण होत नसते. या वृत्तीच्या 'रोहयो' च्या श्री. पागेकृत शासकीय भूमिकेची व त्यामागील तत्त्वज्ञानाची लाखो मजुरांसमोर जाहीर चिरफाड करण्याची ऐतिहासिक गरज निर्माण झालीय. अन्यथा समग्र क्रांतिवादी भूमिकेच्या अभावी या कष्टकरी–दलित मजूरांच्या प्रचंड शक्तीचा वापर उद्याच्या 'हरित औद्योगिक भारता' साठी भांडवली शिस्त असलेली, प्रशिक्षित अकुशल मजुरांची फौज म्हणून होईल व या वर्गातील क्रांतिकारक अंकुर खुडून टाकण्याचे काम हे शासन करील यात शंका नाही. □


या संघर्षातील माझे सर्वोच्च ध्येय ना गुलामी प्रथेला अभय देणे आहे ना तिचे उच्चाटन करणे आहे. ते आहे देशाची अखंडता अबाधित ठेवणे. जर एकाही गुलामाला मुक्त न करता मी देशाची अखंडता राखू शकलो तर ते मी करेन. जर काही गुलामांची मुक्तता केल्याने आणि काहींना तसेच ठेवून देश अखंड ठेवता आला, तर ते मी करेन मी गुलामी प्रथेबाबत वा काळ्या वंशाच्या लोकांबाबत जे करतो ते देशाची अखंडता कायम रहावी यासाठीच करतो आणि त्याला विरोध करतो तो यासाठी की त्यामुळे देश अखंड रहायला साहाय्य होणार असते – **लिंकन**

**देशाचे विच्छेदन हेच पाप मानणाऱ्या**
**सर्वात महान राजकीय नेत्याची**
**संपूर्ण ओळख करून देणारा ग्रंथ.**

अब्राहम लिंकन

**फाळणी टाळणारा महापुरुष**




वि.ग.कानिटकर

**फाळणी एकदा झाली**
**पुनः होणार नाही ह्याची शाश्वती वाटावी**
**अशी परिस्थिती नाही.**
**प्रत्येकाने अभ्यासायला हवी अशी**
**लिंकनची राजकीय कहाणी.**

**भरपूर छायाचित्रांसह प्रकाशित होत असलेली**
**पहिली डिलक्स आवृत्ती.**
**मोठा क्राऊन आकार**
**पृष्ठे : सुमारे ४००**

**राजहंस प्रकाशन** १०२५ सदाशिव पेठ, पुणे. ४११ ०३०



# वर्गीय–जनसंघटनांचे व्यापक व्यासपीठ हाच कॉंग्रेस व्यवस्थेला पर्याय

कॉम्रेड चंद्रगुप्त चौधरी

दादा गेले व निलंगेकर आले या घटनेतील नाटय केव्हाच संपले असून, राज्याचा गाडा तेच जुने लोक त्याच जुन्या चाकोरीत हाकत आहेत. दोन महिन्यांपूर्वी जेव्हा हा खांदेपालट होत होता, तेव्हा काहीजण याला दादांच्या मुत्सद्दगिरीचा विजय म्हणत होते. त्यांच्या मते दादांनी राजीनामा देऊन एका दगडात अनेक पक्षी मारले. आपल्या जागी आपल्या मनाजोगा मुख्यमंत्री बसविला. मनाजोगे मंत्रिमंडळ कायम केले. (विलासराव देशमुखांना वगळण्यामुळे अधिकच मनाजोगे झालेले.) शरद पवारांच्या महत्त्वाकांक्षेला परिणामकारक खो घातला व महत्त्वाचे म्हणजे मुंबईच्या प्रश्नावर केलेल्या विधानांमुळे धूसर झालेली आपली प्रतिमा केंद्राविरुद्ध महाराष्ट्राच्या अस्मितेचा रक्षण करणारा नेता म्हणून पुन्हा उजळून घेतली.

इतर काहींच्या मते दादांच्या चाहत्यांचे हे स्वप्नरंजन आहे. खरे तर केंद्राने दादांना दिल्लीला बोलावून परप्रांतीयांना मुंबई बंद करण्याच्या त्यांच्या वक्तव्याबद्दल त्यांची भरपूर हजेरी घेतली. राजीव गांधींना ते भेटू इच्छित असताना ती भेट होऊ दिली नाही. त्यामुळे अपमानित झालेल्या दादांनी जेव्हा राजीनामा दिला, तेव्हा पंतप्रधान पुणे मुंबईतच्या विविध कार्यक्रमाच्या निमित्ताने दिवसभर त्यांच्या सोबत असताना त्यांनी एका शब्दानेही तो राजीनामा परत घेण्याविषयी सांगितले नाही तर, उलट ताबडतोब नव्या नेत्याच्या निवडीची प्रक्रिया सुरू केली. अर्थात ही निवड दादांच्या इच्छेप्रमाणे झाली हे खरे; परंतु याचा अर्थ एवढाच की, केंद्राला सध्या हे भांडण घ्यायचे नाही. त्यांच्यासमोर पंजाब, आसाम गुजरातचे प्रश्न अग्रक्रमाने आहेत. ते प्रश्न एकदा मार्गी लागले की, त्यांचे लक्ष महाराष्ट्राकडे वळेल. महाराष्ट्राच्या नेतृत्वाला तेवढी उसंत मिळाली आहे एवढेच. दादाही हे ओळखून आहेत.

हे जे नाटय घडून आले त्याने केंद्र व महाराष्ट्राच्या नेतृत्वात असलेली दरी पुनः उघड झाली. ही दरी आजची नाही. १९८० ते १९८५ या पाच वर्षांच्या काळात विधानसभेत कांग्रेसचे निर्विवाद बहुमत असताना व बाहेर कोणताच मोठा लोकप्रक्षोभ नसताना, महाराष्ट्रात चारचार वेळेस मुख्यमंत्री बदलले गेले. कशासाठी ? यावरून एक निष्कर्ष तर स्पष्टच आहे की, केंद्राने महाराष्ट्रात कॉंग्रेस पक्षाला बहुमत मिळाले एवढ्यावर समाधान मानलेले नाही, तर त्याने या पक्षाचा नेता कोण असावा व कोण नसावा याबद्दल सतत विशेष interest दाखविला आहे, आग्रह धरला आहे. तर याउलट महाराष्ट्र कॉंग्रेसचा एक प्रभावी गट केंद्राच्या या आग्रहाला न जुमानता हे नेतृत्व आपल्याकडेच रहावे यासाठी सतत प्रयत्नशील राहिला आहे. सकृतदर्शनी हे सत्तेचे भांडण आहे; परंतु हे वरवरचे पाहणे झाले. खरा प्रश्न आहे या सत्तासंघर्षाच्या मुळाशी असलेल्या हितसंबंधाचा व शक्तींचा ! तसे पाहिले तर सर्व राज्यांचा केंद्राशी काही समान प्रश्नांसाठी झगडा आहे. ते सर्व प्रश्न सरकारिया कमिशनच्या विचाराधीन आहेत. याशिवाय जेथे विरोधी पक्षांची सरकारे आहेत, तेथे ते या ना त्या प्रश्नावर केंद्राकडे आग्रह धरत असतात; परंतु केंद्रशासित राज्यांची साधारणतः अशी परंपरा नाही. या पार्श्वभूमीवर स. का. पाटलांच्या काळापासून महाराष्ट्राचे कांग्रेसचे नेते यशवंतराव

चव्हाण, वसंतराव नाईक व आता वसंतदादा संधी मिळताच कशाच्या बळावर केंद्राला आव्हान देत आले? सदोबांचे आव्हान नेहरूंना होते. लोकसभेच्या निवडणुकीत विजयी झाल्यानंतर 'I am going to Delhi and some tables are going to be overturned' (मी आता दिल्लीला चाललो आहे व काही उलथापालथ करणार आहे!) अशी त्यांची दर्पोक्ती! तर यशवंतरावांनी संरक्षणमंत्री होऊन दिल्लीला जाताना पंडितजींचे परराष्ट्रधोरण बदलण्याच्या आविर्भावाने केलेले शनवारवाड्यासमोरचे भाषण! १९६९ च्या राष्ट्राध्यक्षाच्या निवडणुकीत वसंतराव नाईकांची इंदिरा गांधीचे 'ऑपरेशन' करण्याची कुत्सित भाषा! व आता दादांचा कॉम्प्युटर कपूविरोधी रोष! सदोबा पाटील ते वसंतदादा! दोन वेगळ्या राजकीय परिस्थितीत वावरणारे हे राजकारणी. या काळात महाराष्ट्राचे चित्र बदलले!

सदोबा पाटील मुंबईच्या भांडवलदाराचे विश्वासू प्रवक्ते होते, तर नंतरचे महाराष्ट्रीय नेतृत्व महाराष्ट्राच्या ग्रामीण भांडवलदार वर्गाच्या भावना व्यक्त करत आहे. महाराष्ट्राच्या राजकारणात ह्या दोन प्रबळ शक्ती आहेत. त्यांचे परस्पर संबंध व त्यांचे व केंद्राचे संबंध यांच्या भोवती गेली ३० वर्षे सत्तेचे राजकारण खेळले गेले आहे.

स्वातंत्र्यानंतर देशाने विकासाचा जो मार्ग चोखाळला, त्याला नावे कोणतीही दिली गेली असो, (मिश्र अर्थव्यवस्था, समाजवादी समाजरचना वगैरे) त्याद्वारे या देशात भांडवलशाहीची उभारणी झाली आहे. ह्या भांडवलशाही अर्थव्यवस्थेने शहरी, ग्रामीण सारे क्षेत्र व्यापले आहे. महाराष्ट्राच्या ग्रामीण भागात भांडवली विकासाला गतिरोध कमी होतो. तुरळक भागात सरंजामी अवशेष रयतवारी प्रथा, सावकारशाही विरुद्ध बंड करण्याची परंपरा असलेला व शिवाजीमहाराजांपासून ते ज्योतिबा फुलेपर्यंतचा स्वाभिमानाचा वारसा घेतलेला शेतकरी! कुळकायद्याने लाखोंचे शोषण कमी केले तर लाखोंना जमिनीवरून हुसकावले. यातून दोन स्वतंत्र वर्ग जन्माला आले. एक जमिनीचा मालक शेतकरी व दुसरा केवळ श्रमाचा मालक असलेला ग्रामीण मजूर! यातूनच पुढे महाराष्ट्राच्या ज्या थोड्या भागात पाटाचे पाणी आले त्या भागात बागायतदार शेतकऱ्यांचा वर्ग उदयास आला. तसा तो पंजाब, आंध्र, गुजरात व इतर राज्यातही जन्माला आला. महाराष्ट्राचे वैशिष्टय हे की त्याने भांडवली शेतीच्या जोडीला औद्योगिक क्षेत्रात, विशेषतः साखर कारखानदारीत प्रवेश केला. सहकाराचा आधार घेऊन त्याने आपल्या औद्योगिकरणासाठी वित्तीय संस्थांचे भांडवल मिळविले व बहुचर्चित कृषी औद्योगिक अर्थरचना निर्माण केली व त्याबरोबर ग्रामीण भागात भांडवल निर्मितीला प्रचंड वेग आला. याला मोकळी वाट करून द्यायची तर राज्यसत्ता हातात पाहिजे. महाराष्ट्र राज्य निर्मितीने ती संधी मिळवून दिली व तेव्हापासून या वर्गाची घोडदौड सुरू आहे – आर्थिक व राजकीय क्षेत्रात!

## ग्रामीण विकासाचा चुराडा

काँग्रेसमध्ये सत्तास्थानी असलेल्या या वर्गाने सहकारी क्षेत्राचा विस्तार करून व ग्रामपंचायतीपासून ते जिल्हा परिषदापर्यंत स्थानिक स्वराज्याचे जाळे विणून गेली २५ वर्षे आपली सत्ता टिकविली आहे. ज्या सर्वसामान्य शेतकरी वर्गाच्या पाठिंब्यावर ही सत्ता उभी आहे त्या शेतकऱ्यांचे हितसंबंध व केंद्राचे औद्योगिक व व्यापारी भांडवलदाराचे हितसंबंध जपण्याचे धोरण यात अनेक अंतर्विरोध होते व आहेत. कारखानदाराच्या हितासाठी शेतीमालाचे भाव खालच्या पातळीवर ठेवण्याची सरकारची कायम भूमिका! भांडवलदार वर्गावर पडणारा प्रत्यक्ष कराचा बोजा कमी करत करत सर्वसामान्य जनता, मुख्यत्वे शेतकरी वर्गावर, अप्रत्यक्ष कराचे ओझे सारखे वाढवीत जाण्याचे धोरण! शेतीला आवश्यक वस्तूंचे वाढते भाव! वीज, पाणी इत्यादीवर वापरात व एकंदर अर्थसंकल्पात शेती व्यवसायास दुय्यम स्थान! बँकांचे कर्ज व व्याज धोरणही भांडवलदाराच्या सोयीचे! बाजारपेठेवर व्यापाऱ्यांची पकड! ही व अशी धोरणे सर्वसामान्य शेतकरी वर्गाच्या विकासाच्या सर्व स्वप्नांचा चुराडा करणारी धोरणे होती.

महाराष्ट्र काँग्रेसच्या नेतृत्वाला 'आम्ही या प्रश्नाच्या सोडवणुकीसाठी खरेदी-विक्री संघ कायम केले, शासनामार्फत धान्य खरेदी सुरू केली. कापूस एकाधिकार योजना आणली, केंद्राला कांदा इत्यादी काही वस्तू ठरलेल्या भावात खरेदी करण्यासाठी यंत्रणा निर्माण करण्यास भाग पाडले' इत्यादी गोष्टींचे श्रेय घेता येईल. नाही असे नाही. परंतु ते आंशिक सत्य असेल यातील बऱ्याच गोष्टींना उदा.: कापूस एकाधिकार खरेदी योजना, नाफेड इत्यादीला खरे पाहिले तर शेतकऱ्यांचे प्रचंड आंदोलन व त्यांनी केलेला त्यागच कारणीभूत आहे. या सवलती मिळविण्याचे श्रेय त्या लढाऊ जनतेचे आहे.

मुख्य प्रश्न वेगळाच आहे या सर्व सवलती म्हणजे प्रस्थापित व्यवस्थेत होणारे शोषण सौम्य करण्याचे प्रकार होय ती व्यवस्थाच नष्ट व्हावी, दलाल व अडत्यांचा वर्गच नाहीसा व्हावा, कारखानदारांचे बाजारपेठेवरचे वर्चस्व नष्ट व्हावे हा प्रश्न शेतकऱ्यांचे कैवारी व प्रतिनिधी म्हणविणाऱ्या या नेतृत्वाने यशवंतरावांच्या काळापासून आजच्या काळापर्यंत कधी उपस्थितच केला नाही. या प्रश्नावर भांडवलदार वर्गाशी वा केंद्राशी टक्कर घेतली नाही. एवढेच काय महाराष्ट्र राज्याच्या अर्थसंकल्पालाही कधी तशी दिशा दिली नाही. नसता पंचवीस वर्षांच्या यांच्या सत्तेनंतर महाराष्ट्रात जिल्हा व तालुका पातळीपर्यंत जागा, शेड्स, वीज, पाणी, रस्ते इत्यादी सर्व सोयींनी युक्त औद्योगिक वसाहती भांडवलदारांच्या सोईसाठी उभारत असताना त्यांनी महाराष्ट्राच्या लक्षावधी ग्रामीण जनतेला पिण्याच्या पाण्यासाठी आक्रोश करायला लावला नसता! तीस टक्के जमिनीची सिंचन क्षमता असताना २५ वर्षांत ती केवळ बारा टक्केपर्यंत आणण्यात समाधान मानले नसते. दुष्काळी पट्टा वाळवंटानजिकच्या प्रदेशाप्रमाणे भयानक गतीने पसरत असलेला उघड्या डोळ्याने पाहिला नसता!

मग या नेतृत्वाने काय केले? पहिली गोष्ट: या नेतृत्वाने जसे वर्गशत्रूला शत्रू म्हणून पाहिले नाही, तसे त्याने स्वकीयांना स्वकीय म्हणूनही लेखले नाही साखर उद्योग हे यांचे मुख्य शक्तिस्थान त्याचा कणा म्हणजे एक-दीड एकरचा मालक ऊस उत्पादक शेतकरी! त्याच्या उसाला योग्य भाव देणे यांच्या हाती. केंद्राने भाव ठरविले तर

भाडणे, मार्ग काढणे यांचे कर्तव्य. परंतु जेथे ३०० रु. भाव हवा तेथे गेली दोन वर्षे यांनी भाव दिला १५०–१८० रुपये ! मग उसाचे क्षेत्र कमी होते. एका वर्षात साखरेचे उत्पादन ३५ टक्के घटते. साखरेचे भाव आस्मानाला भिडतात ! या दुष्ट चक्राची याना पर्वा नाही. निरनिराळ्या धद्यात किती काळा पैसा निर्माण होतो याचा नुकताच एक पाहणीरिपोर्ट प्रसिद्ध झाला आहे. त्यात साखर उद्योगात १९८३ साली १२८ कोटी रुपये व १९८४ साली १८० कोटी रुपये काळा पैसा निर्माण झाला असा तज्ज्ञाचा अदाज आहे.

ज्या वेगवेगळ्या मार्गाने हा काळा पैसा निर्माण होतो त्यात शेतकऱ्याची लुबाडणूक हेही एक कारण त्यानी दाखविले आहे. काही वर्षांपूर्वी ऑनमनीचे प्रकरण महाराष्ट्रभर गाजले होते. असा हा भरभराटीचा उद्योग ! त्यालाही 'आजारी' केला– अनियंत्रित भ्रष्टाचाराने ! त्याचे बळी ठरलेत ऊस उत्पादक शेतकरी व कारखान्याचे कामगार ! या भ्रष्टाचाराने सहकारी क्षेत्रातील सर्व उद्योगांना ग्रासले आहे. सपत्तीतून सत्ता व सत्तेद्वारे वाढती सपत्ती असा या वर्गाचा २५ वर्षांचा प्रवास आहे. या प्रवासात त्याने गरीब शेतकऱ्यावर नवीन प्रकारची सावकारी लादली. सरजामी पद्धतीचे, दमबाजीचे जातिनिष्ठ वर्चस्व लादले. त्यांच्या सुपीक जमिनी हडप करण्याचे कट रचले. यातून मग एखादे गोपाळपूर–खामगावसारखे प्रकरण घडते व गावातील सघर्षावर अंधाऱ्या आकाशात वीज चमकावी तसा प्रकाशझोत पडतो.

## ज्युनिअर पार्टनर

ह्याच धोरणाची दुसरी बाजू म्हणून या नेतृत्वाने राज्यातील भाडवलदार वर्गाशी जुळवून घेतले आहे. ज्युनिअर पार्टनर म्हणून भाडवलदार वर्गाला जे अभय व सरक्षण पाहिजे ते या वर्गाने आपल्या कृतीने भरपूर दिले आहे. भाडवलदार वर्गाला खरी भीती कामगार वर्गाची ! वसतराव नाईकांच्या जमान्यात त्यांनी शिवसेनेला हाताशी धरून कामगार चळवळीचे लढाऊ नेतृत्व खच्ची करण्याची मोठी कामगिरी पार पाडली. वसतदादानी तर आपल्या मेव्हण्यानाच इटकचे पुढारी बनविले आहे शरद पवारानीही आपल्या कारकिर्दीत कामगारांवर गोळीबार केलाच होता. शेती मालाला योग्य भाव मिळावेत ही चळवळ मोडून काढण्यासाठी या नेतृत्वाने दडपशाहीत कसूर केलेली नाही. राहिला प्रश्न बाँबेचे मुबई करण्याचा, मुबई शहरात येणारा लोढा थोपविण्याचा, मराठी माणसाची छाप मुबईवर असली पाहिजे या प्रचाराचा असा प्रचार शिवसेनेमार्फत झाला तर दोन गोष्टी साधतात मराठी माणसाचे मत बाधून ठेवता येते व मुबईच्या भाडवलदारावर दडपणही ठेवता येते ! या दडपणाचे कित्येक फायदे आहेत. त्यांच्याकडून निवडणुकीला भरपूर फड घेता येतो, त्यांच्याशी काही धद्यामध्ये भागीदारी करता येते किमान एजन्स्या घेता येतात अजून एक क्षेत्र आहे जेथे या नेतृत्वाचे व मुबईच्या भाडवलदार वर्गाच्या एका विशिष्ट विभागाचे–बिल्डर्सचे घनिष्ट नाते जाणवते वसंतराव नाईकानी बॅकबेच्या जमिनीचा सौदा केला. अंतुलेंचे व बिल्डर्सचे नाते जगजाहीर झाले व दादा जाता जाता घारावीची शभर कोटी रुपयाची २२० एकर जमीन बिल्डर्सला देऊन मोकळे झाले. ही जमीन झोपडपट्टीवासीयांच्या पुनर्वसनासाठी राखीव ठेवली होती. दादानी तो प्लॅन बदलायला लावला. हे दादा राजीनामा दिल्यानंतर मुबईत कुठे रहावे या विवचनेत होते म्हणतात !

जोपर्यंत केंद्राशी सबंधाचा प्रश्न आहे त्याची दिशा इदिरा गाधीनी १९६९ च्या कॉंग्रेस विभाजनानतर ठरवून दिलेली आहे. व त्याचे प्रमुख सूत्र आहे कोणालाही राज्यात बलवान सुभेदार निर्माण होऊ न देण्याचे ! महाराष्ट्राच्या मराठा कॉंग्रेस नेतृत्वाला स्वतःचा सामाजिक पाया आहे या नेतृत्वाने विभाजनाच्या प्रसंगी दुटप्पी भूमिका घेतली होती. कॉंग्रेस श्रेष्ठी ते विसरलेले नाहीत. व म्हणून त्याचा सतत प्रयत्न केंद्रावर अवलबून असणारे व शक्यतो अमराठी, एक पर्यायी नेतृत्व निर्माण करण्याचा राहिला आहे. आपद्धर्म म्हणून दादा मुख्यमंत्री झाले होते. आपद्धर्म म्हणून निलगेकर मुख्यमंत्री आहेत व मुख्यमंत्रिपदाची स्वप्ने पाहणाऱ्या शरद पवारानाही अविश्वासाचे हे पटल दूर सारणे सोपे राहणारे नाही !

केंद्राच्या या सर्वसामान्य धोरणाला महाराष्ट्रापुरती अजून एक बाजू आहे. मुबईच्या भाडवलदार वर्गावर रास्त अकुश ठेवण्याची. देशाच्या भांडवली अर्थव्यवस्थेचे केंद्र आणि फडाचा मुख्य स्रोत म्हणून मुबईचे अनन्यसाधारण महत्व आहे. नेहरू सरदाराच्या जमान्यात या तिजोरीच्या चाव्या सदोबा पाटलाच्या हातात होत्या. १९६९ नतर त्या रजनी पटेलाच्या हातात आल्या. आणीबाणीत भाडवलदार वर्गाशी जुळते घेण्याचे जाणीवपूर्वक प्रयत्न झाले. (सपबदी, बोनस मर्यादा इत्यादी) व त्याच्याच जोडीला रजनी पटेलासारख्या मध्यस्थाची गरज संपली. १९८० नतर केंद्राचे विश्वासू म्हणून अतुले याची मुख्यमंत्रिपदी नेमणूक झाली व ते फड जमा करू लागले. आता राजीव गाधींच्या आगमनानंतर व सारा भाडवलदार वर्ग– नानी पालखीवाला समवेत–त्याच्यावर फुले उधळीत असताना दिल्लीला कोणाचीच गरज उरली नाही व महाराष्ट्राचा जो कोणी मुख्यमंत्री राहील त्याला मुम्बईत या सदर्भात काहीच लुडबूड करता येणार नाही.

मुबईच्या प्रश्नावर दादाना मिळालेल्या कानपिचक्या, त्याचा राजीनामा संमत करणे व त्याच वेळेस मुरली देवराचा राजीनामा न स्वीकारणे या घटनाना वरील सदर्भ आहे. वसतदादासारख्या जुन्या नेतृत्वाची ही एक प्रकारची शोकांतिकाच आहे येत्या काळात या नेतृत्वामार्फत महाराष्ट्राच्या विकासाच्या दृष्टीने काही भरीव पावले उचलली जातील याची शक्यता आता राहिलेली नाही. गेल्या वर्षी विना अनुदान तत्वावर महाराष्ट्र शासनाने शभरावर अभियांत्रिकी व तांत्रिक शिक्षण देणाऱ्या सस्थाना परवानगी दिली. त्याचे समर्थन करताना दादा म्हणाले होते 'डोनेशनवर चालणाऱ्या या सस्थाचा फायदा श्रीमंताच्या मुलाना होईल असे म्हटले जाते, माझे म्हणणे असे की ज्याना लाभ घेता येतो त्याना घेऊ द्या ना ! त्यांच्या मार्गात का अडथळा आणता ? शासन स्वतःच्या वतीने अशा सस्था उभारू शकत नाही.' आपल्या नाकर्तेपणाची आणि आपल्या वर्गीय दृष्टीकोनाची यापेक्षा स्पष्ट कबुली कोणती असू शकते ?

## असंतोषाची पेरणी

महाराष्ट्राच्या नेतृत्वाच्या अशा सकुचित व स्वार्थी दृष्टिकोनामुळे महाराष्ट्रात पराकोटीची विषमता वाढली आहे. ही विषमता

आर्थिक, सामाजिक व प्रादेशिक सर्व प्रकारची आहे. हरित क्रांतीचा अभिमान बाळगणाऱ्या या महाराष्ट्रात उसाचे पीक वगळल्यास इतर सर्व पिकांच्या दर एकरी उत्पादनात महाराष्ट्राचा नंबर साऱ्या देशात खालचा आहे. बागायतदारांच्या या भूमीत शेतमजुरांच्या संख्येत गेल्या दशकात झालेल्या वाढीने उच्चांक गाठला आहे. एकंदर ग्रामीण समाजात शेतमजुरांचे ४० टक्केपेक्षा जास्त प्रमाण असलेले सर्वात अधिक जिल्हे महाराष्ट्रात आहेत. याचाच एक दृष्य परिणाम म्हणून गेल्या दशकात खेड्याकडून शहरांकडे जाण्याचा ओघ–त्याची गती–आहे. प्रादेशिक असमतोल वाढला आहे. दलित, आदिवासी व भटक्या विमुक्त जातींविरुद्धचा हिंसाचार या काळात वाढला आहे. जातीय दंगली वाढल्या आहेत. सुशिक्षितांच्या व अशिक्षितांच्या बेकारीने स्फोटक रूप धारण केले आहे.

या व्यापक असंतोषाने दोन परस्पर विरोधी प्रवाहांना जन्म दिला आहे. एक प्रवाह आहे ग्रामीण श्रमिकांचा–भूमिहीन व अल्पभूधारक–जो १९७२–७३ च्या दुष्काळात होरपळून निघाला, कामाशिवाय ज्याला जगणे अशक्य झाले व म्हणून जो लढायला शिकला, ज्याच्या चिकाटीच्या संघर्षाने रोजगार हमी योजनेला जन्म दिला, कामाचा हक्क दिला व जो आज तो हक्क अमलात आणण्यासाठी व कायद्याने ठरवून दिलेले वेतन पदरात पाडण्यासाठी भ्रष्ट व निर्ढावलेल्या शासनयंत्रणेशी महाराष्ट्राच्या कानाकोपऱ्यात एकजुटीने झगडतो आहे, जाती–धर्माची कुंपणे बाजूला सारून! याच्याच जोडीला सामाजिक समतेचा झेंडा घेऊन लढणारा एक प्रवाह आहे. दलितांचा, आदिवासींचा, भटक्या व विमुक्त जातींचा! अन्यायाविरुद्ध आवाज उठविणारा, आपल्या अस्मितेला प्राणापलीकडे जपणारा, माणुसकीचे हक्क सांगणारा! याच्याचबरोबर आहे स्त्रीमुक्तीची चळवळ – दलितांच्या, श्रमिकांच्या लढ्यात अग्रभागी व शिवाय आपले विशेष प्रश्न मांडणारी!

दुसरा प्रवाह आहे जो धर्माच्या, जातीच्या प्रांताच्या–भाषेच्या नावाने माणसामाणसामध्ये असणाऱ्या भेदांना महत्त्व देतो. द्वेष निर्माण करतो व लोकांना एक दुसऱ्याच्या विरुद्ध हिंसाचारास प्रवृत्त करून त्यांची एकजूट नष्ट करतो. त्यांची शक्ती छिन्न–विच्छिन्न करतो. अलिकडच्या काळात शिवसेना, मराठा महासंघ, पतितपावनसारख्या संघटनांनी समाजामध्ये विशेषतः तरुणांमध्ये हे विष पेरून त्यांचा समान शत्रूविरुद्धचा लढा कमजोर केला आहे

## विरोधक प्रभावशून्य


महाराष्ट्रामध्ये सत्ताधारी कॉंग्रेसपक्षाच्या विरोधात राजकीय क्षेत्रात जे पक्ष उभे राहिलेत त्यापैकी काहींचे व सत्ताधारी पक्षातील काहींचे ह्या फुटीर संघटनांशी संबंध राहिले आहेत व त्यामुळे या संघटनांना प्रतिष्ठा व बळ मिळत गेले आहे. शिवाय काही विरोधी पक्षांचे राजकारण व आर्थिक धोरण सत्ताधारी पक्षापेक्षा विशेष निराळे नाही. त्यामुळे ते आजची कोंडी फोडू शकतील अशी शक्यता नाही. शरद पवारांच्या समाजवादी कॉंग्रेसपक्षाने या निवडणुकीत बरेच यश संपादन केले. तरुणांना या पक्षाचे विशेष आकर्षण होते; परंतु शरद पवारांनी कॉंग्रेस संस्कृतीशी आपली बांधिलकी सांगितल्यापासून त्याचे तेज कमी झाले आहे. कारण कॉंग्रेससंस्कृतीचा अर्थ त्याचे समर्थक काहीही लावो, आज सर्वसामान्य जनतेच्या दृष्टीने ती सत्तालोभी व स्वार्थसाधू संस्कृतीच आहे. शरद पवारांचा कॉंग्रेस प्रवेश लांबणीवर पडलेला असला व नजिकच्या भविष्यात त्याची शक्यता नसली तरी शरद पवारांजवळ कॉंग्रेस शासनाच्या आजच्या धोरणापेक्षा देण्यासारखे वेगळे काही नाही. त्यांच्याकडून गरिबी, बेकारी, विषमता या मूलभूत समस्यांचे कोणतेच उत्तर नाही. दोन्ही कम्युनिस्ट पक्ष, शे. का. पक्ष व इतर डाव्या संघटना यांच्याजवळ स्पष्ट दृष्टिकोन असला तरी त्यांची शक्ती आज फार मर्यादित आहे व तीही विभागलेली आहे. परिवर्तनाची प्रमुख शक्ती खेड्यातील मजूर व गरीब शेतकरी. त्यांच्या सोळा संघटनांनी एकत्र येऊन एक समन्वय समिती कायम केली आहे शिवाय काही बाहेर आहेत व जे एकत्र आहेत त्यांचे निवडणूक विषयक दृष्टिकोन भिन्न होते. दलितांच्या संघटनांची मोजदाद करणे कठीण. नामांतर सत्याग्रहाच्या वेळेस येरवडा तुरुंगात अशा संघटनांची पन्नासावर नावे नोंदवली गेली होती. त्या प्रश्नावर झालेली एकजूट वगळता समतावादी शक्तींचे एकही समान व्यासपीठ नाही. स्त्रियांच्या संघटनांचेही नाही. कामगार क्षेत्रात एकाच धंद्यात व कारखान्यातही युनियन्सची गर्दी असते व त्यांच्यात जीवघेण्या मारामाऱ्या होतात. विद्यार्थी चळवळींचेही हेच स्वरूप आहे अशा परिस्थितीत पुढची वाट कठीण आहे.

पहिले आवश्यक पाऊल वर्गीय संघटनांची एकजूट हे आहे. ग्रामीण श्रमिकांनी त्या दिशेने पुढाकार घेतला आहे. कामगार व विद्यार्थी संघटनांच्याही अशा समन्वय समित्या आहेत. त्या अधिक सक्रिय व्हायला पाहिजेत.त्याच प्रकारे शेतकऱ्यांच्या चळवळीचे सूत्रीकरण आवश्यक आहे व शक्य आहे. दुसरे पाऊल परिवर्तनवादी पक्ष–डावे व पुरोगामी पक्ष यांच्यात चळवळीच्या दृष्टीने व राजकारणाच्या दृष्टीने एकवाक्यता निर्माण करणे आहे व तिसरे पाऊल या सर्व जनसंघटना व हे सर्व पुरोगामी पक्ष यांचे एक व्यापक व्यासपीठ आहे.

असे व्यासपीठ जर निर्माण करता आले तर त्याला आजही महाराष्ट्रात मोठा अधिकार प्राप्त होईल. परिस्थितीची ही गरज आहे व म्हणून आज कोणाचे काहीही अभिनिवेश असोत, ते घडणार आहे. परंपरागत आघाड्या या कॉंग्रेसच्या सत्तेला पर्याय बनू शकणार नाही लोकांना समग्र धोरणांना, व्यवस्थेला पर्याय हवा आहे.

□





# परिवर्तनासाठी हिंदुत्व टिकविणे आवश्यक

—प्रदीप रावत

'आज गुजरातमधलं आंदोलन उभं राहिलं ते वेगळ्या कारणासाठी. राखीव जागा ठेवल्या म्हणून हिंदू चिडले व त्यांनी आंदोलन सुरू केलं, असं म्हणता येणार नाही. तसं असतं तर ज्या वेळी राखीव जागा ठेवल्या, हिंदू कोड बिल आलं त्याच वेळी हिंदूंनी नकारात्मक भूमिका घेतली नसती का? पण हिंदूंनी त्याच वेळी दंगली केल्या का? मुस्लिमांसारखा त्यांनी गदारोळ उठवला का? हिंदू समाजाला हे श्रेय तुम्ही द्यायला पाहिजे आपल्याकडच्या दलितांनी याचा विचार करावा. हिंदूंमध्ये प्रागतिक वृत्ती आहे. ती वृत्ती नाही असं मानणं म्हणजे आतापर्यंतचं आमचं प्रबोधन, परिवर्तन, दलितांचा विकास, घटना हे सगळं मातीमोल करण्यासारखं आहे सर्व हिंदू जात अपराधी मानणं, हा दलितांचा पवित्रा बदलला पाहिजे ..' प्रदीप रावत बोलत होता.

पुणे व आसपासच्या परिसरात गाजत असलेल्या पतितपावन संघटनेचा तो माजी प्रमुख आहे कुठे काही 'अनिष्ट' घडत असल्याचं दिसलं की, तिथल्या तिथं ठेचून काढण्याचा या संघटनेतल्या तरुण मुलांचा पवित्रा असतो. कुणाच्या खासगी प्रकरणातही 'समाजावर अनिष्ट परिणाम होऊ नये' म्हणून ते पुढे सरसावतात. समाजवादी, पुरोगामी, दिखाऊ पुरोगामी असले प्रकार त्यांच्या मनोरंजनाचे विषय. गंमतीचा भाग सोडला तरी, इथे (त्यांच्या दृष्टीनं) समाजाला विघातक गोष्टींना जरब बसवणं, आपल्या समाजाला कुणी खिजवत असेल तर त्याचा बंदोबस्त करणं हा व्यवहार्य कार्यक्रम घेऊनच ही संघटना पुढे फोफावली. पण त्याचबरोबर ही तरुण पोरं तात्या–पंतोजींसारखी नाहीत. नवे भौतिक बदल, विज्ञान, तंत्रज्ञान, नवी सामाजिक रचना यासंबंधी त्यांचे विचार अगदी निश्चित नसले तरी आचार आधुनिक आहेत या सर्वांना अजूनही हक्कानं काही सांगू शकणारा प्रदीप रावत या नव्या गटाच्या मानसिकतेला बौद्धिक वळण व आधारही देण्याचं काम करतो. सभा–आंदोलनात अनावर वाटणाऱ्या प्रदीप रावतचं वाचन, त्यावर विचार, मनन अतिशय उत्तम आहे. बुद्धिवाद्यांना पाहिजे असणाऱ्या 'जार्गन्'मध्ये तो बोलू शकतो.

राष्ट्रीय स्वयंसेवक संघाच्या तालमीत तयार झालेल्या व ते ऋण मानणाऱ्या रावतचा ओढा आहे सावरकरी विज्ञानवादाकडे व त्यांच्या परिवर्तनवादाकडे. सावरकरी विचारसरणीत असलेले भौतिकवादी, राष्ट्रवादी परिवर्तनासंबंधीचे त्याचे विचार आहेत एखाद्या समाजाचा विकास होण्यासाठी त्या समाजाचं **अस्तित्व** महत्त्वाचं असतं. तो सामर्थ्यशाली बनणं आवश्यक असतं. त्याचबरोबर त्याचं सांस्कृतिक ऐक्यही आवश्यक आहे ही सावरकरवादी विचारसरणी मांडताना तो हिंदुत्ववाद्यांच्या अनेक जुनाट पूर्वग्रहांबद्दल नापसंती व्यक्त करतो. काळाच्या ओघात त्या जुन्या गोष्टींचं प्रयोजन समजून घेतलं पाहिजे. एकदा तो हसत सांगत होता, 'परवा माझा मित्र ऋग्वेद पाहून भारावून गेला. त्याला मी म्हटलं की, अरे ह्यात काही नाही. आरंभीच्या माणसाला सुचलेल्या हव्या असलेल्या त्या गोष्टी आहेत. अभ्यासासाठी ते ठीक आहे.'

इथं गाईला उपयुक्त पशू म्हणणाऱ्या सावरकरांचा प्रभाव जाणवतो. हिंदू समाज म्हणवून घेतानाच आधुनिक युगात टिकण्यासाठी समर्थ व्हायचं हा एक विचारप्रवाह आहे. त्यासाठी जातीयता, जुन्या रूढी, स्वतःच्या समाजातील दोष सांडायला पाहिजेत. मात्र त्याचबरोबर आपले सांस्कृतिक

'अस्तित्व' टिकवणे आवश्यक वाटते अशा प्रकारचा मूलवाद हा धर्मांध नसतो. तो धर्माधिष्ठित नसून सामाजिक स्वरूपाचा आहे. म्हणून दलितांना सामावून घेण्याच्या विचाराबरोबरच मुस्लिमाच्या बिगर-राष्ट्रीय निष्ठेबद्दल विरोध निर्माण होतो.

आजच्या हिंदुत्ववादी सघटनाबद्दलही प्रदीपची तक्रार आहेच. आपल्या समाजाच अस्तित्व टिकविण्यासाठी प्रगती, नवी दिशा आवश्यक आहे. त्याचा विचारच काहीजण करत नाहीत. ते निष्ठावत, त्यागी वगैरे असतात पण परिवर्तनाची भाषा आपण करायला लागलो की ते म्हणतात—त्याचे विचार थोडे वेगळे आहेत—'

या कवचासमोर आपण निरुत्तर होतो! हे बदलायला हव. आज हिंदुत्ववादी सघटना आदिवासी भागात, इतरत्र काम करतात. मात्र ते मिशनरी किंवा इतराना प्रत्युत्तर म्हणून करतात. Defence mechanism (सरक्षक पवित्रा) मला मान्य नाहीत. आपण स्वतः होऊन एका जाणिवेतून वनवासीकडे जाणार की नाही? स्वतःला सामाजिक परिवर्तनाची किती आच आहे ते महत्त्वाच आहे'

## श्रद्धास्थान ही अस्मिता

मागच्या गौरवशाली इतिहासाच्या आधारावर राष्ट्रवाद उभारावा याचा प्रदीप फारसा पुरस्कार करत नाही, तरी परिवर्तनाच्या लाटेत आपली श्रद्धास्थान, अस्मिता याना धक्का लागू नये अस त्याला वाटत.

**मी म्हटलं, ही श्रद्धास्थानं, गौरवशाली इतिहास हा फक्त आतापर्यंतच्या Privileged class (प्रस्थापित)साठी आहे; पण शोषित वर्गाला हा इतिहास म्हणजे अवमानाची मालिकाच वाटते ना!**

आज दलिताच्या मनातील इतिहासाची कल्पना वेगळी असण साहजिक आहे हे मान्य करून तो म्हणाला, 'दलित नेते आपल्या इतिहासाबद्दल वाटेल तसे बोलतात. यापैकी बराचसा इतिहास आपण (प्रस्थापितानी) आतापर्यंत गृहीत धरलेल्या इतिहासापेक्षा मूल्यापेक्षा वेगळाच असतो. उदाहरणार्थ, रामाविषयी बोलताना ते शबूकाचा उल्लेख करतात. मात्र आपल्या जनजीवनातली रामाची प्रतिमा ही आदर्श मूल्याचीच आहे. शंबूकाला ठार करणारा राम आपल्याला अभिप्रेत नसतो व तसा नव्हताही. हा नंतर उकरून काढलेला इतिहास आता लादला जातो. सामान्याच्या श्रद्धास्थानाला यामुळे धक्का पोचतो. श्रद्धास्थानं म्हणजे अस्मिता (Identity) असतात. त्यावर घाव घालण म्हणजे आता थोडाफार परिवर्तनाला अनुकूल असलेल्या शक्तींचं काम अवघड करण्यासारख आहे मराठवाडा नामातर चळवळीच्या वेळी मी औरंगाबादला दलित नेत्याशी बोललो चर्चा केली मात्र नतर भाषण करताना त्यानी इतिहास, श्रद्धास्थान रामदास—सीतेसारख्या व्यक्ती याच्याविषयी असभ्य भाषा वापरली. त्यापैकी एकजण आता आमदार आहे. त्या वेळी मी गप्प बसलो. नतर त्याना सागितल की मीही असंच तुमच्या आदरणीय व्यक्तीविषयी बोलू शकेन......पण त्यामुळे काही साध्य होणार नाही..'.

**प्रश्न : या प्रकारांमुळे दलितांसंबंधीचा दृष्टिकोन बदलला का? त्याला शत्रुत्वाचं स्वरूप आलं का? विशेषतः राखीव जागांच्या संदर्भात हा प्रश्न महत्त्वाचा ठरतो.**

प्रदीप रावत त्यावर स्पष्ट म्हणाला, राखीव जागाच्या प्रकरणी आपण शुद्ध—स्पष्ट भूमिका घेतली पाहिजे. आमच्या (हिंदुत्ववादी संघटनाच्या) बैठकीतही मी हे सागितल. उगीच रणनीती (strategy) करायला पाहिजे अशा उद्देशाने राखीव जागाच समर्थन नको. राखीव जागाचा सदर्भ हा आपल्या सामाजिक स्थितीशी आहे. त्या चालू रहाव्यात. तुम्हाला बापजाद्याची इस्टेट पाहिजे; पण त्याची देणी मात्र नको हे काय कामाचं? you must pay for their disparity अशी मानसिकता तयार करणं हे आमच कर्तव्य मानतो. आजपर्यंत दलिताची कर्तृत्वशक्ती बधनात अडकली होती. त्याना बरोबरीची संधी देण्यासाठी हा फायदा, ही सवलत देणं आवश्यक आहे'

मात्र अशा मानसिक व सामाजिक परिवर्तनाला इथल्या हिंदू समाजाचं अस्तित्व टिकवणं आवश्यक आहे अस तो आग्रहपूर्वक म्हणाला. हिंदू समाज आहे म्हणूनच भारतात लोकशाही टिकू शकली असं सागताना तो म्हणाला की, 'भारत आणि आफ्रिकेतले देश, अरब देश किंवा लॅटिन अमेरिका घे. हा सर्व भाग नवस्वतत्र आहे. सर्वच समाजांची आर्थिक स्थिती एक आहे मात्र तिथे अस्थिरता, हुकूमशाही, रक्तपात आहे. भारतातच या गोष्टी का नाहीत? अगदी आपल्या बरोबरच वसाहतवादाच्या जोखडातून मुक्त झालेला पाकिस्तान, त्याची काय स्थिती आहे? याचा अर्थच हा की इथल्या समाजात— हिंदू समाजात— मतभेद चालवून घेण्याची किमान सभ्यता आहे. लोकशाहीला आवश्यक असणारी ती बाब आहे.'

मुस्लिम समाजाविषयी सावरकरवादी विचारसरणीचाच प्रदीपनं पुरस्कार केला. या समाजाने आपल्या सर्व निष्ठा बाहेर ठेवल्या. त्यानी आपल्या अल्पसख्यत्वाचे हत्यार केले आहे त्याचा ते लाभ कायम ठेऊ इच्छितात असं तो म्हणाला. यासाठी त्यान हमीद दलवाईंच्या वक्तव्याचा आधार दिला.

मुस्लिम समाजात कितीही शिक्षण वाढलं त्याचा कितीही उच्च शिक्षित, बुद्धिवादी माणूस असला तरी अती तो मुस्लिम म्हणूनच विचार करतो अस तो आग्रहाने म्हणत होता समान नागरी कायद्याला हे मान्यता देत नाहीत, मात्र समान फौजदारी कायदा, इतर कायदे त्याना हवे आहेत असा दाखला त्यान दिला. 'त्याना केवळ लाभ हवेत, इथल्या परिवर्तनात वाटा नको!'

त्यानतर आम्ही फाळणीवर आलो तिथं डॉ बाबासाहेब आबेडकरानी केलेल्या लोकसख्येच्या अदलाबदलीच्या सूचनेकडे प्रदीपने लक्ष वेधले अर्थात हा विषय लाववावा तितका लाबतो. तिथ भावनावश होण्यालाही भरपूर स्थळं आहेत. पुन्हा नेहमीचेच डाव प्रतिडाव खेळावे लागतात. म्हणून तिकडून दुसरीकडे सटकलो. त्याच्या म्हणण्याच तात्पर्य की, मुस्लिम समाज हा परिवर्तनाच्या विरोधी भूमिका घेत आला आहे.

## आधुनिकता हवी

हिंदू बहुसख्याक समाज या आधारावर व आजच्या गरजेनुसारच परिवर्तनाचे मार्ग असावेत अस सागताना तो म्हणाला, 'मुद्दा अस्तित्वाचा आहे. ते टिकविण्यासाठी या स्पर्धात्मक जगात झपाट्यानं औद्योगिक प्रगती साधून नवा वैज्ञानिक दृष्टिकोन निर्माण करावा लागेल

प्रत्यक्ष अंतर्गत व बाह्य आक्रमणाबाबत राष्ट्राची सुस्पष्ट रणनीती ठरवावी लागेल. आणि यासाठी औद्योगिकरणातून निर्माण झालेल्या नव्या सामाजिक व आर्थिक संबंधांची रचना करावी लागेल.'

मात्र, आर्थिक बदलामुळे परिवर्तन होत असतं, क्रांतीसारखे मोठे बदल घडत असतात हेही त्याला मान्य नाही. तो म्हणाला की ब्रिटन, अमेरिका, चीन, रशिया, व्हिएतनाम यापैकी सर्व देशातल्या क्रांत्या या केवळ आर्थिक स्थितीमुळे उद्भवल्या असं म्हणता येणार नाही. त्यासाठी राष्ट्रीयता हा मोठा घटक आहे. परिवर्तनवादी शक्तींनी ही गरज ओळखावी असं तो म्हणतो.

सध्याच्या हिंदुत्ववादी संघटनांकडे बळ आहे, निष्ठाही आहे. मात्र सामाजिक बदल, आधुनिकीकरण यासाठी आवश्यक असलेला खुलेपणा व वैचारिक संघर्षाची तयारी, तसेच आपल्या समाजाचे वास्तव भान त्यांना पाहिजे असा त्याचा आग्रह आहे. पतितपावन संघटनेत अनेक आंतरजातीय विवाह झाले, हुंडा न घेता विवाह घडवून आणले असं सांगताना त्यानं स्वतःच्या घरातीलच उदाहरण दिले. 'आज धुळ्याकडे संघ विचाराचे एक कार्यकर्ते कामाला जाऊन नुसते भिडले आहेत. पण त्याचा कधी गाजावाजा त्यांनी केला नाही. ही माणसं अबोलपणे काम करत असतात.' असं सद्गदित होऊन तो बोलत होता. अर्थात् हे सांगतानाच भारतीय जनता पक्षाच्या कांग्रेसवादी धोरणाला त्यानं विरोध दर्शवला.

**मी म्हटलं, इथल्या डाव्या पुरोगामी, समाजवादी शक्तींनीही परिवर्तनासाठी काही केलं आहे–**

तो म्हणाला, 'त्यांच्यात काम कुणी करत नाही फक्त बोलत असतात. त्यांच्या बोलण्याच्या अगदी विरुद्ध वागणं असतं. एक बाबा आमटे काम करतात, बाकी सगळी मंडळी पुण्या–मुंबईला बसून प्रसिद्धीचं रॅकेट चालवतात. ही माणसं फार ढोंगी आहेत अशी आमच्यात भावना आहे.'

समाजवादी–डाव्यांचा उपहास करण्याच्या मूडमध्ये मिष्किलपणे प्रदीप म्हणतो, 'ही पुरोगामी पोरं तशी निरुपद्रवी असतात रे! जिमखान्यावरची, चांगल्या वस्तीतली ही पोरं थोडी जाणती झाली की–काही मुलींच्या मागे लागतात, काही सिनेमा–नाटक–कला करतात, आणि काहींना पुरोगामी-मार्क्सवादाचा नाद लागतो. ती अवस्था आलेली पोरं हॉटेलमध्ये वगैरे अशी ऽऽ चेहरे करून बसतात. हे दोन-अडीच वर्ष टिकतं. मग परत नित्यनेमानं ही पोटा–पाण्याला लागतात, बापाच्या धंद्यात जातात...अरे, यांच्या हातनं काही होत नाही. म्हणून मी आमच्या पोरांना म्हणतो की त्यांना काही करू नका, उगीच हिरो बनवू नका.'

'आणि एक सांगू–ही समाजवादी म्हणवणारी मंडळी फार हेकट असतात. आपल्याच संघटनेत थोडे वेगळे विचार असलेले त्यांना खपतच नाही. लोकशाहीचं spirit च तिथं नाही.'

**इथं पतितपावन संघटनेच्या दंडेलीच्या संदर्भात बोलणं आवश्यक होतं. एखादी गोष्ट आपल्याला पटली नाही की, लगाव तडाखा, क्रूर हाणामारी पसरवा दहशत हा काय नवा ट्रेंड आहे? असं मी विचारलं.**

प्रदीप त्याच मूडमध्ये म्हणाला, 'प्रत्येक ठिकाणी आपणच मार खायचा. लोक काय म्हणतील म्हणून गप्प बसायचं असं का व्हावं? आजपर्यंत इथले कोणतेही प्रश्न सुटले ते हिंदूंचे नुकसान करूनच सुटले. आम्ही काहीच करू शकत नाही असं इतरांना वाटू नये. त्यासाठी हा Deterrent आहे. विचारसरणी वगैरेमध्ये आमची मुलं फारशी जात नाहीत. अयोग्य, अन्याय्य काही दिसलं की त्याच्याविरुद्ध समर्थपणे आपण लढलं पाहिजे. तशी दहशत दुसऱ्या बाजूस निर्माण व्हावी. इथल्या देशाच्या, संस्कृतीच्या व समाजाच्या हिताविरोधी कुणी कसंही वागत असला तर आम्ही पुढे येतोच. मग तो प्रश्न वैयक्तिक किंवा सामूहिक स्वरूपाचा असो.'

□

प्रदीप रावतचा सगळा विचार हा व्यवहाराच्या पातळीवरून होत असल्याचं सतत जाणवत होतं. कितीही आदर्शवादी झालो तरी आपलं अस्तित्व हे दुसऱ्यांच्या वर्तनावरही अवलंबून आहे. त्यामुळें इतर मंडळी जाणूनबुजून जातीय–धार्मिक पवित्रे घेऊन आपल्यावर हल्ले चढवत असतील तर आपणही आपला रंग चढवून, आधुनिक काळाशी जुळवून घेत झगडलं पाहिजे या प्रवृत्तीचं प्रतिनिधित्व करतो. लोकमान्य टिळकांच्या दृष्टिकोनातून ही भूमिका विकसित झाली आहे. संघर्ष ही कार्यपद्धती स्वीकारून बाकी समाजाला आरोपीच्या पिंजऱ्यात उभं करायचं ही प्रवृत्ती समाजाच्या प्रगतीला घातक आहे. सर्वांना अनुकूल करून घेऊन, सर्वांच्या सहभागाने पुढं जाणं हे आजच्या तयाकथित पुरोगामी संघटनांना मान्यच नाही. असं प्रदीपचं मत आहे.


या 'तयाकथित' पुरोगामी शक्तींनी देशातल्या राष्ट्रवादी शक्तींचं खरं मूल्यमापन कधीच केलं नाही. राष्ट्रवाद म्हणजे परिवर्तनाला विरोध या संशयातच त्या असतात अशी त्याची तक्रार असते.

यासाठी मतभेद मिटवून, उद्योग–विज्ञान यांनी 'भौतिक प्रगती' साधून बळकट व्हावे तरच आपलं अस्तित्व टिकेल हा परिवर्तनाचा सावरकरी पैलू आहे.

पतितपावन संघटनेचं मनगटशाहीचं स्वरूप थोडं बाजूला ठेवलं तरी परिवर्तनाचा एक विचार या दृष्टीनेदेखील आता तो पसरत आहे हे जाणवत राहतं. कुणाला आवडो वा न आवडो.

मुलाखत : निरंजन आगाशे



# जिथे शाळा आहे पण विद्यार्थी जातात खेकडे धरायला

विनय गुणे

सुमारे १२'×१५' ची खोली–

दारावर 'प्राथमिक आरोग्य केंद्र' असा रंग उडालेला बोर्ड.

खोलीच्या एका कोपऱ्यात जुनाट बारदानाच्या पोत्यात काही तरी भरून ठेवलेलं गाठोडं, त्याच्या शेजारी वाळलेल्या आंब्याच्या कोयींचा ढीग, दुसऱ्या कोपऱ्यात लाकूडफाटा

खोलीच्या अर्ध्या भागात एक कुडाचं मातीनं लिपलेलं पार्टिशन. त्याला लागून बाहेरच्या बाजूनं एक जुनाट, डी. डी. टी. मारल्याने पांढरे डाग पडलेलं, कुरकुरणारं टेबल. पार्टिशनच्या मागे एका कोपऱ्यात चूल, तवा, पातेलं, थाळी असला स्वयंपाकाचा सरंजाम. पत्र्याचे दोन रिकामे डबे. त्यातला एक काळा कुळकुळीत. बहुधा चुलीवर ठेवल्यानं झालेला असावा. चुलीच्या समोर पार्टिशनला लागून मोहाच्या फळांचा ढीग. एक कॉट, कांबळ अंथरलेलं. उकरलेली, उखणलेली जमीन. खोलीभर ओल भरून राहिलेली.

–टक्कल, दाढीचे खुंट वाढलेले, डोळ्यावर जाड भिंगाचा आणि रुंद काड्यांचा चष्मा, कळकट्ट पायजमा आणि कोपरी.

आदिवासी अकोले तालुक्यातल्या अलंगगडाच्या पायथ्याच्या घाटघर गावच्या शाळेचे आणि तिथल्या गुरुजींचं हे प्रथमदर्शनी झालेलं दर्शन.

दुपारी चार वाजण्याच्या सुमारास गड उतरून आम्ही घाटघरला आलो. पथारी पसरायला म्हणून चावडी, देवळाची चौकशी केली. शाळा आहे समजलं म्हणून शाळेत आलो. आपल्या रुंद दंडावर थापट्या मारत गुरुजी म्हणून सामोऱ्या आलेल्या यांना आम्ही परवा येताना एस. टी. मध्ये पाहिलेलं होतं.

पाठीवरच्या सॅक पडवीत ठेवल्या, बूट काढून पाय मोकळे केले आणि आत शाळेच्या खोलीत नजर टाकली.

दिसलेलं चित्र हे असं होतं.

दोघेजण आत खोलीत गेलो. कॉटवर बसलो. बसताक्षणी कॉटचा एक पाय फूटभर खोल जमिनीत गेला.

चार वाजलेले असूनही शाळेत मुलांचा पत्ता नव्हता. गुरुजींना विचारलं, म्हणाले, 'आले तर येतात नाही तर जातात खेकडे धरायला.'

गुरुजींच्या बोलण्यावरून वाटलं त्यांचाही फार आग्रह नसावा मुलांनी शाळेत आलंच पाहिजे असा.

सकाळी सहा वाजल्यापासून पंचवीस तीस मैलाची रपेट झालेली. तरीही तिथं फार वेळ बसवेना. गुरुजींकडून बादली घेतली. बावडीवर गेलो. एका कोपऱ्यात पाण्याचं डबकं. बाकी सगळी विहीर कोरडी ठणठणीत. गेले दोन–तीन दिवस पाऊस पडून गेलेला म्हणून एवढं तरी पाणी. इतके दिवस पाण्याचा दुष्काळच होता. गुरुजींनी दिलेला दोर पाण्यापर्यंत पोहचेना. चार सहा जणी पाण्यासाठी आलेल्या होत्याच. शेवटी राहिलेल्या मुलीला तिची बादली मागितली. काही न बोलता तिचं भरून झाल्यावर सरळ निघून गेली. शेवटी अर्ध्या विहिरीपर्यंत पायऱ्या होत्या तिथपर्यंत उतरून पाणी ओढण्यासाठी कसरत करावी लागली.

नगर जिल्ह्यातल्या अकोले तालुक्यातलं हे अगदी टोकाचं गाव. चारी बाजूने डोंगरांनी वेढलेले. गर्द हिरवीगार झाडी, कौलारू घर. असं चित्रातल्यासारखं गाव. इथून पुढच्या साम्रद नावाच्या वाडीपर्यंत एस. टी. जाते. त्याच्यापुढं रस्ता संपतो. तोही पाऊस सुरू

होईपर्यंत एक पाऊस होऊन गेला की या रस्त्यांना एस्. टी. आणायचे धाडस कोणी ड्रायव्हर करत नाही. गाडी कुठं अडकली तर लोक सरळ उतरून पायी चालू लागतात. मग फसलेल्या गाडीचे आणि त्यातल्या ड्रायव्हर कंडक्टरचे काहीही होवो.

येणारी एस. टी. हाच बाहेरच्या जगाशी संपर्क. एस्. टी. बंद झाली की अजिबात संपर्क राहात नाही. जरुरीचं काम असलच तर भरून वाहाणारे ओढे नाले पार करत पंचवीस कि. मि. वरच्या भंडारदऱ्याला जावं लागतं.

निलंगेकर मुख्यमंत्री, राजीवजींचा अमेरिका दौरा, गुजरातच राखीव जागांचं आंदोलन इ इ. हे सगळेच विषय परलोकातले असावेत इतपत ह्याचा बाह्य जगातील घडामोडीशी संपर्क (!)

इथ शाळा चालायची. मधे बंद पडली. पुन्हा ८२ च्या जूनमध्ये सुरू झाली. बरेच दिवस शाळेला शिक्षकच नव्हते. शिक्षक आले तर जागा नाही. शाळा उघड्यावर भरायची. अशा उघड्यावरच्या शाळेला पावसाळ्यात चार महिने पूर्ण सुट्टी. बाकी नियमितच्या सुट्ट्या आहेतच.

जिल्हा परिषद इथे एक 'ग्रामीण आरोग्य केंद्र' चालवते. त्यासाठी एका डॉक्टराची नेमणूक केलेली केंद्रासाठी एक खोली बांधून घेतलेली. पण त्या डॉक्टरना या केंद्रात कधी पाहिल्याच तिथला कोणीच छातीठोकपणे सांगेना.

मग अशीच कधी तरी कोणाच्याही आदेशाशिवाय उघड्यावरची शाळा या आरोग्य केंद्राच्या खोलीत भरायला (?) लागली. शाळा आणि गुरुजीची 'रेसिडेन्शिअल क्वार्टर' असा या आरोग्य केंद्राच्या जागेचा दुहेरी उपयोग सुरू झाला.

गुरुजीना विचारलं. ते याच तालुक्यातले राजूरचे. तिथं पधरा वर्ष होते. इकडं कसे विचारल्यावर म्हणाले, 'माझा विद्यार्थी सातवीच्या परीक्षेत पहिला आला. त्याना बघवेना. केली माझी बदली.' त्यांना म्हणजे कोणाला विचारल्यावर म्हणाले, 'ज्याना बघवेना ते–' फार क्रॉस घेण्यात अर्थ नव्हता. पण बोलता बोलता बरंच सांगत राहिले. 'पंचायत समितीतल्या एकान खर्चाला ५०० रु. मागितले. मी दिले नाहीत म्हणून माझी बदली केली. जिल्हा परिषदेचा शिक्षण अधिकारी जातवाला आहे; पण जात जाणत नाही.' शाळेच काय विचारल्यावर म्हणाले, 'मी रिपोर्ट केलेत, शाळेला फळा नाही, फलक नाही, नकाशे, तक्ते नाहीत. खोलीची स्थिती ही अशी. पण कोणी दखलच घेत नाहीत. तपासणीला साहेब येऊन गेले तरीही स्थितीत फरक नाही. मी तरी काय करणार.' इन्स्पेक्शनच्या शेऱ्याची वही चाळली. प्रत्येक अधिकाऱ्यानं शाळेची स्थिती चागली नसल्याचा शेरा मारलेला. पण सुधारणेसाठी काहीच हालचाल नाही.

हजेरी वहीच्या पटावर ४० विद्यार्थी, त्यात १५।१६ मुली. ८२ ला शाळा सुरू होऊनही ८५ मध्ये अजून फक्त पहिलीचा वर्ग भरतोय. ८२ सालात पहिलीत असलेले चार वर्षानंतर अजूनही त्याच इयत्तेत असावेत म्हणूनच जिल्हा परिषदेला पुढचे वर्ग सुरू करण्याची गरज भासली नसावी आणि ८२ सालात पहिल्या इयत्तेतले ८५ सालातही पहिलीच्याच वर्गात कसे असं विचारण्याची त्याना आवश्यकताही वाटली नसावी.

मुल शाळेत येत नाहीत, शाळा भरत नाही अशा कोणत्याच गोष्टीसाठी गुरुजीना काही खत वाटत असावी असं जाणवलं नाही आणि अशा आडगावात बदली करून आपल्यावर अन्याय केलाय त्याची त्यांना चीड असावी असंही नाही. अगतिकताही नाही.

काळा पडलेला डबा, मोहाची फुलं, फळाचा ढीग –हे कशासाठी हे मी गुरुजीना विचारल नव्हतं.

शाळेच इन्स्पेक्शन बुक चाळत होतो. एका अधिकाऱ्यान शेरा दिलेला– 'वृक्षारोपणाची मोहीम राबवून उद्दिष्ट पूर्ण करावे.'

हा अधिकारी इन्स्पेक्शनला खरोखरच या शाळेत आला असेल तर त्याच्या लक्षात यायला हव होत, भडारदरा सोडल्यावर सुरू होणारं जगल, हिरवेगार डोंगर, झाडाझुडपानी, लहान-मोठ्या वृक्षानी भरलेला इथला समृद्ध परिसर. इथं वृक्षारोपणाची गरज नाहीये, काम द्यायचच असेल तर ते वृक्षाच्या सरक्षणाच द्यायला हवं. होणारी तोड थांबवण्याचं द्यायला हवं. खरं तर त्याचीच आवश्यकता आहे.

अधिकारी इथं आलेच नसावेत किंवा त्याना तारतम्य नाही अस तरी कस म्हणायचं ? चूक त्याची नाही. 'वरून' आलेला आदेश फक्त त्यानी खालपर्यंत पोहचवला.

आणि त्यानाही दोष देण्यात काय हशील आहे ? वृक्षारोपण आणि संवर्धनासाठी शासनाच स्वतंत्र फॉरेस्ट खातं आहे.

इथल्या रस्त्याच्या कडेच्या फॉरेस्टच्या 'वॉच पोस्ट'चं दार ढकलून आत डोकावलो. आतल्या गायीनं थड नजरेन शिंग रोखून आमच्याकडे पाहिलं – काढता पाय घेऊन आम्ही सरळ रस्त्याला लागलो.

गावात वीज येऊन पोहोचलेली आहे. वीज येऊन किमान दोन वर्ष झालेली असावीत; पण वीज अजूनही रस्त्यावरच आहे. रस्त्यावर लावलेल्या बल्बच्या प्रकाशापेक्षा लुकलुकणाऱ्या काजव्याचा प्रकाश जास्त वाटायचा. चौकशी केली तेव्हा समजल नेहमीच व्होल्टेज नसते. असाच मिणमिणता प्रकाश देणारे बल्ब. मग वीज इथपर्यंत पोहोचविण्याचा फार्स कशासाठी ? कदाचित 'वस्ती तेथे वीज' या आपल्या वचनपूर्तीसाठी वीज इथपर्यंत पोहचवलेली असावी.

'वस्ती तेथे वीज' हे ग्रामीण जनतेच स्वप्न पुरं होण्याच्या दृष्टीने घोडदौड चालू असून आदिवासी गावाना अग्रक्रमाने वीज उपलब्ध करून देण्याचे धोरण आहे. ४१५१ पेक्षा जास्त आदिवासी गावात विजेची सोय करण्यात आली असून त्याद्वारे त्याना जास्तीत जास्त फायदा देण्यात येत आहे.

असा प्रगतीचा (?) रिपोर्ट तयार आहे.

रस्त्यावरच्या विजेच्या दिव्याची ही स्थिती मग १०० टक्के शासकीय अनुदान असूनही प्रत्येक आदिवासी घरात वीज का नाही हे विचारण्याच काहीच कारण नाही.

तर अशी ही आपल्या हरिजन, गिरिजन, आदिवासी, तळागाळातल्या जनतेच्या कल्याणासाठी राबविल्या जाणाऱ्या योजनाच्या प्रगतीची घोडदौड

स्वातंत्र्यानंतर तीस वर्षानेही साधी प्राथमिक शिक्षणाची सोय होऊ शकत नाही. आरोग्यासाठी उपचार व्यवस्था नाही. विजेच्या दिव्याचं अजूनही अप्रुप वाटाव. जंगलातून वृक्षारोपणाच्या मोहिमा राबविण्याचे आदेश दिले जातात, फॉरेस्टच्या 'वॉच पोस्ट (?)' चा गोठा म्हणून वापर केला

जातो. सगळ्याच शासकीय योजनांचा अनुभव असाच पोस्टर्स प्रसिद्धीकरता. खर्च टाकलेल्या रकमेच्या, आकड्यावरून प्रगतीचा आलेख काढला जातो. प्रत्यक्षात स्थिती मात्र शून्य !

आणि इथल्या लोकाबद्दल काय बोलावं ?

सगळ्यांच योजना फायद्याच्या असल्या तरी याचा प्रतिसाद थंड. आपली दुरावस्था ज्यांना समजत नाही त्यांच्या आणि या सुजलाम्‌-सुफलाम्‌ देशाच्या भवितव्याच भाकित करायला ज्योतिषी कशाला हवा ?

'खाटल्यावर देणाऱ्या हरी'ची वाट बघत बसलेल्या याना आपली ही दुरावस्था कशामुळ एवढी जाणं आली तरी पुरे आहे. ही जाण निर्माण करायला हवी. वनवासीचं 'कल्याण' करणाऱ्या संस्थानी एवढं केल तरी पुरे आहे. सगळेच 'मला काय त्याच?' म्हणत राहिले तर रोज गहूभर पुढ आणि तादूळभर मागे सरकणारा 'नदी' एक दिवस तळघात पडल्याशिवाय राहणार नाही.

¤

महाराष्ट्र मंत्रीमडळातील आदिवासी कल्याण राज्यमंत्री नामदार मधुकर पिचड याची भेट झाली. कोण हे मधुकर पिचड असा प्रश्न पडण्याच त्यांच्या बाबतीत खरं तर काही कारण नाही. पचायत समिती, जिल्हा परिषद, जिल्हा बँक अशा विविध सस्थावर काम केलेले, या अकोले तालुक्याचे आमदार आणि आता नामदार असलेले पिचडसाहेब चागले 'सराईत' राजकारणी आहेत.

ना पिचडसाहेब राजूरला गावी आल्याचं समजल आणि तिथे जाऊन धडकलो — सध्याकाळचे सात वाजलेले— नुकताच पाऊस पडून गेलेला.

राजूरच्या रेस्ट हाउससमोर गाडी उभी केली. चारही बाजूला डोगर, हिरवी झाडं, नागमोडी काळधाशार रस्त्याच्या एका वळणावर छोटया टेकडीवरची रेस्टहाउसची बंगली प्रकाशाने उजळलेली होती.

खाली उतरलो—बगलीच्या पॅसेजमध्येच, समोरच. वेताच्या सोफ्यावर पालथी माडी घालून पिचडसाहेब बसलेले. 'दरबार' भरलेला पन्नास शभर माणस हजेरीला आलेली. शाळकरी मुलापासून म्हाताऱ्यापर्यंत. गावचा माणूस मत्री आहे अशा आपुलकीनं साहेबाचं बोलण कौतुकान ऐकत आणि नवलाईनं न्याहाळत बसलेला तो दरबार सगळे गप्प. कोणीच बोलत नव्हतं.

आम्ही गेलो तेव्हा साहेब कोणा अधिकाऱ्याशी बोलत बसलेले. आम्ही गेल्यावर बोलणं थाबलं, परिचय सांगितला, बोलायचं म्हणालो, वेळ आहे का विचारलं. 'हे काय निवात बसलोय, बोलूया पाहिजे तेवढा वेळ' म्हणत साहेबांनी चहाची ऑर्डर दिली... आणि आपलं अधिकाऱ्याबरोबरचं बोलणं पुढे चालू ठेवलं.

'काय कामं चाललीयेत सध्या ? वृक्षारोपणाचं काय करताय ?'

'सुबाभूळ लावतोय साहेब—'

साहेबानी त्याना अडवलं. म्हणाले 'सुबाभूळ नका लावू. आपल्या आदिवासींना त्याचा उपयोग नाही, त्यापेक्षा निलगिरी लावा, आबा, काजू लावा.

आपले वातावरण कोकणासारखे आहे. तेव्हा तिथले प्रयोग इथे करा. अहवालापुरते कार्यक्रम नकोत. असं करा, तुमचा टेम्पो चार दिवसानी पाठवा. मी त्याला दापोलीला कृषी विद्यापीठावर पाठवीन...मी बोललोय त्यांच्याशी. ते मार्गदर्शन करतील, रोपे देतील साहेबांनी मागे वळून बघितलं— सेक्रेटरीन तत्परतेनं नोट केलं.'

अशी प्रत्येकाची चौकशी चालू—

आमच्याकडे वळले, मग 'दरबारा'कडे बघून मीच म्हटलं... 'याची कामं होऊ द्यात मग बसू'

साहेब हसले, 'हे असेच प्रेमानं बसलीयेत. गावात आलोय म्हणून भेटायला आलेत.' म्हणत साहेब उठले. 'कोणाकोणाची काम आहेत, एकेकानं आत या' सागून आतल्या खोलीत गेले. बहुतेकाची कामं नोकरी हवी हेच.

साहेब त्यांच्या अर्जावर शेरा मारून सेक्रेटरीकडे द्यायचे, चौकशी करायचे, एम्प्लॉयमेंटमध्ये नाव नोंदवायला सागायचे, कसं नोदवायच ते सागायचे, दहा-पधरा मिनिटात दरबार ओसरला.

'ह आता बोलूया—'

*प्रत्यक्ष बघितलेलं शाळा, प्राथमिक* आरोग्य केंद्र, वीज वाहतुकीच्या सोयी, सुविधा सरकारी खात्याची या भागातली कामे, त्यांची अमलबजावणी इ. चं दारुण चित्र त्याना ऐकवलं. 'राजूर, कोतूळ, अकोले अशी चार मोठी गावे सुधारली असतील पण या आतल्या भागातल्या, जगाशी संपर्क नसणाऱ्या माणसांचं काय ? साध्या जीवनावश्यक सोयी, सुविधा त्यांच्यापर्यंत पोहचलेल्या नाहीत. आपण त्याचे लोकप्रतिनिधी आहात—यावर काही उत्तर शोधायचा प्रयत्न झालाय ?

सगळं शात ऐकून घेतल, हसले—

'परिस्थिती तुम्ही बघितलीत, सागताय याहीपेक्षा जास्त वाईट होती. तुम्ही सागितलीत ती वस्तुस्थिती आहे. बाहेरगावाहून आलेला प्राथमिक शाळेचा शिक्षक अशा सपर्कहीन, अर्धवट गावात राहातो. त्याला या लोकाबद्दल आपुलकी नाही, आत्मीयता नाही. त्याची तिथली हजेरी फक्त शारीरिक असते, केवळ नोकरीचा पगार घेतो म्हणून हा तिथं राहतो एवढंच. मानसिकदृष्ट्या तो इथ नाही आणि म्हणूनच गेले असतील सेकडे घरायला असं तो मुलाबद्दल सागू शकतो. नोकरशाहीच धोरणही त्याला कारण आहे कोणत्याही खात्यातल्या अप्रिय माणसाला, नको असलेल्या माणसाला शिक्षा म्हणून या आमच्या डोगराळ आदिवासी भागात पाठवलं जात आणि असा शिक्षा भोगायला आलेला माणूस आमच्यासाठी काही आत्मीयतेनं करेल अशी अपेक्षा कशी ठेवायची ? त्यांच्यावर तपासणीस असला तरीही साहित्य नाही, सुविधा नाही इ. इ. या सर्व गोष्टी दुय्यम आहेत त्या उपलब्ध होतील, देता येतील, फक्त काम करणाऱ्या माणसानं आपल समजून काम करायला हवं.'

**० शिक्षा म्हणून येणारी काम करत नाहीत, चांगली माणसं यायला तयार नाहीत तेव्हा 'हे असंच चालायचं' असं म्हणून स्वस्थ बसायचं ? ही स्थिती बदलण्याच्या दृष्टीनं प्रयत्न व्हायला नको ?**

खर तर आत्मीयतेनं काम करणं हा स्वभाव असायला पाहिजे. प्रवृत्ती हवी. तरीही आम्ही एक योजना राबविणार आहोत. आदिवासी भागात काम करू इच्छिणाऱ्यासाठी 'स्पेशल इन्सेंटिव्ह' *योजना तयार केली आहे अशा भागात काम* करायला तयार असणाऱ्याला या योजनेमुळे विशेष भत्ता दिला जाणार आहे. अशा कर्मचाऱ्याला इतरापेक्षा जास्त मोबदला देण्याची

योजना आहे. जास्त मिळणाऱ्या आर्थिक लाभासाठी तरी लोक इथे आपण होऊन काम करायला तयार होतील अशी अपेक्षा आहे.

**० यातलं 'आपणहून येणं' महत्त्वाचं आहे. तसा स्थायीभाव हवा. त्यासाठी बाहेरचा माणूस इथं आणून टाकण्यापेक्षा, ज्याचं सगळं लक्ष दूरच्या घराकडेच असतं. त्याऐवजी इथला, जवळपासचा, त्याच गावातला माणूस तिथं नेमला तर ?**

– असा प्रयत्न झाला. मी पंचायत समितीवर होतो तेव्हा बघितलं त्या गावचा माणूस तिथ नेमला की तो घरचंच काम करत बसतो. कोणी त्याला बोलू शकत नाही. घरची शेती, शेतीतलं काम, गावकी, गावकीतलं राजकारण इ. इ. सर्व आणि मग ज्यासाठी नेमला ते काम तसंच. यासाठी आदिवासी भागात इथलीच माणसं, आदिवासी माणस न नेमता इतर भागातली, समाजातली चांगली पात्रता असलेली माणसं नेमली जावीत असा आग्रह आम्ही धरत आलेलो आहोत टाकाऊ ते आम्हाला देण्याची प्रवृत्ती बदलायला हवी.

**० यासाठी काही विशेष प्रयत्न ?**

– चालू आहेत, आमच्या आश्रमशाळांनी गेल्या पाच–सात वर्षांत केलेली प्रगती लक्षणीय आहे. पाच–सात वर्षांपूर्वी एस्. एस्. सी. चा शून्य टक्के लागणारा निकाल आज ३६% लागला आहे. 'शून्य ते छत्तीस' ही आमची वाटचाल दुर्लक्षणीय खासच नाही.

आमच्या भागातले १२ विद्यार्थी या वर्षी पुण्याच्या मेडिकलला गेलेत आणि इतरांपेक्षा कशातही कमी नाहीत.

माझी एक योजना आहे सगळ्या आश्रमशाळातले असे हुशार विद्यार्थी एकत्र करायचे, त्यांची एक स्वतंत्र बॅच करायची त्यांना चांगल मार्गदर्शन उपलब्ध करून द्यायच. ही तयार झालेली मुलं हे आमच्या आदिवासीत्यातल क्रीम असेल कोणत्याच क्षेत्रात ते कमी पडणार नाहीत. विविध आश्रमशाळातल्या अशा चांगल्या हुशार विद्यार्थ्यांकडे मी आठवीपासूनच लक्ष द्यायला सुचवलं आहे. या योजनेचा परिणाम निश्चितच चांगला असणार आहे

**० आपला असा अनुभव आहे, पदवीधर विद्यार्थ्याला अर्ज कसा करायचा, अेम्प्लॉयमेंटमध्ये नाव कसं नोंदवायचं इथपासून शिकवायला, सांगायला लागतं. त्यासाठी नोकरी मार्गदर्शन, व्यवसाय मार्गदर्शन त्याचबरोबर त्यासाठी प्रशिक्षण संस्था, केंद्र असायला हवं– त्या दृष्टीने प्रयत्न ?**

– आमच्या इथे 'प्रि मिलेटरी ट्रेनिंग सेंटर' आहे आणि तो आमचा प्रयोग छान यशस्वी झालाय. गेल्या वर्षी ३६ मुलाची सैन्यात आणि एकाची नेव्हीत निवड झालीये.

एस् टी. जन्मात न बघितलेला आमचा हा पोरगा जेव्हा इथून बाहेर पडतो, जग बघतो– तिथून त्याची मला येणारी पत्रं फार सुंदर असतात.

ते लिहितात– 'इथं मला बुटाचे दोन जोड आहेत, स्वतंत्र कॉट आहे, गादी आहे आणि हो, प्रत्येकाला एकेक मच्छरदाणीपण आहे–' मच्छरदाणी आयुष्यात प्रथम बघणाऱ्या त्या पोराला त्याचं अप्रूप वाटत. या पोराच्यातला कुणी गोव्याला आहे, कुणी राजस्थानला आहे, दिल्लीला आहे, आसामात आहे. उघड्या डोळ्यानं जग बघतायेत; पण ते आम्हाला विसरलेले नाहीत ही पोरं जेव्हा आपली नोकरी बजावून निवृत्तीनंतर परततील, आपल्या मुलखात येतील तेव्हा अण्णा हजारेंच्या राळेगणशिदीसारख प्रत्येक गाव आदर्श बनवल्याशिवाय राहाणार नाहीत. मला विश्वास आहे त्याचा

इथली इतर मुलं अडाणी, लाजरी बुजरी आहेत.त्याना बाहेरच जग दाखवायला हवं या वर्षातच संगमनेरला आम्ही एक आदिवासी वसतिगृह सुरू करतोय. ही मुलं तिथल्या चांगल्या शाळेत जातील. कॉलेज शिक्षणाची सोय होईल. ती 'सिव्हिलाइज्ड' बनतील

**० शाळांची स्थिती, शिक्षणाच्या दृष्टीनं चाललेले प्रयत्न, आखलेल्या योजना सगळ्यापर्यंत पोहोचलेल्या नसल्या तरी काही तरी चाललंय हेही थोडं नाही. शिक्षणाची सोय तर व्हायला हवीच आहे; त्याहीपेक्षा पण महत्त्वाची आणि तातडीची गरज आरोग्याची सेवा उपलब्ध करून देणं ही आहे इथली आरोग्य केंद्रं फक्त अहवालापुरतीच आहेत त्यांची स्थिती सुधारायला हवी.**

– जिल्हा परिषदेन आरोग्य केंद्र सुरू केल तरी काम करणाऱ्या डॉक्टरना कामाविषयी प्रामाणिक आत्मीयता हवी. सेवा करायला म्हणून आपण इथं आलेलो आहोत हे जाणून काम केल तर 'इथ डॉक्टर कधी असतच नाही.'

अस सांगण्याची वेळ आमच्यावर येणार नाही आणि हे काम कान धरून थोडंच होणार आहे– ? तरीही परिणामकारक अमलबजावणीसाठी जिल्हा परिषदेचं व्यवस्थापन कमी पडतं हे कबुलच आहे.

त्यासाठी प्रवृत्ती हवी, दृष्टी हवी–

**० सेवाभावी प्रवृत्ती असणं हा स्थायीभाव आहे आणि अशी प्रवृत्ती असलेली माणसं तयार कशी होणार ?**

– प्रवृत्ती ही मुळात असावी लागते हे खरच आहे. त्याचबरोबर जास्त लाभाच्या आशेनं माणूस काम करायला तयार होतो आणि त्यान थोड्या जरी प्रामाणिकपणे काम केलं तरी आमच्या या 'वेड्या' आदिवासीबद्दल त्याला प्रेम निर्माण होईल. त्यासाठी जादा इन्सेंटिव्ह ही एक योजना. आणखी योजना आम्ही राबविणार आहोत. कोणत्याही भागातला, कोणत्याही खात्यातला कोणताही सक्षम अधिकारी, कर्मचारी जर स्वेच्छेने आदिवासी भागात काम करायची तयारी दाखवेल अशांना आम्ही त्यांच्या सेवानिवृत्तीच्या मर्यादेत वाढ करून ती वाढ वर्षे या भागात काम करण्यासाठी पाठविणार आहोत. असेच उपाय योजावे लागणार आहेत. त्यातूनच काही घडण्याची शक्यता आहे.

**० इथल्या लोकांच्या प्राथमिक गरजा तर भागायला हव्यातच; पण त्याबरोबर इथली माणसं स्वयंपूर्ण व्हायला हवी. स्वतःचं भलं–बुरं घडवायची इच्छा, शक्ती त्यांच्यात निर्माण व्हायला व्हवी. पिढीजात तुटपुंजी शेती हाच एकमेव व्यवसाय करण्याऐवजी काही जोड उत्पन्नाची साधनं निर्माण करण्याची काही योजना ?**

– आमच्या तालुक्यात दूध व्यवसाय चांगलाच वाढला आहे. अकोल्याला शासकीय दूध शीतकरण केंद्र आहे. रोज हजारो लिटर दूध तालुक्यातून गोळा केलं जातं. इथल्या लोकांना हा एक चागला जोडधंदा मिळालेला आहे. या तालुक्याची पार्श्वभूमी कोकणसारखी आहे. त्यामुळ कोकणातले प्रयोग इथं यशस्वी होऊ शकतात आजपर्यंत आमच्या लोकानी भातच लावला, नाचणीच

केली. इथं मोठ्या प्रमाणावर फळबागा उभ्या राहू शकतात. म्हणून आंबा, काजू, फणस यांची लागवड व्हावी असा प्रयत्न आहे. त्यासाठी एक योजना आमच्या विचाराधीन आहे. रोजगार हमीच्या त्याच त्या ठराविक कार्यक्रमावर पैसा खर्च करण्यापेक्षा आणि आवश्यकता नसताना केवळ रोजगार पुरविण्यासाठी कामे काढण्यापेक्षा त्या पैशाचा चांगला उपयोग करण्यासाठी प्रत्येकाला आपल्या शेतीतच काम द्यायचे, त्याने या फळबागा आपल्या शेतात लावायच्या, जगवायच्या, वाढवायच्या. त्याला रोपेही आम्ही पुरविणार. आज या आदिवासी शेतकऱ्याला कामही मिळेल आणि भविष्यासाठी उत्पन्नाची तरतुदही होईल.

या रोजगार हमीद्वारे राबविण्यासाठी आणखीही योजना आम्ही तयार करत आहोत. आमच्या आदिवासींची घरं या योजनेतून उभारायची. रोजगार हमी, शासकीय अनुदान यातून यासाठी निधी उभारणार आहोत.

**० आपण अकोले तालुक्यात लोकप्रतिनिधि असलात तरी राज्याचे आदिवासी कल्याण खाते आपल्याकडे आहे, त्या दृष्टीनं इतर भागातल्या आदिवासींची स्थिती त्यासाठी काही खास योजना कार्यान्वित करण्याचे धोरण ?**

— आपल्याकडची स्थिती फार चांगली असं वाटावं अशी चंद्रपूर, गडचिरोली या जिल्ह्यातली स्थिती आहे. मी त्या जिल्ह्यांचा पालकमंत्री आहे. तिथं भेट द्यायला गेलो होतो. वाहन जाऊ शकत नाही अशा आतल्या भागात १६ मैल चालत गेलो. आमच्यासारखा 'सिव्हिलाइज्ड' माणसांना पहिल्यांदा बघितल्यासारखा त्या लोकांचा आविर्भाव. झाडावर राहणारी, कंद, कच्चं मांस खाणारी, वस्त्राविषयी बेफिकीर माणसं मी बघत होतो. तिथं आम्ही बरोबर नेलेले पदार्थ, कपडे वाटप केले.

नवीन वाटलेले कपडे घालून आलेली समोरची माणसं पाहून बरोबरचे लोक हसायला लागले-पुरुष परकर आणि साड्या गुंडाळून आलेले.

ते बघितलं आणि माझ्या डोळ्यात पाणी आलं.

अशीही माणसं या देशात, राज्यात, आपल्या प्रदेशात आहेत.

खूप करायचं आहे, करावं लागणार आहे कसं आणि काय करू अशी अवस्था असली तरी सगळ्यांना बरोबर घेऊन, समजावून, पटवून बरोबर न्यायचंय. नोकरशाहीच्या रुळलेल्या चाकोरीतून योजना जाणार. त्यामुळे अपेक्षित वेग असणार नाही; पण काही करून दाखवण्याची जिद्द, तयारी निश्चित आहे–भविष्याविषयी आम्ही आशावादी आहोत.

¤

नंतर किती तरी वेळ बोलत होतो—

शाळा व्यवस्थित चालावी, मुलांनी शाळेत जावं, पालकांनी त्यांना धाडावं, या आणि अशासाठी, शासकीय योजना लोकांपर्यंत पोहचविण्यासाठी कार्यकर्त्यांची साखळी हवी, पगारी कर्मचारी हे करणार नाहीत. नियंत्रणाची आणि मार्गदर्शनाची कामं या कार्यकर्त्यांनी, त्या त्या गावच्या 'मुखियांनी' करायला हवीत, तशी काही यंत्रणा आज अस्तित्वात नाही पिचडसाहेबांना विचारलं. आवश्यकता पटते; पण 'दृष्टी असलेले' कार्यकर्ते कसे तयार करणार हा त्यांच्याही पुढं प्रश्न आहे.

बोलता बोलता त्यांनी सांगितलं— 'पंतप्रधान राजीवजी या महिन्यात महाराष्ट्रातल्या आदिवासी भागाचा दौरा करणार आहेत. मी त्यांना या भागातल्या सगळ्या समस्या जिथं हजर आहेत असं गाव निवडावं असं सुचवेन. समस्या अडचणी समजल्या तरच त्यावर उपाय, उत्तर शोधण्याचा प्रयत्न होणार आहे. उगीच प्रगतीचा आभास निर्माण करण्यात काय हशील आहे ?'

याच अकोले तालुक्यात पाडळण्याला 'विश्व हिंदु परिषद' एक वसतिगृह चालवते. बाहेरची माणसं येऊन इथल्या लोकांसाठी काही करू इच्छितात. काम करण्याची प्रवृत्ती आहे, निरपेक्षपणे काम करतात. त्याला लोकांनी साथ द्यायला हवी. शासनानं हात द्यायला हवा. पाच-सात वर्षं झाली प्रयत्न करूनही अनुदान मंजूर होत नाही. राजकीय विरोध यापेक्षा वेगळं काय कारण असू शकतं ? सगळंच भलं (?) आपल्याच हातून व्हावं हा आग्रह काय कामाचा ?

पिचडसाहेबांना त्याबद्दल विचारलं. प्रश्न टाळला. पुन्हा छेडलं पण त्या विषयावर येईनात. अनिच्छा दिसली. मीही आग्रह धरला नाही.

**रात्रीचे साडेनऊ वाजून गेलेले—**

जवळजवळ दोन तास पिचडसाहेब बोलत होते.

मधेच दोन–तीनदा पावसाची भुरभुर येऊन गेली. गार वारं झोंबायला लागलं.

निरोप घेतला— निघालो—

ऐकलेल्या योजना राबवल्या जातील, जाणार नाहीत. कधी, केव्हा माहीत नाही. निदान मधुकर पिचड नावाचा त्यांचा प्रतिनिधी असलेला मंत्री परिस्थिती जाणतो, अडचणी, प्रांजळपणे सांगतो, वस्तुस्थिती मान्य करतो. लोकांच्या भवितव्याचा, कल्याणाचा, विकासाचा विचार करतो हे थोडं नाही. □


प्रतिकूल निसर्ग
जीवघेणी उपासमार
सहकाऱ्यांचे मृत्यू
भयाण एकाकीपणा, त्यावर
मात करून, चार हजार मैलांची
पायपीट करून ते कैदी
भारतात पोचले.
कसे ?
दुसऱ्या महायुद्धातील
एक चित्तथरारक पलायन कथा.

मला निसटलंच पाहिजे !

अनुवाद : श्रीकांत लागू
वीस रुपये

राजहंस प्रकाशन
१०२५ सदाशिव पेठ, पुणे ४११ ०३०

# हा पहा
# तुमचा विश्वासू सुहृद
# आयुर्विमा प्रतिनिधि

तुमच्या खास व्यक्तिगत व कौटुंबिक गरजा ध्यानांत ठेवून त्यांच्या परिपूर्तिसाठीं बहुविध आकर्षक आयुर्विमा योजनांमधून योग्य ती निवडण्यास मदत करण्यासाठी कोणत्याही प्रकारच्या परतफेडीची अपेक्षा न करतां केवळ कर्तव्यबुद्धिने प्रेरित होऊन आपला अनुभवसिद्ध सल्ला देणारा असा हा तुमचा एक मित्र!



बऱ्याचशा भावी व सांप्रतच्या पॉलिसीधारकांना त्यांच्या मुलाचे शिक्षण, लग्न, त्याला स्वतःच्या बळावर उभे राहाण्यासाठी लागणारे भांडवल, सेवानिवृत्ति इत्यादि बाबींची सुनियोजित आखणी करण्यासाठी थोडक्यांत सांगायचे तर प्रत्येक कुटुंबाच्या विवक्षित गरजा लक्षांत घेऊन मर्यादित उत्पन्नात अधिकाधिक फायदेशीर व सुनियोजित पावले उचलून गरजांची परिपूर्ति करण्यासाठी, तुमच्या सदरहू मित्राचा सल्ला फारच मोलाचा वाटत आलाय!



आयुर्विम्याच्या माध्यमा द्वारे आर्थिक नियोजन साधण्यात आयुर्विमा-प्रतिनिधी तज्ज्ञ मानला गेलाय!

सेवा तत्परतेपोटी आपल्यापासून जवळच्या परिसरांत योग्य ते कागदपत्र व संदर्भ-पूरक दस्तऐवज युक्त असे स्वतः चे थाटलेले कार्यालयहि बऱ्याच जणांच्या बाबतीत आढळून येते.

सध्या देशभर अडीच कोटीच्यावर आयुर्विमा पॉलिसीज असून लक्षावधि कुटुंबांना आयुर्विमा प्रतिनिधि केवळ आपत्कालीन मित्रच नव्हे तर खराखुरा कर्तव्यदक्ष सुहृद वाटतो.

**लाइफ इन्शुअरन्स कॉर्पोरेशन ऑफ इन्डिया**

१९८५–८६ आयुर्विमा महामंडळाचे प्रतिनिधि वर्ष

EP/LIC/253-85 MAR